म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भूगोल
सं. क्र. ८६५

REFBK-0027378

REFBK-0027378

आठवणी दाटतात

डॉ. प्रकाश वा. कवळी

REFBK-0027378

REFBK-0027378

सलील प्रकाशन

प्रकाशक

सौ. सुनिला प्रकाश कवळी
सलील प्रकाशन
कवळी (एकविरा अपार्टमेंटस्)
३६९ वीर सावरकर मार्ग
दादर - मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी क्रमांक - ४३०१८९४

मुद्रक

मे. इंप्रेशन्स
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर
गोंधळी गल्ली क्रॉस रोड
बेळगाव - ५९० ००२
कर्नाटक राज्य
दूरध्वनी क्रमांक : २१३०९

प्रथमावृत्ती : १२ डिसेंबर १९९३

© सौ. सुनिला प्रकाश कवळी

मुखपृष्ठ

श्री. उल्हास चुरी व श्री. नवीन पटेल, कॅमेरा आर्टस्
· माहीम, मुंबई - ४०० ०१६

मूल्य : ८० रुपये

ज्या अंधास दृष्टी नाही त्यांना सृष्टीसौंदर्य कसे पहाण्यास मिळणार! म्हणूनच मी सुदैवी आहे की ज्या ईश्वराने मला डोळे दिले आणि मी हा प्रदीर्घ प्रवास करू शकलो! पण प्रत्येक वेळेस आठवण येत होती ती त्या अंधांची!

म्हणूनच माझ्या अंध बांधवांस हे प्रवासवर्णन मनापासून सादर अर्पण!

डॉ प्रकाश वा. कवळी

आभार

लेखनाला मला शब्दांची उणीव कधीच भासली नाही. पण ह्या सदराखाली कोणाचे आभार कसे आणि कधी मानायचे खरंच कळत नाही! ज्यांनी मला लेखन करण्यास उत्तेजन दिले ते माझे पेशंट मित्र श्री. मनोहर रणपिसे ह्यांचे प्रथम की ज्यांनी माझे पहिले नाटक वाचून 'हॅटस् ऑफ टू यू!' असे म्हणून माझ्या हृदयात घर केले त्या... खरंच काही कळत नाही. मला सतत लेखनिक म्हणून सुंदर अक्षराची जाण असलेल्या श्री. रविंद्र नातू ह्यांना मी कसा विसरू? तरीपण ह्या प्रवासवर्णनात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मी कधीच विसरणार नाही. ह्या प्रवासवर्णनाची हस्तलिखिते वाचून ज्या सुप्रसिद्ध लेखक श्री. मधु मंगेश कर्णिकांनी मला 'गो अहेड' म्हणून सांगितले त्यांचाही मी मनापासून आभारी आहे. तसेच वेळात वेळ काढून मला प्रस्तावना व उत्तेजन देणारे डॉ. सुभाष भेंडे. मला जगामध्ये अनेक ठिकाणी नवीन ओळखी करून देणारे माझे परमपूज्य पेशंट, गायक, संगीत दिग्दर्शक श्री. सुधीर फडके ह्या सर्वांचे खरंच अगदी अगदी शब्दांपलीकडे आभार मानावे लागतील !

मला आपला अमूल्य वेळ देऊन ज्यांनी व्यंगचित्रे काढून दिली त्या श्री. प्रकाश कवळी (पण तो मी नव्हे!) कुमारी सोनल हेळेकर व मानस दादरकर ह्यांचाही मनापासून आभारी. असे अनेकजण आणि त्यापैकी तुम्ही एक जे माझे प्रवासवर्णन वाचणार आहात! वाचून जर आवडले तर कळवा जरूर.

काही व्यक्ती येतात हृदयात घर करतात आणि भुरकन उडून जातात. पण हृदयात राहिलेल्या त्यांच्या आठवणी जेव्हा उचंबळून येतात तेव्हा त्या अगदी हृदयात दाटतात. म्हणूनच ज्या व्यक्ती माझ्या आयुष्यात आल्या आणि आठवणी रूपाने हृदयात राहिल्या त्या सर्वांचे आभार !

डॉ. प्रकाश वा. कवळी

अनुक्रमणिका

पृष्ठ क्र.

१) कोकण कोयनाचा प्रवास १

२) परदेश प्रवासाची पूर्वतयारी ७

३) भुरळ घालणारे बँकॉक ३६

४) रमणीय सिंगापूर ४०

५) अविस्मरणीय हाँगकाँग.....६०

६) महागडे शिस्तप्रिय टोकियो ७७

७) निसर्गाचा अविष्कार होनोलुलू.....८७

८) गजबजलेले शहर - सॅन फ्रान्सिस्को ९७

९) निसर्गाने मढलेले सिएटल.....११५

१०) सर्वांगसुंदर लॉस एन्जलिस १३१

११) वैज्ञानिकांचे आगर ह्यूस्टन १५२

१२) पुन्हा पुन्हा पहावे असे ओरलँडो १५६

१३) दि ग्रेट शिकागो.....१६१

१४) मोटारगाड्यांचे आगर डेट्रॉईट १६६

१५) अतिसुंदर शहर टोरोंटो १७०

१६) आवडते बाल्टीमोर-वॉशिंग्टन १८४

१७) ऐतिहासिक फिलाडेल्फिया १९०

१८) भव्य शहर न्यूयॉर्क १९३

१९) आमची आवडती लाडकी मुंबई.....२०८

प्रस्तावना

ज्येष्ठ पत्रकार श्री. वि. स. वाळिंबे मागे पुण्याला 'मॅजेस्टिक गप्पांमध्ये मुलाखत देताना म्हणाले होते -'वर्तमानपत्रातली नोकरी ही नदीच्या प्रवाहासारखी असते. तीत *माणसाला ताजेपणा मिळतो, जागरूकता येते आणि या नोकरीने* माणूस बहुश्रुतही होतो-! मनात आलं, सर्वांना काही पत्रकार होणं शक्य नाही, पण पत्रकार होण्याचे जे फायदे असतात ते मात्र मिळवणं शक्य आहे. प्रवास करून! मन टवटवीत प्रसन्न रहावं, बहुश्रुतपणा अंगी यावा यासाठी माणसानं जमेल तेव्हा, जमेल तितका प्रवास केला पाहिजे. त्यात पुन्हा परदेश प्रवास करायची संधी मिळाली तर ती मुळीच सोडू नये. बेग बॉरो ऑर स्टील, यापैकी एखाद्या मार्गाने पैसे गोळा करावेत आणि खुशाल विलायतेला प्रस्थान ठेवावं!

याचं कारण असं की परदेश प्रवासात माणसाला अनेक चित्रविचित्र अनुभव येतात. हातात भरपूर डॉलर्स असतातच असं नाही, त्यामुळे धनिक बाळालाही अंथरूण पाहूनच पाय पसरावे लागतात! आपल्याला तिथं रोजच्या सवयीच्या गोष्टी मिळत नाहीत. माझा एक मित्र परदेशी जायला तयार नाही, केवळ तिथं आपल्या पद्धतीचं 'टॉयलेट' मिळणार नाही ह्या भीतीनं! युरोपमध्ये प्यायला पाणी मिळत नाही अन् ऊठसूठ टिश्यूपेपर वापरावे लागतात ह्या गोष्टीलाही काही नतद्रष्ट घाबरतात! तिथे आपल्याला हवे ते पदार्थ खायला मिळणार नाहीत, उपाशी रहावं लागेल अशीही अनेकांना काळजी वाटत असते! 'ॲडजस्टमेंट' करायची कोणत्याही प्रसंगाला तोंड द्यायची तयारी असल्याशिवाय परदेशप्रवासाचे बेत आखू नयेत!

माझे मित्र डॉ. प्रकाश कवळी जगप्रवासी व्हायला लायक आहेत, कारण प्रवासात मिळणारा निर्भेळ आनंद ते भरभरून घेतात आणि त्यासाठी सर्व प्रकारची 'ॲडजस्टमेंट' करायला एका पायावर सिद्ध असतात. स्व-खर्चाने सहकुटुंब परदेशप्रवास करण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते. आवड, सवड आणि पैसे! आवड असली की माणूस सवड काढतो. पेशानं डॉक्टर असल्यानं आणि 'पेशंट प्रिय' असल्यानं पैशाची ददात नसावी (असा माझा कयास आहे!). हौसेला मोल नसतं, त्यामुळे प्रवासाच्या संदर्भात, डॉक्टर पै-पैशाची काळजी करणाऱ्यांतले नाहीत, डॉक्टरना जे ओळखतात त्यांना त्यांचा गोष्टीवेल्हाळपणा चांगलाच परिचित असणार! मुखदुर्बळ डॉक्टर्स पेशंट मंडळीत अप्रिय असतात. पेशंटस् त्यांच्या व त्यांच्या दवाखान्यात जात नाहीत!

डॉ. कवळी यांचा पेशंटवर्ग मोठा आहे व जगभर पसरलेला आहे. आपली पत्नी सौ. सुनीला, मुलगा सलील व मुलगी मृगया यांच्यासह ते जेव्हा परदेश प्रवासाला निघाले तेव्हा त्यांच्या मित्रानं त्यांना इशारा दिला-'तुम्हाला तुमच्या पेशंटस्नी, मित्रांनी कितीही आग्रहानं तिथं बोलावलेलं असलं, कितीही आश्वासनं दिलेली असली तरी कुणावर विसंबून राहू नकोस! आपल्या वेळेला कोणीही मदत करीत नाहीत-!' पण डॉ. कवळींना उलटा अनुभव आला. ओळखीच्या मंडळींनी त्यांचं मनापासून स्वागत केलंच पण ऐनवेळी भेटलेल्या अनेक अपरिचितांनी त्यांना अनपेक्षितपणे मदतीचा हात दिला.

माणसं जोडण्याचं कसब डॉ. कवळी ह्यांच्याकडून डेल कार्नेजी यांनीसुद्धा शिकायला हरकत नाही! स्वतः डॉक्टरांनी हे रहस्य उलगडून दाखविले आहे. 'शिकागो' प्रकरणाच्या प्रारंभी ते म्हणतात -' 'कोणत्याही माणसाला आपलासा करण्यासाठी, पहिल्या भेटीत त्याच्या आवडी विषयी माहिती करून घ्यायची, त्यातील ज्या आवडीबाबत त्याचे व माझे ज़मत असेल त्यावरच बोलायचे किंवा त्याबाबत इंटरेस्ट दाखवायचा! यामुळे माणसे फार लौकर जोडली जातात. माणसांना एकमेकांबद्दल प्रेम निर्माण होते. ह्या प्रेमाची शिदोरी बरोबर असली की कोणताही प्रवास मग तो कितीही अवघड असो सुखकर होतो. ह्यासाठी आपला स्वभाव बोलका हवाच! एखाद्या बाबतीत आपले पटत नसेल तरी तेवढ्यापुरत्या आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवण्याची तयारी हवी. ' डॉक्टरांनी दिलेला हा मंत्र प्रवास करू इच्छिणाऱ्यांनी जरूर ध्यानात ठेवावा. परिणामी त्यांचा प्रवास निश्चितच सुफल संपूर्ण होईल.

'आठवणी दाटतात' हे डॉक्टरांचे पुस्तक म्हणजे त्यांनी बँकॉक, सिंगापूर, हाँगकाँग, टोकियो, कॅनडा, अमेरिकेतील अनेक शहरे यांना जी धावती भेट दिली त्याचं धावतं वर्णन आहे. मुंबईला परतल्यावर आपण केलेल्या झंझावाती दौऱ्याविषयी, परदेशी भेटलेल्या मित्रांविषयी, त्यांनी दाखविलेली माणुसकी आणि मनःपूर्वक केलेले आदरातिथ्य या विषयी अनेक आठवणी त्यांच्या मनात गोळा झाल्या. आणि आपला पेशा व गोष्टीवेल्हाळपणा सांभाळून, त्यातून कसाबसा वेळ काढून त्यांनी प्रवास वर्णन लिहून काढलं. डॉ. कवळी काही वेगळं सांगत नाहीत, एखाद्या स्थळापाशी फार वेळ रेंगाळत नाहीत, प्रेक्षणीय स्थळ पाहताना मनात उचंबळून येणाऱ्या विचारांना ते शब्दरूप देत नाहीत. आपली पत्नी, मुलं, ठिकठिकाणी भेटणारे परिचित, नातेवाईक ह्यांच्यात ते अधिक रमतात. कुठं काय खाल्लं, कुणी कसं स्वागत केलं याचं तपशीलवार वर्णन करतात. हे करताना परिचित-अपरिचित व्यक्तींची लेखणीच्या चार फटकाऱ्यांनी

उभी केलेली शब्दचित्रे लक्षात राहतात. मृगयाने सांभाळून आणलेल्या टेडी बेअरचा किस्सा वाचनीय झाला आहे.

परदेशामधील झगमगाट आणि लखलखाट पाहून डॉक्टर साहेबांचे डोळे दिपलेले नाहीत. आपल्या देशातली माणुसकी अन् आपुलकी याचे त्यांना अप्रूप आहे..आपल्या देशाबद्दल त्यांना अनिवार ओढ आहे. परदेशात अगदी नंदनवन असलं, तरी ते आठवणी दाटण्यापुरतं शेवटी 'गड्या आपुला गाव बरा' हेच खरं!

डॉक्टरांच्या ह्या वाचनीय प्रवासवर्णनाचा हाच संदेश आहे.

डॉ. सुभाष भेण्डे
साहित्य सहवास
मुंबई ५१
७ मे १९९३.

प्रिय डॉ. प्रकाश कवळी यांसी

स्नेहपूर्वक नमस्कार, वि. वि.

तुम्ही अगत्याने पाठविलेली तुमच्या प्रवास वर्णनाची हस्तलिखिते मी लगेचच वाचून काढली. प्रवासवर्णन, स्थलवर्णन, आत्मचरित्र, चरित्र हे विषय माझ्या विशेष आवडीचे हे एक कारण व तुमच्या लिहिण्यातली वाचनीयता, यामुळे मी वाचायला लगेचच सुरुवात केली आणि अक्षरशः ती दोन्ही बाडे मी वाचून पूर्ण झाल्यानंतरच खाली ठेवली!

तुम्ही लिहिलेली कादंबरी मी पूर्वी वाचली होती! शिवाय तुमचे संकीर्ण लेखनही यापूर्वी वाचनात आले होते. परंतु हे प्रदीर्घ प्रवासवर्णन मी प्रथमच वाचत होतो. सांगावयास आनंद वाटतो की, तुम्ही व्यवसायाने वैद्यकीय क्षेत्रामध्ये नाव कमाविलेले आहे, तसेच नाव तुम्ही साहित्य क्षेत्रामध्ये कमावू शकाल, असा दिलासा देणारे हे प्रवासवर्णन तुमच्या लेखणीतून उतरले आहे. कोणत्याही साहित्याची प्राथमिक गुणवत्ता म्हणजे त्याची वाचनीयता! तो गुण तर तुम्ही प्रकर्षाने प्रगट केलेला आहे. परंतु हे प्रवासवर्णन केवळ तेवढ्यापुरतेच मला आवडलेले नाही, तर त्यातील तुमची पर्यटकाची रसिकता, प्रसन्न मनोवृत्ती, प्रत्येक नवी गोष्ट लहान मुलाच्या कुतूहलाने, निरागस कौतुकाने व्यक्त करण्याची तुमची हौस आणि पाहिले ते सर्व अतिशय चित्तवेधक पद्धतीने कथन करण्याची शैली हे सारे या लेखनामध्ये उत्कृष्टरित्या प्रतिबिंबित झालेले आहे. मला तुमची अनौपचारिक लेखन पद्धतीही विशेष वाटली! थेट पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि ते सुंदरपणे इतरांना सांगितले याबद्दल तुम्हाला धन्यवाद द्यावेत तितके थोडेच होतील.

तुम्ही मुद्दाम उल्लेख केलेले 'सिएटल' बद्दलचे चित्रण वाचले. ते तर फारच चित्ताकर्षक उतरले आहे. तुम्ही सौ. सुनीलाताई व तुमची मुले या सर्वांची व्यक्तिचित्रेही नकळत तुमच्या लेखणीतून उतरली आहेत. तीही तेवढीच सुरेख आहेत.

तुमच्या लेखनप्रवासास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

कळावे,

तुमचा स्नेहांकित

'मार्व्हल'शास्त्री नगर
अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.

मधू मंगेश कर्णिक.

मनोगत एका प्रवाशाचे

लहानपणापासून मला निसर्गाची अतिशय आवड, पाचवी सहावी इयत्तेत असताना आमच्या घराच्या गच्चीवर मी छोटीशी बाग केली होती. अनेक झाडांच्या बिया मी गच्चीतल्या कुंड्यातून पेरत असे. त्यातून फुटणारे कोंब, व त्यांना येणारी फुले पहाटे लवकर उठून पाहण्यात मला आनंद वाटे. गच्चीच्या एका कोपऱ्यात माती टाकून त्यात भात लावण्याचा प्रयत्नही एकदोन वर्षे मी केला. त्या भाताला आलेल्या सुंदर लोंब्या पाहून जो आनंद झाला तो काय वर्णावा!

पहाटे उठून घरासमोरील पारिजातकाची फुले गोळा करणे मला आवडायचे. रात्री अंगणात फुललेल्या रातराणीच्या वासाने अगदी मोहरून जात असे मी! पहिल्या पावसाने अंगणातल्या ओल्या मातीचा गंध अजूनही मला भुरळ घालतो.

अभ्यास आटोपून वडिलांच्या मांडीवर डोके टेकून मी आकाशाकडे बघत राही. माडांच्या आडून दिसणारा चंद्र, लुकलुकणाऱ्या चांदण्या, पाहून माझे भान हरपत असे. त्या चांदण्यांच्या रांगोळीत लुकलुकणारा एखादा तारा हळूहळू पुढे सरकताना दिसायचा! अरे, हे तर विमान! वाटायचं, त्या विमानातील प्रवासी किती नशीबवान! रोज नवीन शहरे, रोज नवीन देश त्यांना पहायला मिळतात म्हणून अगदी हेवा वाटायचा त्यांचा! आपणही असेच विमानात बसून नवीन नवीन देश बघावे असे वाटायचे.

दादर चौपाटीवर सूर्यास्ताचे वेळी तो लालबुंद सूर्य अथांग सागरात खाली खाली उतरताना पहावयास मिळे. सूर्याला क्षितिजापलीकडे जाताना पाहून, क्षितिजापलीकडे काय असेल ह्याची उत्सुकता वाटायची.

मुंबई-पुणे प्रवास किती वेळा केला ह्याची गणतीच नाही! आगगाडीने आणि मोटारीने सुद्धा! आगगाडीने जाताना खिडकीजवळची जागा पटकावून, नाहीतर दरवाजात बसून, सृष्टी सौंदर्य पाहण्यात फारच मजा वाटायची! पावसाळ्यात तर शेजारच्या प्रवाशाची नाराजी पत्करूनही, खिडकी उघडी ठेवून पावसाचे शिंतोडे आणि ढग अंगावर घेण्यात अजूनही मजा वाटते. 'मुंबई-पुणे प्रवास चिटुकला असला तरी प्रत्येक वेळचा अनुभव निराळा! गाडीत मिळणारी जागा, शेजारचे सहप्रवासी, बाहेरचा निसर्ग-ह्याचा साजही वेगंवेगळा असतो. दरवेळी अशाच एका पुणे-मुंबई प्रवासात शेजारी बसलेल्या सुंदर तरुणीने दिलखुलास गोष्टी करून अस्मादिकाना चांगलीच भुरळ घातली होती. दादर स्टेशनवर मी उतरल्यावर, तिने गाडीतून केलेला टा टा अजूनही स्मरणात आहे माझ्या!

डॉक्टर झाल्यावर व्यवसाय पत्करला. गाडी घेतली. प्रवास करताना गाडी भन्नाट वेगाने पळविताना टेपरेकॉर्डरवर आवडती गाणी ऐकणे हा एक आवडता छंद! घाटामध्ये किंवा इतरही सुंदर जागा दिसली की गाडी उभी करून त्या सृष्टी सौंदर्याचा आस्वाद घेणे आवडते मला! म्हणून तर चतुर्भुज होताना, लांब-बेळगावकडची सौ. पसंत केली, आणि अगदी मनापासून सांगतो, लग्नाला सोळा वर्षे झाली तरी दर वर्षीची सासुरवाडची फेरी एकदाही चुकविली नाही! हां, एकदाच चुकली ते सुद्धा जगप्रवासाला गेलो म्हणून!

वेळगावच्या प्रवासात, किंवा इतर प्रवासातही, रस्त्यावरच्या मोठ्या हॉटेल पेक्षा टपरीवर स्पेशल चहाची ऑर्डर देवून, तिथल्या बाकड्यावर बसून आजूबाजूला पाहणे अत्यंत आवडीचे! रस्त्यात कधी गाडी थांबवून, चिंचा, जांभळे किंवा हुरडा खाणे तसेच एखाद्या झाडाखाली गाडी उभी करून बरोबर आणलेल्या शिदोरीवर ताव मारणे ह्यासारखी दुसरी मजा नाही! आजपर्यंत आमच्या मोटारीने कितीतरी घाट पार केले आहेत. खंडाळा, फोंडा, खंबाटकी प्रत्येक घाटाचा थाट वेगळा! भयंकर वळणे, दऱ्याखोऱ्यातून धुक्याआडचे अद्‌भूत सृष्टी सौंदर्य पाहताना अगदी मोहून जायला होते.

प्रवास म्हणजे पैशाची नाहक उधळपट्टी म्हणणारी कूपमंडूकवृत्तीची माणसे भेटली की मला अगदी गलबलायला होतं. एका वृद्ध गृहस्थांनी असाच वाद घातला. 'काय म्हणालात? तीस दिवसाला चाळीस हजार रुपये? डॉक्टर, अमेरिका बघायला एवढे पैसे खर्च करण्यापेक्षा तेच पैसे बँकेत ठेवलेले बरे!' अशा मंडळीनी सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळचे सौंदर्य पाहिलेलेच नसते. पहाटेच्या पक्षांचा किलबिलाट ऐकलेला नसतो. दररोज आणि मोफत मिळणाऱ्या ह्या आनंदाचा स्वाद घेऊ न शकणाऱ्या ह्या मंडळींची कींव येते.

शेवटी प्रवास म्हणजे तरी काय? एखाद्या स्थळाला भेट देऊन त्या ठिकाणच्या सौंदर्याचा शोध घेणे अनुभवणे, म्हणजेच सौंदर्य हुडकत पुढे पुढे जायचे! एखाद्या ठिकाणी जास्त वेळ थांबलात की त्या जागचे कुरूपपण दिसू लागते, तेथील दुर्गंध नाकात शिरू लागतो. थोडक्यात गोडी! म्हणूनच कोणाहीकडे पाहुणे म्हणून राहिलो तर त्या थोडक्या वेळात तेथील सुगंधच घ्यावयाचा. म्हणूनच माझ्या ह्या प्रवासात मला सर्वत्र सुगंधच मिळाला अगदी भरभरून!

प्रवासासाठी तीन बाबी आवश्यक आहेत. प्रथम प्रवासाची आवड, नंतर सवड, आणि शेवटी पैसा! ज्याला प्रवासाची आवडच नसेल त्याने बळजबरीने प्रवास करू नये. ज्यांना प्रवासात ऐष आरामाची अपेक्षा असेल त्यांनी आणि

प्रवासात पडतील ती कामे करण्याची तयारी नसणाऱ्यांनी प्रवासाला जाऊ नये. परदेशात हमाल नसतात हे ध्यानात ठेवावे.

प्रवास करायचा म्हणजे वेळ हा हवाच! काही व्यक्तिंना आपण कामात किती व्यग्र आहोत हे सांगण्यात मोठेपणा वाटतो. पण लक्षात ठेवा की प्रत्येकाला दिवसाचे चोवीस तास मिळतात. ह्या चोवीस तासातूनच वेळ काढून आपल्या हौशी भागवाव्या लागतात. दुपारचा किंवा रात्रीचा थोडा वेळ कमी केला तर आपल्याला जादा वेळ मिळू शकतो.

धनाची बाजू तर महत्त्वाची! तेच जर कमी असेल तर आपल्या प्रत्येक आवडीला मर्यादा पडतात हे खरे असले तरी थोडी थोडी काटकसर करून आपण आपली हौस पूरी करू शकतो. व्यसनासाठी महिना तीनशे रुपये उडविणारा, मनात आणील तर बरेच पैसे वाचवू शकतो. प्रबळ इच्छा असली तर मार्ग हा सापडतोच! दिवसेंदिवस परदेशीचा प्रवास महाग होतो आहे. आणि तो आणखी महाग होणार आहे हे विसरून चालणार नाही.

ह्या प्रवास वर्णनामध्ये मी भेट दिलेल्या शहरांचें भौगोलिक वर्णन करण्यापेक्षा माझ्या स्वत:च्या अनुभवांवर जादा भर दिला आहे. भौगोलिक माहिती आपण कधीही वाचू शकतो. ह्या बाबतीत कै. अनंत काणेकर ह्यांची दृष्टी मला पटली. प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी त्यांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे प्रवासवर्णन मी मुद्दाम वाचून काढले.

आपला प्रवास सुखरूप होण्यासाठी आपल्याला नशिबाचीही साथ लागते, हा परदेशचा प्रवास मी माझी अर्धांगिनी सौ. सुनीला, माझा मुलगा चि. सलील आणि मुलगी चि. मृगया (दोन फुल, दोन हाफ) यांना घेऊन केला! ह्या माझ्या कुटुंबियांनी मला सुंदर साथ-सोबत दिली सलील व मृगया ह्यांनी कोठेही बाल हट्ट केले नाहीत व प्रसंग ओळखून मागण्यांना आवर घातला. अगदी सामान उचलण्यापासून सर्वांनी हातभार लावला.

माझ्या व्यवसायामुळे आणि बडबड्या स्वभावामुळे माझी अनेकांशी चांगली मैत्री झाली. जगभरच्या मोठमोठ्या शहरात माझे हे पेशंट, नातेवाईक, मित्र आज मोठमोठ्या हुद्याच्या जागी आहेत. ह्या सर्वांनी मला काय दिले नाही? त्यांच्या आपुलकीच्या शिदोरीच्या जोरावर मी हा प्रवास केला. परदेशामध्ये ह्या सर्वांनी आम्हा सर्वांचे वर्णनापलीकडे आदरातिथ्य केले. ऐंशी नव्वद मैल दूर असलेल्या विमानतळावर आम्हाला उतरवून घेण्यासाठी किंवा सोडण्यासाठी, आपला मौल्यवान वेळ काढून ही मंडळी येत असत.

हे सर्व अनुभवल्यानंतर एक वाटते की अल्लाउद्दीनच्या गुफेमध्ये जशी नाणी ठासून भरलेली होती तशी ह्या जगात सर्वत्र माणुसकी ठासून भरलेली आहे. ह्या गुफेचे दार उघडावयाची MASTER KEY म्हणजे आपली जीभ! आपले बोलणे! ही चावी बरोबर लावली तर समोरच्या व्यक्तीमधील प्रेम उफाळून बाहेर येते. मग आपली जुनी ओळख असो अथवा नसो. ह्या सर्वांच्या प्रेमामुळे वाटते ह्या जगातून अनंताच्या प्रवासास जाण्यापूर्वी असेच फिरत रहावे!. त्या प्रवासाला अंत नाही! अंत नाही.

डॉ. प्रकाश वा. कवळी.

'मौलिक सल्ला'

प्रवासाला निघण्यापूर्वी प्रवासाची तयारी सर्वात महत्त्वाची! आपल्याच देशात प्रवास करणे त्या मानाने सोपे. परंतु परदेशात प्रवास करताना अनेक प्रकारची काळजी घ्यावी लागते. परदेशात ओळखी, नातेवाईक कमी असतात. शिवाय भाषेची अडचण असतेच! माझ्या अनुभवावरून परदेशी प्रवास करताना कोणती काळजी घेणे जरूर आहे त्यासंबंधी थोडे लिहितो.

आपले वय :-

परदेश प्रवास म्हटले की खर्च आलाच! साधारण कोणतीही व्यक्ती वयाच्या ४० ते ५० वर्षांपर्यंत जास्तीतजास्त कमाई करू शकते व बचत करू शकते. ह्या वयात प्रकृतीही त्यामानाने उत्तम असते. म्हणूनच ४० ते ५० हे वय प्रवासाला योग्य म्हणावे लागेल. पन्नाशी उलटल्यानंतर हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब इत्यादी विकार होण्याची शक्यता असते. डोळ्यात मोती बिंदूही तयार होत असतो. म्हणजे ज्या डोळ्यांनी आपण नवलाईची दुनिया पाहणार ते डोळेच साथ द्यायला असमर्थ होतात. तेव्हा ४० ते ५० वयात परदेशात प्रवासास जाणे उत्तम!

स्थळांची माहिती :-

आपण ज्या परदेशांना व तेथील ज्या शहरांना भेट देणार असाल, त्या ठिकाणांची भौगोलिक माहिती अगोदर वाचून तिचे मनन करणे उत्तम. नकाशाचा आधार घेऊन, आपण ज्या महिन्यात तिथे जाणार असू तेव्हाचे हवामान, तेथील हॉटेल्स, तेथील प्रवासासाठी उपलब्ध असणारी साधने, तेथील भारतीय वकिलातीच्या कार्यालयाची माहिती मिळवावी.

पैसे किती न्यावे? कसे न्यावे? कसे वापरावे ? :-

आपल्या देशात आपल्याकडे जरी मुबलक पैसा असला तरी परदेशात जाताना सरकार आपल्याला ठराविक परदेशी चलन देते. हे चलन अमेरिकन डॉलर्समध्ये घेणे उत्तम! विमानतळावरही थोडे डॉलर्स मिळतात. प्रवासाला निघताना आपल्या प्रवासाचा उद्देश नक्की ठरवावा. साईट सीईंग, खरेदी आणि उत्तम राहण्याची सोय ह्या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साधू शकत नाही. तेव्हा ह्या पैकी एक मुख्य ठरवून उरलेल्या दोघांवरील खर्चास बंधने घालावीत. उदाहरणार्थः स्थळं पाहणे हे मुख्य असल्यास कितीही मोह झाला तरी खरेदीं कमी करावी. खाण्यावर-राहण्यावरही खर्च कमी करावा. स्वस्त पण सुरक्षित

हॉटेल्स/मोटेल्समध्ये राहावे. सिंगापूरमध्ये शरंगून रोडवर स्वस्त हॉटेल्स् आहेत. प्रवासात चलन कसे वापरणार त्याचा नीट विचार करावा. प्रवासासाठी व स्थंळांना भेटी देण्यासाठी शहरातील बससेवा वापरावी. ती नसेल तरच टॅक्सी वापरावी. ट्रॅव्हलर्स चेकस् बरोबर ठेवावेत. हे चेक्स वटविण्याची व्यवस्था बहुतेक मोठ्या शहरातून असतेच. जास्त कॅश जवळ ठेवू नये. बँकॉक येथे अनेकदा खिसेकापू खिसे कापतौत व पैसे गेले तर फार गंभीर परिस्थिती उद्भवते. प्रवासाला निघताना फराळाचे पदार्थ बरोबर घेणे उत्तम! त्यामुळे हॉटेलवर होणारा खर्च कमी होतो. मोह पाडणाऱ्या अनेक वस्तू खरेदी कराव्याशा वाटतात, पण त्यापासून दूर रहावे. प्रवासाहून परत येताना आपल्या देशात त्या वस्तूवर जबर कर भरावा लागतो ह्याची जाणीव ठेवावी. आपल्या मौल्यवान वस्तू हॉटेलमधील काऊंटरवर सेफ कस्टडीत ठेवणे उत्तम!

पासपोर्टः-

पासपोर्ट हा आपल्या परदेश प्रवासातील हुकूमी एक्का! पैशा इतकेच पासपोर्टला जपणे अत्यंत महत्त्वाचे. म्हणूनच आपल्या पासपोर्टमधील पहिल्या व मधल्या दोन पानांची झेरॉक्स प्रत काढून ठेवावी. पासपोर्ट कधीही हरवू देऊ नये. तो नेहमी जवळ बाळगावा. कारण परदेशात काही गंभीर परिस्थिती उभी राहिल्यास पासपोर्ट सर्वप्रथम तपासला जातो. तो नसला तर सरळ तुरुंगात रवानगी होते. प्रत्येक देशाच्या राजधानीत आपल्या देशाची वकिलात असते. पासपोर्ट हरवल्यास त्यांना ताबडतोब कळवावे. विमानतळावर किंवा इतर ज्या ज्या ठिकाणी पासपोर्ट तपासला जातो त्या त्या ठिकाणी आपलाच पासपोर्ट आपल्याला परत मिळाल्याची खात्री करावी.

सामानः-

शक्यतो कमीत कमी सामान बरोबर असावे, पुरुषांनी ओव्हर कोट, सूटस नेणे व स्त्रियांनी उंची साड्या नेणे गैर सोयीचे ठरते व त्याची अडचण होते. स्त्रियांसाठी पंजाबी ड्रेस वापरणे सोईस्कर! बर्फाळ प्रदेशात जायचे असल्यास मफलर, कानटोपी, हातमोजे, स्वेटर अत्यंत आवश्यक! जाताना बॅग्ज कमीत कमी घ्याव्या. सिंगापूर, दुबाई येथे जाणार असाल तर तेथे बॅगा स्वस्त व उत्तम मिळतात. हातात एक हॅन्ड बॅग असावी. त्यात प्रवासात चटकन लागणाऱ्या वस्तू असाव्यात..टूथपेस्ट, औषधे वगैरे! किरकोळ आजारांवर लागू पडणारी औषधे आपल्या फॅमिली डॉक्टरांना विचारून, जवळ ठेवावीत. परदेशात वैद्यकीय इलाज फार फार महाग असतात. पासपोर्ट व ट्रॅव्हलर्स चेकस् आणि चलन ह्यासाठी वेगळी छोटी बॅग घ्यावी व त्या बॅगेवर सतत नजर ठेवावी!

इन्शुअरन्स:-

परदेशात प्रवासासाठी जाताना 'मेडिकल इन्शुअरन्स' काढणे अत्यंत जरूर आहे. तेथील वास्तव्यानुसार तो काढून घ्यावा. परदेशात दुर्दैवाने आजारी पडल्यास वा अपघात झाल्यास वैद्यकीय इलाजासाठी फार खर्च येतो. तुम्ही जरी तुमच्या नातेवाईकांकडे अथवा आप्तेष्टांकडे राहणार असलात तरी हा विमा आवश्यक! त्याचप्रमाणे विमान प्रवासाचा विमाही काढावा.

तिकिटे:-

आपण प्रवासास कसे जाणार आहोत ते प्रवासा अगोदर ठरवून निघणे उत्तम! वेगवेगळ्या ट्रॅव्हल एजन्सीज् परदेशच्या सहली आयोजित करतात. त्या संस्था प्रवाशांची उत्तम काळजी घेतात. त्यामुळे प्रवाशांना डोक्याला ताण पडत नाही व प्रवासाचा आनंद मनमुराद उपभोगता येतो. मात्र ह्याला दुसरीही बाजू आहे ह्या ट्रॅव्हल एजन्सीज जादा पैसे घेतात. तुम्हाला मिळणाऱ्या परदेशी चलनातील काही चलनाची त्या मागणी करतात. एखादे ठिकाण तुम्हाला आवडले तर तुम्हाला तिथे मनसोक्त राहता येत नाही. ट्रॅव्हल एजन्सीने आखलेल्या कार्यक्रमानुसारच प्रवास करावा लागतो. ज्यांच्याजवळ पैसा मुबलक आहे व ज्यांना डोक्याला त्रास नको असेल त्यांनी ह्या ट्रॅव्हल एजन्सी तर्फे प्रवासास जाणे उत्तम!

परदेशात तुमच्या ओळखी असतील किंवा तुम्ही निर्भीडपणे बोलू शकत असाल तर स्वत:च आपला परदेश प्रवास आखणे व तिकिटे खरीदणे हे स्वस्त पडेल. ओळखीच्या व्यक्तिंना आपण पत्राने किंवा फोन करून, त्यांच्या गावी आपला येण्याचा दिवस, विमानाचा फ्लाइट नंबर, विमानतळाचे नाव, वेळ वगैरे कळवावे. म्हणजे त्याना तिष्टत बसावे लागत नाही. परदेशात राहणाऱ्या व्यक्तीला वेळेचे महत्त्व फार असते हे ध्यानात ठेवावे.

तिकिटे काढताना ती तिकिटे ओ. के. झाली आहेत की नाही हे जरूर पहावे. प्रत्येक ठिकाणची तारीख, वेळ पडताळून पहावी. तिकिटे जपून ठेवावी. अमेरिकेतील प्रवासासाठी 'ग्रेहाउंड' बसची तिकिटे किंवा 'उसा'ची विमानाची तिकीटे स्वस्तात मिळतात. ही तिकिटे चार, सात किंवा पंधरा दिवसाच्या मुदतीची मिळतात. तेवढ्या मुदतीत त्या तिकिटावर जास्तीतजास्त ठिकाणांना भेट देता येते. ही तिकिटे आपल्या देशात, आपल्या चलनात खरेदी करता येतात. परदेशात जवळ जवळची ठिकाणे फिरण्यासाठी बस प्रवास उत्तम! वाटेमध्ये तेथील निसर्ग

पाहता येतो. वेळ कमी असल्यास व भेटीची ठिकाणे फारच लांब असल्यास विमान प्रवास जरूर करावा.

कोणत्या प्रकारचे सामान टाळावे? :-

प्रवास करताना आपल्या बॅगमध्ये कोणत्या वस्तू आहेत ह्याची माहिती आपल्याला असावयास हवी. न्यूयॉर्कसारख्या विमानतळावर, आपण जी बॅग नेत आहात ती तुमचीच आहे का? त्यामध्ये कोणत्या वस्तू आहेत? कोणी भेट म्हणून दिलेली पार्सले आपण उघडून खात्री केली आहे का? वगैरे प्रश्न विचारतात. ह्यासाठी कोणी अनोळखी व्यक्तिने विमानतळावर किंवा इतर ठिकाणी कोणतीही छोटी वस्तू भेट म्हणून घेऊन जाण्यास सांगितली तरी तिचा स्वीकार करू नये. मादक पदार्थ, स्फोटके वगैरे वस्तू तुमच्या बॅगमध्ये सापडल्या तर फार गंभीर परिस्थिती निर्माण होईल.

सर्वसाधारण दक्षता:-

कोणत्याही अनोळखी ठिकाणी फिरताना अत्यंत काळजी घ्यावी. उगाचंच कोणाशी दोस्ती करू नये व त्याच्याबरोबर कुठेही जाऊ नये. अमेरिकेत चाकू किंवा पिस्तुलचा धाक दाखवून लुटण्याचा प्रकार चालतो. त्याला 'मगिंग' म्हणतात. परदेशात अत्यंत सभ्य दिसणारा अनोळखी माणूस, गुन्हेगार असू शकतो. कोणाच्याही मोटारीत लिफ्ट मागू नये. आपल्याजवळ असलेल्या पैशांचे हॉटेल किंवा उघड्या जागेवर प्रदर्शन करू नये. आवश्यक तेवढेच पैसे जवळ बाळगावे. आपण राहत असलेल्या हॉटेलचे पत्याचे कार्ड नेहमी जवळ बाळगावे.

असो! एवढा सर्व सल्ला ऐकल्यावर, परदेशी प्रवास फारच कठीण बुवा, असे तुम्हाला कदाचित वाटेल! पण तसे नाही. परदेशी प्रवास अत्यंत सुखकारक असतो. विशेषतः विमान प्रवास हा आगगाडीच्या प्रवासापेक्षा सोपा व कमी दगदगीचा असतो. ठराविक सोपस्कार पार पाडण्याची सवय झाली की विमान प्रवासासारखा आरामाचा दुसरा प्रवास नाही!

गेल्या दोनतीन वर्षात महागाई वाढली. डॉलर्सचे भावही वाढले. विमानाची तिकिटे, हॉटेल/मॉटेलचे दर हे सर्वच वाढले असणार, ह्या प्रवास वर्णनात उल्लेख केलेल्या किंमती वगैरे, आम्ही प्रवास केला त्या वेळेच्या किंमतीनुसार आहेत हे वाचकांनी लक्षात ठेवावे.

माझ्या कुटुंबियांसमवेत केलेल्या प्रंवासाचे, माझ्या अनुभवानुसार केलेले हे प्रवास वर्णन आपल्या समोर ठेवीत आहे. हे प्रवास वर्णन वाचत असताना,

आपणही प्रवास करतो आहोत असे आपल्या मनात आले तर ह्या प्रवास वर्णनाला आपली पावती मिळाली असे मी समजेन.

मग आता उशीर कशाला?

'फासन युअर बेल्ट ॲन्ड बी रेडी फॉर टेक ऑफ!'

कोकण कोयनाचा प्रवास

मनुष्य जन्माला आला की इतर इंद्रियांबरोबर देवाने त्याला दोन डोळे दिलेले असतात. ह्या डोळ्यांचा अभाव असणारी ती अंध माणसे! त्यांच्याबद्दल मला नेहमीच सहानुभूती वाटत आलेली आहे. आपल्याला डोळ्यामुळे वाचनाबरोबर इतर अनेक गोष्टी करता येतात. निसर्ग सौंदर्याची लज्जत ह्या डोळ्यामुळेच आपल्याला घेता येते. ह्या आपल्या दृष्टीला जर निसर्ग सौंदर्य पाहण्याची आवड असेल तर जगातील वेगवेगळी स्थळे पाहण्याची हौस काही न्यारीच! प्रवासाचा श्रीगणेशा ह्या निसर्ग सौंदर्याच्या आवडीमुळे होतो हे मात्र खरेच! असो!

तशी लहानपणापासून प्रवासाची मला भयंकर आवड! मला आठवते लहानपणी, अगदी साधारण बारा वर्षांचा असताना, मी एका मित्राबरोबर रत्नागिरीला बोटीने जावयाचे ठरविले. वडिलानी अगदी मोजून पैसे दिले होते. प्रथमच आईवडिलांशिवाय प्रवास करायचा म्हणून मनात धाकधुक होतीच. भाऊच्या धक्यावर सकाळी ९ वाजता बस पकडून पोहोचलो. किती तरी वेळ वाट पाहिली, आमचे मित्र काही बोट सुटायची वेळ झाली तरी आले नाहीत. शेवटी परत घरी जायचे का? हा विचार क्षणभर मनात आला. पण प्रवासाचा उत्साह समोरच्या समुद्राच्या लाटांसारखा उचंबळून आला होता. सागरावर हेलावणारी ती बोट, ते अफाट सागरी सृष्टीसौंदर्य मला ये ये म्हणत होती.

कंटाळून शेवटी मी एका चाकरमान्यास गाठले. आमची तिकिटे सेकंड क्लासची होती. त्या चाकरमान्याला माझ्या जवळचे जादा तिकीट सरळ थर्डक्लासच्या भावाने दिले व सांगितले की रत्नागिरी आले की मला चांगलेसे हॉटेल दाखव! बोट सुरू झाली. अफाट सागरातून पाणी कापीत जाणारी आमची बोट गोव्याला जाणारी होती. गोव्याला जाणारी बरीच प्रवासी मंडळी बोटीत होती. कोणी पत्ते खेळत तर कोणी गप्पा मारत सर्वच आनंदात होते. मी आपला त्या चाकरमान्याला धरून होतो. तो ही खूष होता सेकंड क्लासचे तिकीट थर्डक्लासच्या भावाने मिळाले म्हणून! त्याचे नाव होते राजाराम मयेकर!

आता त्या गोष्टीला ३५ वर्षे झाली, पण तो राजाराम मयेकर डोळ्यासमोर उभा आहे अजून. खरं म्हणजे घाडसी प्रवासाची पहिली पायरी त्याने मला दाखविली.

बोट सुटल्यापासून तो आणि मी गप्पा मारू लागलो. त्याने माझे नाव विचारले. प्रकाश म्हणून नाव सांगताच तो आपला माझ्या जवळ येऊन बोटीची गंमत जंमत सांगू लागला.

"परकास, ते पाहिले काय? तो लांब डोंगरावर दिसतो ना तो जंजिऱ्याचा किल्ला. त्याच्या बाजूला मुरूड"

"मुरूडला आपली बोट थांबणार ना?' ' मी विचारले

"थांबणार तर. आता बघ आपली बोट बंदरात डायरेक्ट नाय जाणार. पान्यातच उभी रहाणार आणि मग पडावाने पॅसींजर मुरूडला जाणार."

सायंकाळ झाली. बोटीच्या इंजिनाचा आवाज व समुद्राच्या लाटांचे संगीत ऐकत मी इकडे तिकडे फिरत होतो. अंधार पडला.

"आता अर्ध्या तासात आपले रत्नागिरी येणार "राजारामने मला सांगितले, बाजूला दरवाजाजवळ गर्दी झाली. इथे पण बोट लांब पाण्यात उभी राहून पडावानेच रत्नागिरीच्या बंदरात जायचे होते. "अरे हलू! हलू! शिरा पडल



राजाराम मयेकर आणि मी रत्नागिरी बंदरात!

तोंडावर"! रत्नागिरीची लोकल भाषा कानावर पडू लागली. पोरांना धरून खचाखच खेचणारी बाई, तसेच डोक्यावर भरलेली गोण घेऊन धावणारा नागवेकर, पावसकर वगैरे सर्वचजण ढकलाढकली करीत होते. राजाराम आणि

मी हात धरून पडावात उतरलो. चहूंकडे अंधार बंदरावर आलो. बंदरापासून शहर बरेच आत होते. मग मात्र भीती वाटू लागली.

राजाराम मयेकर आणि मी अंधारात चालत होतो. मनात शंकेची पाल चुकचुकू लागली. वडिलानी प्रवासासाठी सर्व मिळून पन्नास रुपये दिले होते. राजारामने पैसे मारले तर? थोडा वेळ चालल्यावर गाव दिसू लागले, थोडा धीर आला. गावची बाजारपेठ लागली.

"हे हॉटेल विहार बघ रे. राहायचे असेल तर आतमध्ये जाऊन विचार."

"चालेल, चालेल" मी पटकन म्हणालो.

"तसा पुढे पण चांगला हाटेल आहे" राजाराम म्हणाला.

"नको नको, हेच हॉटेल बरे" मी म्हणालो, कारण राजाराम बद्दलचा विश्वास ढळला होता. कदाचित पैसे मारायचा बिरायचा! मग मुंबईला परत कसे जायचे? राजारामचे आभार मानून हॉटेल विहारच्या काऊंटरवर बुकिंग केले जनरल रूममध्येच! कारण पन्नास रुपयात सर्व भागवावयाचे होते ना!

त्या रात्री जनरल रूममध्ये जवळजवळ गळ्यातच बॅग अडकवून आणि खिशावर हात ठेवून झोपलो. हॉटेलमध्ये रहावयास आलेली इतर माणसे मला एकट्याला पाहून काहीतरी बडबडत होती.

सकाळ झाली. कोकिळेचे सुंदर स्वर कानी पडले. खाली जाऊन चहा घेतला आणि रत्नागिरी दर्शनासाठी बाहेर पडलो. मुख्य बाजारपेठ ओलांडली आणि एस. टी. स्टँडवर उभा राहिलो. प्रवासी येत होते, जात होते. मासळी बाजारासारखा प्रवाशांचा कलकलाट चालू होता. बाजूलाच ह्या स्टँडवरून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या गाड्यांचा बोर्ड होता.

बोर्ड पाहिला की तो वाचण्याचा मोह मला आवरत नाही. गाड्यांचे वेळापत्रक पाहण्याचा नाद मला अजूनही आहे. कुठेही, अगदी स्वत:ची गाडी घेऊन प्रवासाला गेलो तरी, तेथील गाड्यांच्या वेळापत्रकांचा बोर्ड पहायचा, त्या गाडीत किंवा विमानात चढणाऱ्या प्रवाशांकडे पहायचे, हे इथे जाणार ते तिथे जाणार असे मनानेच ठरविण्यात एक अवर्णनीय आनंद आहे असे मला वाटते, असो!

रत्नागिरी-मालवण, रत्नागिरी-विजयदुर्ग, रत्नागिरी-देवगड अशा अनेक पाट्या होत्या. रत्नागिरी-कऱ्हाड म्हणून पाटी पाहिली. दहा वाजता बस होती. चटकन विचार केला. जवळचे पैसे मोजले. रत्नागिरीहून ह्या बसने कोयनेला

जाता येण्यासारखे होते. अर्ध्या तिकिटाच्या हिशोबाने मुंबईपर्यंत पैसे पुरणार होते. चटकन तिकीट काढले. थोडावेळ बंदरावर फिरलो मग हॉटेलमधून सामान घेतले आणि दहा वाजता बसमध्ये येऊन बसलो.

बसमध्ये शेजारी एक वृद्ध गृहस्थ बसले होते, गांधी टोपी, स्वच्छ कपडे, ब्राह्मण वाटले आणि निघालेही ब्राह्मण!

"मला कोयनेला जायचे आहे" मी म्हणालो.

"बाळ, तिथे राहाणार कोणाकडे? कोणी ओळखीचे आहे का? त्यांनी विचारले.

"कोणी ओळखीचे नाही. राहीन हॉटेलात, नाहीतर गेस्ट हाऊसमध्ये."

"ठीक आहे. कोयनेचा स्टॉप आला की सांगतो हं!" त्यांनी सांगितले.

चिपळूण आले. बसने राजमार्ग सोडला आणि ती आता घाट चढू लागली. घाट म्हटले की माझ्या अंगावर अजूनही रोमांच उभे राहतात. निसर्गाचे सौंदर्य, धबधब्यांचा खळखळाट आणि ड्रायव्हरचे गाडी चालविण्याचे कौशल्य हे सर्व मनाला भावून जाते. ह्या सर्व गोष्टी पहाण्यासाठी मी एस्. टी. किंवा आगगाडीतही खिडकीजवळची जागा पटकावतो. पुण्याला जाताना सुद्धा राजमाचीची दरी मला साद घालते. वाटते त्या दऱ्याखोऱ्यात एक अद्भूत शक्ती आहे. त्या सौंदर्याला न्याहाळण्यास डोळे हवेत, ते कसे? तर सृष्टीसौंदर्याचा मनमुराद स्वाद घेणारे!

कोयनेचा घाट पार करून कोयना बस स्टँडवर पोहोचलो, तेव्हा अंधार पडला होता. बस स्टँडवर मी एकटाच छोटी बॅग घेऊन उतरलो. बस निघून गेली. बाप रे! एकही माणूस ओळखीचा नाही.

समोर एक पत्र्याची शेड दिसली, तिथे गेलो. एक माणूस बाहेर उभा होता. मी विचारले "इथे रहाण्याची काही सोय आहे का?"

"कशाला?" शेडमधल्या माणसाने विचारले.

"मला कोयना धरण बघायचे आहे. एक दिवस राहून परत जाणार"

"ते बघ, वरती गेस्ट-हाऊस आहे. तिथे जागा मिळेल." कायरे, पण तुला सिनेमा बघायचा आहे का रात्री?"

"सिनेमा कुठे आहे?"

"अरे हा बघ की" त्यांनी दरवाजा उघडून म्हटले. ती पत्र्याची शेड म्हणजे सिनेमाचे थिएटर होते.

"रात्री नऊ वाजता ये. इकडच्या कामागारांना फुकट असतो हा सिनेमा. मी दरवाजावर उभा असेन, ये तू रात्री. मी तुला आत सोडीन."

"थँक यू" म्हटले मी त्याला. आयुष्यात जी काही प्रेमळ माणसे मला प्रवासात भेटली त्यापैकी पहिला हा डोअर कीपर!

बॅग घेऊन दोन चार उंचवटे पार केले. समोर गेस्ट हाऊसचा बोर्ड दिसला. दरवाजावर फक्त एक भला मोठा काळा कुत्रा बसला होता. फाटकाचा दरवाजा खडखडवल्यावर वाकडी मान असलेला रखवालदार आला. पैसे भरून त्याच्या कडून रूम घेतली. त्या गेस्ट हाऊसमध्ये त्या रात्री मी सोडून दुसरे कोणीच रहावयास नव्हते.

बाहेर आता गडद अंधार झाला होता. रूममध्ये पण अंधार. थोड्यावेळाने रखवालदाराने लाइट चालू केले. आंघोळ करून बाहेर आलो. साडे आठ वाजले होते. बाहेर फाटका जवळचा तो वाकड्या मानेचा रखवालदार माझ्याकडे टक लावून पाहत होता. अचानक "बीस साल बाद" मधील वाकडी मानवाला आठवला: बाप रे! आज काही आपण येथून सही सलामत सुटत नाही!

परत रूममध्ये आलो. बॅग व उरलेले पैसे कॉटखाली ढकलले व त्या पत्र्याच्या शेडजवळ गेलो. संध्याकाळचा तो डोअर कीपर तिथे नव्हता. तो सिनेमा कामगारांसाठी फुकट होता. इकडे तिकडे पाहत मी हळूच आत घुसलो. सिनेमा पाहून बाहेर पडलो. तो डोअर कीपर भेटला. मी त्याचे आभार मानले आणि मला त्या वाकडी मानवाल्या रखवालदाराची भीती वाटते म्हणून सांगितले. त्याने मला गेस्ट हाऊस पर्यंत सोबत केली व वाकड्या मानवाल्याला काहीतरी सांगून माझी भीती घालविली. तरीही त्या रात्री मी तळमळत होतो. "बीस साल बाद" मधला तो सीन डोळ्यासमोर तरळत होता.

दुसऱ्या दिवशी एस्. टी. पकडून मी मुंबईला परतलो. खरंच हा माझा प्रवास, पुढे मी केलेल्या जगप्रवासापेक्षाही थरारक होता! एक तर लहान वय आणि शिवाय स्वत:च्या हिंमतीवर केलेला! ह्या प्रवासाने मला धीट बनवले तसेच काटकसर करून जास्तीत जास्त प्रवासात सुख कसे घ्यावयाचे ते ह्या प्रवासाने मला शिकविले.

काही वर्षांनंतर आई-वडिलांबरोबर कोयनेला पुन्हा गेलो होतो. दोन महिन्यापूर्वी कोयनेला भला मोठा भूकंप झाला होता. तेथील दृष्य पाहून डोळ्यात

पाणी तरळले. गेस्ट हाऊस साफ कोसंळले होते. सिनेमा थिएटरचे अवशेष बाकी होते. बाजूची शाळाही उद्धवस्थ झाली होती.

तो डोअर कीपर, तो वाकड्या मानेचा रखवालदार सर्वजण त्या अवशेषांतून माझे स्वागत करीत होते.

"आलास पुन्हा, पण तुला मदत करण्यासाठी आज आम्ही नाही रे, म्हणत त्या अवशेषातून ते मला न्याहाळत होते.

ह्यापुढे आयुष्यात मी अनेक प्रवास केले. डॉक्टर होण्याच्या अगोदर आणि त्यानंतर सुद्धा. पुढे गाडी घेतली. लग्न झाले. सासुरवाडी बेळगावची! लग्न झाल्यानंतर अनेकदा बेळगावास गेलो. गाडी चालवत तिकडे जाण्यातील मजा काही औरच! नेहमीचीच ठिकाणे, नेहमीचेच डोंगर, पण तरीही निसर्ग पाहिला की मन कसे मोहून जाते. समुद्रकाठी खडकावर बसून सागराच्या लाटा पहाताना, डोंगर कपाऱ्यात बरसणारे चांदणे पहाताना आणि पावसाळ्यात निसर्गाचे रौद्र रूप पहाताना मिळणारा आनंद! खरंच! आयुष्यात ह्यापेक्षा आणखी दुसरे सुख कोणते हा प्रश्न पडतो.

जगामध्ये अशी अनेक ठिकाणे मनाला भुरळ पाडणारी आहेत. दऱ्या, डोंगर, रस्ते, बंगले, उत्तुंग इमारती सर्वच माझ्या मनाला भुरळ पाडतात. म्हणूनच परदेशात जाऊन अशा सौंदर्याचा मनापासून आस्वाद घ्यावा असे ठरविले, आणि कसा कोणास ठाऊक पण परदेशी जाण्याचा तो योग १९८० ते १९९० पर्यंत दर तीन वर्षांनी मला आला.

प्रवास म्हटला की पैसा लागतोच. हा पैसा खर्च करण्याची प्रत्येकाची ऐपत असू शकेलच असे नाही. पण प्रवासाची आवड असली की, काटकसर करून प्रवास करता येतो. परदेशप्रवासात त्या देशामधील प्रगती पाहून आश्चर्याने मन जसे थक्क होते तसेच तेथील सृष्टीसौंदर्य किंवा रिकामा वेळ मौज मनोरंजनात घालविण्याच्या वेगवेगळ्या कल्पना पाहून आश्चर्य वाटते ह्यात शंका नाही.

आयुष्यात एकदा तरी अमेरिका आणि युरोपला भेट देण्याची माझी फार इच्छा होती. डिसेंबर १९८९ मध्ये कोणते तरी मासिक चाळत होतो. सहज १९९० च्या भविष्याच्या पानाकडे लक्ष गेले. माझी रास मिथून! बाप रे! 'पुढील वर्षी जगप्रवासाचा योग! परदेश प्रवासाची संधी'- होरारत्न सांगत होते.

तसा मी भविष्यावर विश्वास न ठेवणारा. पण का कोणास ठाऊक त्यावेळी मनात आले – खरंच आपण पुढील वर्षी परदेश प्रवास करणार.

आणि खरंच तो योग जर्वळ आला. ●●●

परदेश प्रवासाची पूर्वतयारी

फेब्रुवारी १९९० च्या पहिल्या आठवड्यात माझी सौ. सुनीलाचे काही नातेवाईक अमेरिकेहून आम्हाला भेटावयास आले. अजूनपर्यंत माझ्या डॉक्टरी व्यवसायामुळे व इतर अनेक कारणामुळे अमेरिकेमधील पुष्कळजण ओळखीचे झाले होते. डॉक्टर मित्र, माझे पेशंटस्, नातेवाईक –अशा अनेक ओळखी अमेरिकेमध्ये कुठे ना कुठे तरी होत्या. सौ. सुनीलाची मामेबहीण-डॉक्टर शैला आणि तिचा नवरा भवानीदास, मामेभाऊ डॉ. राज व मामी अशी अनेक नातेवाईक अमेरिकेत सिअॅटलमध्ये राहत होती. डॉ. राज-डेंटिस्ट, त्याची बहीण विद्या जम्बो कंपनीत कामाला, तर भवानीदास स्वतः आर्किटेक्ट! ह्या भवानीदासचे सर्व भाऊ वगैरे मिळून एकंदर सत्तर ते ऐंशी जवळचे नातेवाईक सिअॅटलमध्ये होते!

तसा माझा व भवानीदासचा फक्त एक दिवसाचा परिचय! नाव जरी जुन्या पद्धतीचे तरी माणूस एकदम मॉड आणि विनोदी! एका दिवसातच माझ्या मनावर तो छाप पाडून गेला. विनोदी माणसे मला फार आवडतात. हसरा चेहरा आणि विनोद माणसाला दुसऱ्याच्या हृदयाजवळ पटकन घेऊन जातात. मग तो माणूस हवाहवासा वाटतो. तसेच ह्या भगवानदासच्या बाबतीत झाले. सहज त्यांना विचारले 'अमेरिकेत तुम्ही कसे काय पोहोचलात?'

"काय सांगू डॉक्टर तुम्हाला? के. ई. एम्. हॉस्पिटलसमोर पेईंग गेस्ट म्हणून दिवस काढले. तोपर्यंत मोठा भाऊ अमेरिकेत जाऊन स्थाईक झाला होता. आर्किटेक्ट झाल्यावर मी एक पार्टनर घेऊन फोर्ट एरियात प्रॅक्टिस सुरू केली. एके दिवशी अमेरिकेतून भाऊ आला. सहज आमच्या ऑफिसमध्ये आला. तिथे त्याने मला व माझ्या पार्टनरला रिकामे बसलेले पाहिले. माझा पार्टनर कंपास घेऊन उगाचंच कागदावर रेघोट्या मारत होता. आणि मी बोलता बोलता पेन्सिलीची टोके मोडत होतो. आमची मुंबईत काही डाळ शिजणार नाही हे भावाने ओळखले, त्याने विचारले, "येतोस अमेरिकेला?"

"अरे पण नोकरी?"

"मिळेल रे आणि नाही मिळाली तर मी आहेच"

आज तोच भवानीदास सिअॅटलमध्ये भावाच्या बंगल्याच्या बाजूला नदीकाठी सुंदर बंगला, चार गाड्या होंडा, क्रायस्लर, मर्सिडीझ आणि स्वतःची लाँच घेऊन टेसात राहतोय, शिवाय बर्फात फिरायला फोर व्हील जीपही घेतली आहे.

खरंच भवानीदास एका दिवसात जीव लावून गेला होता. तो सांगत होता, "सिॲटलसारखे सीनिक ठिकाण अमेरिकेत कुठेही सापडणार नाही. बर्फ बघायचा असेल – अगदी घराजवळ – तर मार्च नाहीतर एप्रिलमध्ये या. स्प्रिंग चालू होतो. मजा येईल."

भवानीदास व माझ्यामधील आठ दिवसाचे वयातील अंतर आता आठ सेकंदासारखे वाटले. त्यांचे आणि माझे आयुष्य एंजॉय करण्याचे विचार तंतोतंत जुळत होते. जुनी हिंदी गाणी आणि गझल यांचा शौकही माझ्यासारखाच!

सात आठ दिवसांनी भवानीदास कोदे परत अमेरिकेस गेले.

त्यावेळी मी मनात म्हटले, 'लेका, संधी चांगली आहे! सुदैवाने माणसेही चांगली आहेत. आलेली संधी सोडू नकोस!'

पुढे आणखी दोन दिवस विचार केला आणि आमच्या सौ. ला सांगितले, "चल, जायचे अमेरिकेला! अगदी नक्की!"

"अहो पण मुलांचे काय? दोन महिने मुलांना टाकून म्हणजे – शिवाय सलीलला अधूनमधून दम्याचा त्रास होतो. माझा नाही बाई जीव लागायचा. त्यापेक्षा पुढे केव्हातरी जाऊ"

"पुढे केव्हातरी नको. आता ठरवलेय ना? पाहिजे तर मुलांना बरोबर घेऊन जाऊ या."

"अहो, पण एवढ्या लांब जायला पैसे?"

"अगं, सलीलला अजून बारा वर्षे पूर्ण नाही झालेली. आणि मृगया तर त्याच्यापेक्षा लहान, दोघांचे अर्धे अर्धे तिकीट. पुढे त्यांना घेऊन जाण्याचा चान्स नाही येणार. शिवाय तुझ्या मामेबहिणीने आणि मामीनी एवढा आग्रह केला आहे, मग कसं?"

"बरं तर, ठीक आहे."

अशी आमची सौ. तयार झाली

आणि मग प्रवासाची पूर्वतयारी सुरू झाली. प्रथम फक्त अमेरिकेस जाण्याचे ठरविले. मग हळूहळू समजले की अमेरिकेस जाण्याच्या खर्चपिक्षा थोड्याशा अधिक खर्चामध्ये जगप्रवास करता येण्यासारखा आहे. पण मग वर्ल्ड टूरचा कार्यक्रमच आखला तर? झाले, मनात आले. आणि मग जगातील नाना देशांचे

नकाशे मिळतील तिथून जमविले. एस्. ओ. टी. सी. पासून एअर इंडिया मधील नातेवाईक, मित्र. पेशंटस् ह्या सर्वांची मदत घेतली.

माझ्यावर अत्यंत प्रेम करणाऱ्या मिसेस पाटेकर म्हणून माझ्या वृद्ध पेशंट होत्या. मी अमेरिकेला जाणार हे मी त्यांना प्रथम सांगितले. मिसेस पाटेकरांचे मुंबईत जवळचे असे कोणी नव्हते. त्यांचा मानलेला मुलगा अनिल क्षीरसागर, ज्याला त्यांनी लहानपणापासून वाढविले होते, तो आता अमेरिकेत स्थायिक झाला होता. आणि मी त्याच्याकडे जावे म्हणून दरवर्षी त्यांचा आग्रह असे. अनिलही प्रत्येक वेळी मुंबईला आला की मला भेटायचा. प्रत्येक वेळी त्याचाही अमेरिकेस येण्याचा आग्रह, तेव्हा माझा अमेरिकेला जाण्याचा बेत ऐकल्यावर मिसेस पाटेकरांना तर अत्यानंद झाला. घरी जाऊन त्यांनी मला एक अमेरिकेचा नकाशा आणून दिला, आणि अनिलला पत्रसुध्दा लिहून टाकले!

माझ्या प्रवासाची नांदी ह्या प्रेमळ मिसेस पाटेकरांकडून झाली आणि माझ्या प्रवास योजनेस खरा हुरूप आला.

माझे अनेक नातेवाईक व पेशंटस् परदेशात जाऊन आलेले होते. वेळ मिळाला की मी जगाचा नकाशा चाळत होतो. प्रवासाची तयारी कशी आणि कुठपासून करावी हा प्रश्न काही दिवस मला पडला हे खरे, पण मी वर्ल्डटूर करणार आहे हे कळल्या बरोबर एक एक जण माझ्याकडे पत्ते आणून देऊ लागला. देशपांड्यांचा शाम, भागवतांचा प्रदीप, अगदी परवा परवा पर्यंत माझ्याकडून सर्टिफिकेट घेऊन जाणारा महेश कीर अरे बाप रे! साधारण दहा दिवसात माझ्याजवळ बावन्न पत्ते जमले! शिवाय मिसेस पाटेकर मॉरल सपोर्ट देत होत्याच "काही काळजी करू नका. डेट्रॉइटला उतरलात ना की आमचा अनिल तुम्हाला पिक अप करेल. त्याच्याकडे चांगले आठ दहा दिवस रहा" वगैरे वगैरे.

परदेशात प्रवासास जायचे म्हणजे त्या त्या देशांकडून व्हिसा मिळवावा लागतो आधी. काही हितचिंतक सांगू लागले की अमेरिका व कॅनडाचा व्हिसा मिळविण्यासाठी स्पॉन्सरशिपची गरज असते, तर काहीच्या मते स्पॉन्सरशिपची जरूर नव्हती.

स्पॉन्सरशिपची गरज एवढ्यासाठी असते की तुम्ही त्या देशात गेल्यावर तुमच्या बद्दल गॅरेंटी देणारी कोणी तरी व्यक्ती त्या देशाची रहिवासी आहे व काही गैरप्रकार झाल्यास ती व्यक्ती तुमचा सर्व खर्च करण्यास तयार आहे ह्याची खात्री दिली जाते. म्हणजे समजा अगदी तुम्हाला तिकडे मरण आले, तर तुमची बॉडी तुमच्या देशात परत पाठविण्याबद्दल सुद्धा ती स्पॉन्सर करणारी व्यक्ती

जबाबदार असते. तुम्हाला स्पॉन्सर करणाऱ्या त्या व्यक्तिची बँक बॅलन्स, तिचे त्या देशातील वास्तव्याचा कालावधी, तिचे नोकरी मधील वा व्यवसायातील स्थान, ह्या गोष्टी लक्षात घेतल्या जातात. त्यासाठी स्पॉन्सरशिप घेताना ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मगच स्पॉन्सरशिप मागवावी.

स्पॉन्सरशिप असलेली बरी, त्यामुळे व्हिसा पटकन मिळतो असे शेवटी ठरले. त्यामुळे स्पॉन्सरशिपसाठी अमेरिकेत सिॲटल आणि ह्यूस्टन येथे श्री. कोदे व श्री. भडकमकर यांना पत्रे पाठविली.

फेब्रुवारीच्या शेवटी, प्रवासाला जाण्याचे नक्की तर केले. टूरवर जावयाचे म्हटल्यावर बायकोने तर टूर टूर लावली अगदी. तिने सिॲटलला कळविले सुद्धा, आम्ही येत आहोत म्हणून!

परंतु अजून दोन गोष्टींचा निर्णय होत नव्हता. टूरवर जायचे ते एकट्याच्या हिमतीवर जायचे की एस. ओ. टी. सी किंवा सि. टा. सारख्या ग्रुप बरोबर, आणि दुसरे म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणा पूर्वेकडून पश्चिमेकडे जात करायची की पश्चिमेकडून पूर्वेकडे करायची?

देवाच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालताना डावीकडून उजवीकडे घातली जाते. तसे गेलो तर दुबाई-लंडन-अमेरिका करत सिंगापूर मार्गे मुंबईत परतता आले असते. किंवा त्याच्या उलट, म्हणजे सिंगापूर प्रथम करून उलट दिशेने प्रवास करता आला असता. जमले तर एक व्हिडिओ कॅमेरा विकत घेऊन सर्व टूरचे शूटिंग करावे असा माझा मनसुबा होता. तेव्हा पूर्वेने प्रवासास सुरवात करून, सिंगापूरला कॅमेरा घेऊन, पश्चिमेकडून मुंबईला परतणे सोयीस्कर ठरले असते. ह्या कारणामुळे प्रवासाची डायरेक्शन तरी नक्की झाली. शिवाय सिंगापूर प्रथम घेऊन आल्यावर होणारा कस्टमवाल्यांचा छळवादही त्यामुळे टाळता आला.

ग्रुपबरोबर जाणे उत्तम की स्वतः टूर आखून जाणे योग्य हे अजून ठरत नव्हते. अजून मनात शंका होतीच. कारण मुले बरोबर असणार होती. प्रवासात काही गोंधळ झाला तर जवळ आम्हा चौघांशिवाय कोण मदतीला आले असते? पण ग्रुपबरोबर भारतातही फिरण्यास मला आवडत नाही. ग्रुपबरोबर गेल्यास आपल्याला काही पहावे लागत नाही. डोक्याला त्रास होत नाही वगैरे खरे. पण स्वतः टूरचा कार्यक्रम आखून जाण्यात जी मजा आहे ती त्यात नाही हे ही तितकेच खरे! मला आठवते, मागच्या वेळेला सिंगापूरला गेलो असताना तेथे नेमका त्याचवेळी राजा पाटील यांचा ग्रुपही आला होता. त्यात माझे पेशंट श्री. यशवंत देव आणि माझे एक मित्र डॉ. चौधरी हे होते. त्यांच्या टूरच्या बसमध्ये बसताना काही प्रवासी लवकर आले नाहीत म्हणून मेगाफोन वर त्यांच्या नावाची

जाहिरात चालली होती. स्वतः टूरचा कार्यक्रम ठरविला असला की एखादे ठिकाण आवडले तर दोन दिवस जास्त आपण त्या ठिकाणी राहू शकतो. असे

परदेशात मराठीला प्रसिद्धी !

फायदे नक्की होतात. प्रत्येकाचे ह्या बाबतीत मत वेगळे होईल, कारण स्वतः प्रवासाचा कार्यक्रम आखणे तसे जोखमीचे असते हे ही तितकेच खरे! असा उलट सुलट विचार करून शेवटी स्वतःच टूरचा कार्यक्रम आखायचे नक्की केले.

आमच्या प्रवासाच्या अति उत्साहाकडे पाहून अनेकांना प्रेमाचे भरते आले. जे परदेश प्रवासाला जाऊन आले होते ते अधिकाराने उपदेशाचे डोस पाजू लागले. तर काही न गेलेले सुद्धा! उपदेश तरी किती प्रकारचे? मी काय घ्यावे म्हणून

काही, तर मी काय घेऊ नये म्हणून सुद्धा काही! तरी सर्वांना माहीत होते की, मी मदिरेला स्पर्श करीत नाही म्हणून. "स्पर्श करीत नाहीस तर परदेशात जाऊन घेण्यास सुरुवात कर" असे शेजारचे तात्या म्हणाले, "अरे तिकडे थंडी बरीच असते म्हणे तेव्हा थोडी ब्रँडी– नाहीतरी तुम्ही डॉक्टर लोकानीच नाही का शोधली डॉक्टर्स ब्रँडी?"

"अरे, पण थंडीसाठी ओव्हरकोट अगदी पायघोळ घे बरं चौघांना"- शेजारच्या रमाकाकू म्हणाल्या. "आमचे पुण्याचे श्रीपादमामा गेले होते ना, तेव्हा त्यांना बर्फात म्हणे काय हो तो? कसला बाईट? हां हां, तोच तो! फ्रॉस्ट बाईट झाला, आणि मग काय म्हणे धावपळ. हातापायातून म्हणे मुंग्याच मुंग्या."

"हत् वेडे, अमेरिकेत मुंग्या नसतात."

"तसं नाही हो, त्यांना हातापायांत मुंग्या फिरल्यासारखे वाटत होते. त्यात तुमच्या सलीलची तब्येत–"

"बरं बरं"

आपण परदेशी चाललो आहोत, विशेषतः अमेरिकेला जातो आहोत, हे कळले की अनेक जण भेटवस्तू घेऊन येतात. आपल्या साठी नव्हे, तर परदेशातल्या त्यांच्या नातेवाईकांना देण्यासाठी! माझ्या साडूनी सांगितलेला एक विनोद ह्यावरून आठवला.

एका वात्सल्याने भरलेल्या मातेचा एकुलता एक मुलगा लंडनच्या उपनगरात राहत होता. माझे साडू लंडनला चालले आहेत हे कळल्याबरोबर त्या माऊलीने अगदी स्वतःच्या हाताने मुलाला आवडणारे साजुक तुपातील लाडू बनविले, व त्यांना बरोबर घेऊन जाण्यास सांगितले. मुलाचा लंडनमधला फोन नंबरही दिला. लंडनला जाताच माझ्या साडूनी मुलाला फोन केला व त्याच्या आईने काहीतरी भेट त्याच्यासाठी पाठविली आहे असे सांगितले. मुलाने फोनवरच त्यांना पॅकिंग फोडून बघण्यास सांगितले. आतमध्ये लाडू आहेत कळल्यावर, "येऊन घेऊन जातो" म्हणून सांगितले. माझे साडू रोज वाट बघत, पण तो मुलगा काही लाडू घेऊन जाण्यासाठी आला नाही. साडू मुंबईला परत आल्यावर ते ज्यांच्याकडे लंडनला उतरले होते त्यांचा फोन आला की त्या लाडवांना शेवटी मुंग्या लागल्या! बहुतेक त्या मुलाने त्याचे घर आणि लंडन ह्या प्रवासाचा पेट्रोलचा खर्च वाचवला असावा. आईच्या वात्सल्यापेक्षा त्याला पेट्रोलचा खर्च जास्त वाटला असावा! असाच एका गायकाचा किस्सा! आमच्या पेशंटने सांगितला होता. हा पेशंट एअर इंडियात कामाला होता. अमेरिकेत नेमकी त्या गायकाची व ह्याची

भेट झाली. पेशंट एअर इंडियात असल्यामुळे सामान नेण्याबाबतीत त्याला वजनाचा काही प्रॉब्लेम नसणार म्हणून त्या गायकाने त्याचा तंबोरा मुंबईला नेण्यास आमच्या पेशंटला सांगितले. बिचारा पेशंट त्याला नाही म्हणणे जिवावर आले. म्हणून गप्प बसला. पेशंट एअर इंडियाचा नोकर असला तरी सबजेक्ट टू लोड त्याला लागू होताच. दररोज चाळीस मैल टॅक्सी करून तंबोरा घेऊन जायचा व परत यायचा, असे रोज डॉलर्स संपू लागले तेव्हा शेवटी तंबोरा घेऊन एअर पोर्टवर गाणे म्हणत बसायची वेळ येते की काय अशी त्याला भीती वाटू लागली. अनेक डॉलर्स टॅक्सीसाठी खर्चून शेवटी पेशंट तंबोऱ्यासकट मुंबईला पोहोचला. गायकाच्या घरी गेल्यावर त्या गायकाने पॅकिंग उघडून पाहिले तो तंबोऱ्याची एक खुंटी निखळून पडलेली दिसली. तंबोरा संभाळून न आणल्याबद्दलची नाराजी गायकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून आली.

जगाच्या नकाशावर निरनिराळी ठिकाणे मी दररोज पाहत होतो. वर्ल्ड टूरमध्ये कोणते हॉल्टस् स्वस्तात घेता येतील ते पाहत होतो. अनेक ट्रॅव्हल एजंटस्कडे प्रत्यक्ष वा फोनवर चौकशी करीत होतो. माझ्या ह्या प्रवासासाठी जास्तीत जास्त डिस्काउंट व चांगल्यात चांगला रूट देईल त्याच्यातर्फे तिकिटे बुक करायची असे मी ठरविले होते. अनेक एजंटांनी नाना प्रकारची दाखविली, पण जास्तीत जास्त चांगली माहिती देणारा एजंटच मला नक्की करायचा होता. हा एक यक्ष प्रश्नच झाला होता.

आणि, अहो आश्चर्यम्।

प्रवासाला पैशाबरोबर चांगले नशीबही लागतेच. दुपारी दवाखान्यातून घरी आलो. समोरच्या खिडकीतून सहज बाहेर पाहिले. इतके दिवस चाललेले घरासमोरच्या दुकानाचे काम पुरे होत आले होते. आणि बोर्डावर दुकानाच्या नावाची अक्षरे रंगविली जात होती स्काय ट्रॅक, टूर्स अँड ट्रॅव्हल्स! अरे वा! देव पावला म्हणायचा! ह्याचे तर अजून ओपनिंग व्हायचे आहे! दोन-चार दिवसात जर ह्याचे उद्घाटन होणार असेल तर आपण त्यांचे 'भोनीचे गिऱ्हाईक' का होऊ नये? ठीक आहे, विचारून तर पाहू या!

त्याच दिवशी संध्याकाळी मी दुकानात पाय टाकला. मालकानी जंगी स्वागत केले. एका मराठी माणसाची ओळख करून दिली, आणि सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे माझा प्रवासाचा प्रोग्राम ऐकून सर्वात जास्त डिस्काऊंट देण्याचे वचन दिले. काही झाले तरी 'भोनीचे गिऱ्हाईक' होतो ना मी! शिवाय एवढे मोठे व चार तिकिटांचे! चला बरंच झाले! तिकिटांच्या बुकिंगसाठी किंवा इतर माहितीसाठी

कुठे लांब धावायला नको. वाईट इतकेच वाटले की बिचाऱ्या इतर ट्रॅव्हल एजंटस्ना दुखवावे लागणार होते त्यात काही तर माझे पेशंटही होते.

१९९० साल होते ते. राऊंड-द-वर्ल्ड तिकीट प्रत्येकी साधारण अठ्ठावीस हजार रुपयांचे होते. न्यूयॉर्क-मुंबई रिटर्न तिकीट होते बावीस हजारांच्या आसपास. म्हणजे फक्त सात हजार रुपयामध्ये कितीतरी जादा ठिकाणे! कसे काय परवडते विमान कंपन्यांना एवढ्या स्वस्तामध्ये बाकीच्या ठिकाणी फिरविण्यास? अचंबा वाटत होता. अर्थात अशा प्रवासाला नियम व अटीही होत्या. काही विमान कंपन्या दुसऱ्या काही विमान कंपन्यांबरोबर संधान बांधून होत्या. म्हणजे समजा एअर इंडियाने टोकियो घेतले तर त्या पुढील बाकीच्या फ्लाइटस् त्यांच्या संबंधित कंपन्यांचीच घ्यायला हव्यात. मला पाहिजे त्या विमानांनीच सर्व जगभर फिरता येणार नव्हते.

लहानपणापासून अनेक विमान कंपन्यांची नावे पाठ करण्याची मला आवड. बि.ओ.ए.सी., एअर फ्रान्स, लुफ्तान्सा, एअर कॅनडा, पॅनएॅम, कॅथे पॅसिफिक, सिंगापूर एअर लाईन्स, पाकिस्तान एअर लाईन्स्, सयाम एअर -अशी अनेक नावे नजरेसमोर तरळत होती. त्यांच्या रंगीत पुस्तिकांनी आमचे भान हरपत होते. त्याचवेळी आमच्या ट्रॅव्हल एजंटने, आधी व्हिसा मिळविण्याच्या मागे लागा असे सांगितले. जे जे देश पहावयाचे त्या त्या देशाचा व्हिसा काढावा लागणार होता.

"तिकिटात जर एवढा फरक नाही, तर युरोप का सोडायचा?" माझी सौ. म्हणाली,

"अगं, पण युरोप पहावयाचे ठरविले तर मग अमेरिकेतील स्टे कमी होईल. मग सिॲटल फक्त दोन-तीन दिवसात करायचे?"

"नको नको, मला विद्या आणि शैलाकडे पंधरा दिवस अगदी आरामात रहायचे आहे"

"पण निदान लंडनला तरी चार दिवस राहू या गं."

नाही तरी लंडनला ओळखीचे फार आहेत. तसे पाहिले तर लंडनला नातेवाईक सोडा, पण भूषण गोठोस्कर आणि हेमंत कवठणकर नावाचा आणखी एक आर्किटेक्ट माझा पेशंट होता– तो लंडनला स्थायिक झालेला होता. त्याआधी त्याने दोन-तीन वर्षे अमेरिकेत काढली होती. मागे तो मुंबईला आला होता, तेव्हा मी सहज लंडनला यावयाचे आहे असे म्हणालो. सौ. कवठणकरही आमच्या बरोबर गप्पा मारीत होत्या. त्यावेळी हेमंतचे उद्गार ऐकून मी चाटच झालो, तो

म्हणाला, "डॉक्टर, लंडनमध्ये वीस मिनिटांच्या अंतरावर माझे घर आहे. चार बेडरुम्सचे! तुम्ही फक्त यायचे, आणि चार दिवस नाही तर..."

"चांगलं महिनाभर रहायचं" सौ. कवठणकर मन:पूर्वक म्हणाल्या.

"सकाळी ऑफिस पर्यंत फक्त माझ्याबरोबर गाडीतून यायचं. मग तुम्ही आणि माझी गाडी. ड्राइव्हिंग करत हवे तसे फिरा!" कमाल आहे! एवढी आस्था, एवढी आपुलकी, एवढे अगत्य, नुसत्या कल्पनेनेच भारावून गेलो होतो मी!

मला वाटते, परदेशात गेलेला भारतीय कधी कधी संस्कृतीने भारतीय राहत नाही, नाहीतर आपण! माझा एक गुजराथी डॉक्टर मित्र सांगायचा, "आम्ही सुरतवाले किंवा इतर गुजराथी, तुम्हा मुंबईकरांना, सुरतला आलात की जेवायला आमच्याकडेच या म्हणून सांगतो. म्हणजे जेवणासाठी सुरतला येण्याचा खर्च तुमचा तुम्ही करा! शिवाय तुमचे सुरतला येण्याचे चान्सेस कमी म्हणून आग्रह जोरात करायचा."

हेमंतचा आग्रह असा वर-वरचा नव्हता. खरे प्रेम आणि वरवरचे प्रेम ह्यांचा अनुभव आयुष्यात खूप घेतला. काही ठिकाणी हृदयाची नाती निर्माण झाली जी मरेपर्यंत विसरता येणार नाहीत. अशा अतूट प्रेमामुळेच मी परदेशात जाऊ शकलो, आणि अगदी नि:संकोचपणे कितीजणांच्या घरात!

मी वर्ल्ड टूरला जाणार हे जसे इतर पेशंटस्ना बोललो तसेच माझा पेशंट-कम्-जिवलग मित्र विजय देशपांडे ह्यालाही बोललो होतो. माझ्या दवाखान्यामध्ये काही जण प्रथम पेशंट म्हणून आले आणि मग अगदी जिवलग मित्र झाले. त्यामध्ये काही महिलांचाही समावेश आहे. शेवटी मित्र म्हणजे तरी कोण? जो तुमचे दु:ख ऐकून घेतो, संकटामध्ये साथ देतो आणि वेळ पडल्यास चांगला उपदेश देतो, तो मित्र. अनेक पुरुषाबरोबर काही स्त्रियाही माझ्या दवाखान्यात त्यांच्या मनातील अडचणी-प्रापंचिक अथवा मानसिक-नि:संकोचपणे सांगून जातात. म्हणूनच आम्ही त्यांचे फॅमिली डॉक्टर होऊ शकलो, त्यांच्या घरातील एक घटक!

परदेशात फॅमिली डॉक्टर ही प्रथाच नाही, व्हिजिट वगैरे काही नाही. अमेरिकेत डॉक्टरना फोन केला की ॲम्ब्युलन्स येते थेट हॉस्पिटल! तिथे चाचण्या वगैरे करून औषधे दिली जातात. तिकडचे डॉक्टर आधुनिक उपकरणांच्या वापरामुळे हुशार असतील पण त्यांना फॅमिली डॉक्टर म्हणताच येणार नाही. डॉक्टर शेवटी कसा असावा? तर पेशंटच्या हृदयात शिरणारा!

आमच्या एका डॉक्टर लेखकाचे म्हणणे आहे, की तुम्ही रस्त्यांवरून जात असताना तुमच्या पेशंटच्या छोट्या मुलाने गॅलरीतून तुम्हाला हाक मारली की जरूर त्याच्याकडे पाहून स्मित हास्य करा. कारण हा छोटा मुलगा आपल्याबरोबर इतर मुलांना किंवा त्यांच्या आईवडिलांना घेऊन तुमच्याकडे उद्या येणार असतो आणि तुमची प्रॅक्टिस वाढणार असते. असो! थोडे विषयांतर झाले.

तर असा हा माझा पेशंट-कम-मित्र, विजय देशपांडे! त्याला जेव्हा मी क्लिनिकमध्ये वर्ल्ड टूरची कल्पना सांगितली तेव्हा त्याने प्रथम रहाण्याची हॉटेलची काय व्यवस्था? म्हणून विचारले. 'परदेशात माझ्या पुष्कळ ओळखी आहेत' मी म्हणालो, व त्या ओळखीच्या लोकांकडेच मुक्काम करणार असल्याचे सांगितल्यावर तो मनापासून हसला. एअर इंडियातच कामाला असल्यामुळे अनेक वेळा केलेल्या परदेश प्रवासाच्या अनुभवांची वळकटी त्याने माझ्या समोर अलगद सोडली. मित्रत्वाचा सल्ला देत तो म्हणाला, "लेका! अनेक परदेशात रहाणारी माणसे अगदी आग्रहाने त्यांच्याकडे याच म्हणून बोलावतात (सुरतच्या डॉक्टर मित्रासारखी). त्यांचे रहाण्याचे ठिकाण जेवढे दूर तेवढा त्यांचा आग्रह जास्त! कारण ते येणाऱ्याची कुवत, ओळखून असतात. म्हणून तर ते एअर इंडिया किंवा अशाच विमान कंपन्यांतील लोकांना ते जास्त बोलावित नाहीत. कारण ते येण्याचे चान्सेस् फ्री तिकिटामुळे जादा! शिवाय 'सबजेक्ट-टू-लोड,' म्हणजे चार दिवसाऐवजी आठ दिवस सुद्धा कदाचित रहायचे!

उदाहरणार्थ, विजयने अमेरिकेतील एक किस्सा सांगितला, अमेरिकेत म्हणे मुक्कामी पोहोचलो की तेथील यजमान 'कधी निघणार? म्हणून तिकीट बुक करून टाकतो. पाहुण्याला हवे असते त्या दिवसाचे तिकीट मिळत नाही म्हणून सांगून टाकतो.

"तेव्हा तात्पर्य काय?" देशपांडे हसत हसत म्हणाला, "नाही, एवढे ठरवलेच आहेस तर निघ रे! पण पाहुणचार कसा काय होईल ते सांगता येत नाही. त्या पेक्षा एक किंवा दोन हजार डॉलर्सची व्यवस्था कर!"

"अरे, पण जाताना फक्त पाचशेच डॉलर प्रत्येकी मिळतात म्हणे"

"म्हणूनच म्हणतो, विचार कर, आणि पत्रे टाक सर्वांना, त्यांचा आग्रह कसा काय आहे बघ, आणि मग पुढचे पाऊल टाक." देशपांडेच्या बोलण्याने माझ्या प्रवासाच्या कल्पनेला भूकंपाचा धक्काच बसला पण तडा मात्र गेला नाही.

"ठरवलंय ना जायचे म्हणून? मग जायचं. बघुया काय होते ते," मी देशपांडेला म्हणालो.

"हो, तुझे पेशंटस्च तिथे असल्यामुळे एकादेवेळी तुझा चांगला पाहुणचार होईल सुद्धा!" देशपांडेने जाता जाता मधाचे बोट लावले.

त्यावेळी माझी मनःस्थिती खवळलेल्या समुद्रात भरकटणाऱ्या सुकाणू तुटलेल्या होडीसारखी झाली होती. तरी पण आशा तग धरून होती! काही नाही जायचे. म्हणजे जायचे! कदाचित माझा अनुभव वेगळा असेल.

एकाने सांगितले की अमेरिकेतील भारतीयांना, 'तुम्ही गोरे झालात' असे म्हटलेले फार आवडते. तर दुसरा म्हणाला की 'त्यांना नुसते गोरे नाही, तर रेड-इंडियन म्हणायचे' म्हणजे तोंडावर रेड व मनातून रेड-इंडियन, एकेकांचे अनुभव ऐकून छातीतील धडधड वाढत होती.

व्हिसा काढणे हे परदेशात जाताना सर्वात महत्त्वाचे काम! परदेश प्रवासाला सुरवात करताना खिसा खाली करण्यास ह्या व्हिसानेच सुरुवात होते असे म्हणायला हरकत नाही. अमेरिका व कॅनडा यांचा व्हिसा मिळण्यासाठी स्पॉन्सरशिपचा फार उपयोग होतो. फेब्रुवारीमध्ये मी सिअॅटल व ह्यूस्टन येथे स्पॉन्सरशिप पाठविण्यासंबंधी पत्रे पाठविली होती. त्याप्रमाणे दोन्हीकडून स्पॉन्सरशिपची पत्रे मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात आली. स्पॉन्सरशिप मागवण्यापूर्वी कुठे कुठे जायचे ती ठिकाणे नक्की केली, कारण त्याप्रमाणे व्हिसा काढावयाचा होता. प्रवासाचा मार्ग ट्रॅव्हल एजंटच्या सल्ल्यानुसार ठरविला. होता-होईतो अमेरिका व्यवस्थित पहावयाची असे आमचे नक्की झाले होते त्यामुळे त्रेचाळीस दिवसांपैकी तीस दिवस अमेरिकेस दिले होते.

प्रवासाला येणारा खर्च प्रचंड होता. पण जाण्याचे मनाने नक्की ठरविले होते. एवढा पैसा कुठून आणावयाचा हा प्रश्न पुढे होताच. साधारण दोन ते अडीच लाखाच्या आसपास खर्च! ठीक आहे. फिरण्याची हौस आहे ना? तो देख लेंगे!

पैशांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. प्रथम सौ. सुनीलाच्या बँक बॅलन्समध्ये डोकावून पाहिले. नंतर माझ्या स्वतःच्या आणि शेवटी तर सलील-मृगयाच्या सुद्धा! शेअर्स तेजी मध्ये होते तेव्हा सौ. च्या आणि माझ्या नावावरचे शेअर्स काढून टाकले. तरी अजून लक्ष्य बरेच दूर होते. मला मोटार गाड्या वापरण्याची भयंकर आवड! प्रॅक्टिस सुरू केल्यापासून मी अनेक गाड्या वापरल्या इंडियन फियाट, इटालियन फियाट व नंतर मारुती! डेप्रिसिएशनचा फायदा मिळत असल्यामुळे नवीन गाडी घेतली की दोन वर्षात विकायची व पुन्हा डेप्रिसिएशन घ्यायचे असा फायदा मी इन्कम-टॅक्ससाठी घेत होतोच. मार्च

१९९०! दुसरी मारुती गाडी माझ्या मालकीची झाली होती. विकून टाकली तर? किती मिळतील? मिळतील तेवढे घेऊया. बघुया काय ऑफर येते ते!

गाडी विकायची आहे बोलायचा अवकाश, पटापट गिऱ्हाईके आली व गाडी विकली. प्रवास करून आल्यावर गाडी? देखा जाएगा! प्रवासासाठी व परदेशी चलनासाठी आवश्यक तेवढी पुंजी आता जमली होती. चला! बेत पक्का!

ठिकाणे नक्की झाली होती. सुरुवात बँकाक पासून. बँकाक-सिंगापूर-हाँगकाँग-टोकियो-होनोलुलू-अमेरिका-लंडन-मुंबई. असा रूट ठरविला होता. ट्रॅव्हल एजंटला साधारण ठरलेली ठिकाणे सांगितली. शिवाय अमेरिकेतील प्रवासासाठी ग्रे-हाऊंड व उसाची तिकिटे घेण्याचे ठरविले. पैसे वाचविण्याची नवीन शक्कल ट्रॅव्हल एजंटने सांगितली, त्यामुळे आणखी दिलासा मिळाला. तो म्हणाला, तुमचे तिकीट एक्सकर्शन-तिकीट आहे, तेव्हा तुम्हाला अमेरिकेत सहा शहरे फुकट मिळतील, कोणती ती सांगा?

होनोलुलू अमेरिकेचे बावन्नावे राज्य आहे. वर्ल्ड मॅप मधे पाहिले! होनोलुलूपासून कोणती लांबची अमेरिकेतील ठिकाणे घ्यावीत? रात्रभर अमेरिकेचा नकाशा गिरवीत होतो. साधारण ठिकाणे ठरवून दुसऱ्या दिवशी दुपारी एजंटकडे गेलो. वा!

"होनोलुलू, सान फ्रान्सिस्को, सिॲटल .."

"सॉरी. डायरेक्ट होनोलुलू-सिॲटल युनायटेडची फ्लाईट मिळत नाही..."

तुमच्या ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणाची, तिथल्या मुक्कामाची, वगैरे सर्व बाबींची सांगड घालायची होती. एजंटसमोर बसून डोके खाजवीत, नकाशातील ठिकाणे बदलत होतो, काय करावे? शेवटी एकदाचा फायनल प्रोग्राम ठरविला.

ग्रे-हाऊंडचा पास दोन ठिकाणी घेण्याचा माझा इरादा होता. काही झाले तरी ग्रे-हाऊंडने प्रवास करावयाचा हे माझे स्वप्न होते. अमेरिकेतील रस्त्यांवरून मला ग्रे-हाऊंडने प्रवास करावयाचा हे माझे स्वप्न होते. अमेरिकेतील रस्त्यांवरून मला अमेरिका पहावयाची होती. आकाश काय भारतात व परदेशात सर्व ठिकाणी सारखेच! पण भूतलाचे तसे नसते असे वाटत होते, आणि त्याची प्रचितीही आली!

फायनल प्रोग्राम ठरविला. होनोलुलू दुसरे सॅन फ्रान्सिस्को नंतर ग्रे-हाऊंड ते सिॲटल, तिसरे सिॲटलहून लॉस एन्सलिस चौथे, लॉस एंजलिसहून ह्यूस्टन, पाचवा ओरलॅन्डो आणि सहावे शिकागो. शिकागोवरून ग्रे-हाऊंडने

डेट्राईट-टोरंटो-बाल्टिमोर व नंतर फिलाडेल्फिया, न्यूजर्सी व न्यूयॉर्क, आणि न्यूयॉर्क वरून मुंबई! सर्व काही फायनल ठरविले. ठीक आहे!

आता व्हिसासाठी आपणाला किती ठिकाणी जावे लागेल? बँकाकचा व्हिसा एअरपोर्टवर, सिंगापूरला लागत नाही, हाँगकाँग- लागत नाही, जपानचा काढावा लागेल, तसेच अमेरिका व कॅनडा! लंडनमध्ये उतरावयाचे असेल तर व्हिसाची जरूर लागणार.

लक्षात ठेवा, न्यूयॉर्कहून तुम्ही जर डायरेक्ट मुंबईला आलात तर प्रत्येकी दोन मोठ्या बॅग्ज आणायला परवानगी आहे. पण लंडनला तुम्ही थांबलात तर कमी बॅग्ज आणता येतील व सामानाचे वजनही कमी आणता येणार. शिवाय त्यामानाने लंडनचा व्हिसा महाग. महाग म्हणजे साधारण नऊशे रुपये प्रत्येकी! लहान मोठ्याना एकच भाव! तीन दिवसासाठी एवढे आर्थिक व बॅगेजचे नुकसान सोसायचे त्यापेक्षा.. लंडन ड्रॉप केले तर? "हो ना, अमेरिकेत तीन दिवस जास्त मुक्काम करू. सिॲटलला नऊ दिवसांच्या ऐवजी बारा दिवस राहू" आमची सौ. म्हणाली. खिशावर हात ठेवत मी होकार दिला. ठीक आहे.

पासपोर्टवरची व्हॅलिडिटी डेट पहावी लागेल. शिवाय कॅनडासाठी डबल किंवा मल्टिपल एन्ट्री करून घ्यावी लागेल. पासपोर्ट, एजंटच्या हवाली केला. पासपोर्टची एक्सपायरी डेट ठीक आहे. मुलांची नावे? आमच्या मिसेस्च्या पासपोर्टवरच दाखल केली आहेत. हो ना, मागच्या वेळी सिंगापूरला त्यांना घेऊन गेलो होतो, तेव्हा घातली आहेत त्यांची नावे!

"तर सर्व प्रथम अमेरिकेचा व्हिसा"! एजंट सांगत होता- "आणि दिवस कमी राहिले आहेत. तुम्ही प्रवासाला निघण्याच्या दिवसा अगोदर कॅनेडियन ऐंबसीत त्यांचे अधिकारी आले तर बरे, नाहीतर पासपोर्ट दिल्लीला पाठवावे लागतील, नाहीतर तुम्हाला जावे लागेल स्वत:ला."

बाप रे! दिल्लीला जायचे म्हणजे दवाखान्यात दोन दिवस दांडी. त्यापेक्षा जरा प्लीज चौकशी करा ना? ते अधिकारी मुंबईत कधी येतात ते.

"पंधरा दिवसातून एक दिवस मुंबईत येतात ते! पण दिवस कमी राहिले आहेत हं आता."

नशीब जोरावर असले की सर्व कामे कशी चट्टदिशी होतात. दोनच दिवसात टाईम्सला आलेली जाहिरात, सुप्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक श्री. सुधीर फडके यांनी मला दाखविली. वीस मार्च रोजी ते कॅनेडियन अधिकारी मुंबईत

येणार! वा! माझ्या प्रवासासाठी श्री. सुधीर फडके यांनी मला खूपच मदत केली आणि आवश्यक ती माहितीही पुरविली.

श्री. सुधीर फडकेंच्या ओळखीचे श्री. देशमुख जपानमध्ये टोकियोला आहेत. श्री. देशमुख मुंबईत आले असता त्यांचा परिचय आला होता. देशमुखांसंबंधी सविस्तर टोकियोच्या वर्णनामध्ये येईलच. तर श्री. सुधीर फडके यांनी, मी व माझे कुटुंबीय, टोकियोला येणार आहोत हे श्री. देशमुखांना फोनवर सांगितले, आणि श्री. देशमुखांनी ताबडतोब, 'जरूर या' म्हणून कळविले. श्री. देशमुख मुंबईत आले की त्यांचा नेहमी आग्रह चालत असे, "डॉक्टर आमचे जपान पहाच, पाहिजे तर अमेरिका पाहू नका!" नशिबाने माझा, जपान आणि अमेरिका, दोन्ही बघण्याचा योग येणार होता म्हणून मी आनंदलो होतो.

आता मात्र मी व्हिसाच्या मागे लागलो. अमेरिकेचा व्हिसा मिळविणे अति महत्त्वाचे! माझ्या वैद्यकीय व्यवसायामुळे ज्या अनेक व्यक्ती परिचित झाल्या होत्या त्यापैकी श्री. काळे हे अमेरिकन एम्बसीमध्ये नोकरीला होते. त्यांच्याच सल्ल्याने व्हिसासाठी भेटावयास जायची तारीख नक्की केली. व्हिसा मिळविण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची गरज लागते तेही त्यांनी सांगितले. त्यामुळे अमेरिकन व्हिसा मिळणे खूपच सोपे झाले.

अमेरिकन एम्बसीचे ऑफिस मुंबईत बीच कँडी येथे आहे. व्हिसा मिळविण्यासाठी त्या ऑफिसच्या बाहेर सकाळी चार वाजल्यापासून रांग लावावी लागते! व्हिसा काढण्यासाठी लागणारे सर्व महत्त्वाचे कागदपत्र मी एका फाईलमध्ये संगतवार लावून ठेवले होते ते असे १) पासपोर्ट २) जन्माचा दाखला ३) स्वत:च्या मालकीच्या वास्तूबद्दलचा पुरावा उदा. फ्लॅटची शेअर सर्टिफिकेटस्, फ्लॅटच्या मेन्टेनन्सची पावती, मोटारचे रजिस्ट्रेशन पुस्तक ४) रेशन कार्ड ५) लाईफ इन्शुरन्स पॉलिसीज ६) दवाखान्याची भाडे पावती ७) माझ्या व माझ्या इतर कुटुंबियांच्या नावावरील शेअर सर्टिफिकेटस् ८) मुलांच्या शाळेचा दाखला व त्यांचे जन्मतारखेचे दाखले ९) मेडिक्लेम पॉलिसी वगैरे.

अशी सर्व कडेकोट तयारी करून मी मुलाखतीसाठी अमेरिकन एम्बसीमध्ये गेलो. श्री. काळे बरोबर होतेच. येथे एक अनुभव आला की वशिला वगैरे लावून कामे करण्याची येथे मुळीच संधी नाही. एम्बसीचा प्रशस्त हॉल. तेथे अनेक प्रतिष्ठीत मंडळी बसली होती. आम्हाला हा सगळा नवीनच अनुभव होता. हॉलमध्ये जाण्यापूर्वी मेटल डिटेक्टर मधून जावे लागले. अंगावरून पेनसारखे एक उपकरण फिरवून कोणतीही संशयास्पद वस्तू आमच्याजवळ नसल्याची खात्री

करण्यात आली. आमचे पासपोर्ट व इतर कागदपत्र श्री. काळे यांनी तिथल्या अधिकाऱ्यांनादिले.

साधारण दीड ते दोन तासानंतर आमचा पासपोर्ट नंबर इलेक्ट्रॉनिक बोर्डावर झळकला. वेगवेगळ्या चार-पाच केबिनस् व त्यामध्ये बसलेले रुबाबदार अमेरिकन अधिकारी! मनात थोडी धाकधूक होती. कारण व्हिसा न मिळण्याचीही शक्यता असते.

"आर यू डॉक्टर कवली?"

'यस सर" मी घाबरत बोललो. खरे तर 'सर' व 'साहेब' हे दोन शब्द वापरायला मला जड वाटतात, पण इथे त्या अमेरिकन अधिकाऱ्यांचा प्रसन्न चेहरा व त्यावरील स्मित हास्य पाहून धीर आला.

"ओ! सो, यु वाँट टू व्हिजिट स्टेटस्?"

"यस् सर"

"विथ युअर फॅमिली?"

"यस सर"

तो सगळे पेपर्स पाहत होता व पासपोर्टवर लावलेले फोटो बघत प्रत्येकाला न्याहाळत होता. सर्व पेपर्स व्यवस्थित लावलेले असल्यामुळे त्याचे समाधान झालेले दिसले.

"कम ऑन बॉय, व्हॉटस् युअर नेम?"

"अरे बोलना सलील.." आम्ही सलीलला ढोसत होतो.

सलीलने घाबरत नाव सांगितले.

"ओ. के. एंजॉय वेकेशन अँड हॅव ए नाईस ट्रिप!" ओ के?

"थँक यू व्हेरीमच" आमच्या कुटुंबातील प्रत्येकजण बेंबीच्या देठापासून म्हणाला. जणू काही अमेरिकेची स्वातंत्र्य देवताच मशाल घेऊन आमच्या स्वागताला उभी आहे, असे त्या क्षणी आम्हाला वाटले.

श्री. काळे त्यांच्या कामाला गेले होते. दुपारी जाऊन पासपोर्टस् आणले. काम फत्ते झाले होते. एजंटने स्टेम्प्स तपासले बरोबर होते. सहा महिन्याचा व्हिसा पुरेसा होता. एक मोठे काम झाल्याचे समाधान माझ्या चेहऱ्यावर झळकत होते.

अमेरिकन व्हिसा मिळाल्याचा आनंद खरोखर गड जिंकल्याचे समाधान देऊन गेला. तुम्ही विचाराल, एवढे काय त्याचे? ठीक आहे. जे व्हिसा मिळविण्यासाठी जातात त्यांनाच विचारा. तुम्हाला माहीत आहे का? अमेरिकेचा किंवा कॅनडाचा व्हिसा मागताना आपण त्यांच्या दृष्टीने थोडा विचार केला पाहिजे. अमेरिकेत किंवा कॅनडात एक 'पटेल' गेला की त्याच्या पाठोपाठ हजारो पटेल तेथे स्थलांतर करतात. कसे? त्यासाठी मोठमोठ्या पदव्या मिळविण्याची गरज असतेच असे नाही. आम्ही तर सहकुटुंब तिकडे निघालो होतो म्हणजे संशयाला आणखी जागा! एखादा पटेल, कुठेही हॉटेल किंवा मॉटेल टाकतो. मग त्या मॉटेलचा कुक म्हणून, मॅनेजर म्हणून, किंवा अशीच काहीतरी पोस्ट निर्माण करून तो आपल्या एका एका नातेवाईकांना बोलावून घेतो. अमेरिकेत जरी यांत्रिक युग असले तरी शारीरिक कामे थोडी फार करावीच लागतात. डिश वॉशर असो किंवा वॉशिंग मशीन असो, तिथल्या लोकांना ह्या सर्वांची नक्कीच आवश्यकता वाटते. पण आम्हा भारतीयांचे काय? आपल्या डिशेसना जाड जाड तेलाचे तवंग चिकटलेले असतात. ते काही नुसत्या डिशवॉशरमध्ये साफ होत नाहीत. त्याला प्रथम हाताने थोडा तरी साबण लावावा लागतो. तसेच वॉशिंग मशीन, अहो, आमच्या रंगा प्रमाणे आम्हाला कसा काळा घाम येतो. तेथे जरी थंडी असली तरी अमेरिकन लोकांना (गोऱ्या कातडीच्या) गोराच घाम येतो. त्यामुळे त्यांच्या कपड्यांच्या कॉलर्स किंवा पँटचे बॉटम आपल्यासारखे मळत नाहीत. मग? आपल्याकडे पण वॉशिंग मशीनचे फॅड आले आहे. अहो मोलकरणी पेक्षा बरे, वगैरे ठीक आहे, पण शेवटी कपड्याचा मळलेला भाग तिकडे काय किंवा इकडे काय हाताने थोडा तरी चोळून मगच वॉशिंग मशीनमध्ये घालावा लागतो. थोडक्यात काय, की अशी अंग मेहनत, जी आम्हा भारतीयाना जमते ती इतर कोणालाही जमत नाही. म्हणूनच अंग मेहनतीचे धंदे आमचे भारतीय तिकडे संभाळून आहेत.

हो! आता आठवले म्हणून सांगतो! तुम्हाला माहीतच आहे, की मुलीचे लग्न होऊन ती अमेरिकेला किंवा कॅनडाला जाते. निसर्ग नियमानुसार तिला गर्भारपण प्राप्त होते आणि मग तिच्या आई वडिलांचे संभाषण सुरू होते–

"अगं, मीनेनं तुला तिच्याकडे बोलावलय हो." मीनाचा फोन किंवा पत्र आल्यावर मीनाचे बाबा तिच्या आईला म्हणतात.

"काय? खरंच? म्हटलं नाही तुम्हाला मी आपले जावईबापू किती चांगले आहेत म्हणून!" मीनाची आई.

"अगं पण. "

"ते काही नाही. पोरीचे पहिले बाळंतपण, मग तिची काळजी कोण घेणार? खरंच जाऊ ना?"

"अगं, पण पुढचे तर ऐक. जावईबुवा म्हणे तिथूनच तुझे तिकीट पाठविणार...

"काय खरंच? बघा! किती उदार आहेत आपले जावईबापू! नाही तर तुम्ही! एक नवीन साडी घेते म्हटले तर पैसे नाही म्हणून सांगता! लग्न होऊन वर्ष नाही झाले तर माझ्यासाठी तिकीटही पाठवतायत. अहो पण पासपोर्ट, व्हिसा...

"सर्व काही आजच सांगतो, ट्रॅव्हल एजंटला"

"पण मी तिथे गेल्यावर तुमची काळजी कोण घेईल हो? मला नाही वाटत, जावईबापू वर्षभर तरी सोडतील म्हणून" मीनेचे डोहाळ जेवण तिच्या आवडीनिवडी, नंतर बाळाचे सर्व करेपर्यंत वर्षभर तरी सहज रहावे लागेल."

"तू माझी काळजी करू नकोस! खाणावळीतला डबा आणेन मी. आणि वाटलेच तर रमा वहिनीकडे जाईन जेवायला.

पाहिलंत! कधीही बाहेर न जेवणारे मीनाचे बाबा, जावईबापू बायकोला अमेरिकेहून तिकीट पाठवतोय म्हटल्याबरोबर, बदलले! प्रसंगी स्वत:चे हाल स्वीकारायला सुद्धा तयार झाले. लेंग्याचे बटण तुटले तर बायकोला अद्वातद्वा बोलणारे मीनाचे वडील स्वावलंबी होण्यास तयार झाले!

पण खरेच, जावईबापूंचे प्रेम एवढे का वाढले? स्वत:च्या आई वडिलांना न बोलावता मीनाला तिच्या आई तर्फेच बाळंतपणाचे सर्व लाड करून घ्यायला का तयार झाले? याचे कारण असे की, मीनाला दिवस गेल्याचे जेव्हा तिच्या नवऱ्याला समजले तेव्हा त्याने सहज एका दगडात दोन पक्षी मारायचे ठरविले. म्हणजे बघा, इतक्या दूर, अमेरिकेत, मीनाचे सगळे आपुलकीने कोण करणार? मीनाचे पाहिजे ते डोहाळे कोण पुरविणार? मीना झोपून राहिली की घरकाम –जसे डिश वॉशिंग, वॉशिंग मशीन, व्हॅक्यूम क्लिनरने घराची सफाई, बाळाचे लंगोट धुणे वगैरे कोण हो करणार? एवढे सगळे प्रॉब्लेम्स मीनाची आई अमेरिकेत आल्यामुळे सुटणार आहेत. परत अमेरिकेसारख्या देशात जायला मिळते म्हणून मीनाची आई खूष. थोडक्यात मीना खूष, मीनाची आई खूष आणि जावईबापूही खूष! एवढ्या लांबचे तिकीट, सासुबाईंच्या मदतीपेक्षा तसे

काही जास्त मुळीच नसते. शेवटी सासूबाईंचा आपलेपणा, अंग मेहनत वगैरे सर्व कामाला येणार परदेशात! असो.

तर काय म्हणत होतो? सर्वच भारतीय असे विचार असलेले असतील असे तुम्हाला नाही ना वाटत? तसे आम्हालाही वाटत नव्हते आणि अजूनही खरंच वाटत नाही. पण खरे सांगू? काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहिल्यावर तसे थोडे वाटले खरे!

अमेरिकेचा व्हिसा मिळविल्यावर. कॅनडाचा व्हिसा मिळविण्यासाठी मोर्चे बांधणी केली. व्हिसा मिळविण्यासाठी आम्हाला त्यांनी कफ परेड येथील डायनर्स क्लबच्या ऑफिसात बोलावले होते. तिथे आम्ही दोघेच मुलांना न घेता गेलो. ह्या ठिकाणी मुलाखत एकेका इसमास पार्टिशनच्या मागे बोलावून घेतली जात होती. त्यामुळे तीन तास खोळंबा झाला. हॉलमध्ये गर्दी जास्त व खुर्च्या कमी त्यामुळे शेजारच्या इसमाशी बोलत उभा होतो. मराठीच, तीशीच्या आसपासचा गृहस्थ! मिस्किल स्वभावाचा – त्यामुळे त्याचे आणि माझे जमून गेले. त्याच्या सोबतच्या बाई पलीकडे खुर्चीवर बसल्या होत्या, आणि त्यांच्या शेजारी आमच्या सौ.!

त्याला मुलाखतीला बोलावण्यात आले. त्याबरोबर त्याने 'आई' म्हणून हाक मारली. व त्या वृद्ध बाई आणि तो असे दोघं पार्टिशनच्या पलीकडे गेले. माझी सौ. चटकन् माझ्या जवळ आली व म्हणाली,

"अहो! तुम्ही इतका वेळ कोणाशी बोलत होतात?"

"एका मराठी माणसाशी! का?"

"अहो ओळखले नाहीत का त्याला. टी.व्ही. सीरीयलस् मधला उदय टिकेकर तो!

"काय?"

"अहो खरेच! काय मस्त काम करतो तो."

मी चाट झालो. पण कारण वेगळे होते. टी.व्ही वरचे सीरीयल पहाण्याचे भाग्य माझ्या व्यवसायामुळे लाभत नव्हते. पण उदय टिकेकरची आई.. अरेच्चा! सुमती टिकेकर! त्याने आई म्हणून म्हणताच माझ्या लक्षात कसे आले नाही? पण आता उशीर झाला होता. मुलाखत संपवून तो आणि त्याची आई खाली गेले सुद्धा! मला मात्र फार चुटपुट लागली होती. उदय टिकेकरला ओळखले नाही त्या पेक्षा माझ्या अतिशय आवडत्या "आठवणी दाटतात, धुकें कसे पसरावे" ह्या गाण्याच्या गायिका, आज माझ्या इतक्या जवळ येऊनही त्यांच्याशी दोन शब्द

बोलण्याची संधी निसटल्याबद्दल आणि खरेच, आताही आठवतात त्या ओळी,'' आठवणीदाटतात...

इतक्यात माझ्या नावाचा पुकारा झाला. मिसेस आणि मी पार्टिशनच्या आत डोकावून पाहिले. एक कॅनेडियन म्हातारा आम्हाला बसण्यास खुणावीत होता.

'आर यू व्हिजिटिंग कॅनडा फर्स्ट टाईम ?'

"हॅलो, हाऊ आर यु? सो यु आर व्हिजिटिंग कॅनडा! फर्स्ट टाईम?"

"यस सर! नॉट अलोन, बट विथ माय फुल फॅमिली! वुई आर व्हिजिटिंग सो मेनी क्रंट्रीज.. वगैरे वगैरे." मी आपला बोलतच राहिलो, कारण माझ्या फाईलची पाने व पासपोर्ट वगैरे तो न्याहाळत होता! कॅनेडियन व्हिसा मिळविणे

पण कठीणच काम! कारण आपले भारतीय, अमेरिके इतकेच कॅनडात पण स्थायिक होण्यास उत्सुक! कधी कधी तर म्हणे अमेरिकेत जाण्यासाठी कॅनेडियन व्हिसा मिळवून ते अमेरिकेत घुसण्याचा प्रयत्न करतात!

आमचा कॅनेडियन, मजेशीर होता. त्याने मी कसा कसा जाणार ते विचारले. अमेरिकेतला माझा प्लॅन कसा आहे ते विचारून त्याने मला प्रवासासाठी टिपस् दिल्या. 'कॅनडात डबल एन्ट्री पाहिजे' असे मी सांगितले. पण ती माझी चूक होती हे नंतर प्रवासात मला उमगले. केव्हाही मल्टिपल एन्ट्री मागणेच चांगले! माझे टूर प्लॅनिंग कोणी केले ते विचारून त्याने पासपोर्टवर शिक्कामोर्तब करून, माझा कॅनडात जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला. व्हिसा सहा महिन्यांचा मिळाला होता.

मुख्य दोन व्हिसाज् मिळाले होते. जपानचा व्हिसा मिळविण्यास सोपा! पेडर रोडवर मागच्या गल्लीत जपानी एम्बसीमध्ये गेलो, फॉर्मस् भरून दिले. कांहीही मुलाखत वगैरे न होता दोन दिवसांनी व्हिसा मिळाला.

इंग्लंडला जाण्यासाठी व्हिसा काढण्याच्या कटकटी, व केवळ चार दिवसासाठी सर्वात जास्त पैसे व्हिसासाठी मोजणे तसेच बॅगेज नेण्या आणण्यावर नियंत्रण यामुळे आपोआपच इंग्लंड आमच्या प्रवासाच्या नकाशातून गळून पडले.

सर्व सोपस्कार भराभर पार पडत होते खरे. पण जसजशी जाण्याची तारीख जवळ येऊ लागली, तसतशी मनातली धाकधूकही वाढू लागली. अमेरिकेत, कॅनडात, सगळीकडे निरोप पोहोचले होते. त्यांचे फोनही - आग्रहाचे येत होते. मी जगप्रवासाला निघणार ही बातमी पसरत होती व प्रवासा अगोदरच्या वीस पंचवीस दिवसात दररोज तीन-चार पत्ते, नातेवाईक व पेशंटस्कडून येऊ लागले.

"आमचा अनिल? डॉक्टर, आठवत नाही का? त्याच्या फॉर्मवर तुम्हीच सही केली होती ना जाताना."

"आमचा बंड्या, अहो लंडनला असतो हल्ली. आता त्याला कळविले फोनवर, तर म्हणाला डॉक्टरांना आमच्याकडेच पाठव म्हणून."

निघेपर्यंत दररोज पत्त्यांची खैरात होत होती. ह्या सर्वांचे एवढे प्रेम, एवढा जिव्हाळा, खरोखरंच माझे नैतिक धैर्य वाढवून गेला. माझे जे पेशंटस् कायमचे परदेशात गेले होते त्यांना माझा आता काही उपयोग पण नव्हता. मला बोलविण्यात त्यांचा काही मतलब नव्हता, व्यवहारी दृष्टी नव्हती. होते ते केवळ मला पाहिजे असलेले प्रेम – ज्या प्रेमासाठी आयुष्यात मी आसुसलो होतो.

व्हिसाचा प्रोग्राम आटोपल्यावर ग्रे-हाऊंडचा पास काढण्यासाठी पैसे भरले. ग्रे-हाऊंडचे पासेस घेताना त्या पासचा जास्तीत जास्त विनियोग कसा करता येईल ह्याबद्दल मार्गदर्शनही मला करण्यात आले. ह्या बाबतीत गुजराथी लोकांची चतुराई मानावयास पाहिजे! प्रवास सुरू करताना म्हणे बरोबर रात्री बाराच्या नंतर सुरू करायचा. सात दिवसात सतत रात्रीचा प्रवास करायचा व दिवसा प्रेक्षणीय ठिकाणांना भेटी द्यावयाच्या! असे केल्याने पासची किंमत पुरेपुर वसूल करता येते. माझ्या मनात मात्र वेगळेच विचार होते. सृष्टी सौंदर्य आणि अमेरिकेतील रस्त्यावरील प्रवासाचा दुर्मिळ आनंद घेण्यासाठी प्रवास दिवसाच करावा असे माझे प्रांजळ मत होते. मग त्यामुळे पासचा पुरेपुर उपयोग नाही झाला तरी चालेल! जे मी स्वतः ठरविले तेच शक्यतो आचरणात आणण्याचा मी प्रयत्न केला.

परदेशी चलन प्रौढाला पाचशे डॉलर्स व मुलाला अडीचशे डॉलर्स असे प्रत्येकी मिळणार होते. त्यासाठी नरिमन पॉईंट येथील एअर-इंडिया बिल्डींगमध्ये किंवा सांताक्रुझला सेंटॉर हॉटेलमध्ये जावे लागणार होते. माझ्या बरोबर एजंटने त्याच्या माणसास नरिमन पॉईंटला पाठविल्यामुळे ते काम झटकन झाले. खरंच, एवढ्या पैशात जगप्रवास होईल का? पण मला खात्री होती, की माझे हितचिंतक प्रवासात नक्कीच मला मदत करतील म्हणून.

१८ एप्रिल १९९० च्या रात्री व १९ तारखेस पहाटे ५ वाजता सुटणाऱ्या कॅथे पॅसिफिकच्या विमानाने बँकाकला प्रयाण ठरले होते.

दवाखान्यात बदली डॉक्टरची गरज होती. माझ्या बदली जो डॉक्टर ठेवायचा, त्याने दवाखाना व्यवस्थित सांभाळावा ही मनापासून अपेक्षा होती. काहीही झाले तरी पेशंटना त्रास होता कामा नये, माझी उणीव भासता कामा नये! काही पेशंटस् अतूट प्रेमामुळे द्विधा मनःस्थितीत होते. "डॉक्टर, तुम्ही जाणार, मग आमचे काय?" "नाही पण डॉक्टर, जरूर जा, मजा करा" असे दोन्ही बाजूने बोलणारे पेशंटस् मला भारावून टाकीत होते. आपले डॉक्टर परदेशात जाणार. प्रवासाचा आनंद लुटणार म्हणून त्यांनाही आनंद होत होता. ज्यांचे नातेवाईक परदेशात होते ते तर मुद्दाम येऊन नातेवाईकांचा पत्ता-अगदी व्यवस्थित नकाशा वगैरे काढून समजावून देत होते. तरीही मनात शंका होती. विजय देशपांडेचे शब्द मनात घोळत होते– "लेका! वाटते तितके सोपे नाही! कोणी काही मदत करीत नाही, वगैरे" विशेषतः टोकियोबद्दल तर फारच भीती वाटत होती. श्री. देशमुखांना मी फोनवर कळविले होते. श्री सुधीर फडके यानीही कळविले होते. तरी समजा देशमुख टोकियोत भेटलेच नाहीत, तर? बाप

रे! टोकियोत चार दिवस मुक्काम आणि तिकीट कॅन्सल करून अलीकडच्या दिवशीचे घेताही येणार नव्हते, एवढा टोकियोत 'रश' होता. शिवाय टोकियो म्हणजे जगातील सर्वात महागडे शहर! अशा नाना तऱ्हेच्या शंका मनात डोकावत होत्या. पण धाडस करून पुढेच पाऊल टाकावयाचे आता!

आमचा प्रवासाचा कार्यक्रम फायनल झाला होता. सौ. सुनिला सर्वांना पत्रे पाठवून आमच्या येण्याबाबत. कळवीत होती. प्रत्येक शहरात आम्ही केव्हा पोहोचणार, व तिथून केव्हा निघणार हे लिहीत होती. आता त्यात फेरफार करावयाचा नव्हता. आमच्या एजंटने आमच्या टूरच्या फायनल प्रोग्रामची कॉम्प्युटरवर कॉपी काढून आमच्या हातात ठेवली.

माझ्या दवाखान्याच्यावरील सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर ठाकूर यांच्या कन्या ह्या अत्यंत हुशार डॉक्टर असून, भूलतज्ञ (ॲनास्थेटिस्ट) म्हणून प्रॅक्टिस करीत होत्या. माझ्या गैरहजेरीत माझ्या दवाखान्यात बसण्यास त्यांनी आनंदाने होकार दिला. त्या डॉक्टर बाईंची छोटी मूर्ती व हसरा चेहरा, माझ्या दवाख़ान्याची काळजी नीट घेतली जाईल, याची ग्वाही देऊन गेला.

प्रवासाला निघण्यास आता आठ दिवस राहिले होते. बँकाक आणि सिंगापूर येथेच बॅगस् खरेदी करायच्या होत्या त्यामुळे एक दोन जुन्या बॅगाच बरोबर नेण्याचे ठरविले. प्रवासासाठी ओव्हरकोट घ्यावा की नाही, मुले लहान आहेत तेव्हा त्यांना स्वेटर कानटोप्या पाय मोजे चालतील, असे मार्गदर्शनात्मक जिव्हाळ्याचे निरोप नातेवाईक व इतर हितचिंतक पाठवीत होते. प्रवासाची खरी तयारी आताच होणार होती.

प्रवासाची तयारी करताना सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे इन्शुअरन्स! हो हा सर्वात महत्त्वाचा! प्रत्येकाने प्रवासाला जाताना हा करायलाच हवा. कारण समजा परदेशात तुम्हाला जर काही अपघात झाला तर वैद्यकीय उपचारासाठी अतोनात पैसा जातो. आपल्याकडे परकीय चलन मोजकेच! तेव्हा ही इन्शुअरन्स पॉलिसी काढणे अत्यंत आवश्यक! दोन महिन्याचा माझ्या कुटुंबाचा इन्शुअरन्स मी ताबडतोब काढून घेतला.

कोठेही परदेशात, विशेषतः ओळखीच्या कुटुंबात जाताना त्यांच्यासाठी भेटवस्तू नेणे हे अगदी आवश्यक नसले तरी महत्त्वाचे! ते देत असलेल्या पैशाचा किंवा पाहुणचाराचा मोबदला म्हणून नव्हे, तर आपल्यातर्फे त्यांना एक आठवण म्हणून. त्यासाठी खादी ग्रामोद्योग भांडार आणि हॅन्डलूम हाऊस मधून भेटवस्तूंची खरेदी करून ठेवली.

आता प्रवासात खाण्यास काय? लांबचा प्रवास, शिवाय मुले बरोबर! प्रवासात प्रत्येक ठिकाणी भूक लागली की हॉटेलमध्ये जाऊन खाणे खिशाला परवडत नाही. तेव्हा जाताना मुलांच्या आवडीचे खाण्याचे पदार्थ-लाडू, चकल्या, चिवडा वगैरे करून घेतले.

१७ एप्रिल उजाडली. उद्या रात्री निघायचे जगप्रवासाला! आणि एवढ्या मोठ्या प्रवासात विमानाला अपघात झाला तर? झाला तर काय? एक बरे, सर्व कुटुंब एकत्र आहे. त्यामुळे मागे रहाणाऱ्यांचे हाल नकोत! सकाळपासून फोन येऊ लागले. अनेकजण भेटायला येऊ लागले. त्यांच्या नातेवाईकांकडे जा म्हणून पुन्हा सांगून गेले. पत्ते तर पुष्कळ जमले होते. अमेरिकेतील तर बावन्न पत्ते जमले होते.

रात्री सहज आकाशाकडे पाहिले. काळा अंधार! त्यात लुकलुकणाऱ्या असंख्य चांदण्या! त्यात एक छोटीशी चांदणी लुकलुकत पुढे पुढे सरकत होती! उंचावरून जाणारे ते विमान होते. काही तासांच्या अवधी नंतर आमचेही विमान असेच लुकलुकत आकाशात तरंगत जाणार होते.

१८ एप्रिल उजाडला. आज रात्री निघायचं. बाप रे! दीड-दोन महिन्यांचा प्रवास! कुटुंबा बरोबर एवढे सान्निध्य प्रथमच! व्यवसायामुळे इतका वेळ कुटुंबियांबरोबर प्रथमच मिळणार होता. सकाळपासून पासपोर्ट, मिळालेले पत्ते ह्यांच्या झेरॉक्स कॉपीज काढण्यात वेळ गेला. हो, पासपोर्ट म्हणजे प्रवासातील सर्वात महत्त्वाचे कागदपत्र! त्याला जपायलाच हवे. शिवाय परकीय चलन, मिळविलेले शहरांचे नकाशे पत्तेसर्व व्यवस्थित ठेवून, त्यांच्या कॉपीज् हातातील पिशवीत ठेवल्या.

१८ एप्रिल संध्याकाळ! फोन सारखा खणखणत होता. इतक्यात बेळगावहून फोन आला. माझ्या मेहुण्याने ओरलॅन्डो येथील अनंता जोशी यांचा पत्ता व फोन नंबर सांगितला. चटकन् कागदावर लिहून घेतला. पण इतर पत्त्यांबरोबर तो पत्ता व्यवस्थित ठेवला गेला नाही, त्यामुळे काय गोंधळ झाला ते पुढे कळेलच!

रात्री एक वाजता निघायचे! सर्वांचा निरोप घेण्यात वेळ गेला. जाताना आईने देवापुढची साखर हातावर ठेवली, गाडीत सर्व सामान चढवले, आणि धडधडत्या अंत:करणाने घराबाहेर पडलो.

मनात विचार आला, निघताना जर विमान अपघात झाला तर...? प्रवासाची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली होती.

पहाटे अडीच. सहार एअरपोर्टवर मात्र पहाटेचे अडीच वाजले आहेत असे वाटतच नाही. डिपारचर गेट मधून आत गेलो. ट्रॉलीवर बॅगज् टाकल्या. माझे साडू श्री हेळेकर - अगदी काऊंटरपर्यंत आले. काऊंटरवर वेगवेगळे बोर्डस् लागले होते. कॅथे पॅसिफिकची हाँगकाँगची फ्लाईट व्हाया बँकाक बोर्ड पाहून तिथे गेलो. तिकीटे दाखवून सीटस् कनफर्म असल्याची खात्री करून घेतली. सीटस् ओ. के. करून घेणे किती महत्त्वाचे असते ते पुढील प्रवासात कळून आले. बरोबर मुले असल्यामुळे खिडकीजवळच्या सीटस् हसत हसत मिळाल्या. विमान प्रवासाला सुरुवात होण्याआधीची विमानातली कामे, म्हणजे एमबारकेशन कार्डे आणि डिसएम्बारकेशन कार्डे भरून देणे. प्रत्येक देशात प्रवेश घेताना व तो देश सोडताना ही कार्डे द्यावी लागतात. ती कार्डे भरून टाकली तिथेच. नातेवाईक बाहेर उभे होते, हात हलवून त्या सर्वांचा निरोप घेतला. सिक्युरिटी चेकअप पर्यंत साडू ट्रॉली ढकलीत होते, पण सिक्युरिटी पार केल्यावर एकमेव जिव्हाळ्याचा धागा तेथे संपल्यासारखे वाटला. जिना उतरून वेटिंग हॉलच्या बाहेर आलो. मेटल डिटेक्टरमधून आत जावयास वेळ होता. विमान दोन तास लेट, म्हणजेच पहाटे पाच च्या ऐवजी सात वाजता सुटणार होते. तोपर्यंत बाहेर खुर्चीवर बसून बाजूला झोपलेल्या पॅसेंजर्सकडे मी पहात बसलो. मुले मात्र बसल्या बसल्या झोपी गेली.

मनात विचार आला. सर्व पाश मागे राहिले होते. कुटुंब मात्र जवळ होते. मनात विरहाचे दुःख आणि प्रवासाचा आनंद ह्याचा भोवरा तयार झाला होता. ह्या भोवऱ्यात माझे मन घुसळून निघत होते. मुंबईचा पोलिस तेथे फेऱ्या मारीत होता. त्याच्याशी थोड्या गप्पा मारल्या. तेवढ्यात कॅथे पॅसिफिकच्या हाँगकाँग फ्लाईटची घोषणा झाली, आणि क्लोज सर्किट टी. व्ही वर आमचा फ्लाईट नंबर झळकला.

मुलांना उठविले, सामान गळ्यात अडकविले, ट्रॉली घेऊन मेटल डिटेक्टरजवळ आलो. येथे सामानाची क्ष-किरणांनी तपासणी होत होती. सर्व हॅन्डबॅग्ज व बॅगा त्यातून पाठविल्या व लाकडी कमानीतून आम्ही सर्वजण गेलो. हल्ली हायजॅकिंग/स्कायजॅकिंग होते म्हणून येथे तपासणी फार कडक होते. एकदा विमानामध्ये गेलो आणि परत बाहेर आलो तर पुन्हा ह्या मेटल डिटेक्टरमधूनच जावे लागते.

समोर सहार विमानतळाचा परिसर दिसत होता. सूर्योदय होत होता. सूर्यनारायणाचा लाल रंग क्षितिजावर दूरवर फाकत होता. जणू तो आमच्या प्रवासा साठी आरती घेऊन उभा होता. खिडकीच्या काचेतून जसा समोर सूर्य

सॉरी सर ! यु आर नॉट सपोझ टू कॅरी हँडबॅगस् ! कीप देम ऑन साइड ट्रॅक !

वजनात सूट मिळण्यासाठी हँडबॅगस्नी लगडलेले आम्ही ४ भारतीय

दिसला, तसेच त्याच्या प्रकाशात दिमाखाने उभी असलेली चार-पाच विमानेही दिसली. अरे बाप रे! एका दरवाजा जवळ कॅथे पॅसिफिकचे जम्बो विमान! अरे वा! आज प्रथम प्रवास जम्बो विमानाने – क्या बात है! मी आनंदानेउद्गारलो.

अनेक प्रवासी खुर्च्यांवर बोईंगची अनाउन्समेंटची वाट बघत बसले होते. कोपऱ्यात फोन दिसला. सहज आठवण झाली. पावणे सात झाले होते. घरचा नंबर फिरवला, "हॅलो! मी प्रकाश, एअरपोर्टवरून बोलतोय. आता पंधरा मिनिटात आमचे विमान सुटणार. हो हो जम्बो विमान आहे! बरं" फोनवर माझ्या पाठोपाठ सौ. सुनीला, सलील व मृगयाने पण बोलून घेतले. प्रत्येक एअरपोर्टवर पॅसेंजर्ससाठी लोक कॉलकरता असा फोन फुकट असतो.

गेट उघडला. रांगेने प्रवासी आत जाऊ लागले. आम्हीही आत जाऊ लागलो. सुहास्य वदना थाई एअर होस्टेसिस आमचे तिकीट चेक करून आमचे स्वागत करीत होत्या. फ्लाईट नंबर Cx504 फ्लाईट नंबर लक्षात ठेवल्यामुळे विमानात कोणत्या गेटने जावयाचे हे चटकन समजले.

विमानात शिरताच जम्बो विमानाचे अंतरदर्शन घडले. दरवाजाजवळ गोलाकार जिना, वर जाण्यासाठी होता. वरती फर्स्ट क्लास व एक्सिक्युटिव्ह क्लास – तर खाली इकॉनॉमी क्लास! दृष्टी पोहोचेपर्यंत खुर्च्यांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या. बाप रे! किती प्रवाशांना हे विमान पोटात समावून घेते!

आम्ही आपापल्या सीटस्‌वर बसलो. हातातील सामान वरच्या कपाटात ठेवले. समोरच पडदा होता.

"बाबा, सिनेमापण बघायला मिळणार?"

"हो, पण विमान सुरू झाल्यावर."

सर्व पॅसेंजर्स बसल्यावर विमानाचे दरवाजे बंद झाले. आता आमचा मुंबईशी संपर्क तुटला होता. विमानाचे इंजिन जोरात आवाज करू लागले. इतक्यात अनाऊंसमेंट झाली. आमच्या विमानाचा पायलट आम्हाला 'प्रवास सुखकारक होवो' म्हणत होता. त्याचबरोबर बँकॉकला पोहोचण्यास किती वेळ लागेल तेही त्याने सांगितले.

विमान वळले व कुर्ल्याच्या बाजूला येऊन थोडावेळ उभे राहिले. पाहता पाहता विमान चालू लागले, आणखी फास्ट, आणखी फास्ट, आणि जम्बोने-खरोखरच त्या अजस्र विमानाने हवेत झेप घेतली. मुंबईचा किनारा झटकन गेला आणि विमान ढगांच्याही वर आले. समोर उभी राहून आमची एअर होस्टेस, इमर्जन्सीच्या वेळेला काय काय करायचे त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवीत होती. जॅकेट कसे फुगवायचे, कसे बांधायचे वगैरे, आमचे सीट बेल्ट अजून बांधलेलेच होते. कानात एकदम दडा बसल्यासारखे झाले. मी बरोबर कापूस घेऊन आलो होतो. चटकन् सर्वांच्या कानात कापसाचे बोळे घातले. विमान आकाशात उंच उंच झेपाऊ लागले, आणि मग काही वेळाने, एका विशिष्ठ उंचीला गेल्यावर अनाऊंसमेंट झाली, सीटबेल्ट सोडा म्हणून! वा, बरे वाटले!

जम्बो विमानातून प्रथमच प्रवास! बसल्या बसल्या विमानाचे निरीक्षण करीत होतो. विमानात वेगवेगळ्या क्लासचे प्रवासी, तसेच धुम्रपान करणारे व न करणारे यासाठी वेगळ्या जागा. सीटस् सरळ करावयाच्या व पट्टा बांधायचा! विमानाच्या इंजिनाचा धों धों आवाज मला सातासमुद्रापलीकडे घेऊन चालला होता. प्रत्येक विभागासाठी वेगवेगळ्या एअर होस्टेस! बहुतेक बसक्या नाकाच्या, टिपिकल मंगोलियन! ठरवून दिलेली कामे कशा यंत्रासारख्या करीत होत्या.

आपल्या पुढच्या सीटच्या मागच्या बाजूस सर्व काही व्यवस्थित ठेवलेले. वेगवेगळी मनोरंजक पुस्तके, विमान कंपनीची माहिती पत्रके आणि उलटी झाल्यास उलटीसाठी पिशवी व कागदाचे नॅपकिन्स! खुर्चीला वेगवेगळी बटणे, त्यावर वेगवेगळ्या खुणा. सीटवरच्या छतातल्या छोट्या लाईटपासून, म्युझिकसाठी, एअर होस्टेसला बोलविण्यासाठी सुद्धा बटने! खुर्चीवरून शक्यतो उठायला नको, खरंच राजेशाही खटले! संगीत ऐकण्यासाठी इअरफोन, एक बाजू कानात अडकवावयाची, दुसरी बाजू खुर्चीच्या हँडलला अडकवावयाची व बटण गोल फिरविले की पाहिजे ते संगीत! वेगवेगळ्या चॅनेलस्वर वेगवगळे संगीत! इअर फोन्स काही कंपन्या फुकट देतात तर काही कंपन्या त्यासाठी वेगळा चार्ज लावतात. ही गोष्ट अलहीदा!

समोर पांढरा शुभ्र पडदा भिंतीला लावलेला! थोड्या वेळाने अंधार करण्यात आला. व त्या पडद्यावर विमान कसे चालले आहे ते दाखविले. मुंबईपासून आपण किती अंतरावर आहोत, बँकॉक कुठे आहे, बँकॉकचे हवामान, तेथील वेळ हे सर्व दाखविण्यात आले. एका नकाशावर विमानाची छोटी प्रतिकृती पुढे पुढे सरकत होती. विमानाने गाठलेली उंची-बापरे ३४,००० फूट तर मधेच ३८,००० फूट! सुंदर नकाशा! मुंबई, हैद्राबाद प्रवास करून हिंदुस्थान सोडून, विमान आता बंगालच्या उपसागरावरून उडत होते. मी सुनीलाला म्हणालो, "हिंदुस्थान संपला. समजा विमान कोसळले तर आपल्या अस्थी आता आपल्या मातृभूमीवर विखुरल्या जाणार नाहीत. कुठेतरी माशाच्या पोटात..." "चला, काहीतरीच" सुनीला त्राग्याने बोलली.

समोरून एअर होस्टेस ब्रेकफास्टची ट्रॉली घेऊन येत होती. काल रात्री निघण्याच्या टेंशनमुळे जेवण गेले नव्हते. डिसपोझेबल ट्रे, चमचे व भांडी! वेगवेगळ्या तऱ्हेचे पाव, ॲल्युमिनियम फाईलमध्ये जाम, मस्का, आमच्या मृगयाला भूक फार लागली होती. ॲल्युमिनियम फाईल उघडून तिने पटापट खाण्यास सुरुवात केली. पण... चवीमध्ये फरक होता. आपल्या भारतीय न्याहारीसारखा तो ब्रेकफास्ट नव्हता,

शेवटी जाम व पावावरच्च भूक शमविली. विमानातील चहा पिणे म्हणजे मला तरी शिक्षाच वाटे. ॲसिडिटीचा त्रास असल्यामुळे मी शक्यतो चहा टाळीत असे! चहा नको असला तर कॅनमधून कोकाकोला व सेव्हनअप् होता! काळजी नको. मृगया आनंदली. सलीलला कोक भयंकर आवडतो! त्या दोघांनी एअर होस्टेसकडे दोन-दोनदा कोक मागून भारतीय लोकांचा हावरटपणा दाखवला.



मृगया : एस्क्युज मी मॅडम ! गीव मी वन कोक मोअर !

आमच्या मृगया व सलीलमध्ये एक मोठा फरक आहे. मृगयाला गाडी लागते तर सलीलला विमान! जेवणही येणार होते. जेवणाचे मेनूकार्ड फारच सुंदर अगदी ग्रीटिंग कार्डासारखे, प्रथम वेगवेगळ्या मद्यांची नावे! मद्यपान मला व कुटुंबियांना निषिद्ध, त्यामुळे त्याचा प्रश्नच नव्हता! खरंच, मद्यपान करीत नसल्यामुळे प्रवासात फुकट मिळणाऱ्या मद्यपानाला मला मुकावे लागले. त्याची खंत थोडी थोडी अजूनही माझ्या मनात आहे.

पडद्यावर इंग्लिश सिनेमा चालू होता. मधूनच विमानाचा पायलट अनाऊंन्समेंट करीत होता. आपण कोणत्या शहरावर आहोत, बँकाकपासून किती दूर आहोत वगैरे.

जेवण आले. खरे म्हणजे आम्हा भारतीयांना आवडण्यासारखे हे जेवण नव्हते. हळद मसाल्याशिवाय उकडलेले पदार्थ, नॉन व्हेजमध्ये पोर्क व बीफ याचा मारा! तरी सुद्धा जम्बो प्रॉन्स आणि चिकन मिळण्याचे नशिबात होते. पण हळद मसाल्याशिवाय हे सर्व खाणे अगदी जिवावर आले. मोसंबी रस, इतर फळांचा रस, व कोक घेऊन पोट भरले.

इतक्यात विमान थोड्याच वेळात बँकाक विमानतळावर उतरत असल्याची अनाऊंसमेंट झाली. पट्टा कमरेला बांधला. खुर्ची सरळ आहे की नाही ते एअर होस्टेसने तपासले. विमानाच्या इंजिनाचा आवाज बदलला. पंखांची उघडझाप

होऊ लागली. घिरट्या घालीत एखाद्या गरुडाने भक्ष्यावर झेप घालावी तसे आमचे विमान धावपट्टीवर उतरले. विमान उतरविताना वैमानिकाला कमालीचे कौशल्य दाखवावे लागते. उतरताना अपघात होण्याचे चान्सेस् जास्त! त्यामुळे जीव मुठीत. अगदी सुनीलाचा हात पट्ट्याच्या बाहेरून हातात धरून! जम्बो विमान उडताना किंवा उतरतानाचे दृश्य प्रेक्षणीय असते. जम्बोचे अजस्र धूड जमिनीवर उतरल्याची जाणीव एका जोरदार धक्क्याने झाली. विमानाची गती कमी कमी झाली. आणि बँकॉक विमानतळासमोर आम्ही येऊन थांबलो.

वैमानिकाने व एअरहोस्टेसने आमचे सर्वांचे आभार मानले व पासपोर्ट व एमबारकेशन कार्ड तयार ठेवण्यास सांगितले. एवढेच नव्हे तर अंमली पदार्थ नेण्या वा आणण्यास बंदी असल्याचे सांगितले. शेवटी पुन्हा आभाराचे एक वाक्य बोलून दरवाजा उघडला. पूर्वी विमानाच्या पायऱ्या उतरून विमानतळापर्यंत चालावे लागत असे पण हल्ली पोर्टेबल बोगदे असतात. विमान थांबले की ते डायरेक्ट विमानाला जोडले जातात त्यामुळे चढण्या उतरण्याचा अजिबात त्रास होत नाही. (एअरोब्रीज?)

●●●

भुरळ घालणारे बँकॉक

बँकॉकला मी सात-आठ वर्षांपूर्वी आलो होतो सुनीलासमवेत, पण ह्यावेळी बँकॉक फार बदललेले वाटले. विमानतळावरच त्याचा अनुभव आला. सौजन्याने किंवा माणुसकीने मदत करण्याचे बाजुलाच राहिले पण विमानतळावरील अधिकारी अतिशय उद्धटपणे वागत होते. आम्ही उतारू प्रवासी हे जणू त्यांना त्रास देण्यासाठी आलो आहोत असे ते समजत होते.

विमानतळावर सर्व कागदपत्रांचे सोपस्कार आटोपण्यास दोन-तीन तास लागले. तेथील अधिकाऱ्यास 'आमचा एकच दिवस मुक्काम आहे, असा वेळ फुकट गेला तर आम्ही बँकाक पहाणार केव्हा' असे विचारले तरी त्याच्या तोंडावरची माशी काही हलली नाही. एअरपोर्टवर व्हिसाचे पैसे भरण्यात आणखी वेळ! प्रवासाची सुरुवात काही चांगली झाली नव्हती.

टॅक्सी पकडून शहरात गेलो. गेल्यावेळेला टूर कंपनी तर्फे आलो होतो, आणि सर्व सुखसोयी असलेल्या सुंदर हॉटेलमध्ये उतरलो होतो. पण ह्या वेळी परिस्थिती वेगळी होती! शक्यतो पैसा वाचविण्याकडे लक्ष होते कारण पुढे इतक्या देशांना भेटी द्यायच्या होत्या.

एकाने पत्ता दिला होता ते हॉटेल शोधत गेलो. हॉटेल म्हणजे हॉटेलच होते! मुंबईच्या भायखळा वगैरे भागात असावे तसे! जाता जाता एक सरदारजी रस्त्यावर भेटले. शिवाज रिगल, ब्लॅक लेबल किंवा डाळी, पापड, चहा पावडर, नेस्काफे असे काही आणले आहे का विचारू लागले. अशा वस्तू ते जास्त पैसा देऊन विकत घेतात, त्यामुळे तो पैसा प्रवासात उपयोगी पडतो. पुढल्या वेळेस लक्षात ठेवायला हवं! बुडत्याला तेवढाच काडीचा आधार!

कोणत्याही देशात प्रौढाला मद्याची एक बाटली नेण्याची परवानगी असते. बँकाक मागच्या वेळेस व्यवस्थित पाहिले होते. त्यावेळच्या आठवणी डोळ्यासमोर तरळल्या.

बँकॉक थायलंडची राजधानी. तसे पाहिले तर सुंदर शहर! पण देश तसा गरीब. त्या मानाने राजधानी श्रीमंत. म्हणून बँकॉकमध्ये अनेकजण वस्ती करून राहतात. बँकॉकमधील टुरिस्ट लोकांसाठी आकर्षणे म्हणजे शॉपिंग मार्केटस् आणि मसाज सेंटर्स. शॉपिंगसाठी इंडियन मार्केट भारतीयांचे आवडते. पटाया बीच पाहण्यासारखा! गेल्या वेळेस बँकॉकमध्ये आलो होतो, तेव्हा डॉ. जवाहर रेळे हे इथे भारताचे प्रतिनिधी म्हणून राहत होते. त्यांनी आम्हाला जेवायला बोलाविले होते. आता त्यांची बदली होनोलुलू येथे झाली होती.

गेल्या वेळेला टूर कंपनीबरोबर सुंदर रोषणाई केलेले नाईट क्लब्स पाहिले होते. तसेच मसाज सेंटर म्हणजे काय ते नुसते पाहून आलो होतो. बँकाकमध्ये थाई पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त. तेथे सेक्स फ्रीडम असल्यामुळे सेक्स एन्जॉय करणे निषिद्ध मानले जात नाही. मुलगी वयात आली की ती व्हर्जिन राहण्याची शक्यता बहुधा कमीच! बँकॉकमध्ये मसाज सेंटर्स एवढी तेजीत का याचे कारण गेल्या वेळेस कळले होते.

बँकॉक सिटी खरे म्हणजे अमेरिकन लोकांनी नावारूपास आणली. अमेरिकन लोकांना प्रवासाची तसेच नवीन नवीन ठिकाणे शोधून काढण्याची हौस! व्हिएतनाम आणि कम्बोडियाच्या सीमा थायलंडला अगदी लागून. बँकॉक थायलंडची राजधानी. तेव्हा युद्धामध्ये थकले भागलेले अमेरिकन सैनिक मौजमजा करण्यासाठी बँकॉकमध्ये यावयाचे. अमेरिकन सैनिकांनी ह्या मौजमजेत सेक्स एंजॉयमेंटसाठी अमाप पैसा उडविला. त्यामधून अनौरस संतती झाली. पासस्ट सालापर्यंत त्यांनी जी अनौरस संतती जन्माला घातली. त्यातील स्त्रिया ह्या क्रॉसब्रीड असल्यामुळे त्यांची नाक-डोळ्यांची फीचर्स मंगोलियन, पण रंग अमेरिकन लोकांसारखा नितळ पांढरा शुभ्र! म्हणून आज ज्या स्त्रिया मसाज सेंटरमध्ये काम करीत आहेत त्या साधारण वीस ते तीस वर्षांच्या आणि दिसायला अतिशय सुंदर आढळतात.

मसाज सेंटर गेल्यावेळी बघितला होता. टूर कंपनीबरोबर! मसाज सेंटरमधील व्यवस्था पाहून आश्चर्य वाटते. सेंटरमध्ये तीन क्लासच्या मुली

नंबर थर्टी सिक्स प्लिज! तोंडाला पाणी सुटलेले गिऱ्हाईक अशाळभूतपणे काचेतून पाहताना!

असतात. काचेच्या आत त्या बसलेल्या असतात. अंगावर नंबर लावून! आपण काचेच्या बाहेरून त्यांना न्याहाळावयाचे व आपल्या पसंतीची मुलगी सिलेक्ट करायची. वरच्या मजल्यावर त्यांचा क्लास वाढतो व सौंदर्यही. सौदर्याच्या बाबतीत त्यांची एकमेकीत जणू स्पर्धा लागलेली असते. अश्लील हावभाव नाहीत खाणाखुणा करणे नाही. स्मित हास्य व सौंदर्याच्या जोरावर त्या गिऱ्हाईकाला खेचून घेतात.

मागे मी एका मराठी लेखकाने लिहिलेले वाचले होते, की बँकॉकला जाऊन जो मसाज करून घेत नाही तो सर्वात मूर्ख! अशा मूर्खांमध्ये माझी ही गणना झाली होती. शेवटी मसाज सेंटर म्हणजे वेश्या व्यवसाय! पण अत्याधुनिक! शक्यतो अश्लीलतेचा बाजार टाळून! म्हणूनच बँकॉक म्हणजे मसाज सेंटर असा सरळ अर्थ का होतो ते मसाज सेंटर पाहिल्यावर – न अनुभवता सुद्धा – समजू शकते.

'पटाया बीच' पाहण्याचे भाग्य दोन्ही वेळेस मला लाभले नाही. गेल्या वेळेला बँकॉकची देवळे, गार्डन्स, हिऱ्यांचे कारखाने पाहून झाले होते. बँकॉकला खरेदी करण्यात और मजा असते. इंडियन मार्केटमध्ये कापड अगदी स्वस्त, साड्या स्वस्त, सफारी सूट फार थोड्या वेळात म्हणजे अठ्ठेचाळीस तासात शिवून तयार. ह्यावेळेला बँकॉकला मुलांसाठी कपड्यांची खरेदी करण्याची इच्छा होती, पण बँकाक गेल्यावेळेपेक्षा फारच महाग वाटले.

विमानतळावर मिळालेल्या माहिती पत्रकात प्रवाशांना सावधगिरीच्या सूचनाही होत्या. एकटे फिरावयास जाऊ नका. हॉटेलचे कार्ड जवळ ठेवा. पैशांचे प्रदर्शन करू नका. कोणतेही मादक द्रव्य घेऊ नका-नेऊ नका. खिसेकापूपासून सावध रहा. खरे आहे! बँकॉकमध्ये खिसेकापुंचे प्रमाण वाढते आहे. माझ्या एक दोन मित्रांचे खिसे बँकॉकमध्ये कापले गेल्याचे ऐकले होते. म्हणून शक्यतो पैसे बाहेर न काढता थोडीच खरेदी बँकॉकमध्ये केली. बँकॉक ह्यावेळी तितकेसे आवडले नाही. महागाई आणि एअरपोर्टवरचा घाणेरडा अनुभव पाठीशी बांधून बँकॉकमधील त्या अडगळीच्या हॉटेलमध्ये झोपी गेलो.

वीस तारीख उजाडली. सिंगापूरचे विमान पकडावयाचे होते. रिपोर्टिंग टाईम दोन तास अगोदर पावणेदहापर्यंत एअरपोर्टवर पोहोचावयाचे होते. आंघोळी आटोपून बॅगा भरल्या. मृगया व सलीलच्या हातात बॅगा सरकावल्या. हॉटेलवाल्याचे पैसे चुकवून टॅक्सी पकडली.

बँकॉक सोडताना गेल्या वेळेच्या बँकॉक भेटीची आठवण येत होती. डॉ. श्री. रेळे यांचेकडे जेवावयास गेलो होतो, त्यांच्याकडे श्री. शेणॉय नावाच्या वृद्ध

गृहस्थांची ओळख झाली होती. त्यांनी युनोमध्ये तीस ते पस्तीस वर्षे काम केले होते. त्यावेळी रात्री जेवण्यापेक्षा आम्ही मसाज सेंटरमध्ये जाऊन यावे म्हणून त्यांनी आग्रह धरला होता. अशी संधी पुन्हा नाही मिळणार म्हणून ते पुन्हा पुन्हा सांगत होते. बँकॉकला येऊन मसाज सेंटरला भेट देण्याची संधी दोनदा हुकली होती. खरे म्हणजे ह्यावेळी मसाज सेंटर आणि वेश्या व्यवसायात एडस्‌चा फैलाव झाल्यामुळे बँकॉक सरकारचे धाबे दणाणले आहे, हे मात्र लक्षात आले. असो.

विमानतळावर वेळेवर पोहोचलो. पासपोर्ट व तिकीट दाखविले. सामानाची तपासणी होऊन विमानात येऊन बसलो.

• • •

रमणीय सिंगापूर !

विमानाच्या इंजिनांचा आवाज सुरू झाला. सीट बेल्ट बांधून बसलो. पुन्हा जम्बो विमान! अरेच्या, आज विमानात फक्त वीस टक्केच पॅसेंजर्स! कमाल आहे! जम्बोसारखे राजेशाही विमान आज खाली होते. विमान रिकामे पाहून अस्मादिकांना आनंद झाला. मुलांना तर मजाच झाली. विमानाने विमानतळ केव्हा सोडले कळले सुद्धा नाही. सहजसुंदर उड्डाण! थोडावेळ खाली जमीन, मग खाली ढग आणि वर निळे आकाश! मधेच केव्हा केव्हा ढगामधून प्रवास!

सीट बेल्ट बांधण्याची सोडण्याची सूचना झाली. विमान किती उंचीवर आहे, सिंगापूरला किती वेळात पोहोचणार, तिथले हवामान वगैरे बद्दल पायलटने सांगितले, व नेहमीप्रमाणे "प्रवास सुखाचा होवो म्हणून" शुभेच्छा दिल्या. आयुष्यात मी प्रथम जेव्हा विमानात बसलो तेव्हा विमानाचा अपघात झाला तर ही भीती वाटत असे. पण आता तर नेहमीच ही जोखीम प्रवासात होती. आता कशाला घाबरायचे? नाहीतरी सर्व कुटुंब आहे ना बरोबर, काही झाले तरी!

"एक्सक्यूज मी, डु यू रिक्वायर इंडियन डिश? व्हॉट अबाउट युवर फॅमिली?"

"यस मॅडम, बट वुई वाँट इंडियन-नॉन-व्हेज डिश"

"व्हॉट डू यू मीन, सर?" तिने विचारले.

"इन नॉन व्हेज, वुई वाँट ओनली चिकन, नो बीफ ऑर पोर्क"!

"ओ. के." ती हसत म्हणाली. एअर होस्टेसचे स्मित हास्य पाहून सुंदर सिंगापूरमध्ये सुंदर स्वागत होणारच ह्याची मनोमन खात्री पटली.

विमान मोकळे. त्यामुळे पाहिजे त्या सीटवर बसून बाहेर पहायला मृगया व सलील धावत होते. टॉयलेटमध्ये जाऊन तिथल्या सुगंधित द्रव्याचा वापर करून तोंड धुण्यात त्यांना मजा वाटत होती. जम्बो विमानात पाहिजे तसे फिरायला मुलांना फारच मजा वाटत होती. इतक्यात विमानाचा वेग बदलल्यासारखा झाला. टण-टण सुंदर बेलसारखा आवाज झाला, प्रवाशाना जागेवर बसून पट्टे बांधण्याची सूचना झाली. खाली समुद्रात उभ्या असलेल्या बोटी दिसू लागल्या, मग इमारती दिसू लागल्या. हळूहळू विमान खाली खाली येऊ लागले. "चांगी

एअरपोर्ट'' विमानतळावरील इमारतीवरची पाटी दिसली, आणि का कोणास ठाऊक, अगदी क्षणभर का होईना, पण घरीच आल्यासारखे वाटले. हळूहळू विमान थांबले. दरवाजा उघडला. सर्व पॅसेंजर्स आपापले सामान घेऊन बोगद्यात शिरू लागले. एअर होस्टेस दारावर उभ्या राहिल्या होत्या. तिथे पायलटही उभा होता. स्मित हास्याने ते आमचे आभार मानित होते. खरं तर आम्ही पायलटचे आभार मानावयास हवे होते. त्याच्यामुळे तर आम्ही जमिनीवर उतरू शकलो होतो.

सिंगापूरचा चांगी एअरपोर्ट! जगातील सर्वोत्तम एअरपोर्ट म्हणून ज्याची गणना केली जाते तो हा एअरपोर्ट! बोगद्यातून बाहेर पडून जेव्हा एअरपोर्ट इमारतीत पाय ठेवला तेव्हा रोषणाई, स्वच्छता व सुंदर डिझाइन पाहून डोळे दिपून गेले. काही क्षण तसाच बघत उभा राहिलो.

"अहो! बॅगस् घ्यायच्या आहेत ना? चला लवकर! मृगया व सलीलच्या पाठीवर छोट्या बॅगा अडकवीत व स्वतः एक बॅग सावरीत सुनीला म्हणाली, "अरे हो!" मी भानावर येत म्हणालो.

बॅगेज क्लेमचा बोर्ड पाहिला. समोर वेगवेगळी अक्षरे खुणा करीत चमकत होती. आउट, इन, टनेल नंबर बॅगेज क्लेम आणि त्या दिशेने जाण्याची दिशादर्शक बाणाकृती दिसली. झपाझप चालत बॅगस् घेण्यासाठी गेलो. खरे म्हणजे इतकी घाई करण्याचे कारण नव्हते. हा काही बँकॉकचा एअरपोर्ट नव्हता. मागच्यावेळेस असाच एक पै नावाचा हनिमूनला आलेला गृहस्थ, 'डयुटी फ्री' मध्ये खरेदी करीत राहिला आणि मग बॅग क्लेम करावयास गेला तेव्हा त्याची बॅग 'मिसिंग' होती – कोणीतरी उचलून घेऊन गेले होते. त्यामुळे जरी आम्ही बँकाकमध्ये नसलो तरी बॅगस् पटकन आपल्या ताब्यात.घेण्याकडे आमचा कटाक्ष होता. सांगता काय, एखादी बॅग आणि पैसे गेले तर? ... सर्वच प्रवास बोंबलला.

बॅगेज क्लेमच्या ठिकाणी स्वच्छता होती. गडबड नाही. आमची मुले बॅग कधी एकदा बाहेर येते, आणि आपण ती उचलतो म्हणून वाट पाहत होती. ट्रॉली घेऊन सुनीला बाजूला उभी होती. शेवटी बॅगस् आल्या, आणि ट्रॉलीवर आमच्या हातातील बॅगा अडकवून आम्ही कस्टम चेकिंग साठी आलो. सिंगापूर काय किंवा कोणतेही परराष्ट्र, हल्ली कस्टमच्या बाबतीत फारच दक्ष असते. कोणताही अंमली पदार्थ देशा आत येऊ नये ह्यासाठी ते अतिशय काळजी घेत असतात.

कस्टमच्या अधिकाऱ्याने पासपोर्ट पाहिला, आमच्या तोंडाकडे पाहिले, आणि बॅगस् न उघडता, 'वेलकम टू सिंगापूर' म्हणत स्मित हास्य केले.

घड्याळात पाहिले. दुपारचे तीन वाजत होते. ट्रॉलीवर सामान टाकून एअरपोर्टवरच थोडा वेळ फिरत राहिलो. इतका सुंदर एअरपोर्ट! तिथून पायच निघत नव्हता. शेवटी एका वेगळ्या दालनात आलो. समोर मध्यभागी माणसे आपोआप पुढे सरकत होती, व दुसऱ्या पट्ट्यावरून येत होती. हा होता समांतर पट्टा! त्यावर आपण सामानासकट वा ट्रॉलीसकट उभे राहावयाचे, की आपण पट्ट्यावरून पुढे पुढे सरकत जातो. त्यामुळे चालण्याचे व सामान वाहून नेण्याचे श्रम वाचतात. लांबलचक पट्टा, अगदी जिन्यासारखाच पण समांतर, बाजूला आधारासाठी जिन्यासारखा कठडा! ह्या खूप लांब पट्ट्यावरून सरकत सरकत आम्ही चांगीच्या मुख्य दालनात आलो, जेथून प्रवासी येत होते.

हे दालन तर फारच सुंदर! आजूबाजूला सरकते जिने व समोर एक मोठा पांढरा शुभ्र - साधारण पाच मजली उंच पट्टा, जमिनीवर येताना दिसत होता. अरेच्या हा तर कारंजा! किती सुंदर! मागच्या वेळेला आपण पाहिला होता. वास्तुशास्त्रज्ञाची कमाल! पाणी जवळ जवळ पाच मजल्याच्या उंची वरून खाली जमिनीवर, अगदी अलगद, कारंजासारखे पडत असते, पण पाण्याचे तुषार आजूबाजूला दिसत नाहीत. जणू काही एखादा पारदर्शक मोठा पाईपच उभा केल्यासारखे वाटत होते. मृगया व सलील कारंजाची गंमत पाहत होते. सरकत्या जिन्यावरून वरखाली करीत होते. आरामात पायांना कष्ट न देता वर खाली जाताना त्याना मजा वाटत होती.

मला आठवण झाली मुंबईतील नरिमन पॉईंटवरच्या सरकत्या जिन्याची! काही दिवस चालला, आणि मग जो बंद पडला तो आजतागायत. आमच्या नगरपालिकेला तो सरकता जिना दुरुस्त करून वापरता काही येत नाही. आपल्या देशाची तुलना प्रत्येक ठिकाणी आपोआप केली जात होती.

"चला आता! हॉटेल शोधावे लागेल" सुनीला म्हणाली. चटकन् बाहेर आलो. टॅक्सीला हात केला! टॅक्सी बाजूला येऊन थांबली. सामान ठेवण्यासाठी ड्रायव्हर खाली उतरला. पटापट डिकीमध्ये सामान भरले. पैशाची पर्स व छोट्या पिशव्या जवळ घेऊन टॅक्सीत बसलो. सुंदर टॅक्सी! सिंगापूरमधील टॅक्सी म्हटली की चपट्या नाकाचे ड्रायव्हर, टॅक्सीत इलेक्ट्रॉनिक मिटर व बाजूला सतत चालू असणारा वॉकी-टॉकीचा आवाज. टॅक्सी पाहिजे असली की ह्या वॉकी-टॉकीवरून टॅक्सी वाल्याला कॉल पाठविला जातो.

सिंगापूरच्या सुंदर रस्त्यावरून टॅक्सी शहराकडे धाऊ लागली.

"शरंगून रोड' आय वाँट टू गो". "ओ. के. ओ. के" ड्रायव्हर म्हणाला. एअरपोर्टकडे जाणाऱ्या गाड्यांची वर्दळ एका बाजूने, तर दुसऱ्या बाजूने

शहराकडे धावणाऱ्या गाड्या! छोट्या छोट्या इमारती दिसू लागल्या आणि मग डावीकडे सुंदर हिरवळ आणि हिरवीगार झाडी दृष्टीपथात आली. काय सुंदर हिरवळ होती! वा! सर्व गाड्या जलद गतीने जात होत्या. अरे! हे काय? डावीकडे समुद्र दिसू लागला. लांबवर बोटी दिसत होत्या, सिंगापूर शहर जवळ आले वाटते!

"अहो, आपण मागच्या वेळेस इथेच कुठेतरी..."

"हां. हां. जातेगावकरांबरोबर सी. फूड खायला आलो होतो"मी तात्काळ म्हणालो, सिंगापूरच्या दुसऱ्या भेटीत आम्ही चार दिवस हॉटेलात तर चार दिवस श्री. जातेगावकरांकडे राहिलो होतो.

जातेगावकरांचे बादशाही आदरातिथ्य !

श्री. जातेगावकर बँक ऑफ इंडियाच्या सिंगापूर ब्रँचचे मॅनेजर! मी ज्यांचा दवाखाना मुंबईत व्यवसायासाठी घेतला त्या डॉ. परांजप्यांचे जावई! मला त्या दुसऱ्या भेटीत, त्यांचा बंगला फारच आवडला होता. बँक ऑफ इंडियाची जिथे जिथे जगात शाखा होती तिथे त्यांच्या बदल्या झाल्या होत्या. आम्ही मागच्या वेळी आलो होतो तेव्हा ते सिंगापूरलाच होते. शरंगून रोड पासून डावीकडे जाणाऱ्या कुआलालंपूरच्या हायवेवर साधारण तीन मैलांवर अत्यंत उच्च वस्तीत ते राहत होते. त्यावेळी त्यांनी केलेला पाहुणचार मी कसा विसरू शकेन? चार दिवस

त्यांच्या गाडीतून फिरत होतो. एके दिवशी रात्री, ते सी-फूड खाण्यासाठी आम्हाला ह्याच ठिकाणी घेऊन आले होते. शहराच्या बाहेर, एअरपोर्टवरून येताना डाव्या बाजूला त्या रात्री, मुंबईचा ब्रेब्रॉर्न स्टेडियम भरेल इतक्या मोटारी उभ्या होत्या.

सी-फूड खाण्याची मजा, परदेशात खास करून सिंगापूर-हाँगकाँग मध्ये आहे. मोठमोठे स्टॉल्स किंवा पक्क्या इमारतीत टेबल-खुर्च्या मांडलेल्या असतात. गल्यावर जाऊन मासे पहावयाचे. काचेच्या आड मासे तरंगत असतात. क्रॅब, लॉबस्टर, प्रॉन्स असे अनेक प्रकारचे मासे त्या पाण्यात जिवंत पोहत असतात. आपण हवा असेल तो सिलेक्ट करायचा, ऑर्डर घ्यायची थोड्या वेळाने टेबलावर हजर! जिभेला पाणी आणणारे, अतिशय रूचकर! त्यावेळची आठवण झाली. पण -ह्यावेळी ठरविले होते. पैसा असा तसा नाही उडवावयाचा! जगप्रवास करावयाचा आहे ना!

हळूहळू सिंगापूर शहर जवळ येऊ लागले. वेगवेगळे सुंदर उड्डाणपूल, बंदरातल्या बोटी. वा! सिंगापूर फार बदललेले वाटले, हळूहळू अशाच एका उड्डाणपुलावरून पलीकडे गेलो. सिंगापूर शहरात प्रवेश केला होता आम्ही. मुख्य रस्त्याने पुढे चाललो. तीन वर्षांपूर्वी ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो त्याच हॉटेलमध्ये उतरू असा विचार होता. टॅक्सीवाल्याला शरंगून रोडच्या सुरवातीला गाडी थांबवावयास सांगितले. साधारण टेकडी व त्या टेकडीवर ते हॉटेल, असे अंधूक आठवत होते. सामान उतरवून टॅक्सी निघून गेली. तीन मोठ्या बॅग्ज, हातात सामान, हॉटेल टेकडीवर, काय करावे सुचेना! सौ. ला व मुलाना तिथेच थांबवून हॉटेल शोधण्यास टेकडीवर गेलो, आणि चाट झालो! तीन वर्षांपूर्वीची इमारत भूमीगत झाली होती..त्याऐवजी एक नवे पॉश बैठे हॉटेल तिथे उभे होते. आत जाऊन दर विचारला. बापरे! माणशी पन्नास सिंगापूर डॉलर्स. मुलांचे वेगळे! निराशेने बाहेर पडलो. काय करावे? शरंगून रोड स्वागतास उभा होता. पण परवडण्यासारखे हॉटेल काही दिसत नव्हते.

एका दुकानात इंडियन माणसे दिसली. त्यांना स्वस्तातले हॉटेल विचारले. "गो स्ट्रेट, एंटर इन दॅट लेन! ओ के?"

सामान कसेतरी ढकलीत हॉटेलच्या दारापाशी पोहोचलो, बापरे! सिंगापूरमधल्या जुन्या इमारतीजवळ उभा होतो. जुना उभा जिना. वरती गेलो! सरदारजी होते. आतमधे एक हॉल होता. तिथे एक बाई बसली होती. जाऊ दे! दोन रात्रीच तर काढायच्या आहेत. रूममध्ये गेलो. रूम साधारणच होती. हरकत नाही. पैसे वाचवायचे होते, जगप्रवास करायचा होता ना? रूम बुक केली.

थोडावेळ विश्रांती घेतली. चहा प्यावासा वाटला. चहासाठीही पैसे उडवायचे नाहीत म्हणून टी-बॅग्ज घेतल्या होत्या बरोबर मुंबईहून निघताना. दूधपावडर, साखरही होती. खालच्या मजल्यावर किचन आहे समजले, सुनीलाने तिथून चहा बनवून आणला.

मुंबईहून आणलेले ड्रममधील पाणी संपत आले होते. मोठ्या पातेलीत पाणी सुनीलाने तापत ठेवले तिथे, पण! वर आली तेव्हा तिच्याबरोबर एक वीस वर्षाचा मुलगा ते पातेले घेऊन आला. त्याने भांडे आतमध्ये आणून ठेवले व तो सुनीलाला म्हणाला, "भाभीजी, आप सब आज खाना खानेको हमारे यहाँ आइये, शामको!" मी चाटच झालो, मी सुनीलाला विचारले "हा कोण" ती म्हणाली, "पाणी उकळवितांना किचनमध्ये चार-पाच मुले होती! कराचीची! "म्हणजे पाकिस्तानची" मी चमकून म्हणालो. "ते जाऊ द्या हो - बिचारे म्हणाले, भाभीजी पाणी तुम्ही कसे नेणार? थांबा, आम्हीच पोहोचवतो. जेवण करत होते, म्हणून त्यानी आग्रह केला," "वेडी बिडी का काय तू? त्या पाकिस्तान्यांबरोबर जेवण! छे! गाय खायचीय का तुला?" "इ ऽऽ वाटेल ते काय बोलता?" सौ. ला माझा पॉईंट समजला.

"ठीक आहे, आटप आता लवकर! अंधार पडत आला आहे. दुकाने उघडी असली तर थोडी खरेदी करू. उद्याचा दिवस संतोसा आयलंडवर जाईल."

खरंच रात्र होत आली होती. चटकन बाहेर पडलो, 'शरंगून रोड'- परदेशीयांचे खरेदीचे माहेर घर! बारीक सारीक खरेदी आटोपली! उद्या सकाळी मोठी खरेदी - व्हिडियो कॅमेरा घ्यायचा ठरविला होता ना सिंगापूरला! दुकानाचा पत्ता मुंबईहून त्यासाठी आणला होता. दुकान शरंगून रोडवरच्या गल्लीतच होते. उशीर झाला होता. व्हिडियो कॅमेऱ्याची खरेदी उद्या करावयाची ठरवून जेवणासाठी निघालो.

सिंगापूरला ही माझी तिसरी भेट! प्रथम भेटीत दूरतर्फे सिंगापूरला आलो होतो, तेव्हा 'हॉटेल तैवान' नावाच्या हाय स्ट्रीटच्या जवळपास एका पॉश फाइव्ह-स्टार हॉटेलमध्ये मुक्काम होता, हॉटेल फारच छान! बाथरूम मधे टब, परफ्युमच्या छोट्या बाटल्या, छोटे छोटे मिळणारे ते सुगंधी साबण. खरंच, सिंगापूर फार छान वाटले होते. १९८२च्या आसपासची ती वेळ होती. बँकॉक व सिंगापूर मिळून सात हजारात होते. तेव्हा मी स्वत:साठी सोनी टीव्ही घेतला होता. खास एशियाडसाठी तेव्हा भारतात ड्यूटी कमी पडणार होती.

मला अजूनही वाटते आणि एखाद्याला प्रवासाची आवड असेल तर मी पुन्हा पुन्हा सांगेन - की भारतात फिरून चार-पाच हजार रुपये घालविण्यापेक्षा,

तीन-चार हजार जास्त घालवून बँकॉक, सिंगापूरला भेट द्यावी. येताना वाशिंग मशीन, टी.व्ही, किंवा व्हिडिओ स्वत:ला आवड असल्यास आणावा. अगदी व्यवस्थित ड्यूटी भरून सुद्धा वस्तूमागे तीन-चार हजार रुपये वाचतात. टूर बरोबर गेल्यास काहीही व्यवस्था वगैरे पण पहावयास लागत नाही. पासपोर्ट काढण्यापासून ते भारतात परत येईपर्यंत चोख व्यवस्था! नाहीतरी आयुष्यात फाइव्ह-स्टार हॉटेल आणि परदेशचा प्रवास ह्याचा थोड्या पैशात आनंद उपभोगावयाचा असेल तर साथारण मध्यम परिस्थितीतील कोणीही ह्या ठिकाणाना भेट द्यावी. प्रवास करून आल्यावर, 'उगाचंच खर्च केला' म्हणणारे फार क्वचितच भेटतील.

'जीवनमे एक बार आना सिंगापूर' हे गाणे जिभेवर घोटाळत होते. सिंगापूरमध्ये उतरल्यावर काय करू आणि काय नको असे होऊन जाते. प्रत्येक वर्षी सिंगापूरची झपाट्याने होणारी प्रगती पाहून आश्चर्यचकित व्हायला होते. खरंच! द ग्रेट सिंगापूर! सिंगापूरच्या तीन भेटीत मी सिंगापूरच्या तीन अवस्था पाहिल्या, एकापेक्षा एक सुंदर! पण आमचे राहणीमान प्रत्येक फेरीस मात्र खालच्या खालच्या पातळीवर आले! प्रथम भेटीत फाइव्ह-स्टार तैवान हॉटेल, दुसऱ्या भेटीत साधारण हॉटेल आणि ह्यावेळेस तर अगदी बेताचे - दोन खाटा असलेले - सरदारजीचे शरंगून रोडवरील हॉटेल.

सिंगापूरमध्ये आल्यावर प्रत्येक भारतीयाची जमेल तिथे पैसा वाचवून जास्तीत-जास्त खरेदी करण्याची दृष्टी असते. मग बरोबर आणलेल्या वस्तूवरच ताव मारायचा - ब्रेक फास्टसाठी, आणि फक्त रात्री जेवावयाचे, ह्यामुळे जेवणाचा खर्च नक्कीच वाचतो. मांसाहाराची मला आवड. सिंगापूरमध्ये काय किंवा बँकॉकमध्ये काय, सरसूच्या तेलात तळलेले मासे किंवा भात खावयास मिळत असे. विशेषत: चायनीज डिशेश सरसूच्या तेलात असतात. "सिंगापूर प्लाझा" नावाचे एक आलिशान डिपार्टमेंट स्टोअर आहे, मागच्या वेळेस त्याची इमारत पाहिली होती. त्यावेळेस तेथे अगदी तळातल्या भूमीगत मजल्यावर वेगवेगळ्या तऱ्हेचे मासे विशेषत: प्रॉन्स आणि चिकनचे वेगवेगळे भाग छानपैकी तळून विकण्यास ठेवलेले होते. फारच चवदार!

शरंगून रोडच्या सुरवातीस एक साधारण दिसणारे डिपार्टमेंट स्टोअर आहे. आतमध्ये गेले की मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटचा भास होतो! समोर भारतीय, पाकिस्तानी व चायनीज स्टॉल आहेत. बाहेर स्टुले व टेबलस् ठेवलेली होती. गरम गरम फ्राइड साईस व प्रॉन्स स्वस्तात होते, रात्रीचे जेवण तिथेच घेतले व रूमवर परतलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. उठलो कसले? रात्रभर ढेकणांनी झोपच घेऊ दिली नव्हती! ढेकूण होतेच, शिवाय रात्री एक उंदीरही कॉट खालून धावताना पाहिला. स्वच्छ सिंगापूरचे स्वप्न ह्या हॉटेलने धुळीत मिळविले होते. सरदारजीकडे कम्प्लेंट करायची ठरविले व सकाळी रूम बदलली.

सुनीला सकाळी चहा करण्यासाठी पॅन्ट्रीमध्ये गेली, आजही ती पाकिस्तानी मुले होतीच. भाजी बिजी कापत होती, सुनीलाला त्या मुलांचा आग्रह, 'आज तुम्ही आमच्याकडे जेवा.' सुनीलाचे गरम पाण्याचे भांडे घेऊन एक मुलगा आमच्या खोलीत आला. मकबूल का काहीतरी नाव होते त्याचे. कराचीचा राहणारा! बेगम भुत्तोची स्तुती करत होता. म्हणाला की कराचीची पूर्ण वाट लागत आली आहे. शिया, सुन्नी व भारतीय घुसखोर मुसलमान या तिघांची लढाई तिथे जोरात! कधी कोण गोळी झाडेल नेम नाही! कराचीत म्हणे, माणूस सकाळी घराबाहेर पडला आणि संध्याकाळी सुखरूप परत आला तर घरची माणसे अल्लाचे आभार मानतात. मला क्रिकेटची आवड म्हणून इम्रानखानच्या गोष्टी केल्या. तर तो म्हणाला इम्रानसारखे वीस पंचवीस जण पाकिस्तानात आहेत, पण त्यांना खेळण्याची संधीच मिळत नाही.

खरं म्हणते तो पोरगा तेथील राजकारणाला कंटाळला होता. इतरच्या दहा बाराजणींबरोबर तो इंडोनेशियात नोकरीसाठी चालला होता. कदाचित कायमचा.

सहज काश्मीरची गोष्ट काढली. म्हटले "क्यों काश्मीर के लिए झगडते हो?" बाप रे! एकदम उसळलाच,

"कुछ भी बोलो, काश्मीर हमारा, पाकिस्तान का है! अगर झिया न होता तो कश्मीर पहिलेसेही पाकिस्तानका हो जाता! काश्मीर हम कभी नही छोडेंगे!"

बापरे! ह्याच्या बरोबर नको तो विषय काढला! विषय बदलून त्याला म्हटले, "चलो भाई, अब हमे जरा बाहर घूमनेको जाना है" मी त्याला टाळण्यासाठी म्हणालो. बिचारा ताबडतोब रूममधून निघून गेला. पण जाताना पुन्हा आग्रह "आज आप हमारे यहाँ खाना..."

"न, बाबा आज हमे रातको आनेमे देर होगी बच्चा"

अरे बापरे, तुझी ती काश्मीरबाबतची आपुलकी ऐकून पाचावर धारणच बसली. तुझ्याबरोबर आणि जेवायला? छ्या! मनात म्हटले, परदेशात ह्यापुढे कोणाबरोबरही वाद घालायचा नाही. अगदी कानाला खडा. आपण बालबच्चेवाले लोक, कशाला नाही त्या भानगडी?

अरे हो! आज एकवीस एप्रिल! एकवीस हा माझा शुभ आकडा! मी प्रथम गाडी घेतली तिचा नंबर होता ३२१, माझ्या दवाखान्याचा नंबर १२१, माझ्या ब्लॉकचा नंबर २१. एकवीस आकडा पाहिला की मला शुभशकूनच वाटतो. असो.

आज पावसाची लक्षणे दिसत होती. चटकन जाऊन फोल्डींग छत्र्या घेतल्या, आणि खरंच पावसाला सुरुवात झाली. खरे म्हणजे आज व्हिडिओ कॅमेरा विकत घ्यावयाचा होता. पण नको, आज पाऊस आहे. परत कॅमेरा रूमवर ठेवणे धोक्याचे! पावसामुळे आजकाही फिरावयास मिळणार नाही, तेव्हा फिरायला जाण्याचा बेत रद्द केला! तसे पाहिले तर सिंगापूर शहर गेल्या काही वर्षात फार सुधारले आहे. मुंबईसारखे सिंगापूरही दलदलीने भरलेले कोळ्याचे खेडेगाव होते, व मुंबईसारखेच ब्रिटिशांनी सिंगापूरला एक अव्वल दर्जाचे शहर बनविले. आता जरी चिन्यांचे वर्चस्व सिंगापूरवर असले तरी ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा पाहून आश्चर्य वाटते. रॅफल्स पॅलेस, हाय स्ट्रीट. सेंटर पॉईंट, सिंगापूर प्लाझा असे कितीतरी सुंदर विभाग सिंगापूरमध्ये आहेत. सिंगापूरमध्ये उतरताच तेथील कडक शिस्त व स्वच्छतेबद्दलचे धडे प्रवाशाना पुन्हा पुन्हा ऐकविले जातात. रस्त्यावर केरकचरा टाकायचा नाही. ह्यावरून माझ्या एका पेशंटने त्याच्या मित्राची जर्मनीमध्ये घडलेली हकीगत सांगितली. तिथेही शिस्त कडक! तर, त्याच्या मित्राने एअर कंडिशनर बंद करून खिडकी उघडली व खिडकीच्या कडेला उभे राहून हातातील लिफाफा फोडला. चुकून लिफाफ्याचा एक कपटा उडून रस्त्यावर जाऊन पडला. खालून पोलिस त्याच्या खोलीत आला. आणि स्वच्छतेचे नियम मोडल्याबद्दल व एअरकंडिशनर बंद करून खिडकी उघडल्याबद्दल त्याला दंड करून गेला.

रस्त्यावर कचरा जसा टाकायचा नाही, तसंच रस्त्यावर थुंकणे म्हणजे महाभयंकर गुन्हा. थुंकताना तुम्ही सापडलात तर सरळ तुरुंग किंवा अमाप दंड जो प्रवाशाला कधीच परवडणार नाही! तसेच सिंगापूर मध्ये वाटेल तिथून रस्ता ओलांडावयाचा नाही. फक्त नाक्यावर पादचाऱ्यांसाठी रस्ता ओलांडण्यासाठी जागा आखून दिलेली असते, तिथूनच रस्ता ओलांडावयाचा! जरूर लागल्यास खांबावरचे बटन दाबावयाचे. सिग्नलचा दिवा उघडझाप करू लागला की गाडीवाल्यांनी गाड्या थांबवून पादचाऱ्याला रस्ता ओलांडायला दिला पाहिजे. वाटेल तिथे रस्ता ओलांडणे नाही, गतीरोधक उंचवटे किंवा विभाजक नाहीत. मुंबईत किंवा भारतात ह्याच्या उलट! माणसे कोठेही कधीही रस्ता ओलांडतात, नियम म्हणून काही पाळतच नाहीत. थुंकणे व कचरा टाकणे - शी, नुसती आठवण येऊन माझ्या तोंडात थुंकी आली. थुंकणार होतो पण चटकन् भानावर

आलो - हा सिंगापूरचा फूटपाथ आहे - तसाच आवंढा गिळून टाकला. रस्त्यावर कोठेही गाड्यांचे प्रदूषण नाही, आवाजाचे प्रदूषण नाही की धुराचे प्रदूषण नाही. चार-पाच वर्षे वापरलेला मोटारींचे सुटे भाग मिळतीलच असे नाही, कारण नवीन गाड्यांची मॉडेल्स बाजारात येत असतात रोज.

स्लिम लिम टॉवरच्या आसपास जुन्या गाड्यांचे पार्टस् व सुंदर हॉर्नस् फार स्वस्तात मिळतात. 'स्लिम लिम टॉवर' ही एक वीस पंचवीस मजल्यांची उंच इमारत, इलेक्ट्रॉनिक वस्तूंसाठी प्रसिद्ध आहे. सिंगापूरला भेट देणाऱ्या व्यक्तीला संगीताची वा टीव्हीची थोडी जरी आवड असली तर त्याने ह्या टॉवरला भेट द्यावीच. शरंगून रोड वरून चालत जाण्याएवढ्या अंतरावर ती आहे. तळमजल्यापासून ते वरपर्यंत विविध वस्तूनी भरलेली असते ही इमारत. मला व्हिडिओ कॅमेऱ्याची किमत विचारावयाची होती म्हणून गेलो! बापरे! तिथे ठेवलेले अनेक प्रकारचे कॅमेरे व टीव्ही सेटस् पाहून डोळ्यांचे पारणे फिटले!

सिंगापूर म्हणजे खरेदीचे आगर! अगदी लहानशा खेळण्यापासून ते सोन्यापर्यंत सर्व तऱ्हेच्या वस्तू येथे विकत मिळतात. त्या सुद्धा भयंकर स्वस्तात! सोन्याच्या अनेक दुकानामध्ये भारतीयांची गर्दी! कारण भारतापेक्षा इथे सोने स्वस्त. परदेशात गेल्यावर मी सोन्याच्या खरेदीत कधीही गुरफटलो नाही. एकतर पैसा कमी आणि कायद्याने बाहेरून सोने आणण्यास असलेली बंदी. एवढे असूनही अनेक भारतीय मध्यमाशांप्रमाणे सोन्याच्या दुकानात घुटमळताना दिसत होते.

खरेदीसाठी सिंगापूरचे दोन भाग करता येतील. एक हायस्ट्रीट व दुसरा शरंगून रोड! हायस्ट्रीट हा खरोखरंच हाय स्टँडर्डच्या लोकांसाठी वाटतो, ह्या रस्त्यावर अनेक दुकाने आहेत. "सतनाम हाऊस" ह्या इमारतीत सिंधी - सरदारजीची अनेक दुकाने एकावर एक आहेत. शेजारीच सिटीझन घड्याळांचे दुकान! पैसा जास्त असेल तर त्यांच्यासाठी डिपार्टमेंट स्टोअर्स किंवा सेंटर पॉईंट विभाग मौजूद आहेच.

पण सर्वसाधारण भारतीय शरंगून रोडवरच खरेदी करताना दिसतात, शरंगून रोडवर 'मीना' नावाचे पातळांचे दुकान आहे. येथे अनेक प्रकारच्या सिंगापूर सिल्क स ाड्या मिळतात. गल्लीत किंवा मेनरोडवर अनेक मद्राशांची दुकाने कॅसेटस्, वाशिंग मशीनस, शर्टस्, जीनस्, वेगवेगळी खेळणी वगैरे वस्तू भारताच्या मानाने अत्यंत स्वस्त! तसेच शरंगून रोडच्या सुरूवातीस असलेले डिपार्टमेंट स्टोअर! चिनी आणि मलायी लोकांची अनेक दुकाने पहिल्या

मजल्यावर तिथे आहेत, पण तीनवेळा सिंगापूरला जाऊनही 'मुस्तफा' सारखे खरेदीचे ठिकाण पाहिले नाही. दहा वर्षांपूर्वी त्याचे शरंगून रोडवर छोटेसे दुकान होते. आता शरंगून रोडवर एका टोकाला त्याचे भव्य डिपार्टमेंट स्टोअर आहे. फारच रमणीय ठिकाण! आतमध्ये गेल्यावर मन प्रसन्न होते. टेलिफोन आणि इतर वस्तुंची वेगवेगळी मॉडेल्स पाहून मन थक्क होते. मुस्तफाच्या दुकानात किंमतीत फरक असला तरी खरेदीसाठी फिरण्यात वेळ घालविण्यापेक्षा एकंदरीत खरेदी तेथेच करणे योग्य होय.

अरब स्ट्रीट नावाच्या रस्त्यावर रात्रीचा बाजार भरतो, पण हल्ली सिंगापूरमध्ये तैवानचा डुप्लिकेट माल मिळू लागला आहे, त्यामुळे खात्रीच्या दुकानातून खरेदी केलेली बरी.

सिंगापूरमध्ये फिरण्यात दिवस घालविला. मुंबईत माहिती मिळालेल्या बनाना लीफ वरच्या जेवणावर ताव मारला. पावसाची रिपरिप चालू होती. अरेच्च्या! रस्त्याच्या बाजूला हे काय? जमिनीतून माणसे वर येत होती. अरे! ही तर भुयारी रेल्वे! चटकन् सर्वांना घेऊन खाली गेलो. वा! गेल्या दोन भेटीमध्ये भुयारी रेल्वे पाहिली नव्हती, तेव्हा रेल्वेचे काम चालू होते. गेल्या तीन वर्षात भुयारी रेल्वेचे जाळे विणले गेले आहे. खरं म्हणजे सिंगापूरच्या मध्यवर्ती भागात मोटारींची भयंकर वर्दळ! त्यासाठी ऑफिस टाईममध्ये मध्यवर्ती भागात जाताना मोटारीत कमीत कमी चार माणसे हवीतच! नाहीतर दंड भरावा लागतो. मुंबईत ही कल्पना अजून अधांतरी आहे. ह्या दंडाच्या कटकटीपासून वाचण्यासाठी हल्ली बरेच लोक भुयारी रेल्वेने प्रवास करतात.

भुयारातून खाली उतरल्यावर सुंदर रेल्वे स्टेशनवर आलो. सगळीकडे स्वच्छता. ट्रेनने जायचे, पण कुठे? कोणत्या तरी सहा स्टेशने सोडूनच्या स्टेशनची तिकीटे काढावयाची ठरविले. पण तिकिटे काढण्याची खिडकी?

"एस्क्युज मी, व्हेअर कॅन आय गेट टिकीट्स प्लीज?"

"व्हेअर डू यू वाँट टू गो?"

"आरकीड रोड" मॅपकडे पाहून मी सांगितले. तो मला एका ऑटोमॅटिक मशीनजवळ घेऊन गेला, एका फटीतून डॉलर सरकवायला त्याने मला सांगितले. इलेक्ट्रॉनिक मीटर थोडावेळ फिरला व तिकीट बाहेर! वा! काय कमाल आहे! त्या मशीनकडे पाहत "थँक्स" म्हटले.

मृगया आणि सलीलची डॉलर टाकण्यासाठी झुंबड! चार तिकीटे काढली. लांबलचक तिकीट हातात पकडून, इतर माणसांप्रमाणे प्लॅटफार्मवर जाण्यासाठी रांगेत उभा राहिलो. पुढची माणसें काय करतात ते बघून तसेच आपण करावयाचे. बघतो तो काय? प्रत्येक जण आत जाण्याआगोदर छोट्या कठड्याच्या फटीतून हातातील तिकीट ढकलीत होता व दुसऱ्या बाजूने आत गेल्यावर तिकीट घेत होता. आम्ही प्रत्येकाने तिकीट ढकलले व दुसऱ्याबाजूने तिकीट घेतले. पण मृगया चटकन् न सरकल्यामुळे अडथळा झाला. मधला दांडा लॉक झाला. अरे बाप रे! पंचाईत मोठी! कारण सिंगापूरमध्ये भरपूर दंड भरावा लागतो. पण बाजूला उभ्या असलेल्या पोलिसाला आमची पंचाईत समजली. चावी फिरवून त्याने दांडा वर केला व मृगयाचे तिकीट काढून हातात दिले. आम्ही त्याला 'सॉरी' म्हटले. व सहज मागे पाहिले तर आमच्या दोन मिनिटांच्या गडबडीमुळे तीस ते चाळीस माणसे रांगेत खोळंबली होती.

प्लॅटफॉर्मवर आलो. सुंदर प्लॅटफॉर्म. प्लॅटफॉर्मच्या बाजूला अंधारात रूळ होते. रुळाच्या बाजूला निऑन साइनच्या सुंदर जाहिराती होत्या. समोर प्लॅटफॉर्मवर रेल्वेचा नकाशा होता. गाडी कुठे व कशी जाते ते लाईटस्च्या द्वारे दाखविले होते.

"बाबा गाडी आली" आणि बघतो तर काय, खरंच एक नवी कोरी करकरीत गाडी प्लॅटफॉर्मला लागली. आपोआप दरवाजे उघडले. माणसे बाहेर पडली. काही चढली. आपोआप दरवाजे बंद झाले, आणि गाडी हलकेच प्लॅटफॉर्म सोडून गेली सुद्धा. गाडीच्या डब्याचा लाल दिवा भुयाराच्या अंधारात गडप झाला.

"चला ना बाबा! आपण पण बसूया"

"थांब गं! थोडा वेळ बाहेरून मजा बघू!"दहा पंधरा मिनिटे अशी लोकल गाड्यांची मजा पाहत राहिलो. नंतर एक गाडी आली आणि आम्ही चटकन् आत चढलो. समजा आपला हात किंवा सामान दरवाजाच्या बाहेर राहिले तर? काही घाबरावयाचे नाही. दरवाजा बंद होतच नाही. गाडीही चालू होत नाही. मग गार्ड अनाऊन्स करतो, 'लौकर गाडीत चढा' आणि तुम्ही चढल्यावर मगच दरवाजा बंद होतो व गाडी सुरू होते. खरंच काय सुंदर गाडी! आतमध्ये माणसे कशी व्यवस्थित उभी राहतात. ना मोठ्याने गप्पा ना भिकाऱ्यांची वर्दळ! मुंबईच्या लोकलला लोंकळणारी माणसे, थुंकणारी माणसे व मधूनच येणारी भेळवाल्याची प्रेमळ हाक ह्या लोकलमध्ये आढळली नाही. गाडीमध्ये आणखी एक सुंदर सोय होती. दरवाज्याच्या वर रेल्वे लाईनचा मॅप होता, छोट्याशा बाणानी काढलेला. पुढील येणारे स्टेशन त्याचे नाव, ते कुठल्या बाजूला येणार ते दाखविणारे दिवे

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
मु. प्र. ७६५

लुकलुकू लागत. त्यामुळे येणारे स्टेशनचे नाव व ते कुठल्या बाजूला येणार ते ताबडतोब समजत असे. ही सोय अत्यंत सोपी व स्वस्त आहे. निदान एवढी सोय तरी मुंबईच्या लोकल्समध्ये करावयास हवी पण- असो.

आर्कीड रोड स्टेशनला उतरून वर चालत आलो. एकदम पॉश एरिया! समोर मॅकडोनाल्ड दिसले! कुटुंबाला भूक लागली होती. बरोबर चिवडा लाडू होते, पण तरीही मॅकडोनाल्ड स्वस्त आणि तिथे बसण्याचा मोह आवरेना. सेल्फ सर्विस काऊंटर वर जाऊन पदार्थांची नावे वाचली. हॉट डॉग पासून पिझ्झापर्यंत सर्व काही होते. पण फ्रेंच फ्राईज सर्वात स्वस्त म्हणून दोन पुड्या घेतल्या. नाव मोठे पण- फ्रेंच फ्राईज म्हणजे बटाट्याचे तळलेले तुकडे, सॉसबरोबर! इकडे तिकडे फेरी मारली. कंटकी चिकन खावीशी वाटत होती पण खिशात पैसे खुळखुळत नव्हते.

मॅकडोनाल्डमध्ये बसून कंटाळा आल्यावर अक्षरशः रस्त्याच्या बाजूला फुटपाथवर उंचवट्याच्या ठिकाणी सहकुटुंब बसलो. अंधार पडत होता. ऑर्किड रोड आधी पॉश एरिया. तिथली सुंदर सुंदर डिपार्टमेंट स्टोअर्स - ती सुद्धा संपूर्ण काचेची. म्हणजे सी-थ्रू! बसल्या बसल्या वेळ चांगला चालला होता. रस्त्यावरून सुंदर गाड्या धावत होत्या. गाड्या म्हणजे माझा आणि सलीलचा जीव की प्राण. 'परदेशात जाऊन काय आणशील' असे जर मला कोणी विचारले तर मी फक्त गाडी, म्हणून प्रथम सांगेन. देखणी गाडी मला मोहून टाकते. टोयोटा, मित्सुबिशी, होंडा- अहाहा! काय त्या गाड्या! टॅक्सीवाल्याकडे इतक्या सुंदर गाड्या पाहून मला वाटत होते की टॅक्सीवाला होऊन इथेच राहावे व अशा अप-टु-डेट गाड्या फिरवाव्यात!

गुडूप अंधार झाला होता, तरी उठवेना, पण काय करणार, दुसऱ्या दिवशी संतोसा आयलंडवर जायचे होते ना!

पुन्हा प्लॅटफॉर्मवर येऊन परतीची गाडी पकडली. भुयारी रेल्वेतून त्यानंतर अनेक देशात प्रवास केला. सर्व ठिकाणी तीच पद्धत! तरी ही सिंगापूरची भुयारी रेल्वे नवलाईची म्हणून असेल, पण फारच सुंदर वाटली. रात्री शरंगून रोड वरील स्टॉलवर जाऊन प्रॉन्स-फ्राईड राईस घेतला व रूमवर आलो. त्या अगोदर व्हिडिओ कॅमेऱ्याच्या दुकानात गेलो. किंमतीचा अंदाज आधी काही ठिकाणी घेतला होता, पण ह्या दुकानात त्याहूनही किंमती कमी होत्या. सर्व तंत्र समजावून घेतले. बॅटरी चार्जर घेतला. मनातील एक इच्छा पूर्ण झाली होती! आता व्हिडिओ कॅमेऱ्यातून मी सर्व प्रवास टिपणार होतो, कायमच्या, आठवणीसाठी.

रात्री व्हिडिओ कॅमेऱ्याची बॅटरी चार्ज केली व आरामात झोपी गेलो. त्या रात्री ढेकूण चावले की नाही आठवत नाही. कारण स्वप्नात सारखा व्हिडिओ कॅमेरा दिसत होता.

बावीस एप्रिल, सकाळी लवकर उठलो. आंघोळी आटोपल्या. नवीन घेतलेल्या बुशशर्ट आणि पँटची घडी मोडली. कॅमेरा घेऊन रस्त्यावरचे शुटिंग करण्याचा प्रयत्न केला पण जमत नव्हते. म्हणजे दुकानात पुन्हा जायला पाहिजे! आज सिंगापुरातली दुकाने बंद! म्हणजे खरेदी बोंबलली! तशी आता विशेष खरेदी राहिली नव्हती म्हणा. सिंगापूरमधील आज शेवटचा दिवस. बाहेर पडलो. नशीबाने कॅमेऱ्याचे दुकान उघडे होते! पुन्हा तंत्र समजून घेतले, आणि संतोसा आइलंडला जाण्यासाठी बसस्टॉपवर येऊन उभे राहिलो.

सिंगापूरमध्ये अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. सिटी-टूर बसने ती सर्व व्यवस्थित बघता येतात. सिंगापूरला प्रथम भेट देणाऱ्यांनी काही स्थळांना न विसरता भेटी दिल्या पाहिजेत व त्यासाठी साधारण पाच दिवस तरी राहावे. पहिला दिवस खरेदी करावयाच्या वस्तुंच्या किंमती वेगवेगळ्या दुकानात फिरून काढाव्या. दुसरा व तिसरा दिवस प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी घालवावा, व शेवटचे दोन दिवस खरेदीसाठी ठेवावेत.

सिंगापूरमध्ये आल्यावर काही स्थळे आवर्जून पहावीत. जसे संतोसा आयलंड, फाउंटन-शो, बोटॅनिकल गार्डन, बर्ड-शो, टायगर बाम गार्डन वगैरे. संतोसा आयलंडवंरच फाउंटन-शो असतो. फाउंटन शो अंधार पडल्यावर बघावयाचा असल्यामुळे संतोसा आयलंडवर दुपारी दोनच्या पुढे जाणे उचित. सबंध संतोसा आयलंड पाहून, अंधार पडल्यावर फाउंटन-शो पाहावा. फाउंटन-शो - एक अत्यंत आल्हाददायक शो! संगीताच्या तालावर वेगवेगळे कारंजे, आणि कारंजांचे लयबद्ध नृत्य पाहून, प्रेक्षकाला निर्भेळ आनंद देण्याची सिंगापूरीयन कल्पना मोहवून टाकते.

आपला भारत गरीब आहे, ठीक आहे. पण काही सोप्या स्वस्त व सुटसुटीत कल्पनांचे आपल्या देशात अनुकरण करता येईल. साधे पाणी, पण कारंजातून येताना रंगीत होते, नृत्य करते तेव्हा एखादी युवतीच आपल्यासमोर नाच करीत आहे की काय असा भास होतो.

बर्डस्-शो हाही एक न चुकता पहावा असा प्रकार. सिंगापूरमध्ये जाऊन फक्त खरेदी करायची ही चुकीची कल्पना मनात बांधून सिंगापूरमध्ये उतरू नका! सिंगापूरमध्ये अनेक स्थळे मनाला मोहून टाकतात. बर्ड-शो पाहताना पक्षांचे खेळ आणि त्यांची बुद्धी पाहून मन थक्क होते, विशेषत: काकाकुवा पक्षी

आपल्यासारखा कसा बोलतो, किंवा प्रेक्षकांच्या खिशातील नेमके पैसे कसे काढतो तसेच त्यांचे नाचकाम पाहून सिंगापूर काय आहे आणि किती प्रगत आहे ह्याची कल्पना येते.

पाश्चात्य देशात एक पाहिले. पाच दिवस भरपूर काम करा आणि आठवड्याचे शेवटचे दोन दिवस मजा करा. ह्या दोन दिवसात रिक्रिएशनला महत्त्व असते. मनावरचे सर्व ताण, दडपणे बाजूला ठेवून मजा करावयाची आणि कामाच्या वेळेस कसून काम! वॅक्स म्युझियम मध्ये वेगवेगळ्या व्यक्तिंच्या प्रतिकृती आणि पुतळे पाहून ही माणसे खरी की खोटी असा संभ्रम होतो. तेव्हा सिंगापूरला आल्यावर ह्या स्थळांना भेटी दिल्याच पाहिजेत. आमच्या दुसऱ्या भेटीत आम्ही हे सर्व पाहिलेले असल्यामुळे तिथे आम्ही ह्यावेळी गेलो नाही. संतोसा आयलंडवर जाताना, अलीकडे डोंगरावर झाडी आहे, तिथे टायगर बाम गार्डन आहे. टायगर बाम हा सिंगापूरमधील प्रसिद्ध पेनबाम -जसा आपल्याकडे अमृतांजन, तसाच हा टायगर बाम. दोन चिनी भाऊ होते. आबून हा आणि आबून पार त्यांची नावे! त्या दोघा भावांची आई ब्रम्ही तर वडील चिनी! सत्तर वर्षापूर्वी सायकलवर औषधे विकीत ते सिंगापूरला आले. पुढे त्यांनी टायगर बामचा कारखाना काढला. भरपूर पैसा मिळविला. मग त्या दोघा भावांनी हा डोंगर खरेदी करून त्यावर हे गार्डन तयार केले, ते हे टायगरगार्डन! हे गार्डन म्हणजे सिमेंट क्राँक्रीटचे एक जिवंत दुःस्वप्न आहे. चिनी लोककथांतील मोठमोठ्या शेपट्यावाले ड्रॅगन्स, खेकडे, साप, अजगर, राक्षस! अगदी चामुंडी हिल-म्हैसूर मधल्या त्या तरवार घेतलेल्या पुतळ्याची आठवण येते. सर्व वेगवेगळ्या आकारांची सिमेंटची शिल्पे! शिल्पकाराच्या कल्पनेचा विलास पाहून आशचर्य वाटते. एके ठिकाणी एक भली मोठी डुकरीण आडवी पहुडली आहे व तिचे दुध माकड, जिराफ, हरीण पीत आहेत व तिची पिल्ले बिचारी आशाळभूतपणे पाहत आहेत असे दाखविले आहे. ही सर्व ठिकाणे गेल्यावेळी पाहिली होती. पुन्हा ह्या ठिकाणांना भेट देण्यास वेळ नव्हता आणि पैसाही नव्हता, तरीही संतोसा आयलंड पाहण्यास मी उत्सूक होतो. बसस्टँडवर उभा असताना, सुनीला व मुलाना पोझ घेण्यास सांगितले, व कॅमेऱ्याने चित्रण चालू केले. प्रवासातील पहिलेच चित्रण! रिवाईंड करून ताबडतोब पाहिले. वा! फारच सुंदर! एक बस आली, तिलाही कॅमेऱ्याने टिपून घेतले. बस पकडून हाय स्ट्रीटला उतरून, संतोसा आयलंडसाठी दुसरी बस पकडावयाची होती. बसने हाय स्ट्रीटला आलो, आणि आम्ही हाय खाल्ली! त्या दिवशी सुट्टीचा दिवस होता. सर्व दुकाने बंद! सिटीझन शॉप, सतनाम हाऊस सर्व काही बंद. थोडी खरेदी करून मग संतोसा आयलंडला जावयाचे होते. कारण दुसऱ्या दिवशी सकाळची फ्लाईट असल्यामुळे खरेदी होणार नव्हती.

झाले! सुनीलाचा मूड गेला. "अगं, आपण हाँगकाँगला करू खरेदी" असे म्हणून आजूबाजूच्या भागाचे चित्रण करीत बसस्टँडकडे आलो. हाय स्ट्रीटचा परिसर पार बदलून गेला होता. प्रत्येक भेटीत हायस्ट्रीटचे रूप निराळे! पहिल्या भेटीत डाव्या बाजूला एक जुनी तळमजली इमारत होती. दुसऱ्या भेटीत तिथे एक चिनी दुकान आले होते, त्याचेही तेव्हा शेवटचे दिवस आलेले दिसत होते, काही दिवसानी हे दुकानही जमीन दोस्त होणार होते. म्हणून तिथल्या दुकानातल्या बाईंनी अगदी कमी किंमतीत वस्तू दिल्या होत्या, आणि ह्या वेळेस ते दुकानही नाहीसे झालेले होते.

डाव्या बाजूला कोलंबो कोर्टची सुंदर इमारत, उजव्या बाजूला हायस्ट्रीट पलीकडे प्लाझा. समोर सुंदर हिरवळ, त्या पलीकडे तो सिंगापूरचा छोटासा पूल व खाडी! दृष्य सुंदर खरेच! गेल्या दहा वर्षात किती बदल झाला होता! कॅमेरा डोळ्याला लावला व सर्व टिपून घेतले, आणि संतोसा आयलंडकडे जाणाऱ्या बसमध्ये चढलो.

बस सुरू झाली. कोलंबो कोर्ट बिल्डींग, व हायस्ट्रीटचा सुंदर परिसर दिसेनासा झाला. परदेशात जसे बसमध्ये सुटे पैसे बॉक्समध्ये टाकायचे असतात तसेच येथेही होते. बसमध्ये कंडक्टर नसतो. पैसे घातल्यावर दुसऱ्या बॉक्समधून तिकीट बाहेर आले. बसचा दरवाजा बंद झाला. तिकीट घेऊन वरच्या डेकवर जाऊन बसलो. अगदी पुढच्या सीटवर. चटकन् कॅमेरा काढला आणि खिडकीमधून शूटींग चालू केले. बसच्या हादरण्यामूळे कॅमेरापण हालत होता, पण तरीही सिंगापूरच्या रस्त्यांचे शूटींग ठीक झाले. इतक्यात थोडी चंढण जाऊन डाव्या बाजूला मोठी खाडी दिसू लागली. आले! संतोसा आयलंड जवळ आले!

वर्ल्ड-ट्रेड-सेंटरच्या जवळ बस थांबली, व आम्ही उतरलो. वर आकाशात रोप-वे दिसत होती. बंदिस्त ट्रॉलीज रांगेने पुढे मागे सरकत होत्या. मृगया सलीलला ह्या ट्रॉलीत बसायला मिळणार म्हणून आनंद झाला. वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या पायऱ्या चढून तिकीटे काढली व रोप-वे मध्ये बसण्यासाठी लिफ्टने वर गेलो.

खरं सांगायचे तर आमच्या सिंगापूरच्या प्रथम भेटीची आठवण झाली. तेव्हा टायगर बाम ज्या डोंगरावर आहे तिथून संतोसा आयलंडपर्यंत रोप-वे होती. तेव्हा सुनीला आणि मीच होतो. एका खोलीमध्ये एक अजस्र चाक होते, तिथून रोप-वे सुरू होत होती. त्या दोराचे दुसरे टोक थेट संतोसा आयलंडवरच्या दुसऱ्या खोलीतल्या दुसऱ्या चाकावर! का कोणास ठाऊक, मी गंमतीने सुनीलाला म्हटले की हे चाक जमिनीपासून नीट काटकोनात नाही, तेव्हा घर्षणाने ही दोरी एका

बाजूने तुटायला आली असणार. रोप-वे ने जाताना ट्रॉलीतही मी हे सांगून सुनीलाला घाबरवीत होतो. 'आता दोरी तुटली तर आता आपण डोंगरावर पडू,



रोप्वेने संतोसा आयलंडकडे प्रयाण ! सिंगापूर

आता रस्त्यावर पडू आणि आता खाडीच्या पाण्यात!' नशीबाने त्यावेळी तसे काही घडले नाही.

पण आमचा प्रवास आटोपल्यानंतर दोन-चार महिन्यानी ती दोरी खरोखरच खाडीच्यावर तुटली, काही जण खाडीत पडून मेले, तर काही जण लोंबकळत राहिले आणि वाचले. तेव्हांच्या त्या अपघाताचे चित्रण टी. व्ही. वर भारतातही दाखविले गेले होते! असो. त्या अपघातानंतर एवढी लांब असलेली रोप-वे कमी करण्यात आली आणि वर्ल्ड ट्रेड सेंटर बिल्डींग तिला मध्यभागी टेकू देण्यासाठी बांधण्यात आली. पण पूर्वीची मजा गेली. आता वर्ल्ड ट्रेड सेंटरवरून टायगर बाम गार्डन किंवा संतोसा आयलंडकडे असेच जाता येते. आम्ही ट्रॉलीसाठी रांगेत उभे राहिलो.

ट्रॉलीज एकामागून एक येत होत्या. आम्ही रांगेने ट्रॉलीत बसलो. हळूहळू ट्रॉली संतोसा आयलंडकडे सरकू लागली. सिंगापूर बंदराचे दृष्य डाव्याबाजूला दिसत होते. लांबवर सिंगापूरमधील सुंदर सुंदर इमारती उठून दिसत होत्या. हळूहळू संतोसा आयलंड जवळ आले. कॅमेरा फिरवून छायाचित्रण केले.

संतोसा आयलंडवर पाय ठेवले. जवळच बटरफ्लाय म्युझियम होते, तिकीट काढून आत जायचे होते. मृगया सलीलने हट्ट धरला म्हणून त्याना पाठविले. बाहेर पडायच्या दारावर उभे राहिलो पण किती वेळ झाला तरी दोघे बाहेर आली नाहीत. भीती वाटायला लागली. शोध शोध शोधले - आणि पाहतो तो काय? आत शिरण्याच्या गेटवर ती आली होती! इतक्यात काही जपानी माणसे तेथे आली. मी व्हिडिओ शुटींग करीत होतो. त्याना सुनीला बरोबर फोटो काढायचा होता. मी परवानगी दिली. ते वाकून नमस्कार करून निघून गेले.

समोरच्या स्टेशनवर उभे राहिलो. तिथे मोनोरेल होती. इतक्यात गाडी आली. सुंदर डबे. जवळ जवळ चारी बाजुनी उघडे! लेडी ड्रायव्हर! आतमध्ये प्रत्येक स्थळाची माहिती देणारी टेप. 'कृपया उभे राहू नका, दरवाजा उघडू नका' वगैरे सूचना. पण माझ्याजवळ व्हिडिओ कॅमेरा असल्यामुळे मी अंग वळवून दोन्ही बाजूचे शुटिंग केले. टूर बरोबर आपण गेलो तर मोनोरेलने फक्त एकच फेरी मारायला देतात टूरचे संचालक. पण खरं तर एकदा तिकीट काढले की तुम्ही कितीही वेळ फेऱ्या मारू शकता! रेलमार्ग वर्तुळाकार असल्यामुळे बसल्या बसल्या भलतीच करमणूक होते. दर दहा मिनिटांनी ट्रेनची एक फेरी होते. ट्रेनने जाताना वेगवेगळी स्टेशने लागतात. छोटी छोटी.

सुंदर बीच! तिथे उतरून समुद्रात मनसोक्त डुंबावे किंवा पायाने चालविण्याच्या रणगाड्यांच्या सारखी चाके असलेल्या गाड्या चालवाव्यात. त्याचे नाव सिलोसो बीच.

पुढे सिलोसो फोर्ट लागतो. ट्रेनमधून जाताना तोफांचे धुडूम-धुडूम आवाज ऐकू येतात, खोटी खोटी माणसे खोट्या खोट्या तोफा चालवितात. अगदी हुबेहून देखावा.

सरेंडर चेम्बर, म्हणजे जेथे जपान्यांनी सिंगापूर ब्रिटिशांना देण्याच्या तहनाम्यावर सह्या केल्या ते ठिकाण. फाउंटन गार्डन, कोरॅलियम - येथे समुद्रातील वेगवेगळे सुंदर सुंदर दगड ठेवलेले आहेत. आयलंडवर गोल्फ क्लब सुद्धा आहे. संतोसा आयलंड मनाला भाऊन टाकतो. आम्ही अगदी मन तृप्त होई पर्यंत भटकलो.

ह्या वेळेस फाउंटन-शो पाहण्यासाठी थांबलो नाही. रात्र होत आली होती. पुन्हा रोप-वे ने वर्ल्ड ट्रेड सेंटर व तिथून बसने शरंगून रोड! शरंगून रोडवर थोडीशी खरेदी केली. उद्या सकाळी सात वाजता सिंगापूर सोडायचे! रात्री सामानाची बांधाबांध करताना वाईट वाटत होते. खरे म्हणजे एकदा तरी बँकॉक

ते सिंगापूर असा ट्रेनने प्रवास करावयाची इच्छा होती. बँकॉकच्या बाजूस कवाय नावाचे छोटेसे शहर आहे. त्या शहरावरून 'ब्रिज ऑन द रिव्हर कवाय' हा इंग्रजी चित्रपट निघाला होता. त्यातील सैनिकांचे शिट्टयावरचे ते सुंदर गाणे, त्या गावात ऐकावे असे वाटत होते. पण ह्या दोन्ही इच्छा पूर्ण झाल्या नाहीत. एक म्हणजे बँकॉक सिंगापूर ट्रेन प्रवासात लुटण्याचे प्रकार सर्रास होतात, तेव्हा ती जोखीम घेणे शक्य नव्हते. दुसरे ब्रिज ऑन द रिव्हर कवाय ह्या चित्रपटाचे छायाचित्रण करण्यास थायलंडच्या सरकारने परवानगी नाकारली होती म्हणे, आणि त्यामुळे खरे छायाचित्रण सिलोनमध्ये झाले! असो.

तेवीस एप्रिल. सकाळी साडे सहावाजता हॉटेल सोडले. टॅक्सी पकडली. एअरपोर्टवर येता येता सिंगापूरचे निरोपाचे चित्रण केले. एअरपोर्टवर चटाचट पासपोर्ट दाखवून मोठ्या बॅगा कॅथे पॅसिफिकच्या काउंटरवर दिल्या. प्रत्येकवेळी विंडोसीट मागणार मी! पण ह्यावेळी मधल्या चार सीटस् मिळाल्या! कस्टम चेक पार करून आत गेलो. विमान सुटण्यास अजून दोन तास होते. बोर्डिंग पास जवळ होते. बोर्डिंग पास घेतले असल्यामुळे पॅसेंजरला घेतल्या शिवाय विमान सुटणार नाही ह्याची खात्री होती. तेव्हा मधल्या वेळात माझ्या ह्या आवडत्या एअरपोर्टचे शुटिंग करण्याचा इरादा होता.

शूटिंग करण्यास परवानगी मिळेल की. हेर वगैरे समजून किंमती कॅमेरा जप्त व्हावयाचा! म्हणून घाबरत घाबरत चौकशीच्या काउंटरवर गेलो चुणचुणीत सिंगापूरी मुलगी होती,

"मॅडम, आय वॉन्ट टू डू शूटिंग ऑफ धिस एअरपोर्ट, बिकॉज आय लाइकड् इट व्हेरी मच.

ओ ... व्हाय यू आर आस्किंग फॉर? यू कॅन शूट एनिथिंग ... व्हॉट एव्हर यू लाइक." स्मित हास्य करीत ती म्हणाली. चांगी एअरपोर्टचे चित्रण करण्याची माझी इतके दिवसांची इच्छा पूर्ण होणार होती. वाटले 'थँक्स' म्हणायच्या ऐवजी ह्या आनंदाप्रित्यर्थ तिचा एक किस घ्यावा! चांगी एअरपोर्ट असा माझ्या आठवणीच्या पोतडीत कायमचा येऊन बसणार होता.

एअरपोर्टच्या तळमजल्यावर चटकन् सर्वांना घेऊन गेलो. त्या सुंदर उभ्या पाईपासारख्या कारंजाचे जवळून चित्रण केले. सरकत्या जिन्यावर व नंतर पहिल्या मजल्यावरून विमानात बसण्यापूर्वी वेटिंग रुमच्या अलीकडे मुलांच्या खेळण्याच्या जागेत, व इतर ठिकाणांचे चित्रण करीत आलो. एका बाजूला पाहिले तो काय, एका सुंदर पडद्यावर 'सिंगापूर सिंगापूर' हे गाणे व त्यासोबत सिंगापूरचे सुंदर दर्शन त्या गाण्याच्या तालावर दाखविले जात होते. थोडावेळ तिथे

थांबलो, व मग वेटिंग रुममध्ये आलो. समोर काचेच्या पलीकडे एअरपोर्ट दिसत होता. आमच्या विमानाचा नंबर अजून काही काऊंटरवर लागला नव्हता. विमाने पाहण्यात थोडा वेळ घालविला. आणि आमच्या हाँगकाँगच्या विमानाची अनाउन्समेंट झाली.

कॅथे पॅसिफिकचे हिरवे जम्बो विमान आमची वाट पाहत उभे होते. विमानात शिरताना चपट्या नाकाच्या एअरहोस्टेसिस आमचे स्वागत करून तिकीटे चेक करीत होत्या. एक दोन सरळ नाकाच्या होत्या -त्या बहुतेक भारतीय असाव्यात. विमानात आल्यावर सामान सीटखाली ढकलले. जड सामान वर ठेवले. विमानात ह्यावेळी सेंटरच्या सीटस् होत्या -विंडो सीटस् नव्हत्या.

विमानाची घरघर सुरू झाली. हळूहळू विमान चालू लागले. मग 'फासन बेल्ट' घोषणा झाली व पडद्यावरही ती सूचना झळकली. काही एअर होस्टेसिस् खुर्ची सरळ आहे की नाही, बेल्ट बांथलाय का नाही पाहू लागल्या. तोपर्यंत एक, संकटकाळात विमानातून बाहेर पडताना लाईफ जॅकेट कसे अडकवायचे त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवत होती.

●●●

अविस्मरणीय हाँगकाँग

हाँगकाँग एक सुंदर शहर!

काही वेळाने आम्ही हाँगकाँगच्या त्या एअरपोर्टवर उतरणार होतो ज्याची मी इतकी वर्षे आतुरतेने वाट पाहत होतो. अनेक इंग्रजी चित्रपटातून हाँगकाँगच्या विमानतळाचे दर्शन मी घेतले होते. खरेच! हाँगकाँग इतका सुंदर एअरपोर्ट का? त्याच्यामागे भौगोलिक कारण आहे. हे मला विमान हाँगकाँगच्या जवळ आल्यावर समजले.

विमानाच्या इंजिनांच्या आवाजात बदल झाला. टिंग-टाँग, बेल वाजली. अनाउंसमेंट सुरू झाली. 'आता आपण हाँगकाँगच्या जवळपास आलो आहोत, काही मिनिटात आपण लँड होणार आहोत, तरी सर्वांनी कृपा करून बेल्ट बांधून घ्यावे व खुर्ची सरळ करावी.' आम्ही मधल्या खुर्च्यांवर असल्यामुळे बाहेरचे खिडकीतून दिसेना! तरीपण विमान जरासे तिरके झाले, आणि अहाहा! हाँगकॉगच्या सुंदर इमारती नजरेस पडल्या, समुद्र आणि समुद्राला लागूनच छान छान इमारती! हळुवारपणे पाण्यावरून उडता उडता विमान जमिनीला कधी टेकले ते कळलेच नाही. बाप रे! बाहेर सर्वत्र ढग होते. पावसाची लक्षणे होती.

हाँगकाँगच्या सर्वांगसुंदर एअरपोर्टवर उतरलो. सिंगापूरच्या चांगी एअरपोर्टची इमारत पाहण्यासारखी! तर हाँगकाँगची भौगोलिक रचना पाहण्यासारखी. एक चिंचोळा पट्टा पाण्यात गेलेला आहे, तोच रनवे! बाजूला समुद्र. एका बाजूला पडाव व बोटी तर दुसऱ्या बाजूला भव्य इमारती. ब्रिटिशांची ह्या स्पॉटवर एअरपोर्ट बांधण्याची कल्पना अफलातून!

विमानातून उतरतो तो ट्रेलर बस उभी. हवा पण फार थंड! चटकन् एअरपोर्टचे शूटिंग केले व ट्रेलर बसमध्ये बसलो. आम्हाला मुख्य इमारती जवळ उतरविण्यात आले. एमबारकेशन व डिसएमबारकेशन कार्डे दाखविण्यासाठी, पासपोर्ट घेऊन रांगेत उभा राहिलो. बॅगेज क्लेमला सुद्धा मोठी रांग होती. दोन तीन फ्लाइट एकाच वेळी आल्या होत्या.

१९९७ मध्ये हाँगकाँगचा ताबा चीनकडे जाणार आहे. त्या अगोदर हाँगकाँगचे दर्शन घ्यावे ही इच्छा मनोमन पूर्ण झाली होती. १८४१ साली जानेवारीत चीनने ब्रिटिशांना हाँगकाँग बेटावर प्रवेश करावयास दिला. चारियाट इंग्लंड ह्या ब्रिटिश आर्मी अधिकाऱ्याने येथे ब्रिटिशांचा झेंडा रोवला. कोवालून व

हाँगकाँग हे भाग १८६० साली जोडण्यात आले. १८९८ साली हाँगकाँग बेट ब्रिटिशांना ९९ वर्षांच्या लीजवर देण्यात आले. १९१० साली कोवालून रेल्वे चीनबरोबर जोडण्यात आली. १९३८ साली अनेक निर्वासित चीनमधून हाँगकाँगमध्ये आले. हाँगकाँगमध्ये दर चौरस किलोमिटरला साधारण ५२६८ माणसे राहतात. त्यामुळे हे फार दाट लोकवस्तीचे शहर. येथे ९८ टक्के लोक चीनी आहेत. हवामान मुंबईसारखेच. सत्ता ब्रिटिशांची त्यामुळे येथे ब्रिटिश गव्हर्नर जनरल, नाव डेव्हिड विल्सन. इंग्रजी भाषा लोकांना समजते त्यामुळे भाषेचा प्रश्न आजतरी नाही. असे हे हाँगकाँग, लीज संपल्यामुळे १९९७ साली ब्रिटिश सरकार चीनला परत करणार आहे!

ज्या हाँगकाँगची ख्याती मी इतके वर्षे नुसती ऐकत होतो वा चित्रपटातून पाहत होतो ते मी आज प्रत्यक्ष पाहत होतो! इंग्रजी चित्रपटांचे माझे वेड अगदी लहानपणापासूनचे. पूर्वीच्या रहस्यपटातील स्मगलर्स किंवा गुप्तहेर विमानाने हमेशा हाँगकाँग एअरपोर्टवर उतरावयाचा त्यामुळे एअरपोर्टचे दर्शन चित्रपटातून मी अनेकदा घेतले होते. तसेच चित्रपटात पाहिल्यामुळे हाँगकाँगमधील गजबजलेला नॅथान रोड आणि सिम-शा-सुई हे भाग सुद्धा ओळखीचे झाले होते.

एअरपोर्टवरून बाहेर आलो, टॅक्सी पकडली. कोवालून विभागात एका भव्य इमारतीमध्ये अनेक भारतीय स्वस्त हॉटेले आहेत, त्यातच राहा मध्यवर्ती असल्यामुळे खरेदीसाठी, फिरण्यासाठीही बरे पडेल, असा हितोपदेश मुंबईत मिळाला होता. टॅक्सीवाल्याला नुसते त्या इमारतीचे नाव सांगितले - त्याने चटकन् 'ओके ओके' म्हटले. भारतीय लोक त्यात चौघेजण, कुटुंबासह कुठचे फाइव्ह-स्टार हॉटेलमध्ये जाणार! आमची सरड्याची धाव कोठपर्यंत, ते त्याने ओळखले होते.

सरकारच्या कडक धोरणामुळे मनात कितीही फिरण्याची हौस असली तरी, मिळणारे परकीय चलन इतके थोडे असते की त्यामुळे पैसा अगदी काटकसरीनेच वापरावा लागतो. जास्तीत जास्त निसर्ग सौंदर्य व शहरे पाहिजे व त्यासाठी पैसा जपून खर्च करणे हे त्यामुळे माझे परम कर्तव्य होते!

हाँगकाँगच्या रस्त्यावरून टॅक्सी धावू लागली. मीटरवर लक्ष ठेवले होते. किती हाँगकाँग डॉलर म्हणजे एक अमेरिकन डॉलर ह्याचा हिशोब मनात चालू होता. ओ माय गॉड! ज्या भागातून टॅक्सी चालली होती तो भाग खरंच परळ-लालबाग सारखा वाटला. अरे बापरे! जुन्या इमारती, ते कळकट पूल, छे! हे हाँगकाँग शहर असेच आहे काय? खरं तर हा प्रश्न टॅक्सीवाल्याला विचारावा असे वाटले, पण तो पडला चीनी. पावसाची झिमझिम सुरू होती. बाप रे!

थोड्या वेळाने पाऊस जोरात सुरू झाला. दोन-तीन वळणे गेल्यावर मोठे रस्ते दिसू लागले. रस्त्याच्या बाजूला मोठ्या इमारती! गर्दीच्या रस्त्यामधून टॅक्सी हळूहळू धावू लागली, व थोड्या वेळाने एका छोट्या गल्लीमध्ये थांबली. 'धिस इज युअर बिल्डींग' तो म्हणाला. 'ओके' म्हणत मी सामान उतरविण्यासाठी सुनीला व मृगया सलीलला सांगितले.

इतक्यात टॅक्सीच्या दरवाज्याजवळ दोन-तीन एजंट आले. त्या मोठ्या इमारतीत चांगली रूम देतो म्हणून सांगू लागले. काही केल्या पाठ सोडीनात! शेवटी एकाच्या तोंडाकडे पाहून ओ.के. म्हटले. भारतीय वाटला आणि खरंच भारतीय होता. त्याने चटकन् सामान काढून घेतले व पावसात स्वत:ची छत्री आमच्या डोक्यावर धरली. टॅक्सीवाला मात्र भामटा निघाला. इलेक्ट्रॉनिक मीटरवर ३५ आकडा असताना, ४५ मागू लागला. त्या एजंटतर्फे समजवून ४० डालर्स टेकवले. मोठ्या बॅगा घेऊन पावसात भला मोठा रस्ता क्रॉस करण्याचे एक धाडसच होते मोठे. एजंट भराभर रस्ता क्रॉस करून आमच्या बॅगा पलीकडच्या फुटपाथवर नेऊन ठेवू लागला. व आम्ही मराठी संशयीपणा दाखवू लागलो.

"अगं सुनीला, तू जा पलीकडे, बॅग घेऊन तो पळाला तर"?

"अहो मी राहते बॅगांजवळ. तो पर्यंत तुम्ही मृगया-सलीलला पलीकडे घेऊन जा!"

असे हो-ना करता करता आम्ही एकदाचा तो रस्ता पार केला. सामानासकट! भाऊच्या धक्यावर मुंबईत प्रथमच पाय ठेवणाऱ्या अंत्या नागवेकराची जशी स्थिती व्हावी ना तशीच आमची होती. पलीकडच्या फुटपाथवर गेल्यावर पुन: धावपळ सुरू झाली. तो एजंट! तिवारी त्याचे नाव! आमच्या चांगल्या जड दोन बॅगा घेऊन पुढे पुढे जाऊ लागला आमच्या सर्व खरेदी केलेल्या वस्तू व पैसे त्या बॅगांमध्ये होते, म्हणून भीती वाटत होती. हाँगकाँगच्या त्या गजबजलेल्या रस्त्यावर मधूनच तिवारी दिसेनासा व्हावयाचा. मग लोकांच्या पायामधून आमची बॅग घसरत चाललेली बघीतली की हायसे वाटायचे. असा लपंडाव चालू होता. आमचे हात तर ओझी वाहून थकले. शेवटी एका मोठ्या इमारतीच्या पायरीवर तिवारी बॅगांसकट उभा राहिलेला दिसला. 'चलो साब, मेरे पीछे आव!'

त्याच्यामागे आम्ही सर्व सर्कशीतल्या प्राण्यांप्रमाणे धावत होतो. त्या इमारतीत भयंकर गर्दी. माणसे चुकवीत एखाद्या पाळीव कुत्र्याने जसे त्याच्या मालकाच्या मागे मागे जावे तसे आम्ही जात होतो. कारण तिवारी कुठे नाहीसा झाला तर? इतक्यात इमारतीच्या एका भागात ब्लॉक सी जवळ, तो लिफ्टजवळ

थांबलेला दिसला. आम्ही चटकन त्याच्याजवळ पोहोचलो. आमच्या मागेपुढे रांगेत अनेक माणसे होती. कुरळ्या केसांच्या निग्रो पासून ते निळ्या डोळ्यांच्या गोऱ्यापर्यंत अनेक चेहेरे तिथे होते.

लिफ्ट आली, लिफ्टमध्ये गर्दी झाली, तरी तिवारीने आमच्या बॅगा भरल्या व आम्हाला दाटीने उभे केले. जादा वजन झाल्यामुळे लिफ्ट हलेना! आम्ही बाहेर येणार तोच तिवारी लिफ्टच्या वरच्या भागाला लटकला व पाय हवेत सोडले. आणि लिफ्ट सुरू झाली! लिफ्टच्या तळावरचा भार कमी केल्यास लिफ्ट वर जाऊ शकते हे त्या दिवशी समजले!

कोणत्यातरी मजल्यावर लिफ्ट उभी करून तिवारी बरोबर आम्ही बाहेर आलो. 'हॉटेल इस्लामाबाद' उर्दू व इंग्रजी अक्षरे! तर बाजूला 'कराची गेस्ट हाऊस' सर्वच पाकिस्तानी! पण तिवारीने मधल्या पॅसेज ने आत नेले. शेवटी एजंटच तो! त्याने आम्हाला चटकन् नेऊन एक रूम दाखविली.

रूम म्हणजे रूमच ती! जेमतेम डबल कॉट, एअरकंडिशनर आणि कॉटवरच एका बाजूला टी. व्ही! "मला वाटले बॅगा ठेवल्या तर कपडे बदलायला बाथरूममध्येच जावे लागणार" मी सुनिलाला म्हटले, "ते जाऊ द्या! पण बाजूला पाकिस्तानी. दुसरीकडे कुठे तरी जाऊ या" सौ. कुरकुरत म्हणाली, "जाऊ दे गं, दोन रात्री तर काढायच्यात. ठीक आहे!" मी ठरवून टाकले. तिवारीला टाटा केले. ॲडव्हान्स पैसे दिले व पलंगावर अंग टाकून दिले.

हाँगकाँगमध्ये काय काय आहे बघण्यासारखे? पिक ट्रॅम, हाँगकाँग बेट आणि ओशन पार्क ह्या तीन स्थळांना तरी कमीत कमी भेट द्याच असे मुंबईत सांगितले होते मित्रांनी! विमानात मिळालेले हाँगकाँग गाईड थोडावेळ चाळले! बापरे! पाहण्यासारखे खूप, पण मुक्काम फक्त दोनच दिवस! आमच्या रूमला बाहेर पाहण्यासाठी खिडकीच नव्हती, पण संध्याकाळचे सात वाजत आले होते. प्रत्येक एअरपोर्टवर उतरल्यावर घड्याळ पुढे सरकवावे लागत होते.

त्या हॉटेलमध्ये एक छोटी पॅन्ट्री (स्वयंपाकघर) होती. तिथे एक मुलगा चहा, ब्रेकफास्ट बनविण्यासाठी होता. त्याला ऑर्डर दिली. तो चटकन् आमलेट ब्रेड-चहा घेऊन आला. पाऊस थांबल्याचेही त्याने सांगितले. चहा घेऊन रस्त्यावर आलो.

आमच्या हॉटेलची इमारत खरोखर फार मध्यवर्ती भागात होती. प्रत्येक मजल्यावर दुकाने होती. बहुतेक भारतीय लोक सिंधी, मद्रासी, काही पाकिस्तानी तर काही चीनी! ह्या इमारतीमध्ये बहुतेक भारतीय प्रवासी खरेदी करतात.

इतकेच नाही तर व्हिडिओ कॅसेट पाहताना एस्कवॉयर वगैरे कंपन्याचे पत्ते वाचले होते, त्या सर्व कंपन्याची ऑफिसेस ह्याच इमारतीमध्ये होती. ह्या भागाला सिम भाग म्हणतात ते मग कळले. समोर जो मोठा रोड ऐसपैस पसरला होता तो नॅथान रोड! खरं म्हणजे ह्याचा उच्चार नॅथान ऐवजी नाथनच मला वाटला. कारण स्पेलिंग नाथन सारखेच होते. इतर रस्त्यांपेक्षा हा सर्वात मोठा व मुख्य. इतर रस्त्यांची नावे हायफांग रोड, पेकिंग रोड वगैरे, चीनीच.

रस्त्यावर आलो आणि खरोखर डोळ्याचे पारणे फिटले. इंग्रजी चित्रपटातून गर्दीतून चाललेला तो खलनायक, त्याचा पाठलाग करणारा तो सिक्रेट एजंट, उत्कंठा वाढविणारे ते पार्श्वसंगीत. ह्या सगळ्या एकदम डोळ्यासमोर तरळून गेल्या. झगमगता रोड! सर्व ठिकाणी मोठ मोठ्या निऑन साईन्सनी उजळलेल्या जाहिराती. इंग्रजीचे प्राबल्य, तरीपण चीनी संस्कृती जाणवतेच. इमारतीसमोर रस्त्याच्या कठड्याला टेकून उभे राहिलो. खिशात राहत्या हॉटेलचे कार्ड आहे की नाही ते पाहिले. कार्ड असणे अतिशय महत्त्वाचे! रस्ता चुकला तर ह्या कार्डावर इंग्रजीत व तेथील स्थानिक भाषेत हॉटेलचा पत्ता असतो.

मला भयंकर आनंद झाला. रोड कसा, गजबजलेला. अनेक गोरी माणसे, विशेषत: गोऱ्या तरुणी तुरुतुरु चालत होत्या. निऑनच्या जाहिराती लुकलुकत उघडझाप करीत होत्या! मधूनच जुन्या बसेस जात होत्या. काही बसेसचा वरचा डेक उघडा होता. तिथे खुर्च्या मांडल्या होत्या. रात्रीचे हाँगकाँग दाखविणाऱ्या ह्या बसेस!

एकमेकाना धरून फुटपाथवरून चालू लागलो. मख्य म्हणजे मुलांवर लक्ष ठेवावे लागत होते. खाली फुटपाथवर रेलिंगला टेकून तिवारी उभा होता. दुसरे गिऱ्हाईक शोधीत होता.

"साब, कल किधर जाएगा?"

"अरे तिवारी, कल हमे सिमस पार्क जानेका है, और वो पिक ट्रॅम और हाँगकाँग आयलंड"

"साब, ऐसा करो, कल आपलोग ट्रेनसे हाँगकाँग आयलंडपर जाना, उधरही पिक ट्रॅम है और परसो सिमस् पार्क देखो." तिवारीने सल्ला दिला.

रस्ता क्रॉस केला, अनेक दुकाने, सर्वच सुंदर. फारच सुंदर पाश्चात्य वस्तू. आणि हे काय मध्येच? बाप रे! नाईट क्लब! त्याच्यावर अर्धनग्न स्त्रियांचे फोटो! बाप रे! मुलांना पुढे चालायला सांगून हळूच त्या क्लबवर नजर टाकली. नॅथान रोडवर असे नाईट क्लब पुष्कळ होते. त्याच्या जाहिरातीही कल्पक आणि मोहून

टाकणाऱ्या. एक-दोन तास इकडे तिकडे फिरलो आणि पुन्हा आमच्या इमारतीत आलो. खाली तळमजल्यावर छोटी हॉटेल्स होती. भारतीयांनी चालविलेली. तेथे ब्रेडपासून चिकन, अंडी वगैरे सर्व मिळत होते. कल्पना सुचली! खालून अंडी पाव घेतला आणि वर पॅन्ट्रीमध्ये आमलेट केले तर? तेवढीच पैशाची बचत, आणि खरंच त्या हॉटेलच्या मेहेरबानीमुळे व त्या हॉटेल बॉयला मस्का लावून कल्पना मूर्त स्वरूपात आणली.

रूमवर आल्यावर पलंगावर पडलो खरा! पण, त्या एवढ्याशा खोलीत घुसमटल्यासारखे वाटत होते. मुलांना टी. व्ही. लावून दिला. एका चॅनेलवर नेमका हिंदी सिनेमा होता. तोपर्यंत मी हाँगकाँग गाईड चाळत होतो. हाँगकाँगवरून मकावला जाता आले तर पाहा असाही सल्ला मुंबईत मिळाला होता.

मकाव चीनच्या हद्दीजवळ आहे व तिथे कॅसिनोज आहेत. कॅन्टन हे दक्षीण चीनमधील मुख्य शहर आहे हे बरेचदा ऐकून होतो. कॅन्टन हे फक्त सत्तर मैलांवर होते, हाँगकाँग, कावलूनपासून एकवीस मैलांवर हाँगकाँगची म्हणजेच ब्रिटिश हद्द संपते. लोबू नावाचे गाव चीन हाँगकाँग बॉर्डरवर आहे. चीनी लोक हाँगकाँगमध्ये त्यांच्या त्यांच्या बोटीमध्येच राहतात. त्यामुळे बंदरामध्ये चीनी नक्षीकाम असलेल्या जुन्या बोटी, अगदी शिडांसकट दिसतात.

गाईडमध्ये अनेक पाहण्यासारखी ठिकाणे दाखविली होती. बर्ड मार्केट, वांगतीई सिन टेंपल, स्पेस म्युझियम, रिपल्स बे, चुंगचाऊ व लाम्या नावाची जवळ पासची बेटे. पण वेळेचा व पैशांचा अभाव आम्हाला बाकीची ठिकाणे पाहू देणार नव्हता. गाईडची पाने उलटताना सहज ट्रान्स्पोर्टवर लक्ष गेले. प्रवाशांसाठी हाँगकाँगमध्ये किती विविध प्रकार आहेत. टॅक्सी व ट्रेन आपल्याप्रमाणेच. पण भुयारी ट्रेन एम. टी. आर फारच प्रसिद्ध! फेरी बोट, स्टार फेरी– विशेषतः सिम-शा-सुई आणि वांछाय भागातून हाँगकाँग बेटावर जाण्यासाठी ह्या फेरीचा उपयोग होतो. ट्रॅम पाहण्यासारख्या, अगदी जुन्या पद्धतीच्या पण वेगवेगळ्या जाहिरातींनी नटलेल्या. पिक् ट्रॅम एक सुंदर मार्ग. मिनी बसेस, मॅक्सी बसेस आणि इतर अनेक गोष्टी. थोडक्यात माणसांनी ओढण्याच्या रिक्षा पासून हेलिकॉप्टर पर्यंत प्रवासाच्या सर्व सोयी हाँगकाँगमध्ये आहेत, का कोणास ठाऊक अजूनही हाँगकाँग तेवढे सुंदर वाटत नव्हते.

चला, सकाळी लवकर उठायचे आहे ना? मुलांना झोपविले व आम्हीही झोपी गेलो.

आज २४ एप्रिल! सकाळी नऊ वाजता उठलो. पटापट अंघोळी आटोपल्या! मृगया सलीलसाठी पुन्हा ब्रेड-जॅम नास्ता आणला! पॅन्ट्रीमध्ये चहा बनवून थर्मासमध्येही घेतला. मुंबईहून आणलेला चिवडा लाडू वगैरे खाण्याचे जिन्नसही घेतले, शिवाय पिण्याचे पाणीही होतेच. रेल्वे स्टेशन रस्त्यापलीकडे उजव्या बाजूस होते. बाहेरच बोर्ड होता 'सिम-शा-सुई', एम्. टी. आर स्टेशन. समोर भुयारी जिना. एम. टी. आर म्हणजे 'मास ट्रान्झिट रेल्वे'. भुयारात दोन्ही बाजूनी जिने उतरले होते, पुन्हा खाली उतरणाऱ्या पायऱ्या व नंतर तिकीटे काढण्यासाठी अनेक चौकोनी स्लॉट मशीन्स.

मी काढणार, मी काढणार म्हणून सलील व मृगयानी आरडाओरड केली. दोघांनी तिकीटे काढली. ॲडमिरॅलिटी स्टेशन हाँगकाँग आयलंडवर आहे. त्याची तिकीटे काढली. ट्रेन आली. वा! ॲटोमॅटिक दरवाजेवाली सुंदर ट्रेन!

"पाण्याखालून चाललो आहोत आपण, बोगद्यातून". "खरंच?". सुनीलालाही कळले नाही.

ही रेल्वे लाईन भुयारी आहेच शिवाय पाण्याखालून थेट पलीकडे हाँगकाँग बेटावर. ॲडमिरॅलिटी स्टेशन आले. बोगद्यातून बाहेर आलो आणि खरोखरंच चाट पडलो! बाप रे, काय हा थंड सोसाट वारा! आणि हे काय? इतक्या सुंदर इमारती! डोळ्याचे पारणे फिटेना अगदी. इमारती नुसत्या सुंदरच नाहीत तर काचेच्या! रस्त्याच्या मध्यावरून रंगीत ट्रॅम जोरात इकडून तिकडे धावत आहेत. बाजूने मोटारी! बस पकडून पिक-ट्रॅमच्या स्टँडपर्यंत जायचे होते. पण खरं तर त्याची गरजच नव्हती. व्हिडिओ कॅमेऱ्याने आजूबाजूच्या दृष्याचे चित्रीकरण करीत होतो. मधून घोडागाडीही दौडत होती. स्वेटर चढवले, शाली लपेटल्या आणि पिक-ट्रॅमचा स्टँडकुठे आहे विचारत चालू लागलो.

पाहतो तर काय? एकापेक्षा एक सुंदर इमारती! बाप रे, हाँगकाँग इतके सुंदर! खरंच कुठे पूर्वीचे ते जुने हाँगकाँग आणि आत्ताचे हे हाँगकाँग! समोर उंच डोंगर त्यावर सुंदर सुंदर बंगले, ढगांनी लपेटलेले! गार वारा झोंबत होता. हळूहळू आम्ही पिक-ट्रॅमच्या दिशेने चालत होतो. मध्येच हाँगकाँग बँकेची इमारत लागली फारच सुंदर! पुलावरून रस्ता क्रॉस केला. रस्ता क्रॉस करताना आजूबाजूचे चित्रण केले.

इतक्यात डाव्या बाजूला एका इमारतीत अगदी दहाव्या बाराव्या मजल्यापर्यंत मोटारी पार्क होताना दिसल्या. गाड्या पार्क करण्यासाठी ही खास इमारत! कमाल आहे! पुलाच्या पलीकडे गेल्यावर बोर्ड दिसला पिक-ट्रॅम स्टेशन. तेवढ्यात वरून खाली येणारी पिक-ट्रॅम दिसली. ट्रॅमच्या रंगसंगतीमध्ये ब्रिटिश आणि चीनी

संस्कृतीचे मिश्रण आढळले. ट्रॅमचा रंग लाल, चीनी लोकांचा आवडता, तर त्यावरचे सोनेरी मुलामा दिलेले दांडे, ब्रिटिशांची पसंती.

तिकिटे काढून आम्ही जागा अडवून बसलो. दरवाजे बंद झाले. घोडागाडीसारखे दरवाजे. फक्त पन्नास जणांचे दोनच डबे. आम्ही हातातील सामान खाली ठेवले. बूट काढून बाजूला ठेवले. हळूहळू पिकट्रॅम स्पीड पकडू लागली. उजव्या बाजूला छान छान इमारती दिसत होत्या, ढगात लपेटलेल्या, नंतर डोंगरावरची झाडे वाऱ्याच्या झोताने डुलत होती. चढणीवर ट्रॅम फारच तिरकी झाली. अरे हे काय? आमचे सामान, बूट! बापरे! ट्रॅम इतकी तिरकी झाली होती की आम्ही पुढे ठेवलेले सामान घरंगळत पार मागच्या भिंतीला पोहोचले होते. हळूहळू झाडीमधून समुद्र व डोंगर दिसू लागला. हवा फारच गार! शाल घट्ट गुंडाळून व पँटच्या खिशामध्ये हात खुपसून बसलो होतो. हळूहळू ट्रॅम-पिकवर आली.

हे शेवटचे स्टेशन. इथे गोलघुमटासारखे विश्रांती गृह. उतरलो व आत गेलो. काचेच्या दरवाजाबाहेर सर्वत्र ढग दिसत होते. मध्येच ढग विरळ झाले की निसर्गाच्या कृपेने हाँगकाँगचे दृष्य पहावयास मिळे. गॅलरीमध्ये दुर्बिणी ठेवलेल्या दिसत होत्या. तिथेच टेबलावर बसून थर्मासमधला चहा घेतला. थर्मास हातात धरून हात गरम केले. हातात काही धरवत नव्हते. इतक्यात ढग विरळ झाले व चटकन् बाहेर येऊन दुर्बिणीने हाँगकाँगचे सौंदर्य न्याहाळले. मोठमोठ्या इमारती, समुद्रात लांबवर मोठमोठ्या बोटी! व्हिडिओ कॅमेरा सरसावला. त्यावर पावसाचे शिंतोडे येण्याचा संभव पण तरी चित्रण केले. समुद्रात तीन टेकड्या होत्या, त्यावर ब्रिटिशांनी सुंदर सुंदर बांधलेले बंगले होते. सर्व दृष्य पाहून आज अगदी समाधान झाले होते. थोड्याच वेळात ढगांनी ते दृष्य लपेटून टाकले.

ॲबर्डीन नावाचे ठिकाण येथून जवळच आहे, ॲबर्डिनला चिनी होड्या फार आहेत. त्या होड्यांमधूनच चिनी लोकांचे संसार आहेत. सिंगापूरला जसे आपण निवडलेला मासा शिजवून देणारी हॉटेल्स आहेत तशी ॲबर्डिनलाही आहेत.

पिकट्रॅमने खाली आल्यावर, का कोणास ठाऊक, त्या पर्वताच्या टोकाकडे लक्ष जाते. इतके सुंदर ठिकाण पुन्हा पाहण्याचे भाग्य मिळेल की नाही ह्याची शंका वाटते. असो.

दुपारनंतर भुयारी रेल्वेने पुन्हा आमच्या ठिकाणावर आलो. संध्याकाळी आमच्याच इमारतीत थोडीफार खरेदी केली. हाँगकाँगमध्ये अनेक सुंदर सुंदर हॉटेल्स आहेत. हाँगकाँग बेटावर हिल्टन हॉटेल, मॅन्डारिन ओरिएंटल, वॉचाय

भागामध्ये रमादा-इन, कोवालूनमध्ये सिम-शा-सुई किंवा भारतीय न्यू देल्ही वगैरे अनेक! सगळी हॉटेल्स् पॉश, पाहण्याजोगी! आणि खाण्याजोगीही. जर खिशाला परवडत असेल तर! आम्ही राहत होतो, त्या इमारतीत मजल्या मजल्यावर अनेक दुकाने होती. पाहिजे ती वस्तू मिळे. पण महाग.

रात्री झोपताना एकदम आठवण झाली. एक मोठी हॅन्डबॅग दिसत नव्हती. कुठे गेली? सर्व पैसे मोजून पाहिले, व्यवस्थित होते. सिंगापूर सोडताना गोंधळ झाला होता बहुतेक. दरवेळेला हॉटेलची खोली सोडताना सर्व सामान चेक करणारा मी, आदल्या दिवशी गादीखाली ठेवलेली हँडबॅग घेण्यास विसरलो होतो, बाप रे! पैसे? पैशांचा हिशोब लागत होता. मग काय बरे त्या हँडबॅगमध्ये होते? मेडिक्लेम पॉलिसी आणि... आणि नकाशे, छोट्या वह्या! बस! शेपटावरच निभावले. समजा त्यात पैसे असते तर? नुसत्या विचारानेच छातीत लख्ख झाले. इन्शुरन्स पॉलिसी, पण गहाळ झाली होती. सुनीलास मुंबईला फोन करून पुढच्या पत्यावर मागवून घेण्यास सांगितले व वेळ निभावून नेली. पुढे आठवडाभर त्या हँडबॅगमध्ये आणखी काही नव्हते ना हे पुन्हा पुन्हा आठवत होतो.

आज पंचवीस एप्रिल! आज हाँगकाँगमधला शेवटचा दिवस. सिमस् पार्क पहावयाचा व संध्याकाळी बॅगा भरून ठेवायच्या असे ठरविले.

पार्कला जाण्याचा मार्ग कालचाच. म्हणजे भुयारी रेल्वेने हाँगकाँग बेटावरील ॲडमिरॅलिटी स्टेशनवर आलो. बाहेर आल्यावर डाव्या हाताला एक मोठा बस डेपो होता. चटकन् तिकीटे काढली व डबलडेकरमध्ये वरच्या डेकवर पुढची जागा अडवली. जागा अडविण्यासाठी हल्ली मी सुद्धा धावत असे, पण ह्या बाबतीत आमची मुले स्मार्ट! कुठेही जागा कशी अडवायची ते त्याना विचारा. नशीब! विमानामध्ये सीटना नंबर होते नाहीतर त्यानी पायलटची जागा सुद्धा प्रथम जाऊन अडविली असती. ॲडमिरॅलिटी स्टेशनहून दर अर्ध्या तासाने बस सुटत होती. तिकीट प्रौढांना साधारण १२२, तर मुलांना ६३ हाँगकाँग डॉलर.

बस सुरू झाली. हाँगकाँग बेटाला वळसा घालीत घालीत बस डोंगराआडून धावू लागली. मग एका बोगद्यात शिरली आणि दुसऱ्या बाजूला बाहेर आली. अरेच्या! हे काय? डाव्या बाजूला हा डोंगर कसला? आणि त्यावर अगदी उंचावर नागमोडी, झाकलेला रस्ता सुद्धा! पाहता पाहता बस डोंगराच्या पायथ्याशी येऊन ठेपली. हाच तो प्रसिद्ध 'ओशन पार्क'. एका बाजूला समुद्र आणि दुसऱ्या बाजूला डोंगर! "बाप रे"! "एवढा डोंगर चढायचा? दमछाक होणार" "त्यापेक्षा..." सौ. चा व माझा वाद सुरू झाला. डोंगरावर नजर टाकली

आणि दृष्टीचे पारणे फिटले. खरंच इतकी कल्पकता! इतके सुंदर आराखडे काढून, डोंगर सजविणारे मला वाटते, हाँगकाँग हे जगातील पहिले राष्ट्र असावे.

"तिकीटे तर काढूया आधी!" तिकीटे काढली.

डोंगराच्या माथ्यापर्यंत सुंदर सुंदर वेगवेगळे बाग बगीचे आणि एका बाजूला ती झाकलेली वेडी वाकडी वाट दिसत होती. जवळ गेल्यावर समजले डोंगरावर चढताना दमछाक होऊ नये म्हणून बसविलेले सरकते जिने होते ते. सरकत्या जिन्यावर जाऊन उभे राहिले की आपण आपोआप चाललो वरती!

चटकन् मला आठवण झाली. लोणावळ्याजवळच्या एकवीरा देवी असलेल्या कार्ला गुफांची, चौलच्या डोंगरावरील दत्त मंदिराची, आणि पुण्यातील पर्वतीची. ह्या सर्व डोंगरावर असे सरकते जिने बसविले तर? ह्या डोंगरासारखा छान डोंगर मुंबईतला मलबार हिल, तिथे सुद्धा असे काहीतरी करता येईल.

असा विचार करीत दहा-बारा पायऱ्या चढून वर आलो, छोट्या छोट्या सिमेंटच्या पायवाटा डाव्या, उजव्या बाजूला गेल्या होत्या. प्रथम डाव्या हाताला गेलो. डाव्या बाजूला सुंदर पक्षी संग्रहालय होते. इतके सुंदर की पाहून चाटच पडलो. उंच उंच झाडांवरून जाळी लावल्यामुळे पक्ष्यांना आतमध्ये मनमुराद उडण्याची सोय होती. वेगवेगळ्या पक्ष्यांना वेगवेगळे ठेवले होते.

मोर दिसले. सफेद मोर. मी व्हिडिओ कॅमेरा रोखून उभा राहिलो आणि चटकन् पिसारा फुलवून त्याने छानपैकी पोझ दिली. अगदी सलील- मृगया बरोबर हवी तशी. नंतर नेहमीच्या मोरानेही आमच्यावर मेहेरनजर केली, कॅमेरा रोखल्याबरोबर पिसारा फुलविला. वा! मला मनापासून आनंद झाला, मोराचा पिसारा फुललेला पाहून माझे मनही नाचू लागले! निसर्ग सौंदर्य पक्ष्यांचे गाणे, नाचणे, सवैर भराऱ्या मारणे, सगळेच आठवणीच्या कप्प्यात ठेवण्यासारखे. फुलपाखरांचे संग्रहालयही तसेच. उंच जाळीखाली फुलपाखरे विहारत असतात. ओशन पार्क आपली एक-एक झलक दाखवीत होता. हळूहळू आम्ही सरकत्या जिन्यांच्या जवळ आलो. सरकत्या जिन्यांवर साधारण पारदर्शक असे छप्पर होते बाजू मात्र खुल्या होत्या. जिन्यावर उभे राहिलो आणि वर वर सरकू लागलो.

मी उलट्या बाजूला तोंड करून खालचे सृष्टीसौंदर्य कॅमेऱ्यात टिपत होतो. काही उंचीवर गेल्यावर हाँगकाँगचा समुद्र दिसू लागला. उफाळणारा समुद्र!

थोडी उंची गाठली की दुसरा सरकता जिना. मग आणखी तिसरा असे करीत डोंगराच्या माथ्यावर आलो. इथेही सिमेंट व डांबरी रस्ते होते. इंग्रजीमधून

माहिती लिहिलेले बोर्ड होते. वेगवेगळे शोज़ आणि वेगवेगळे खेळ होते. 'बर्ड थिएटर' 'डॉल्फिन आणि व्हेल शो' आणि 'कोस्टर राईडस्!'

सुनिला आणि मुलांनी त्यात जाण्यासाठी रांग लावली. बापरे! आकाशात उंचावरून जाणारे वेगवेगळ्या आकाराचे मोठमोठे ट्रॅक्स. वर्तुळाकार आणि नागमोडी. प्रवाशांना घेऊन ती गाडी चालू झाली आणि अतिवेगाने आकाशातल्या मार्गाने वरखाली होऊ लागली. बाप रे! त्यात बसलेल्यांना कसे काय वाटत असेल? मला मोशन सिकनेसचा त्रास असल्यामुळे मी ह्या राईडपासून दोन हात दूरच राहिलो पण त्यामध्ये बसलेल्या माझ्या सौ. च्या व मुलांच्या आनंदी चेहेऱ्यावरून व आरडाओरड्यावरून ते ह्या प्रवासाचा आनंद उपभोगत होते ह्याचे मला समाधान वाटत होते.

अशा प्रकारच्या राईडस्मध्ये रक्तदाब किंवा मोशन सिकनेसचा त्रास असलेल्यांनी भाग घेऊ नये. असा बोर्ड लावलेला असतो. माझ्या संजय नावाच्या एका पेशंटने सांगितलेली गोष्ट आठवते. तो एका ग्रुपबरोबर हाँगकाँगला आला होता. त्याच्या ग्रुपमध्ये सातारचा एक गांधी टोपीवाला होता. पन्नास पंचावन वयाचा, आपण भरलेला पैसा फुकट घालवावयाचा नाही म्हणून तोही ह्या राईडमध्ये बसला. राईड सुरू झाल्यावर त्याला गरगरायला लागले. तो किंकाळ्या मारू लागला. आणि शेवटी अस्सल इरसाल शिव्या त्याने वरून दिल्या. राईड थांबली आणि तो घामाघूम होऊन खाली उतरला.

म्हणून मी विचार केला की असे काही होण्यापेक्षा आपली दुरून मजा बघावी. आमची सौ. व मुले मात्र काटक! खिदळत होती सारखी! खरं म्हटले तर कुत्रा, मांजराच्या पिल्लाला त्याचे मागचे पाय धरून गोलगोल फिरवावे व जमिनीवर फेकून द्यावे तसे ह्या कोस्टर राईडबद्दल मला वाटते!

आमच्या मंडळींनी निरनिराळ्या पाळण्यांमध्ये बसावयाची हौस पूर्ण करून घेतली.

लांबून लोकांचा आरडाओरडीचा आवाज ऐकू येत होता. डॉल्फिन व व्हेलचा शो पंधरावीस मिनिटात चालू होणार होता. तिकीटे काढण्याचा प्रश्न नव्हता. परदेशात फिरताना एक लक्षात आले, की अशा मनोरंजन करणाऱ्या पार्कमध्ये एकदा तिकीट-काढून तुम्ही प्रवेश केलात की मग आतमधल्या कार्यक्रमांना वेगळी तिकीटे नाहीत. पार्क बंद होईपर्यंत, कुठल्याही कार्यक्रमात कितीही वेळा बसा, कितीही वेळा पहा. फक्त पार्क बंद होण्याआधी बाहेर पडा म्हणजे झाले! ह्या सोयीमुळे प्रत्येकाला त्याच्या आवडत्या खेळाची मनसोक्त मजा लुटता येते.

डॉल्फिन व व्हेल शो साठी मोठा स्टेडियम होता प्रेक्षकांसाठी समोर स्टेज. आणि प्रेक्षकांच्या स्टेज स्टेडियमच्या मध्ये खोल पाण्याचा टँक. पहिल्याने डाइव्हिंग-शो सुरू झाला. अमेरिकन जलतरण पटू हा शो करीत होते.

पाहता पाहता बाजूच्या तलावातून चार-पाच डॉल्फिन मासे समोरच्या टँकमध्ये आले. प्रेक्षकांना अभिवादन म्हणून त्यांनी आल्या आल्या उंच गोलांट्या मारल्या आणि मग स्टेजवरील चिनी ट्रेनर प्रमाणे ते वेगवेगळे खेळ करून दाखवू लागले. मध्येच त्यांना छोटे मासे खाण्यास देण्यात येत होते.

डाल्फिन आणि व्हेल अतिशय संवेदनाशील मासे! ग्रहण शक्ती उत्तम त्यामुळे काहीही शिकविले तर चटकन शिकतात. त्यांनी वेगवेगळ्या कसरती केल्या. पाण्यात उलटे होऊन त्यांच्या पोटावर एक माणूस उभा राहिला, तेव्हा एखाद्या बोटीप्रमाणे कल्ले पंख हलवीत त्यांनी त्याला कडेला नेले.

नंतर सी. लायन माशांचा खेळ स्टेजवर पाहून आम्ही थक्क झालो. त्यांनी केलेला बॅडमिंटनचा खेळ, विवाहाच्या वेळेस केलेली वधूची निवड, संगीताच्या तालावर केलेले नृत्य फारच सुंदर होते. आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले होते.

थोडे पुढे गेलो, आणि कठड्याला टेकून उभे राहिलो. समोर पाहिले तो विस्तीर्ण दरी, पलीकडे समुद्र आणि डोंगर. डोंगराच्या एका टोकावर आम्ही उभे होतो. समोर हळूहळू जाणाऱ्या आणि येणाऱ्या, शिंकाळ्यात टांगून ठेवलेल्या गोल भोपळ्याप्रमाणे, दिसणाऱ्या ट्रॉलीज़, लांबवर जात होत्या. "बाप रे! इतक्या लांब?" आमच्या सौ. ने आश्चर्योद्‌गार काढले.

"बाबा, चला ना बसू या" मृगया, मागे लागली.

"थांबा जरा" म्हणत मी त्या डोंगराच्या कड्यावरून त्या दृष्याचे चित्रण केले. क्षणभर मला असे वाटले की ते दोन डोंगर म्हणजे भूमातेचे उरोज आणि त्या ट्रॉलीज म्हणजे त्या उरोजांवर रुळणारी मण्यांची माळ! मणी जसे किणकिण नाद करतात तसाच त्या ट्रॉलीज आवाज करीत होत्या व आमच्या समोरच्या टॉवरमधून एका मागून एक सुटत होत्या.

चटकन् जाऊन मृगयाने एका ट्रॉलीत जागा अडवली. हळूहळू आमची ट्रॉली टॉवरच्या बाहेर आली. झिम झिम पाऊस सुरू झाला होता. ढग डोंगरावर उतरत होते. ट्रॉली हळूहळू पुढे सरकत होती. विरुद्ध दिशेने ट्रॉलीज वर वर सरकत होत्या. किती सुंदर! बाजूला डोंगर, समुद्र आणि आमचा ट्रॉलीतून चाललेला तो प्रवास.

"मलबार हिलवरून मरिन ड्राइव्हवर अशा ट्रॉलीज टाकल्या तर?" मृगयाने कल्पनेच्या राज्यातून विचारले.

"हरकत नाही प्लॅनिंग करायला! अगं मुंबईत झोपड्या बांधायला जागा राहिली नाही आता, त्यात तू ट्रॉल्या आणल्यास की प्रत्येक ट्रॉलीत झोपड्या होतील, सरकत्या!" मी सावधपणे इशारा दिला.

"इ! बाबा, काही तरीच." मृगयाचा पार हिरमोड झाला होता.

व्हिडिओ कॅमेऱ्याने चित्रण करत करत मी आजूबाजूचे सृष्टी सौंदर्य न्याहाळत होतो. साधारण दोन मैल लांबीचा रोपवे व त्यावरून सरकणाऱ्या ट्रॉलीज! डोंगरावर फक्त बर्फाची कमतरता होती, नाहीतर स्वित्झर्लंडच वाटले असते. हळूहळू समोरचा टॉवर दिसू लागला. ट्रॉली टॉवरमध्ये शिरताच तेथील दोन माणसांनी ट्रॉली धरून ठेवली, आणि तेवढ्यात आम्ही फलाटावर उड्या मारल्या.

टॉवरवरून खाली उतरलो. सुंदर बाग व वेगवेगळ्या हवाई कमानी व खेळ. पण दुर्दैवाने आज येथील कसरती व खेळ बंद होते, त्यामुळे मग जास्त वेळ रेंगाळलो नाही. परत, जाणाऱ्या ट्रॉलीज्चा आवाज दुरून येत होता. सर्व कांही मनसोक्त पाहिल्याचे समाधानात परतीचा प्रवास सुरू केला व ओशन पार्कच्या डोंगरावर आलो.

अंधार पडू लागला होता आता आणि पार्क बंद होत होता.

"बाबा, एवढ्या मोठ्या डोंगरावर कोणी लपून बसले तर गुरख्याला कसे कळणार" सलीलने शंका विचारली. खरंच, कोणी लपून बसले तर कसे कळणार?

"बाबा मी बसू लपून" मग उद्या पुन्हा मस्त मजा करीन! गोल चक्रात बसेन, डॉल्फिन शो, सर्व काही एकटी पाहीन" मृगया म्हणू लागली.

"चला आता घरी!" मी दरडावून म्हणालो, खरंच मृगया कोठेतरी लपायची आणि मग ह्या परप्रांतात आम्ही तिला कसे शोधणार? नुसत्या विचारानेच थरकाप उडाला.

पायथ्याशी बस पकडली. डोंगराला वळसा घातल्यावरसुद्धा डोंगरावर सरकणाऱ्या ट्रॉलींज दिसत होत्या.

"ते बघा बाबा, आपण तिथे गेलो होतो"

"अरे हो, खरंच." आम्ही ट्रॉली मधून उतरलो तिथूनच बस चालली होती. रोप-वे वरच्या ट्रॉलीज कण्हत होत्या. जणू आम्हाला निरोप देत होत्या. 'पुन्हा लवकर या, आम्ही चीनमध्ये जाण्याअगोदर या;''

ॲडमिरॅलिटी स्टेशनवरून सब वे ने थेट आमच्या हॉटेलच्या स्टेशनवर आलो. हाँगकाँगची आज शेवटची रात्र! थोडी खरेदी केली आमच्याच इमारतीत आणि बॅगा पॅक केल्या.

मृगया 'हाँगकाँग गाईड' चाळत होती.

"बाबा ह्याला हाँगकाँग का म्हणतात हो?"

"मला नाही माहीत"

"बाबा, फार पूर्वी येथे कोळ्यांची वस्ती होती. त्या वस्तीमुळे ह्याला हाँगकाँग नाव मिळाले. पूर्वी येथे बंदराजवळ सुगंधी झाडे होती. म्हणून त्याला 'सुगंधी बंदर' म्हणतात. Fragrant Harbour..."

"बस, पुरे." मृगयाच्या हातातील हाँगकाँग गाईड हिसकावून घेऊन मी ते बॅगच्या तळाशी ठेवीत म्हणालो, "चला, झोपा पाहू, उद्या जपान... लव्ह इन टोकियो" सामान आवरून आम्ही झोपी गेलो.

२६ एप्रिलची सकाळ. हॉटेलमध्ये चहापाणी व नास्ता आटोपून बिल भरले, हॉटेलच्या नोकराला सामान खाली नेण्यास सांगितले टॅक्सी पकडली. नाथान रोडचे शेवटचे दर्शन. टॅक्सीत बसण्यापूर्वी सर्व रोडवर शेवटची नजर फिरविली. आम्हाला हॉटेलमध्ये जागा पाहून देणारा एजंट तिवारी, रेलिंगला टेकून उभा होता. मला पाहून जवळ आला

"क्यों साब, जा रहे है?

"हां तिवारीजी, जानेको जी नही चाहता, लेकिन..."

"हां साब, हाँगकाँग ऐसाही है"

"लेकिन चायनाने लिया तो ऐसा रहेगा क्या? और तुम लोग?

"वो तो भगवानका लेन देन, अच्छा साब? फिर मिलेंगे" दुसऱ्या गिऱ्हाईकाला पाहून त्याने बोलणे आवरते घेतले.

"शुक्रिया" मी म्हणालो, "फिर मिलेंगे" कसले पुन्हा भेटणार? हा परदेशी प्रवास करणे एवढे सोपे आहे का? आणि समजा हाँगकाँगला पुन्हा आलो तरी हा तिवारी भेटेल का? तिवारी दृष्टीआड झाला आणि आम्ही टॅक्सीत बसलो.

हाँगकाँग एअरपोर्टवर ह्यावेळी लवकर पोहोचलो, टॅक्सीचे बिलही कमी झाले, तेवढेच पैसे वाचल्याचा आनंद! एअरपोर्टवर पोहोचल्यावर एअरपोर्ट टॅक्ससाठी पैसे ठेवून बाकी सर्व पैसे डॉलर्समध्ये बदलून घ्यावे लागले. त्यामुळे कमिशनसाठी आमचे पैसे खर्च झाले. म्हणूनच प्रवाशाना एक सूचना करावयाची की सिंगापूर सारख्या शहरात मनी चेंजर असतात. त्यांच्याकडे भाव जास्त मिळतो. तेव्हा एअरपोर्टवर टॅक्ससाठी लागणारे पैसे बाकी ठेवून बाकीचे, मनीचेंजरकडून डॉलर्समध्ये बदलून घ्यावे. असो.

हाँगकाँग एअरपोर्टवर इमिग्रेशन तपासणी होऊन बॅगा तेथील अधिकाऱ्यांच्या हवाली केल्या ह्यावेळी मात्र विमानामध्ये खिडक्याजवळ जागा मिळविण्याची दक्षता घेतली. जम्बो विमानात एकॉनॉमी क्लासला बाजूला तीन तीन व मध्यभागी चार सीटस् अशी व्यवस्था असते. आम्ही तीन सीटस् एकत्र व मागे एक, खिडकीजवळची, अशा जागा घेतल्या.

हाँगकाँग एअरपोर्टवर चित्रण केले. व वेटिंग रूममधून आमच्या विमानाचा बोर्ड लागल्यावर दरवाजाजवळ आलो. प्रवाशांना एका डबल जोडलेल्या बस ट्रेनने विमानापर्यंत घेऊन जाणार होते व मग जिन्याने विमानात चढावयाचे होते. डायरेक्ट टनेल सिस्टिम येथे नव्हती. जिन्याने विमानात चढताना राष्ट्रपती किंवा पंतप्रधान विमानात चढताहेत असा अभिनय करीत आम्ही जिना चढलो. एअर होस्टेसने 'गुड मार्निंग' म्हटले तरी व्हिडिओ कॅमेरा डोळ्याला लावून व बाहेरचे विमानतळाचे शूटिंग करीत करीत, मागल्या पावलाने मी विमानात प्रवेश केला.

हे सुद्धा जम्बो विमान होते. पण ह्या वेळी विमानात फारच कमी प्रवासी! असे कां? कारण कळले नाही, पण अर्धे अधिक विमान रिकामे! जम्बो सारखे विमान, आणि रिकामे! असो. दरवाजा बंद झाला. विमानाची घरघर वाढली व विमान चालू लागले. खिडकीला व्हिडिओ कॅमेरा लाऊन बसलो होतो. खिडकीच्या काचेवर दंव सांचले होते. हाताने पुसण्याचा प्रयत्न केला पण मग लक्षात आले काच डबल होती. कॅमेऱ्याची लेन्स अगदी खिडकीच्या काचेला चिकटून ठेवली. विमान विशिष्ट जागी वळून थोडा वेळ उभे राहिले. सर्वांनी सीटबेल्टस बांधले. आणि विमान वेगाने धावू लागले. विमानाने गती पकडली. मी कॅमेरा अगदी जमीन व पाणी ह्यावर केंद्रित केला. पाहता पाहता विमानाने हवेत झेप घेतली. जमीन संपली आणि सगळे पाणीच पाणी! खाली विमानतळाचा चिंचोळा भाग अगदी पाण्यापर्यंत दिसत होता. थोड्याच वेळात सर्व ढगा आड झाले!

जम्बोसारखे अवाढव्य विमान ढगामध्ये गेल्यावर हलत नसेल असे मला वाटत असे पण निसर्गापुढे कोणाचेही काही चालत नाही. ढग आणि वारा जोरात

असेल तर जम्बोसुद्धा हादरते! एअर पॉकेटस् आली की विमानाची आणि वैमानिकाची धावपळ होते. मग पुन्हा 'फासन बेल्ट' म्हणून लाईट लागतो. अशावेळी कोणीही सीट सोडून उठायचे नाही. विमानाने विशिष्ट उंची गाठल्यावर मग विमानात फिरण्यास मोकळीक असते.

एअर होस्टेस नेहमीप्रमाणे, विमान पडल्यास जीव वाचविण्यासाठी लाईफ जॅकेट कसे वापरावयाचे त्याचे प्रात्यक्षिक दाखवीत होती. अस्मादिकांना वा कुटुंबातील कोणालाच पोहता येत नव्हते. समजा विमान पाण्यात पडले तर जीव वाचण्याशी शक्यता म्हणून कमीच. तेव्हा अक्षरशः जिवावर उदार होऊनच आमचा प्रवास चालला होता!

नेहमीप्रमाणे स्नॅक्स, फळांचे रस वगैरे एअर होस्टेसने आणून दिले. थोड्या वेळाने जेवणही आले. इंडियन नॉनव्हेज मील म्हणजे काय हे प्रत्येकवेळी आम्हाला सांगावे लागे. कारण त्यांना इंडियन व्हेज मील माहीत असे. तेव्हा इंडियन नॉन व्हेज म्हणजे 'ओनली चिकन, नो हॅम नो पोर्क प्लीज!'' मग ओके ओके म्हणत.

जेवणाच्या वेळेस ॲल्युमिनियम वेष्टने काढून प्रत्येक प्रकाराचे डिसेक्शन करून मगच खाणे वगैरे प्रकार विमानात प्रत्येक वेळी होत असे आमचा. मुले 'कोक' वरच जास्त खुश! आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी मोटार वेगात चालविली तर मृगयाला मोशन सिकनेसचा त्रास व्हावयचा व त्यासाठी ड्रामामिनची गोळी द्यावी लागे. पण विमानात मृगया अगदी खुशीत. तिला काहीच त्रास होत नसे. पण सलीलला मात्र विमान लागत असे विशेषतः विमान उतरताना.

वर ढग आणि ... सॉरी! खाली ढग आणि वर निळे आकाश कधी खाली समुद्र निळा आणि वरती आकाश निळे, काही समजायचे नाही. पण आमचे विमान ह्यावेळेस भलत्याच उंचीवर होते. नेहमी ३० ते ४० हजार फूट उंचीवरून जाणारे विमान आज ५० हजार फुटांवरून चालले होते.

मुंबईहून पुण्याला अनेकदा प्रवास केला तरी घाट आला की खिडकीतून बाहेर पाहण्याची माझी सवय अजून कायम आहे. विमानात सुद्धा मी खिडकीतून बाहेर पाहत बसायचा. सुनिला डुलक्या घेत बसायची! बाहेर बघताना खालून एक जम्बो विमान वेगाने विरुद्ध दिशेने चाललेले दिसले. बाप रे! जम्बो! केवढ्या वेगाने चालले होते! त्याच्यापेक्षा कितीतरी उंचावर आम्ही होतो. क्षणभर मनात धडकी भरली, आत्ता विमान कोसळले तर? आणि मग स्वतःचे स्वतःलाच हसू आले. विमानातून प्रवास करताना विमान कोसळेल ही भीती

बाळगली तर सर्व संपलेच! विमानाने कितीही उंची गाठली तरी मरण हे येणारच! उलट जेवढी उंची जास्त तेवढा वेळ जास्त देवाचे नाव घ्यायला!

विमानाच्या इंजिनाचा कर्णमधूर आवाज मला साद देत होता. जणू निळ्या निळ्या आकाशात मी एकटाच भराऱ्या मारत चाललो होतो.

'वुड यू लाइक टु हॅव कॉफी ऑर ज्यूस ? एअर होस्टेस जवळ येऊन विचारत होती. मी बाजूला पाहिले. आमचे कुटुंब ढाराढूर झोपले होते.

"आय डोन्ट माईंड कोक"

"ओके. ओके" करत तिने कॅन उघडला. मी चटकन् सलील, मृगयाला व सुनिलाला जागे केले. कारण त्या सर्वांचा कोक आवडता!

समोरच्या पडद्यावर इंग्रजी चित्रपट चालू होता. खरं म्हणचे मी चित्रपटांचा शौकीन. पण चित्रपट पाहण्यास मूड लागतो आणि विमानाच्या प्रवासात चित्रपट पाहणे म्हणजे मला शिक्षा वाटते. विमानाच्या खिडकीतून बाहेर पाहिले तर एकच ठराविक दृष्य दिसत असते. तरी सुद्धा त्या निळ्या आकाशात आलेले ढग, मधूनच खाली दिसणारी शहरे, दऱ्या खोरी वगैरे पाहण्यात मला तरी मौज वाटते. कित्येकजण म्हणतात की विमान एकदा हवेत उडाले की बाहेर पाहण्यासारखे काही नसते. त्यांचे मत त्यांना लखलाभ! मी इतका प्रवास केला तरी खिडकीशी मग ती घराची असो, ट्रेनची असो वा विमानाची, मला बसावयास आवडते. खिडकीतून बाहेर पाहता पाहता मी बाहेरच्या निसर्गाशी एकरूप होतो हे मात्र खरे.

इतक्यात विमानाच्या इंजिनाचा आवाज बदलला, घड्याळाकडे बघीतले. जपान जवळ असावे असा कयास बांधला आणि खरोखरच 'फासन बेल्ट' म्हणून अक्षरे समोर चमकू लागली. विमान हळूहळू खाली येऊ लागले. हिरवागार देश जपान! ओह, जपानी भाताची शेते कशी सुंदर दिसत होती. हळूहळू विमान विमानतळावर उतरले.

'महागडे शिस्तप्रिय टोकियो'!



नारिता एअरपोर्ट टोकियो! जपानी प्रेमळ स्वागत!

नारिता एअरपोर्ट! एअरपोर्टवर वर्तुळाकार इमारती. बोगद्यातून अशाच एका वर्तुळाकार इमारतीमध्ये आलो. पटापट विमानतळावरील सोपस्कार आटोपून बॅगा ताब्यात घेतल्या. मुंबईहून निघताना देशमुखांना फोन केला होता. काही काळजी करू नका, मी आहे' असे देशमुखानी अनेकदा सांगितले होते. विख्यात संगीत दिग्दर्शक श्री सुधीर फडके ह्यांच्यामुळे देशमुखांची ओळख झाली होती. आता देशमुख भेटायला पाहिजे होते.

समजा टोकियोत देशमुख भेटलेच नाहीत तर? अत्यंत महागडे शहर टोकियो म्हणजे! खिशात पैसेही कमी! हृदय धडधडत होते, डोळे भिरभिरत होते. टोकियोमध्ये आसरा देणाऱ्या देशमुखांना शोधण्यासाठी पॅसेजमधून बाहेर आलो.

रिसेप्शन काऊंटरच्या अगोदर पॅसेजमध्ये एक फळा-वजा बोर्ड होता. त्यावर माझ्या नावासारखे एक नाव चमकत होते व सोबत निरोप होता, 'कम टू द रिसेप्शन सेंटर' बाप रे! काय मेसेज असावा? जर देशमुख भेटले नाहीत तर? मग टोकियोच्या एअरपोर्टवरूनच गाशा गुंडाळून पुढचे ठिकाण गाठण्याची पाळी

आली असती. पण त्याची सुद्धा शाश्वती नव्हती. रिसेप्शन काऊंटरवर एक मुलगी होती. जपानमध्ये इंग्रजीतून बोलणे महाकठीण, कारण बहुत करून जपान्यांना इंग्रजी येत नाही. नशिबाने काऊंटरवर असलेल्या मुलीने स्मित हास्य करून विचारले, "सर व्हॉट कॅन आय डू फॉर यू? नीड एनी हेल्प?" "आय वाँट टु कॉन्टॅक्ट मिस्टर देशमुख हू मस्ट बी समव्हेअर ऑन द एअरपोर्ट. आय थिंक देअर ईज ए मेसेज फॉर मी ऑन युअर नोटिस बोर्ड. द स्पेलिंग इज सिमिलर टू माय नेम"

तिने चटकन नोटिस बोर्डाकडे पाहिले आणि काऊंटरवरचे नोटबुक न्याहाळून मला विचारले, "फ्रॉम विच कंट्री आर यू कमिंग,सर?" "फ्रॉम इंडिया" मी म्हणालो. "ओह् सॉरी सर! दॅट पर्सन इज फ्रॉम इंडोनेशिया. बट डोन्ट वरी! यू वान्ट टू कॉन्टॅक्ट युअर पर्सन, आय विल अनाऊन्स" तिने चटकन् मायक्रोफोनवर माझे व देशमुखांचे नाव घेऊन अनाऊंसमेंटला सुरुवात केली. आणि जपानमध्ये आल्याबरोबर माझे नाव दुमदुमले! त्याचे पडसाद एअरपोर्टवर घुमत राहिले.

पाच मिनिटे वाट पाहून तिने मला देशमुखांचा फोन नंबर विचारला व सामान तिथेच ठेवून खाली जाऊन पब्लिक फोनवरून फोन करण्यास सांगितले. जपानसारख्या अनोळखी देशात कुटुंबाला तसेच सोडणे माझ्या जिवावर आले होते. तिला 'डोन्ट वरी' म्हणून सर्व कुटुंबीय व सामानासह सरकत्या जिन्याने बाहेर आलो.

पब्लिक फोन व इनफर्मेशन सेंटर जवळ होते. पण खिशात जपानी सुट्टे पैसे नव्हते. फोनजवळ घुटमळलो तेवढ्यात एक जपानी तरुणी बुटांचा टॉक टॉक आवाज करीत फोनजवळ आली व फोन करू लागली. चटकन् पुढे होऊन मी तिला माझ्याजवळचा फोन नंबर देऊन सुटे पैसे आहेत का विचारले. मला पैसे न देता जपानीमध्ये ती काहीतरी बोलली. सर्व काही माझ्या डोक्यावरून गेले. तिने स्वत:चे क्रेडिटकार्ड फोनमध्ये घातले व मला प्रथम देशमुखांचा नंबर लावून दिला व मी 'थँक यू' म्हणायच्या आत ती बाजूच्या बूथमधून स्वत:च नंबर फिरवू लागली.

"हॅलो, इज दॅट देशमुखस् हाऊस?"

"यस्" म्हणून बाईचा आवाज आला

"मी डॉक्टर कवळी बोलतो आहे. देशमुख आहेत का घरी?"

"अहो ते आजच बाहेरगावी गेलेले आहेत" हे वाक्य ऐकून माझ्या

डोळ्यासमोर काजवे चमकले. देशमुख जर बाहेरगावी गेलेत तर मग...? ज्यांच्या आशेवर इतका टोकियोपर्यंत आलो ते देशमुख घरी नाहीत! म्हणजे संपलंच सगळे...

"पण मी, फोन नंबर सांगते त्यावर त्यांना फोन करा, नाहीतर थांबा. मी त्यानाच एअरपोर्टवर फोन करायला सांगते. तुम्ही रिसेप्शन काऊंटरजवळ थांबा हं. काही काळजी करू नका! ते पाच मिनिटात तुम्हाला फोन करतील." अहो आश्चर्यम! आणि मी तिथे रिसेप्शन काऊंटरजवळ घुटमळत राहिलो. तिथल्या जपानी मुलीला इंग्रजी येत होते. तिला माझे नाव सांगितले आणि माझा फोन आला तर मला सांग अशी विनंती केली. थोड्याच वेळात बेल वाजली. "डॉक्टर कवळी" तिने हाक मारली, आणि रिसीव्हर माझ्या हातात दिला.

"कोण? देशमुख का"?

"हो, हो, देशमुख बोलतोय. घाबरू नका. मला एअरपोर्टवर येण्यास जमणार नाही-" मला आधी देशमुखांचा आवाज ऐकून पहायसे वाटले. मनात म्हटले, अहो देशमुख तुमच्या भरवशावर तर जपानमध्ये आलोय आणि तुम्हीच नाही म्हटलं तर काय करू? खरंच काय करू?

"हां बोला" मी मोठ्याने म्हणालो.

"हे बघा डॉक्टर, टॅक्सी पकडा आणि आता मी सांगतो त्या हॉटेलवर या. पण तुम्ही असे करा, ती जपानी मुलगी आहे ना तिला जरा फोन द्या. ती जपानी भाषेत पत्ता लिहून देईल, तो कागद तुम्ही टॅक्सीवाल्याला दाखवा."

"अहों पण टोकियो सेंट्रल ते हॉटेल किती वेळ लागेल? आणि पैसे किती लागतील?"

"साधारण अर्धा तास... पैसे मीटरवर समजतील. फोन द्या तिच्याकडे" तिने पत्ता लिहून दिला, स्मित हास्य केले व टॅक्सी स्टॅन्डही दाखविले. म्हटले चला! आता काळजी नको! टॅक्सीज नंबराप्रमाणे येत होत्या. मलाही एक टॅक्सी मिळाली. टॅक्सीवाल्याला हॉटेलच्या पत्त्याचा कागद दाखविला. त्याने जोराने उभी मान हलवली व जपानी मध्ये काहीतरी बडबडला. मी सुद्धा उभी मान हलवली व मराठीमध्ये 'समजले ना? म्हणून बडबडलो. इंग्रजी काय आणि मराठी काय, दोन्हीची किंमत त्याला सारखीच होती. सामान टॅक्सीत टाकले. टॅक्सी सुरू झाली. वॉकी टॉकीचा आवाज येत होताच.

टोकियोच्या वेगवेगळ्या रस्त्यांवरून टॅक्सी धावत होती. मी मीटरकडे पाहत होतो. मीटर वरचे आकडे पटापट चढत होते. माझा पाराही चढू लागला. कारण

एक तास झाला! देशमुखांनी साधारण अर्धा तास लागेल सांगितले होते. मी टॅक्सीवाल्याला हाताने खुणा करून अजून किती वेळ लागेल ते विचारत होतो,

आणि तो पत्त्याकडे खूण करून, थांब तुला चांगला फिरवितो असे बहुतेक जपानीतून बोलत होता. अरे, पण टॅक्सीचे बील चढत होते त्याचे काय? आणि कुठेतरी ह्याने लुटले तर? अंधार पडला होता. मधून मेनरोडवर, मधून गल्लीबोळातून तर मधूनच ओसाड भागांतून टॅक्सी धावत होती. बाप रे! हा टॅक्सीवाला आपल्याला लुटणार नक्की.

कोणत्या एरियात आपण आहोत काही कळत नव्हते. जीवाची घालमेल होत होती. दर पाच मिनिटांनी 'अजून किती वेळ'

विचारले की तो टॅक्सीवाला जपानीत काहीतरी बडबडे. शेवटी मी त्याचा हात धरला. कुठेतरी मेन रोडवर उतरून देशमुखांना पुन्हा फोन करावा असा मी विचार केला. खुणेनेच मी त्याला गाडी थांबवावयास सांगितले व फोन फोनची खूण केली. शेवटी त्यालाही माझ्या खिशाची दया आली असावी. गाडी थांबवून व पत्ता घेऊन तो फोन करून आला, आणि टॅक्सी माघारी फिरवून एका सुंदर हॉटेलसमोर येऊन थांबला. म्हणजे पुणेरी रिक्षावाल्याप्रमाणे त्याने आम्हाला चांगलेच घुमवले, पण मी ही खमक्या! मीटरवर ४८ आकडा आला होता. मी सरळ ४० त्याच्या हातावर टेकवले, तो मीटरकडे बोट दाखवू लागला. मी ही त्याचे उगाचंच पुढेमागे टॅक्सी फिरविल्याचे त्याला ऐकविले. शेवटी त्याने नमते घेतले व बहुतेक एक इरसाल जपानी शिवी हासडून तो निघून गेला.

रस्त्यावरून बॅगा खेचत आम्ही रस्त्यापलीकडे असलेल्या हॉटेलच्या दाराशी आलो. टोकियोत हवा थंड असताही मला घाम सुटला होता. वरती हॉटेलात काऊंटरवर जाऊन देशमुखांची चौकशी केली. रिसेप्शनिस्टने फोन फिरविला व देशमुख फोनवर आले, त्यांनी सांगितले की त्यांच्या 'जमुना हॉटेल' पासून आम्ही हाकेच्या अंतरावर आहोत. 'कृपया रूमवर जाऊन फ्रेश व्हा आणि जेवण्यासाठी ताबडतोब त्यांच्या हॉटेलवर या! आमच्या नावावर दोन रूम बुक केल्या होत्या, पण एकाच खोलीत सगळे सामान टाकून आम्ही देशमुखांच्या हॉटेल जमुनावर जेवण्यास गेलो.

ह्या देशमुखांचा इतिहास तसा अदुभुतच! उस्मानाबादमध्ये राहणारे देशमुख जपानला कसे पोहोचले? उस्मानाबाद-औरंगाबद भागात सुधीर फडके व देशमुख यांचे जवळचे संबंध आले. देशमुखांना 'कराटे' मध्ये फार इंटरेस्ट होता. सुधीर फडके आणि त्यांच्या इतर मित्रांनी देशमुखांना आर्थिक सहाय्य केले. मग त्यांनी वरळीच्या जपानी बुद्ध मंदिराशी संपर्क साधला. आणि फक्त दहा डॉलर्स खिशात

ठेवून टोकियोत प्रवेश केला. साधारण १९७१-७२ मध्ये! धडाडीचा मनुष्य! पहिले काही दिवस टोकियोमधील बुद्धमंदिरात राहून त्यांनी पुन्हा एकदा भारताची फेरी केली व टोकियोतच बस्तान बसविण्याचे त्यानी ठरविले. टोकियोत भारतीय हॉटेल्सची फार कमतरता होती. तेव्हा हॉटेल काढावयाचे त्यांनी ठरविले. भांडवलाची काय सोय? एका जपानी मुलीची ओळख झाली, तिने ऑफर दिली माझ्याशी लग्न कर मी बापाची एकुलती एक मुलगी आहे आणि वडिलांच्या नावावर कर्ज काढ! बस्तान बसले की घटस्फोट घे! पैसे फेडून टाक!

देशमुखांनी ह्या ऑफरचा विचार करण्याआधी त्यांना एक जपानी उद्योगपती भेटला. त्याने कर्ज दिले, आता तेच देशमुख टोकियोतील निशावाजू विभागात हॉटेल टाकून आहेत. हॉटेलचे नाव "जमुना" त्यांच्याच मुलीचे नाव. दुसरे हॉटेल आहे 'कोबे' येथे.

सुंदर भारतीय जेवण. अगदी नान सकट! आतमध्ये त्यांचे कुक नान बनवीत होते. ते सुंदर गरमागरम नान पोटात कधी गेले काही कळलेच नाही. गिऱ्हाईकांना संभाळत, संभाळत, देशमुख आमच्याकडे जातीने लक्ष देत होते. हॉटेल बंद होईपर्यंत आम्ही थांबलो. त्या दिवसाचा गल्ला देशमुखांनी मोजण्यास सुनीलाकडे दिला! ते म्हणाले, 'आज तुमच्या पायगुणाने कमाई वाढली. का कोणास ठाऊक पण असे शब्द मनाला फार समाधान देऊन जातात. आपल्यामुळे जर दुसऱ्याला मदत होत असेल तर आपण नक्कीच मदत करावी असे मला नेहमीच वाटते.

हॉटेलवर आलो. हॉटेलच्या बुक केलेल्या दोन रूम ऐवजी एकच रूम घेतली. कारण टोकियोतील डबल रूमचे भाडे परवडण्यासारखे नव्हते. देशमुख त्या हॉटेलचे सभासद असल्यामुळे आणखी डिस्काउंट!

रूममध्ये पाहतो तर बेडवर सुदंर चादरी घातलेल्या होत्या आणि पायाशी जाळीदार ड्रेसीस ठेवले होते. उघडून पाहिले. अरेच्या! हे तर किमोनो! जपानी लोक घालतात तसे! चटकन् आम्ही तिघांनी ते ड्रेस अंगावर चढविले. रात्रीचे बारा वाजून गेले होते. मृगया आणि सलील त्या ड्रेसमध्येच जवळ आली. मी त्यांना जवळ घेतले. आता आज अगदी निवांत झोपणार होतो.

सकाळी उठून पटापट आंघोळी केल्या, टेबलवर छोटासा हीटर होता. चहा साखर बरोबर असल्यामुळे खोलीतच बेड-टी केला. खोलीच्या बाथरूम पासून सगळ्याचे चित्रण केले. कपडे करून देशमुखांकडे गेलो.

छान ब्रेकफास्ट, वर आपुलकी अगदी घरच्या सारखी! देशमुख मुंबईला आले की नेहमी म्हणायचे! डॉक्टर, तुम्ही अमेरिका नका बघू पण आमचे जपान

बघा. आज ते स्वप्न पुरे होत होते. ब्रेकफास्ट घेतां घेतां, पुढचा प्रोग्राम आखला दुपारी टोकियो टॉवर गाईड म्हणून त्यांचे चीफकुक सकपाळ बरोबर येणार होते. त्यांनी ब्रेकफास्ट घेता घेता जपानची माहिती दिली.

जपानमध्ये मुलींचे प्रमाण फार! जपानमध्ये व्हर्जिन हा प्रकार नसतो. पण ह्याचा अर्थ असा नव्हे की सेक्स रस्तोरस्ती आहे. वागणे चालणे सगळीकडे अगदी सभ्यतेने, बहुतेक जपानी पुरुष दिवसा सुटात असतात. पण घरी आले की त्यांच्या जपानी किमोनो मध्ये. कामाच्या बाबतीत एकदम काटेकोर. काम आणि मौजमजा ह्या दोन्हीतही वक्तशीरपणा. रस्त्यावर चालताना त्यांच्याइतके जलद चालणे आपल्याला जमत नाही. चेहेऱ्यावर गंभीरपणा, पण मध्येच स्मित हास्यही उमटते. ऑफिस संपले की ही माणसे क्लबवर जाऊन सर्वप्रकारची मजा लुटतात व रात्री बारा एक वाजता घरी, व्हर्जिन राहणे त्यामुळे जरा कठीणच! पण रात्री कितीही उशीर झाला तरी

सकाळी अगदी वेळेवर कामावर हजर! एक सेकंद त्यांना एक तासासारखा वाटतो, जपानी माणसाला स्वच्छतेचीही फार आवड! कुठेही कचरा, घाण करण्यास त्यांना आवडत नाही. गार्बेज बॅग मधून कचरा एकत्र आणून त्याची विल्हेवाट लावण्यात येते. अमेरिकेतही तीच पद्धत आहे.

गप्पा मारून व जेवणास दोन वाजता येतो असे सांगून आम्ही बाहेर निघालो. निघताना देशमुखांनी त्यांच्या हॉटेलचे कार्ड दिले, जपानी भाषेतील! ते जपून ठेवले.

रस्त्यावरून चालता चालता सुंदर मोटारी पाहत होतो. होंडा, टोयोटो, मित्सुबिशी ह्या माझ्या आवडत्या गाड्या रस्त्यावरून धावत होत्या. एका शो-रूम मध्ये तर त्या विकण्यास ठेवल्या होत्या! चटकन् आत जाऊन त्या गाड्यांचे दर्शन घेतले. हा खरा जपानी माल! त्या गाड्यांचे फिनिशिंग, नवीन नवीन गॅजेटस् व मॉडेल्स पाहून मन हरखून गेले. परदेशात फक्त एक वर्ष डॉक्टर म्हणून राहून, परत येताना जर मोटार आणता येत असेल, तर फक्त गाडीच घेऊन मी परत येईन असे मला अजूनही मनोमन वाटते. त्यामुळे शोरूमच्या बाहेर पडलो तरी मन गाड्यांभोवती रेंगाळत होते. जपानी लोक रस्त्यावरून चालताना फार जलद चालतात. चालताना जणू काही हा वेळ फुकटच जातो आहे असा त्यांचा चेहरा असतो. गप्पा मारीत हसत खिदळत चालणारे जपानी त्यामुळे फारच कमीनिदान टोकियोत तरी कमी भेटले. असंच फिरत फिरत 'जपानी संध्याकाळ' घालवली. व रात्री जमुना हॉटेलवर परतलो. जेवण तयार होते. इतर गिऱ्हाईकेही होती.

देशमुख अदबीने वाकून प्रत्येकाची ऑर्डर टिपून घेत होते. जपानी लोकांची वाकून नमस्कार करण्याची पद्धत मला फार आवडली. त्यामुळे आयताच त्यांच्या पाठीच्या कण्याला व्यायाम मिळतो. पाठीचे व कमरेचे आजार जपानमध्ये कमी आढळण्याचे कारण कदाचित हेच असावे! आपल्या भारतीयांच्या कमरा नेहमी 'धरतात', कारण व्यायामाचा असा प्रकार नाही. जपानमध्ये सर्वांच्या कमरा फारच बारीक! विशेषत: तरुणींच्या कमरेवरील कमरपट्टा आवळलेला पाहून मी माझ्या मनगटावर असलेल्या घड्याळाच्या पट्ट्याकडे पाहत असे. कदाचित माझ्या मनगटाची व त्यांच्या कमरेची बरोबरी असावी! बसक्या नाकाचे मंगोलीयन चेहेरे मला साधारण आवडत नाहीत. तरी पण बँकॉक मधील मसाज सेंटर मधील सौंदर्यवतींचा प्रकार ह्याला अपवाद होता. हे मान्य करावयास हवे.

देशमुखांचे गिऱ्हाईक कमी होईपर्यंत आम्ही मजा पाहत कोपऱ्यात बसलो होतो. पॅन्ट्रीमधून एक पन्नाशीचा माणूस आमच्याकडे, विशेषत: मृगया सलीलकडे पाहत मराठीत बोलत होता. गिऱ्हाईके थोडी कमी होताच देशमुखांनी आमच्यासाठी जेवणाची तयारी केली. देशमुखांचे लक्ष नाही असे पाहून मी मेन्यूकार्डावरील किंमती पाहिल्या. बाप रे! केवढ्या ह्या पदार्थांच्या किंमती!

देशमुखांनी हे सर्व आमच्यासाठी का करावे? कशासाठी? खरंच जगात सर्व काही पैशाने मोजता येत नाही. पैशाच्या देवाणघेवाणीपेक्षा हृदयाची देवाणघेवाण महत्त्वाची असते. आपण हृदयाची नाती जोडली तर त्यापेक्षा मोठे सुख ह्या जगात काहीही नाही, आणि त्याला पैशाची जरूरही पडत नाही.

जेवताना देशमुखांनी दुसऱ्या दिवशी दुपारी जेवल्यावर टोकियो टॉवर पाहण्यासाठी जा म्हणून सांगितले. टॉवरला जाण्यासाठी आमच्या बरोबर त्यांचे चीफकुक सकपाळ येणार होते. सकपाळ म्हणजे जे .मघापासून मृगया व सलीलशी पॅन्ट्रीमधून बोलत होते ते! त्यांनाही आमच्या बरोबर फिरावयास मिळणार म्हणून खूप आनंद झाला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळचे जेवण लवकर आटोपून आम्ही एक वाजता निघालो, सकपाळना आमच्याबद्दल फार प्रेम वाटत होते. त्यांनी आम्हाला व्यवस्थित टोकियो टॉवर पर्यंत नेले. हा टॉवर ३३३ मीटर उंचीचा आहे व जगातील सर्वात उंच, लोखंडाचा टॉवर आहे. तो १९५८ साली बांधण्यात आला. त्याला रंगवायला १४० ड्रम रंग लागतो म्हणे! ह्या टॉवरचे वजन ४००० टन आहे. पॅरीसमधील एफेल टॉवर हा ह्या टॉवरपेक्षा कमी उंच आहे व त्याचे वजन

मात्र ७००० टन आहे. टोकियो टॉवर हा दळणवळणासाठी व वेगवेगळ्या ट्रान्समिशनसाठी वापरला जातो. टॉवरच्या तळाशी डिपार्टमेंट स्टोअर, कॉफी शॉप वगैरे आहेत.

लिफ्टने १५० मीटर उंचीवर जाण्यासाठी एक तिकीट. मग २५० मीटर उंचीपर्यंत जाण्यासाठी दुसरे तिकीट. तिकीटे महागच. पण सकपाळांनी तिकीटे काढली.

टोकियो टॉवरकडे पाहून मुंबईतल्या टीव्ही टॉवरची आठवण झाली. उंचीमध्ये व डिझाईनमध्ये जमीन अस्मानाचा फरक, हे मात्र खरे!

टॉवरच्या गॅलरीमध्ये लावलेल्या लाऊड स्पीकरवरून टेप केलेली कामेंटरी ऐकू येत होती. त्यामुळे कुठल्या बाजूला टोकियोचा कुठला भाग दिसतो आहे ते समजत होते. दक्षिणेस माऊंट फुजी दिसत होता व शिबुचा एरिया. तर पश्चिमेला आकाशाला प्रिन्स हॉटेल. उत्तरेला झिंजा एरिया तर पूर्वेला टोकियो डिस्ने-लँडचे मनोहर दृष्य दुर्बिणीतून पाहता येत होते. मी माझ्या व्हिडिओ कॅमेऱ्याच्या झूम लेन्सने सर्वांचे चित्रण करीत होतो. टॉवरवर त्याच दिवशी एका शाळेची मुलेही ट्रिपला आली होती. त्या जपानी मुलांबरोबर सुनीलाची दोस्ती झाली होती, त्या हसत्या खेळत्या जपानी मुलांसह आमच्या कुटुंबाचे चित्रण करून आम्ही खाली आलो.

फिरत फिरत सकपाळ आम्हाला एका खेळण्याच्या दुकानात घेऊन गेले, तेथे वेगवेगळ्या प्रकारचे कॉंप्युटरवर चालणारे खेळ होते. ह्यावर पैसे टाकून खेळण्यात मजा आली. रात्री पुन्हा आम्ही हॉटेलवर परत आलो.

२८ एप्रिल! अरे आज माझा वाढदिवस! सकाळी बोलताना सहज देशमुखांना सांगितले. त्यांनी हात मिळवला! घरी फोन केला व जपानी भाषेत त्यांच्या मराठी बायकोला सांगितले. ते म्हणाले 'माझ्या पोरीला-जमुनाला आज तुम्हाला झिंजा एरिया दाखवून आणण्यास सांगितले आहे, ती तुम्हाला तिथे घेऊन जाईल!'

थोड्याच वेळात जमुना हॉटेलवर आली. तिच्याबरोबर आम्ही निघालो. काही वेळ आम्ही भुयारी रेल्वेने प्रवास केला. गाडीत अगदी खेटून प्रवासी उभे होते, पण कुठेही आरडाओरडा नाही की शिवीगाळ नाही, मुंबई मधील लोकलसारखी लोंबकळणारी माणसे, कित्येक दिवस आंघोळ न केलेले भिकारी, पायाजवळ ठेवलेल्या मासळीच्या टोपल्या, धक्काबुक्की व शिव्याशाप ह्यापैकी

काहीच नव्हते. जो तो आपआपल्या मूडमध्ये! कोणत्यातरी स्टेशनवर उतरलो. बाहेर आल्यावर झिंजा एरिया पाहिली. सुंदर सुंदर डिपार्टमेंट स्टोअर्स पाहत पाहत झिंजाचे प्रसिद्ध जपानी देऊळ पाहण्यास गेलो.

मोठे भव्य देऊळ, आतमध्ये धुपाचा वास दरवळत होता. का कोणास ठाऊक जपानी, चिनी व भारतीय संस्कृती एकच आहेत असे वाटले. धुपाचा वास आपण अगदी मुंबईच्या एखाद्या देवळात असल्यासारखे वाटत होते. जिंझा एरिया पाहून, व इतर खेळण्यांच्या दुकानातून फिरत फिरत देशमुखांच्या घरी आले. घर फारच छोटेसे! मिसेस देशमुखांनी हसत स्वागत केले. थोड्या वेळाने टेबलावर मोठा केक आणून ठेवला त्यांनी. अरे हे काय? "अहो डॉक्टर आज तुमचा वाढदिवस! मेणबत्त्या किती लावायच्या?"

"नको नको, मेणबत्त्या नका लावू" मी म्हणालो. मेणबत्त्या लावल्या की खरे वय कळले असते ना! बायकांसारखी वय चोरायची सवय लागली होती! तरीही देशमुखांची जपानी शेजारीण व कुटुंबातील मंडळी 'हॅपी बर्थ डे' चे गाणे म्हणत होती. मी आयुष्यात प्रथमच स्वत:चा बर्थ डे साजरा केलेला पाहिला.

देशमुखांच्या विडीओवर दोन्ही चॅनेल असल्यामुळे आतापर्यंत चित्रण केलेली कॅसेट लाऊन पाहिली. आमचे व्हिडिओ शूटिंग झकास झाले होते.

देशमुखांना मी आता कसा विसरणार. त्यांच्या घरातील बर्थडे केक माझी इतक्या वर्षाची इच्छा पूर्ण करून गेला. मृगया व सलील त्यांच्या बाबांना केक कापताना पाहून आनंदले होते. रात्री हॉटेलवर आलो. जेवणे आटोपली, देशमुखांचा निरोप घेतला. उद्या सकाळी निघायचे होते. जपान सोडून होनोलुलूला. सकपाळ आले व म्हणाले 'मी हॉटेलवर निरोप घ्यायला येतो'

रात्री सामानाची बांधाबांध केली. सकपाळ आले, अगदी भावनावश होऊन, रात्री एक वाजता परत गेले. जाताना फोन करण्याचे आश्वासन देऊन गेले. 'तुम्ही मुंबईत पोहोचाल त्यावेळी मी पण मुंबईत असेन म्हणाले.' आणि खरंच आमच्या प्रवासानंतर सकपाळ मुंबईत भेटले. त्यांचे आमच्यावरील प्रेम काही औरच. आता सुद्धा जपानहून ते आम्हाला फोन करतात. माझ्या मुलांबरोबर व सुनीलाशी बोलतात आणि फोनचे बील हॉटेलवर येऊ नये म्हणून ते रस्त्यावरच्या फोनवरून आम्हाला फोन करतात! हे खरं प्रेम! हे सर्व पाहून वाटते की अशी माणसे आम्हाला भेटली हे आमचे मोठे भाग्य! आमचे पूर्वजन्मीचे काहीतरी पुण्य असले पाहिजे!

आज तारीख २९ एप्रिल. काल वाढदिवसाची मजा चाखून, ह्यावेळी बरोबर पत्ता विचारून नारिता एअरपोर्टवर आलो. एअरपोर्टवर आल्यावर मन विषण्ण झाले. जपानचे दर्शन घेतले होते पण काही इच्छा अजून बाकी राहिल्या होत्या, बुलिट ट्रेन मध्ये बसलो नव्हतो, हिरोशिमा पाहिले नव्हते.. आणि... नाही तरी ह्या महागड्या शहरात जे काही पहावयास मिळाले ते देशमुखांच्यामुळेच.

काल रात्री जेवताना पुण्याच्या भागवताची ओळख 'व्हिडिओ कॅमेऱ्यावरून' झाली. आमची दोघांची सेम मॉडेल्स! पुण्या-मुंबईच्या गप्पा रंगल्या. मुंबईच्या ताज्या बातम्या समजल्या. बरे वाटत होते. इराण इराक युद्ध थांबविण्यात जपानची मध्यस्तीच शेवटी उपयोगी पडली. जपानने आर्थिक मदत बंद करण्याची तंबी दिल्याबरोबर दोघेही घाबरले म्हणे! मुलांच्या शिक्षणाला फार पैसा खर्च होतो वगैरे वगैरे.

नेहमीची क्रियाकर्मे विमानतळावरती उरकून विमानात बसलो तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. युनायटेड एअरलाईन्सचे जम्बो विमान, विमानात चांगली सीट कोणती ते आता पाठ झाले होते. मुलेही आज खुशीत होती! प्रवास किती तासांचा हे कळले नव्हते पण साधारण अंधार होताना म्हणजे सहा-सात वाजता होनोलुलूला उतरणार असा अंदाज होता.

●●●

निसर्गाचा अविष्कार होनोलुलू

होनोलुलू! एक छोटेसे बेट! पॅसिफिक माहासागरामधील हवाई आयलंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेटांपैकी एक. हल्ली अमेरिकेच्या ताब्यात. जपानकडून जिंकून घेतलेले, पर्ल हार्बर, दुसरे महायुद्धातील भीषण लढाई काही शब्द आठवत होते. आता अमेरिकेचे बावन्नावे राज्य म्हणून होनोलुलू ओळखले जाते.

"काहीही करा पण होनोलुलूला भेट देण्यास विसरू नका. विशेषतः व्हायकिकी बीच पाहण्यास विसरू नका" माझ्या मोदी नावाच्या गुजराथी मित्राने फार आवर्जून सांगितले होते. म्हणून प्रत्यक्ष अमेरिकेला भेट देण्यापूर्वी होनोलुलू फक्त चोवीस तासांची भेट देण्याचे ठरविले होते.

जपानवरून आमचे युनायटेड एअरलाईन्सचे विमान निघाले होते. सबंध प्रवास समुद्रावरून! खालीवर असा काहीच फरक नव्हता, सगळीकडे निळे निळे! निळ्या डोळ्यांच्या प्रदेशात शिरणार म्हणूनच की काय सर्वत्र निळेच निळे होते. निळे आकाश, निळे पाणी! निळ्या डोळ्यांचे चेहरे पाहताना मध्येच काळे निग्रोंचे डोळे दिसावेत तसे निळ्या आकाशात एखादा ढग विमानाखालून सरकत होता. दर तासा दीड तासाने काहीतरी खायला प्यायला मिळत होते. पण विमानातील खाण्याचा आता खरंच कंटाळा आला होता. ठरलेला रॅ. ब्राऊन ब्रेड, छोट्या छोट्या डब्यांमधून चीझ-सॉस, उकडलेल्या भाज्यांमधून हॅम नाहीतर असंच काहीतरी, चिकन पण उकडलेले. भाज्या उकडलेल्या नाहीतर कच्च्याच! त्यामुळे विमानातल्या खाण्याला कंटाळून आमचे कुटुंब फक्त झोप काढत होते आणि मधेच पेप्सी, कोकाकोला वा कॉफीवर ताव मारीत होते.

हळूहळू अंधार पडू लागला. सूर्य क्षितिजापलीकडे जात होता पण क्षितीज तर दिसत नव्हते, मी खिडकीच्या काचेला तोंड लावून बसलो होतो, बाहेरचे काहीतरी दिसेल म्हणून.

विमानाचा आवाज बदलू लागला. 'फासन बेल्ट' म्हणून अक्षरे समोर झळकली. एअर होस्टेस खुर्च्या सरळ आहेत की नाही व पट्टे बांधले आहेत की नाही ते पाहू लागली. "होनोलुलू आले" मी सुनीलाला जागे करीत म्हणालो. खाली दिव्यांच्या माळाच्या-माळा दिसत होत्या. आमचे विमान कितीतरी वेळ होनोलुलूवर घिरट्या घालत होते. मला वाटले कदाचित वैमानिकाला अंधारात

विमान उतरविण्यास भीती वाटत असावी किंवा रनवेचे लाईटस् व शहरातील रस्त्यांचे लाईट कोणते हे त्याला समजत नसावे! पण पाहता पाहता विमानाने जमिनीकडे झेपं घेतली आणि ते अलगद एअरपोर्टच्या इमारती जवळ येऊन थांबले.

होनोलुलूला उतरताना छातीत धडधडत होते, कारण तिथे ओळखीचे फारसे कोणी नव्हते. मुंबईहून निघताना एवढेच कळले होते माझ्या मागच्या प्रवासात बँकॉकमध्ये मला ज्यांनी मदत केली होती त्या डॉ. जवाहर रेळे (कै. सॉलिसिटर रेळे यांचे पुतणे) यांचे वास्तव्य हल्ली होनोलुलूत आहे. इमर्जन्सीत लागला तर म्हणून त्यांचा फोन नंबर खिशात होता. विमानतळ त्या मानाने छोटा. अमेरिकेच्या प्रदेशात प्रवेश करीत असल्यामुळे कस्टम चेकिंग अगदी कडक होणार ह्याची जाणीव रांगेत उभे राहिल्यावर झाली. रांग हळूहळू सरकत होती, चार-पाच ठिकाणी पासपोर्ट व इतर कागदपत्रं तपासले जात होते.

मीही आमच्या कुटुंबियांसमवेत रांगेत उभा होतो. ह्यावेळेस होनोलुलू एअरपोर्टवरच रात्रीचा मुक्काम करून मॉटेल किंवा हॉटेलचा खर्च वाचविण्याचा विचार पक्का केला होता. त्यामुळे कस्टम चेकिंगसाठी वेळ लागत असला तरी तो वेळ मजेत जात होता. होनोलुलूच्या एअरपोर्टवर उतरलेले सर्वच प्रवासी मजा करण्यासाठी आलेले होते. काही शौकीन, गळ्यात फुलांच्या मोठ मोठ्या माळा घालून उघडेच फिरत होते. होनोलुलू ही काहीतरी वेगळी चीज आहे हे आजूबाजूला नजर फिरविताच लक्षात येत होते. आजूबाजूला निळ्या डोळ्यांच्या अनेक सुंदर तरुणी रांगेत उभ्या होत्या. अमेरिकेत प्रवेश करताच प्रथमच गोरे सौंदर्य पहावयास मिळाले. सरळ नाक, निमुळती जिवणी, गोड लांबट द्राक्षासारखा चेहरा व त्यावर सुंदर निळे डोळे! मन सुखावत होते, एखादी लक्षवेधी तरुणी दिसली की सुनीलाला दाखवीत होतो. मृगया सलील रांगेतून ट्रॉली ढकलत खेळत होते.

माझा चेहरा मात्र भलताच ओढलेला झाला होता. जपानहून निघताना, कधी नव्हे ती आज मी जिन पँट चढविली होती. जिन पँट बसते मस्त. पण माझ्यासारख्याचे पोट त्या पँटच्या बटनाना आड येत होते. वर जरी मी पट्टा आवळला होता तरी पँट खाली घसरत होती. साधारण जिन पँटवर मी बुशशर्ट घालतो पण आज निघण्याच्या घाईत नेमका टी-शर्ट घातल्यामुळे अस्मादिकांच्या पोटाच्या गोलाईचे प्रदर्शन होत होते.

आमच्या प्रवासी बॅगा प्रवास करून थकल्या होत्या. खेचण्याचे पट्टे हातात आणि बॅगा दुसरीकडे! आणि जपानमध्ये लक्षात आले की बॅगला लावलेली रानडे

रोड दादरच्या कुलपांच्या किल्ल्या, कुलपात गोलगोल फिरू लागल्या होत्या. शेवटी भारतीय मालाने आपली कमाल दाखविण्यास सुरुवात केली होती. खेचण्याच्या बॅगची एका बाजूची चाके निखळून पडली होती. समजा कस्टम चेकिंगच्या वेळी कुलपे उघडली नाहीत तर? उगाचंच संशय यावयाचा!

कस्टमचा फॉर्म वाचून पाठ झाला होता. अमेरिकेत कोणत्या वस्तू आणण्यास बंदी आहे, किती पासून किती किंमतीच्या वर असलेल्या वस्तूची किंमत सांगावी लागेल. सर्व काही पाठ, तरीही माझ्याकडे व्हिडिओ कॅमेरा लिहावयाचा की नाही ही शंका होती. कल्पना सुचली. इकडे तिकडे फिरणाऱ्या एका कस्टम अधिकाऱ्यास विचारले, मी व्हिडिओ कॅमेरा कॅरी करतोय, लिहिण्याची गरज आहे का? "ओ सर्टनली नॉट" तो म्हणाला! हायसे वाटले! पण बॅगमधील गरम मसाला जर ब्राऊन शुगर वाटली तर? त्याची थोडीफार धाकधूक होतीच. हळूहळू आमचा नंबर आला. एअरपोर्टवर मग तो कोणताही असो, एका पॅसेंजरनेच पेपर्स व पासपोर्ट तेथील अधिकाऱ्याला दाखवावयाचा असा प्रघात असतो. त्यासाठी त्या अधिकाऱ्याच्या टेबलापासून दोन-तीन फुटांवर एक रेषा मारलेली असते. एकानेच त्या रेषेच्या पुढे जाऊन पेपर्स द्यायचे. त्या प्रमाणे मी पुढे झालो. माझ्या हातात दोन पासपोर्ट, तिकीटे आणि एमबारकेशनची कार्डे होती. आमची कस्टम ऑफिसर गोऱ्या आणि काळ्या कातडीच्या मधल्या एका विशिष्ट रंगाची, जाड कातडीची, जाडी बाई होती. तिने माझ्याकडे वरपासून खालपर्यंत न्याहाळून पाहिले, माझी जिन पँट नेमकी तेव्हा थोडी खाली आली होती, मी अस्वस्थ,

"सर, व्हेअर हॅव यू कम फ्रॉम?" तिने विचारले.

"आय हॅव कम फ्रॉम बॉम्बे, इंडिया! आय ॲम ऑन वर्ल्ड टूर" आणखी काही ती बोलण्याअगोदर चौघांची तिकीटे तिच्यापुढे ठेवत मी म्हणालो. तिने तिकीटे हातात घेतली. बॅगा उचलून वर टेबलावर ठेवण्यास सांगितले. मी चटकन् सुनीला, सलील, मृगयाला बॅगा घेऊन बोलावले, इतक्या जड बॅगा उचलून वर ठेवताना आमची तारांबळ उडाली. बाकीचे पॅसेंजर्स आमची लांबून मजा बघत होते. मला आवडलेली तरुण अमेरिकन मुलगी माझा गोंधळ पाहून खुदकन् हसली. बॅग एवढ्याशा फटीतून वर उचलता येईना. सुनीलाच्या मदतीने कशा बशा बॅगा वर ठेवल्या. जिन पँट वर सरकवली. बापरे! आता बॅगा उघडताना चावी लागली नाही तर! देवाचे नाव घेणे चालू केले. कस्टम ऑफिसरने बॅगांची व माझी झालेली दैना न्याहाळली होती. पुन्हा एकदा आम्हा सर्वांवरून नजर फिरविली व का कोणास ठाऊक आमच्या नशिबाची चावी चटकन् लागली.

आता पर्यंत ती कस्टम ऑफिसर प्रत्येक पॅसेंजरला बॅगा उघडून दाखवावयास सांगत होती. पण ह्या बाईने काही पेपर्स माझ्या पुढ्यात सरकावले व त्यावर सही करण्यास सांगितले. मी सही केल्यावर म्हणाली, "पुट डेट"

"मॅडम टुडे इज टवेन्टी नाईनथ, नो?"

"नो, टवेन्टी एट" ती जाड्या भरड्यात आवाजात म्हणाली, मी घाबऱ्या घाबऱ्या म्हणालो "मॅडम यस्टर्डे वॉज टवेन्टी एट्थ, सो टुडे विल बी टवेन्टीनाईंथ"

"वॉट आय से इज करेक्ट, पुट टवेन्टीएटथ"

बरं बाई! पण ओरडू नकोस, तू म्हणतेस तेच खरे! कारण कस्टम ऑफिसर आहेस तू. तुला उलट बोलणे म्हणजे... मी मनात म्हणालो.

मुंबईमध्ये अनेक व्यवसायांतील लोक माझ्याकडे पेशंट म्हणून येतात. त्यापैकी दाते नावाचे गृहस्थ, मी मागे सिंगापूरहून मुंबईला आलो तेव्हा कस्टम ऑफिसर म्हणून एअरपोर्टवर ड्युटीवर होते. माझा नंबर येण्याआधी मी बघीतले की एक अप टू डेट मध्यम वयाचा माणूस त्यांच्याशी व्हिडिओच्या किंमतीवरून हुज्जत घालत होता. दातेंच्या म्हणण्यानुसार त्या व्हिडिओची प्राइस लिस्ट मधली किंमत खरी होती. तर त्या माणसाच्या मते त्याने आणलेल्या व्हिडिओच्या रिसीटवरची किंमत खरी होती, शेवटी दातेंनी थोडीशी ड्युटी कमी करून सोडून दिले, ड्युटीचे पैसे एअरपोर्टवरील बँकेत भरून तो मनुष्य परत त्यांच्याकडे आला व म्हणाला! "कस्टम ऑफिसर, प्लिज गिव्ह मी युवर ॲड्रेस. आय विल कॉल यू फॉर डिनर." त्या माणसाची ही भलतीच मस्केबाजी पाहून दाते भडकले व म्हणाले," मिस्टर, व्हेन यू विल क्रॉस धिस डोअर यू विल फरगेट मी, बट यू वोंट फरगिव मी. ओ के?" तो सुटाबुटातला माणूस त्यांच्याकडे पाहत पाहत निघून गेला. सांगायचा मुद्दा हा की, कस्टम ऑफिसर ही जगातील एकच व्यक्ती मी मानतो जिच्यापुढे भिकाऱ्यापासून राजापर्यंत (मिनिस्टर किंवा सरकारी अधिकारी सोडून) सर्व लाचार बनतात.

आमच्या कस्टम ऑफिसर बाईंचा मूड खराब करून माझ्या सामानाची उकराउकर व कुलुपांची मोडतोड करून घेण्यापेक्षा मी सरळ मान खाली घालून, घे बाई, अठ्ठावीस तर अठ्ठावीस म्हणत फॉर्मवर तारीख टाकली! २८ एप्रिल फार्म परत देताना वर मानकरून तिच्याकडे पाहिले, अहो आश्चर्यम!

ती ऑफिसरीण चक्क हसत होती!

"यू आर ए डॉक्टर" पासपोर्टवरून तिला मी डॉक्टर असल्याचे कळले होते. पण ह्यापुढे तिने जो मला धक्का दिला त्याने मी जवळजवळ कोलमडलोच!

"डॉक्टर, यू आर सेलिब्रेटिंग युअर बर्थ डे स्टिल! यू सी, यू हॅव क्रॉसड् द इंटरनॅशनल डेट लाईन, सो यू हॅव गॉट ए लॉंगर टवेंटिएटथ डेट. इनस्टेड ऑफ टवेंटीफोर यू हॅव निअरली थर्टी सिक्स अवर्स! यू शुड हॅव टोल्ड द एअर होस्टेस, शी वुड हॅव सेलिब्रेटेड युवर बर्थ-डे इन द प्लेन!"

"काय?" मी शूद्ध मराठीत ओरडलो!

"इटस् ओ. के."माझ्या मुलांकडे वळून ती म्हणाली," कम ऑन, सेलिब्रेट युअर डॅडस् बर्थ-डे इन होनोलुलू. इफ पॉसिबल ऑन द वायकीकी बीच!"

मी तिच्या चेहेऱ्याकडे पाहून घाबरलो. कारण मला वाटले, ही जाडी बाई माझी मुंडी पकडून माझा बर्थ-डे-किस घेणार. अरेरे विमानात त्या एअर होस्टेस जवळ चांगली संधी हुकली! आमच्या कस्टम ऑफिसरीण बाईची रिॲक्शन न पाहता सामान ट्रॉलीवर घालून, पेपर्स घेऊन मी एअरपोर्टच्या बाहेर कुटुंबासकट पळत सुटलो.

"बाबा, शी! काय मज्जा आली असती, विमानात तुम्ही तुमचा बर्थ- डे सांगितला असता तर!" मृगया म्हणाली. क्षणभर, माझा जन्मच विमानात झाला आहे, आणि माझे रडणे ऐकून सुंदर एअर हॉस्टेस मला जवळ घेऊन माझे पापी वर पापी घेतायत असा भास झाला! चुकलंच आमच्या आईच, माझ्या जन्माच्यावेळी विमानात असती तर? जाऊ द्या.

बर्थ डे किससाठी आतुरलेली कस्टम ऑफिसर माझी पाठ काढताना!

"बाबा, आता तरी घड्याळ ॲडजेस्ट करा" मृगयाने माझे घड्याळ पाहून म्हटले, अरे खरेच! आता घड्याळ ॲडजस्ट करायलाच हवे. पण आता एक भलताच प्रश्न उभा राहिला, बाप रे!

तिकीटे काढून प्रोग्राम तपासला आणि पार मूड गेला, सुनिलाला कळेना काय झाले ते.

"अगं बाई, भलताच गोंधळ झालाय. एक दिवसाचा तारखेचा गोंधळ झाल्यामुळे आता आपण एक दिवस आधी आलो आहोत. म्हणजे होनोलुलूला एक दिवसाच्या ऐवजी दोन दिवस रहावे लागणार आपल्याला! बाप रे! एक रात्र आपण एअरपोर्टवर जागून काढू, पण दोन दिवस म्हणजे हॉटेल मध्ये रहावे लागणार, म्हणजे हॉटेलचा डबल खर्च, होनोलुलूला एक दिवस पुरे होतो, तिथे फुकट दोन रात्री काढायच्या! आमच्या ट्रॅव्हल एजंटच्याही लक्षात ही अडचण कशी नाही आली? २९ तारखेच्या ऐवजी पुन्हा २८ एप्रिल आणि होनोलुलूचे डिपार्चर ३० तारखेला! काय करावे? तितक्यात कल्पना सुचली.

सरळ युनायटेड एअरलाईन्सच्या काऊंटरवर गेलो. तिथे एक तरुण सुंदर मुलगी काऊंटर संभाळत होती. तिला मी माझी अडचण सांगितली. ट्रॅव्हल एजंटच्या गाढवपणामुळे माझा प्रवासातील एक दिवस फुकट जातोय हे तिला बळेच पटवून दिले. माझी मलाच कमाल वाटली.

तिने पटापट कॉम्प्यूटरवर चेक केले. आणि २९ एप्रिलच्या विमानात आम्हा चौघांच्या सीट्स रिझर्व करून दिल्या. पुन्हा मला म्हणाली, "सॉरी सर, ऑन अकाऊंट ऑफ अवर ट्रॅव्हल एजंट यू अननेसेसरिली लॉस्ट युअर मूड, बट डोन्ट वरी. आय हॅव मेड अरेंजमेन्ट, सो यू कॅन फ्लाय सान फ्रान्सिस्को ऑन टवेंटीनाईंथ, इनस्टेड ऑफ थर्टी. इफ यू डोन्ट माईंड, यू कॅन हॅड ओव्हर युवर बॅगेज टू मी, ॲन्ड यू कॅन फ्लाय टुमॉरो" मला अत्यानंद झाला! ह्याला म्हणतात उत्कृष्ट सेवा!

माझ्या जड बॅगा तिच्याकडे लॉकर मध्ये ठेवण्यास द्यावा असा विचार आला. पण नको! कुठे हरविल्या तर? शिवाय एअरपोर्टवर रात्र काढायची म्हणजे चादरी वगैरे कपडे लागणार होते.

"इट इज ओ के. आय ॲम व्हेरी मच थ्यँकफुल टू यू ॲन्ड युअर एअरलाइन्स"

"बाय बाय, हॅव अ नाईस डे इन होनोलुलू" स्मित हास्य करीत ती म्हणाली, ह्यावेळी मात्र माझा बर्थ-डे चा किस तिने घ्यावा असे मला फार वाटले. असो.

सुनीलाकडे येऊन तिकीट बदलून आणल्याचे अभिमानाने सांगितले. जड सामान लॉकर मध्ये टाकले व पुन्हा एअरपोर्टवर आलो. आमची छोटी ट्रॉली आणि त्यावर दोन छोट्या बॅगा ठेवून एअरपोर्टच्या पायरीवर बसलो.

रात्रीचे दोन वाजले होते. एअरपोर्ट बाहेर पडण्याच्या दरवाजाजवळ आम्ही बसलो होतो. पहिल्या मजल्यावर आतमध्ये जाण्यासाठी म्हणजेच डिपार्चर व खाली अरायव्हल. मुलांना व बायकोला चिवडा, ब्रेड जॅम काढावयास सांगितले व आम्ही सर्वांनी ते सर्व अक्षरशः पायरीवर बसून फस्त केले, त्यावेळी पायरीवर बसून आपण आपली किंमत कमी करून घेत आहोत वगैरे मुळीच मनात आले नाही; झोप कोणालाच आली नव्हती.

खाता खाता मृगयाचे लक्ष पाठीमागे गेले. तिच्या लक्षात आले की प्रवाशांनी सोडलेली रिकामी ट्रॉली बाजूला नेऊन हँगरमध्ये अडकविली की पाव डॉलरचे नाणे मिळते. आम्ही गप्पा मारीत बसलो होतो. सुंदर सुंदर गाड्या येऊन उभ्या राहत होत्या. पॅसेंजर त्यात बसत होते. टॅक्सीवाले पार्किंगला जागा न मिळाल्यामुळे चकरा मारीत होते. अरे वा! सुंदर गाड्या पाहून मन उल्हासित होत होते, झोप पार उडून गेली होती. इतक्यात मृगयाने मागून येऊन नाण्यांचा आवाज केला. बाप रे! ट्राली हँगरमध्ये नेऊन ठेवण्याचे काम करून तिने पाच डॉलर्स कमावले होते. "शी, काय हे! लोक हसतील ना. मूर्ख कुठली." "पण इथे हसायला आपणाला ओळखतंय कोण बाबा." मृगयाच्या कमाईचे पैसे मी नाही घेणार, तुझ्याचकडे ठेव म्हणत ते पैसे मी सुनिलाकडे दिले. कारण हमालीकरून कमाई करण्याची पाळी आमच्यावर अजून तरी आली नव्हती.

पहाटेचे चार वाजले! बाप रे! थोडा वेळ तरी झोपू या! आम्ही जिन्याने वर आलो, एअरपोर्ट लांबलचक होता. शक्यतो अंधारात खुर्च्या मिळाल्या तर तिथे झोपायचे म्हणून थोडी शोधाशोध केली. जिकडे तिकडे गोऱ्या कातडीचे प्रवासी आरामात झोपले होते. आम्हीही एअरपोर्टच्या इमारतीत आडोशाची सुंदर जागा शोधून काढली. तिथे सुनीला मृगया व सलील आडवे झाले. मी मात्र डुलकी काढत सूर्यप्रकाशाची वाट पाहत बसलो होतो.

वाढत्या वर्दळीमुळे जाग आली. शेजारच्या पॅसेंजरला विचारले, "किती वाजले?" सकाळचे साडे आठ वाजत आले होते. सुनिलाही जागी झाली. पटापट अंथरूणे आवरली. वायकीकी बीचवर जाण्यापूर्वी एक एक जण टॉयलेटला जाऊन आलो.

श्री. जवाहर रेळे यांचा फोन नंबर खिशात होता, करून पाहावा का फोन? कॉईन टाकून नंबर फिरविला. रेळे घरी होते. आम्ही होनोलुलूला अचानक आलेले ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांच्या घरी पाहुणे! तेव्हा रात्री मुक्कामाला जाऊन त्यांची पंचाईत आम्ही करणार नव्हतो, तरीही त्यांनी त्यांच्या घरी येण्याचा आग्रह केला. वायकीकी बीचवरच त्यांचा फ्लॅट होता. कोणती बस पकडावयाची हे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे बस पकडून आम्ही त्यांच्या घरी पोहोचलो.

रेळेंचा फ्लॅट छानच होता. समोर कॅनॉल होता. रोडवरून गाड्या वेगात धावत होत्या. वॉश घेतला व फ्रेश होऊन रेळेंच्या बरोबर ब्रेकफास्ट घेतला. रेळे हा माणूस भयंकर हुशार. युनायटेड नेशन्सची नोकरी सोडून आता ते होनोलुलूला संख्याशास्त्रज्ञ म्हणून नोकरी करीत होते. सौ. रेळेंचा हसरा चेहरा व आनंदी स्वभाव त्या आदर्श गृहिणी होत्या. आज दुसऱ्यांदा त्यांच्या घरचा पाहुणचार घेण्याची संधी आम्हाला लाभलेली होती. प्रथम बँकॉकमध्ये दहा वर्षापूर्वी आणि आज होनोलुलूत!

अत्यंत हुशार संख्याशास्त्रज्ञ म्हणून रेळेंचा नावलौकीक होता. त्यांनी मुंबईतही अनेकाना ह्या विषयात मार्गदर्शन केले होते. तरीही त्यांच्या लाघवी स्वभावामुळे त्यांनी स्वत:ला कधी मोठे समजून घेतले नाही. अशी हुशार माणसे भारतातच राहावयास हवीत असे त्यावेळी प्रथम मला वाटले. आणि पुढे अमेरिकेत तर अनेकदा. असो.

होनोलुलू हे ओहू नावाच्या बेटावरचा एक भाग आहे. होनोलुलूला ओहूमध्ये सर्वात सुंदर समुद्रकिनारा लाभलेला आहे. जगाच्या नकाशावर बारीक सुईच्या टोकाएवढे हे बेट, पण ह्या बेटाने आज फार नाव कमविले आहे. हवाई बेटे या नावाने ही बेटे ओळखली जातात. अननसचे अतोनात पिक! त्यामुळे अननसाचे अनेक खाद्यप्रकार हॉटेलात दिसून येतात. वायकीकी हा फारच सुंदर समुद्रकिनारा रेळेंच्या घरापासून फार जवळ! चालत चालत बीचवर गेलो. पाण्याचा इतका सुंदर निळा रंग प्रथमच पाहिला. अनेक प्रवासी रेतीमध्ये सूर्याची किरणे अंगावर घेत पहुडले होते. काही पाण्यात पॉवर बोटी चालवत होते. तर काही बोर्डवर कसरती करीत लाटांवर नाचत होते. लाट आली की तिच्याबरोबर वर खाली उसळत होते. पाण्याशी खेळण्याचे नानाप्रकार पाहावयास मिळत होते. आम्हीही रेतीत बसलो.

'सर्वांगसुंदर वायकीकी बीच होनोलुलु !'

आमच्या मागच्या बाजूला हवाई इंटरनॅशनल हॉटेल होते. होनोलुलूमध्ये मनोरंजनाची अनेक साधने आहेत. म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. हेलिकॉप्टर, हॉवरक्राफ्ट, पॉवरबोटी, गाड्या, मोटरसायकली भाड्याने मिळतात. व्हिडिओ कॅमेरा भाड्याने मिळतो. रात्रीचे नाईट क्लबस् आहेतच. आणि विशेषतः हवाई डान्स! हवाई डान्स म्हणजे काय? गळ्यामध्ये फुलांच्या लांबलचक माळा घालून कंबर एका विशिष्ट पद्धतीने हलवीत केलेला डान्स! ह्या डान्ससाठी प्रवासी हौसेने जातात. वायकीकी बीचवरचे पहिले हॉटेल अठ्याऐंशी वर्षांपूर्वीचे आहे.

ह्या हवाई बेटांची लिलिऊ नावाची राणी होती. तिची कैलुनी नावाची एक पुतणी होती. राणीच्या मृत्यूनंतर अमेरिकन लोकांनी हवाई बेट परत दिले नाही. बिचारी कैलुनी चोवीसाव्या वर्षीच वारली.

हवाई मध्ये एकूण आठ बेटे येतात. ओहू हे सर्वात मोठे बेट व त्यावरचे होनोलुलू राजधानीचे शहर. होनोलुलूच्या विरुद्ध म्हणजे ओहूच्या पश्चिम किनाऱ्यावर सुप्रसिद्ध पर्ल हार्बर! दुसऱ्या महायुद्धातील एका महाभयंकर संहाराचे साक्षी. अमेरिकन नौदलाचे पानिपतच. होनोलुलूहून अमेरिकेतील जवळचे ठिकाण -कॅलिफोर्निया, फक्त दोन हजार चारशे मैल! दुपारचे दोन वाजले तरी बीच सोडावा असे वाटत नव्हते, पण कडकडून भूक लागली होती. व्हिडिओने चित्रण केले व रेळेंच्या घरी येऊन फार सुंदर भारतीय जेवणावर ताव मारला. वायकीकी पाहून झाला! होनोलुलू पाहून झाले! पुन्हा एअरपोर्टवर जायचे होते, परतीची बस पकडली रेळेंचा निरोप घेऊन! तेव्हा कल्पनाही नव्हती की तो डॉ. रेळेंचा शेवटचाच निरोप होता. कारण मुंबईत आल्यावर समजले की डॉ. रेळे हे दिल्लीला आले असता हार्ट फेल होऊन वारले. इतक्या लांबच्या ठिकाणी भेटलेले डॉ. जवाहर रेळे आता फार फार लांब गेले. कदाचित काही वर्षांनी तिथेही ते माझ्या स्वागतासाठी तसेच हसत उभे असतील.

होनोलुलूवरून युनायटेड एअरलाइन्सची रात्रीची फ्लाईट पकडली.

विमानाने टेकऑफ घेतला तेव्हा सुंदर दिव्यांच्या जणू माळाच पाण्यात विखुरलेल्या दिसल्या. हीच ती हवाई बेटे. होनोलुलू, हवाई, ओहू ह्या सर्वांना सोडून आम्ही चाललो होतो. उंच उंच आकाशात, पर्ल हार्बरचे दर्शन अंधारातूनच घेतले. आता खरी अमेरिका! सान फ्रान्सिस्को! अमेरिकेतील एक सुंदर शहर! उद्या सकाळी आम्ही तिथे पोहोचणार होतो, तो पर्यंत झोप आली तर पाहू म्हणत विमानात डोळे मिटले, पण झोप येत नव्हती.

●●●

'गजबजलेले शहर - सॅन फ्रान्सिस्को'!

सॅन फ्रान्सिस्को सकाळी नऊ वाजता आले. विमान शहरावरून उतरत खाली आले तेव्हा सॅन फ्रान्सिस्कोच्या देखणेपणाची कल्पना आली. समुद्रावरचे अनेक मोठमोठे पूल दिसले. त्यापैकी प्रसिद्ध गोल्डन गेट ब्रिज मी शोधत होतो. शेवटी अमेरिकेला येण्याचा 'गोल्डन चान्स' मलाच नव्हे तर माझ्या मुलांना व सौ.लाही लाभला होता.

सॅन फ्रान्सिस्कोला त्यामानाने ओळखीचे लोक कमी होते. तरीही सेंट जोसे नावाच्या उपनगरात माझे पूर्वीचे पेशंट, श्री सबनीस राहात होते. विमानतळावर उतरल्याबरोबर त्याना त्यांच्या घरी किंवा ऑफिसात फोन करा म्हणून त्यांच्या कुटुंबियांची मला तंबी होती.

प्रवासाला निघताना दादरमधील प्रसिद्ध स्त्री रोगतज्ञ डॉ. श्रद्धानंद ठाकूर, (जे पु. ल. देशपांडेंचे सख्खे मेहुणे आहेत) ह्यांनी प्रवासाबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या होत्या. त्यांच्या माहितीचे श्री. सामंत, सॅन फ्रान्सिस्कोत आहेत. त्यांना फोन करून जमल्यास त्यांच्या मोटेल्सवर राहण्यास सांगितले होते.

विमानतळावर बॅगेज क्लेम करून, बॅगा उचलून बाहेर आलो. अमेरिकेत करन्सी बदलण्याचा प्रश्न नव्हता. कारण निघताना अमेरिकन डॉलर्स घेतले होते. बाहेर आल्यावर फोन शोधू लागलो. जवळच फोन होता. डिजिटल कॉलसाठी पन्नास सेंट टाकावयाचे, पण माझ्याकडे सुटे पैसे नव्हते. काय करावे कळेना. परत एअरपोर्टमध्ये जाऊन पैसे सुटे करण्यापेक्षा बाजूच्या अमेरिकन बाईना सुटे पैसे देण्यास सांगितले. जवळ जवळ सत्तर पंचाहत्तर वर्षांची गोऱ्या कातडीची अमेरिकन बाई! बिचारीने थरथरत्या हाताने माझा फोन नंबर हातात घेतला व स्वतःचे पैसे टाकून मला फोन लावून दिला. पैसे घेण्यास ती तयार नव्हती. का तर म्हणे आम्ही त्यांचे 'गेस्ट' आहोत! खरंच! जगामध्ये माणुसकीचा अनुभव मला फार फार वेगळा आला. लोक मदतीला तत्पर असत. कोणीही कधीही मदत करण्यास तयार. माझे पेशंट, जे जगामध्ये सर्व ठिकाणी विखुरलेले होते, ते परदेशात राहून माझ्यासाठी काय काय करीत होते! त्यांच्या मनात, हा डॉक्टर पुन्हा आपल्याला भेटेल किंवा आपल्याला उपयोगी पडेल, हा स्वार्थ नव्हता. फक्त प्रेम-निस्सीम प्रेम! ओळखीच्या आणि अनोळखीच्या. अशा जगातील अनेक माणसांचे अनुभव घेतले. गहिवरून आले! अगदी हृदयापासून! मला वाटते

जगात माणुसकी, अल्लाउद्दीनच्या गुहेसारखी ठासून भरलेली आहे. त्या गुहेचे दार उघडण्याची 'मास्टर की' आपल्या जिभेत असते. ती किल्ली बरोबर लागली की माणुसकी उफाळून बाहेर येते. अगदी नको म्हटले तरी!

कदाचित बाकीच्यांचे अनुभव वेगळे असतील, पण निःस्वार्थी प्रेमाचे दर्शन मला जगप्रवास करताना अनेक ठिकाणी झाले, त्या प्रेमाच्या शिदोरीवरच माझा हा सर्व प्रवास चालला होता. आत्तापर्यंत जपानचे देशमुख, होनोलुलूचे डॉ रेळे. आणि आता पुढे माणसे आपली की परक्याची ते कळणार होते. मुंबईतून निघताना विजय देशपांडेने काढलेले उद्‌गार ओढवत होते! 'लेका! अमेरिकेत पोहोचशील तेव्हा कळेल खरे कोण व खोटे कोण!'

असो, फोन लागला होता.

"मी डॉक्टर कवळी, मुंबईहून आलो आहे, "डॉक्टर ठाकुरांनी आपले नाव सांगितले होते..."

"अरेच्या कधी आलात? पण प्रॉब्लेम आहे. आमच्याकडे नेमके आज आमच्या सासऱ्यांचे ऑपरेशन आहे, त्यामुळे आम्ही एअरपोर्टवर येऊ शकत नाही. पण तुम्हाला मोटेल पाहिजे असेल तर दुसऱ्या मोटेलचा ॲड्रेस देते" सामंताच्या सूनबाई फोनवर बोलत होत्या.

नाराजीत 'ठीक आहे' म्हणत मी पत्ता लिहून घेतला. कारण अनोळखी देशात कुठेतरी राहण्यापेक्षा सामंतांच्या माहितीतील मोटेल बरे, सामंत तरी काय करणार? नेमके चुकीच्या दिवशी आम्ही सॅन फ्रान्सिस्कोला आलो होतो. सूनबाईंनी मोटेलच्या पत्त्याबरोबर त्या ठिकाणी जाण्यासाठी एअरपोर्टवरून कोणती बस पकडावयाची, कुठे उतरावयाचे, ड्रायव्हरला काय सांगायचे ते सर्व सांगितले. मोठ्यांना प्रत्येकी दहा डॉलर व मुलांसकट पस्तीस डॉलरच्या आसपास तिकीट होईल म्हणून सांगितले. ठीक आहे म्हणून व आभार मानून मी फोन ठेवला.

ह्यापेक्षा सेंट जोसेला सबनीसांकडे गेलो तर? पण सकाळचे अकरा वाजत आले होते. सबनीसांना ऑफिसमध्ये फोन करून त्रास देणे प्रशस्त वाटत नव्हते. त्यापेक्षा मोटेलमध्ये राहावे असे ठरवून बॅगा बसच्या दिशेने सरकविण्यास सुरुवात केली.

इतक्यात एअरपोर्टवरचा एक व्हाईट अमेरिकन जवळ आला, व म्हणाला "सर, व्हेअर आर यू गोईंग?" मी त्याच्याकडे पत्ता दिला.

"ओ! यू नो हाऊ मच विल यू पे फॉर द बस? फॉर्टी डॉलर्स!"

"नो नो. थर्टी फाइव्ह डॉलर्स" मी वाण्याच्या हिशोबात सांगितले. अरे पाच डॉलर्सचे आमच्या इंडियात किती रुपये होतात माहीत आहे काय? शंभर रुपये! मी मनात म्हणालो.

तो हसत हातवर करत म्हणाला, "ओके, ओके. आय विल टेक यू टू धिस प्लेस ओनली इन थर्टी डॉलर्स. कम ऑन!"

तो टॅक्सी एजंट होता! मी क्षणभर विचार केला. सामानाच्या बॅगा माझ्याकडे केविलवाण्या होऊन पाहत होत्या. कोणाचे पट्टे तुटले होते, तर कोणाच्या नाड्या सुटल्या होत्या. बॅगांवर बसून केविलवाण्या चेहेऱ्याने मृगया म्हणाली, "बाबा जाऊ या ना टॅक्सीने"

"ओके. व्हेअर हॅव वी टू गो?" मी एजंटला विचारले.

त्याने ताबडतोब आम्हाला एका ड्रायव्हरला टॅक्सी दाखविण्यास सांगितले. बाहेर आलो. बाप रे! काय थंडी आणि गार झोंबणारा वारा! एका सुंदर गाडीचा दरवाजा ड्रायव्हरने उघडला, डिकी उघडली, बाप रे! ही तर लिमोसिन गाडी! आपले राष्ट्रपती वापरतात तशी सहा दरवाजेवाली! बाप रे! सामान डिकीत भरता

सहा दरवाजांवी लिमोसिन ड्रायव्हर अदबीने दार उघडून स्वागत करताना!

भरता गाडी न्याहाळत होतो. ड्रायव्हरने दरवाजा उघडून धरला, "प्लीज टेक युअर सीट सर!" ड्रायव्हर मला सांगत होता. अगदी राष्ट्रपती गाडीत बसतात तसे वाकत मी गाडीत बसलो फक्त बसताना जिन पँट वर सरकावली!

बाप रे! आतमध्ये तर वेगळाच थाट. ड्रायव्हर आणि आमच्या सीटमध्ये गोल टेबल, त्यावर ग्लासेस मांडलेली! हा काय प्रकार? आम्ही भांबावून पाहत होतो.

"बाबा, पाणी कुठे आहे?" ग्लासेस पाहून मृगयाने विचारले,

"अगं ही दारू पिण्याची सोय - थंडी आहे ना बाहेर, म्हणून"

ड्रायव्हरने ऑटोमॅटिक, खिडक्यांच्या काचा वर चढविल्या आणि हीटर चालू केला. दारू पासून लांब राहिल्यामुळे, अनेकदा दारू प्राशन करण्याच्या संधी हुकल्या होत्या विमानात, आणि आता अमेरिकेत तर आणखीनच.

"वा! काय गाडी आहे, नाही का गं?"

"हो ना," सुनीलाही भांबावून बाहेर पाहत बोलली. आम्ही सर्वचजण भाबावलो होतो. मालगाडीत कोंबलेली मेंढरे, छोट्याशा फटीतून बाहेर बघतात तसेच आम्ही सर्व काचेला डोळे लावून बाहेरचे सृष्टी सौंदर्य पाहत होतो.

गाडी चांगली तीन-चार तास जरी चालली तरी चालेल! जपानसारखा

मीटरचा प्रश्न नव्हता. बोली आधीच झाली होती. त्यामुळे तीस डॉलर्सच्यावर बिल जाणार नव्हते. काही वेळाने डोंगरासारखा भाग आला. वळणा वळणाचा रस्ता, उतरण, वेगवेगळ्या इमारती, छोटे छोटे बंगले, गाडी उतरणीवर हळू जाऊ लागली. गल्ल्या ओलांडीत एका आडव्या गल्लीत घुसली व नाक्यावर उभी राहून इमारतीत घुसली.

चटकन् उतरून ड्रायव्हरने आमचे सामान बाहेर काढले, व त्याने समोर बोट दाखविले. 'हेच ते मोटेल' गार वारा सुटला होता, थंडी बोचरी होती. अगदी मुंबईत जसा थंडीत गार वारा सुटतो तसा! बाप रे! तिथे तर कोणीही दिसत नव्हते. इतक्यात ऑफिससारखी एक खोली दिसली. बाहेरची बेल वाजविली, आतून एक तिशीची बाई ऑफिसात आली, आम्ही दरवाजा उघडून आत गेलो, रूम पाहिजे म्हणून तिला सांगितले, बाप रे! ती बाई फटाफट बोलू लागली.

"सी, यू हॅव टु पे थर्टी डॉलर्स पर डे, मनी इन ॲडव्हान्स, फॉर फोन कॉल्स यू हॅव टू पे एक्स्ट्रा, फॉर टी ऑर कॉफी यू पे एक्स्ट्रा" माझ्या चेहऱ्यावरचे

भाव बदलत होते, पुण्यामधील लॉजच्या गल्यावरचा एखादा रानडे किंवा दांडेकरच जणू मला सगळे नियम समजाऊन सांगत आहे की काय असा भास झाला.

"काय बाई आहे गं! अमेरिकेत पण अशी माणसे!" मी सुनीलाकडे पाहत म्हटले, आणि अहो आश्चर्यम्!

बाईच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले, अगदी अस्खलीत मराठीत ती म्हणाली, "तुम्ही मराठी? अरेच्या,! सॉरी मला माहीत नव्हते हं. आधी सामान आणि मुलांना आतमध्ये घ्या, बाहेर थंडी आहे"

आणि मग काय विचारता, सगळा ट्रान्सफर सीन, "पैसे मग द्या! आधी रूमवर जाऊन फ्रेश व्हा." मग खरी मायेची ऊब त्या बाईने दिली आम्हाला. एकदम व्ही. आय. पी. ट्रीटमेंट! हा परिणाम लिमोसिन गाडीचा नव्हता तर मराठी भाषेचा होता. आमची मातृभाषा मराठी असल्याचा अभिमान त्या क्षणी जसा झाला, तसा आजवर कधी अनुभवला नव्हता. दादरमधील शिवसेना भवन समोर असलेल्या माझ्या दवाखान्याबद्दल मला अभिमान वाटला.

सामान रूममध्ये ठेवता ठेवता ती बाई उत्साहाने बोलत होती, "मी रत्नागिरीची, आम्ही तिथले मुसलमान." म्हणजे हिचे आडनावसुद्धा मराठी असणार, कारण जंजीरा विजयदुर्ग येथील मुसलमानांची आडनावे मराठी असतात अगदी दांडेकर सुद्धा. आमच्या वर्गातच होता ना एक, सुलतान प्रधान. आता बेटा टाटा हॉस्पिटलमध्ये मोठ्या पोस्टवर आहे. अली, पारकर, खांडेकर अशा पैकी ती असावी असा तिच्या बोलण्यावरून मी अंदाज बांधला.

"तुम्ही इतक्या गोऱ्या आहात की तुम्ही इंडियन वाटतच नाही" तिला चढवीत मी म्हणालो. तिने मुरका मारीत असा चेहरा केला की "चला काहीतरीच काय?" असे तिला म्हणावयाचे होते.

"अहो तिला जास्त खूष करू नका, नाहीतर गळ्यात पडायची!" ती बाहेर गेली असता आमची सौ. म्हणाली. मनात विचार आला समजा गळ्यात पडली तर काही हरकत नाही. कारण दिसायला ती नक्कीच छान होती. पण...

"अहो मुलांना भूक लागली आहे. "सौ. म्हणाली, इतक्यात मालकीणबाई आली "मुलांना भूक लागली का?" आमच्या सौ. चे बोलणे तिने ऐकले होते.

"हो ना! इथे जवळपास कुठे आम्लेट ब्रेड —" सौ. विचारत होती.

"सॉरी"ती म्हणाली "आम्लेट ब्रेड इथे जवळपास नाही. पण चायना टाऊनमध्ये मिळेल" पण ॲक्सीने जायला पाच डॉलर, यायला पाच डॉलर.

ठे. प्र. ७६५ दा. क्र.

म्हणजे जाऊन येऊन दहा डॉलर्स! बाप रे! म्हणजे दोनशे रुपये नुसते जाण्यायेण्यासाठी. शिवाय आम्लेटचे वेगळे! मुंबईत इराण्यांची हॉटेल्स नाक्या-नाक्यावर कशी आहेत व तिथे आम्लेट ब्रेड कसा छान मिळतो त्याची मला फार तीव्रतेने आठवण झाली. टॅक्सीचे भाडे ऐकून माझा चेहरा साफ पडला. तो बघून, कधी नव्हे तो आमच्या मृगयाने समंजसपणा दाखविला "बाबा, मला नको आम्लेट. त्यापेक्षा आपला चिवडा..."

"थांबा थोडा वेळ. चहा करत ठेवलाय, घेऊन येते" मालकीणबाई म्हणाल्या. "चहाचे पैसे वेगळे"

"तुम्ही असे करा, दोन कपच आणा. आम्ही चौघात वाटून घेऊ!"

मुंबईत हॉटेलमध्ये विशेषतः चायनीज हॉटेल्समध्ये सहा माणसांना फक्त चार डिशेस किंवा दहा माणसांना सहा किंवा सात डिशेस ऑर्डर करण्याची माझी हुशारी मी वापरली. खरं म्हटलं तर त्या क्षणी त्या थंडीत दोन कप चहा मी एकट्यानेच संपवला असता!

आम्ही कपडे बदलले. व दारावर टक टक झाले. मालकीणबाई मोठा ट्रे त्यात एका बाजूला चार मोठी आम्लेट आणि पावाचे तुकडे व चहा घेऊन हजर झाल्या!

"खा सावकाश" म्हणून निघूनही गेल्या.

मी आ-वासून पहातच राहिलो, मृगयाने पण आ-वासला होता पण गरम व घमघमाट सुटलेले आम्लेट तोंडात घालून तिने खायला सुरुवातही केली. वा! मस्त! म्हणत आम्ही सर्व काही फस्त केले.

चहाचा एक घोट सुनीलाने तोंडात घेतला, आणि तिला उलटीसारखे झाले, "अहो चहाला बघा कसा विचित्र वास येतोय!"

"खरंच" चहाचा वास घेत मी म्हटले, ही मालकीण मुसलमान. तिच्याकडच्या चहाच्या कपांना गाईच्या मटणाचा वास!" छे, टाकून देऊया चहा." मी नको नको म्हणेपर्यंत सर्व चहा तिने कमोडमध्ये ओतून टाकला.

"मी जाते तिच्याकडे आणि करून आणते चहा" सुनीला म्हणाली. "आणि त्या बाईने मघाचा चहा का टाकला म्हणून विचारले तर?"

"हां आयडिया, चहात माशी पडली म्हणून सांग"

"अहो पण –"

"आता काय" मी विचारले.

"अहो अमेरिकेत माशा, असतात का हो?" हो गं हो! अमेरिकेत माशा, पाली, झुरळे, ढेकूण, डांस नसतात. त्यामुळे उगाचंच आपले अज्ञान तिच्यापुढे वाजवू नकोस, त्यापेक्षा तू तिला, चहात मुलांचा बूट पडला म्हणून सांग."

"वा छान आयडिया" म्हणत सुनीला गेली सुद्धा!"

थोड्या वेळात सुनीला नवीन चहा एका स्वच्छ भांड्यात घेऊन आली. "त्या बाईने बिचारीने खरं सांगितले, आम्ही गाईचे मटण खातो, गेले पंधरा दिवस त्यांचेकडे ते मटण नव्हते. फ्रीज उघडून दाखवला अगदी, तरी काय झाले. मी हे भांडे एकदम स्वच्छ करून चहा केला. आता बघा वास नाही येत ना।" खरंच चहा सुंदर झाला होता!

दुपारचे बारा वाजायला आले होते. फिरायला बाहेर पडलो, रस्ता क्रॉस करून पलीकडे गेलो. सुंदर गार्डन आणि मोठमोठ्या इमारतींनी नटलेल्या सॅन फ्रान्सिस्को शहराच्या दर्शनाने आमचे खरे 'अमेरिका दर्शन' सुरू होत होते!

सॅन फ्रान्सिस्को हे कॅलिफोर्निया ह्या राज्यातील महत्त्वाचे शहर कॅलिफोर्निया म्हणजे फळा फुलांनी व शेतीने समृद्ध असे राज्य. मला आठवते सुप्रसिद्ध उद्योगपती गोगटे ह्यांची आपल्या कोंकणाचे कॅलिफोर्निया करण्याची इच्छा होती. तेच हे कॅलिफोर्निया स्टेट. अशी अनेक स्टेटस् (राज्ये) मिळून अमेरिका. युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका बनलेली आहे. नकाशा पाहिला की आपल्याला ह्या वेगवेगळ्या राज्यांची कल्पना येते.

पश्चिम किनाऱ्यावर खालच्या बाजूस कॅलिफोर्निया स्टेट, तर वरच्या बाजूला वॉशिंग्टन स्टेट, ही प्रमुख राज्ये आहेत. प्रत्येक स्टेटला स्वतःचे राजधानीचे शहर आहे. जसे कॅलिफोर्नियामध्ये याशिमोटो उत्तर पश्चिमेस वाशिंग्टन मध्ये सिॲटल, दक्षिणेस टेक्सास मध्ये ह्यूस्टन, डलास व पूर्वेस. पेनसिल्वानियामध्ये न्यूयॉर्क, एवढे सगळे करून ह्या संयुक्त राज्य संघाची राजधानी पूर्व किनाऱ्यावर वाशिंग्टन आहेच! अनेक राज्ये, अनेक शहरे, प्रत्येक राज्याचे वैशिष्ठ्य वेगळे वेगळे.

सॅन फ्रान्सिस्कोला 'फ्रिस्को' ह्या लाडक्या नांवाने ओळखले जाते. आपल्याकडे जसे प्रकाशचे 'पक्या' किंवा नंदिनीचे 'नंदू' होते तसेच! फ्रिस्को हे नाव आमचा मंबईतला ट्रॅव्हल एजंटही अनेकदा उच्चारावयाचा. पण फ्रिस्को हे लाडुक नाम सॅन फ्रान्सिस्कोचे हे इकडे उतरल्यावर कळले.

पंचेचाळीस ते पन्नास चौरस मैल क्षेत्रफळाचे हे शहर अदमासे चाळीस टेकड्यांवर वसलेले आहे. त्यामुळे रस्त्यावर चढउतार फार. चालणाऱ्या माणसाची तर दमछाकच व्हावयाची! पण ह्या अमेरिकेमध्ये चालतोच कोण? धावणारे मात्र खूप बघायला मिळतात. अंगावरची चरबी कमी करण्यासाठी जॉगिंग करणारे, अर्ध्या चड्डीमधील लोक, दिवसा रात्री कधीही, बाजूने जाताना दिसायचे. अमेरिकेत कुठलाही प्रांत असो, जॉगिंग करणारा दिसला नाही असे झाले नाही. हां तर सॅन फान्सिस्कोचे रस्ते इतके चढउताराचे आहेत की एका रस्त्याला चक्क 'क्रुकेड स्ट्रीट' नाव आहे.

फिरत फिरत आम्ही पुढे गेलो. तो समोर गोल्डन गेट पूल दिसू लागला. गोल्डन गेट पूल, एक लांबलचक पूल, ज्या विषयी इतके दिवस ऐकले होते. सर्वांत मोठा लोंबता पूल म्हणून हा ओळखला जातो, ह्या पुलाच्या खालून मोठमोठ्या बोटीही आरामात जातात! पुलापलीकडे उपनगरात शिल्पकार व कलावंत लोक राहतात. पलीकडे एक छोटेसे बेट, अल्कात्राझ आयलंड आहे. अपल्याकडे जसे पूर्वी काही कैदी अंदमान बेटावर ठेवीत असत तसे ह्या बेटावर कैदी ठेवले जातात.

२७ मे १९३७ रोजी हा पूल रहदारीला खुला झाला. दरवर्षी साधारण चार कोटी वाहने हा पूल पार करतात. पुलावर पादचाऱ्यांसाठी वेगळा रस्ता! हा पूल बांधताना एकलक्ष अट्ठावीस हजार सातशे चव्वेचाळीस मीटर लांब तार् दोन मनोऱ्यांमध्ये वळवून बांधण्यात आली. हा पूल बांधणारा स्ट्रॉस ह्या साहेबाचा पुतळा पुलाच्या उत्तरेस आहे. पुलावरून सॅन फ्रान्सिस्कोचे विलोभनीय दर्शन घडते. चालत चालत पुढे गेलो. सोसाट्याचा गार वारा बाप रे! हाच तो फिशरमेन्स व्हार्फ, कितीतरी बोटी उभ्या होत्या, पण हवा फारच थंड आणि झोंबणारा वारा, फिशरमेन्स व्हार्फ लांबूनच पाहून परत मोटेलवर आलो.

संध्याकाळी गोल्डन गेट पार्क पाहण्यासाठी बाहेर पडलो. आमच्या मालकीणबाईंनी तिथे जाण्यासाठी आम्हाला एकतीस नंबरची बस पकडण्यास सांगितले होते. येताना उलट्या दिशेने येणारी तीच बस पकडा म्हणून सांगितले, व बस सर्विस रात्री दहा वाजता बंद होते म्हणून सांगितले. बस पकडून पार्कजवळ उतरलो. हा पार्क डोंगरावर होता. तिथून लांबचलांब गार्डन पसरले होते. फिरत फिरत लांबवर गेलो. इतक्यात अंधार होऊ लागला. घड्याळात पाहिले, बाप रे! रात्रीचे साडेनऊ वाजत आले होते. म्हणजे साडेनऊ पर्यंत अजून उजेड होता.

भराभर चालत बसचा स्टँड शोधू लागलो. काही केल्या स्टॉप सापडेना. एकतीस नंबर, एकतीस नंबर करत आम्ही रस्ते फिरत होतो. आता रस्ते

निर्मनुष्य झाले होते. फक्त गाड्यांची वाहतूक, कोणाला विचारावे तर रस्त्यावर चिटपाखरू नाही, बाप रे! अमेरिकेत रात्री माणसांना लुटतात, काळजी घ्या म्हणून सांगितलेले आठवले. शेवटी समोरून एक भलाभक्कम जाडा अमेरिकन गोरा माणूस, अंधारात त्याच्या कुत्र्याला घेऊन येताना दिसला. "एक्सक्यूज मी सर. विल यू प्लिज टेल मी व्हेअर इज बसस्टँड फॉर नंबर थर्टीवन" त्याने नाक्यावर नेऊन बसस्टँड दाखविला. व तो म्हणाला "हॅव यू गॉट चेन्ज फॉर द बस फेअर?" 'नो वुई डोन्ट हॅव! मी उत्तर दिले, तो विचारात पडला. आणि म्हणाला, "ड्रायव्हर वोंट टेक यू इन, अनलेस यू गॉट चेन्ज, बट इटस् ओके," टेल हिम वुई आर टूरिस्ट, देन ही मे अलाव यू टु ट्रॅव्हल" "ओके, थ्यँक यू व्हेरी मज" मी त्या माणसाच्या पाठीवरून हात फिरवत व त्या माणसाला जवळ घेत म्हटले. तो माणूस हसत गेला.

व्हाईट अमेरिकन बाईला मिठीत घेऊन मी व मृगया खोखो हसताना!

मृगया माझ्याजवळ आली. मी तिला म्हटले, "पाहिलेस अमेरिकन पूरुष कसे धष्टपुष्ट, नाहीतर तुम्ही इंडियन!"

"बाबा, तो कोण होता?"

"अगं, अमेरिकन पुरुष" मी सांगितले, मृगया हसत हसत म्हणाली "बाबा तो पुरुष नव्हता, ती अमेरिकन बाई होती."

"काय?" मी क्षणभर हवेत उडालो, "अगं पण आधी नाही का सांगायचेस? बाप रे! मी तर त्या बाईला अगदी जवळ घेऊन..." आणि आता मागून काठी घेऊन आली तर! "चला चला लवकर" मी बसस्टँडच्या दिशेने पाऊले उचलीत म्हटले.

बसस्टँडवर कोणी नव्हते. नाहीतरी बसचा उपयोग अमेरिकेत कोण करतो? आमच्यासारखे प्रवासी नाहीतर निग्रो! जवळ पैसे सुटे नाहीत आणि शेवटची बसची वेळ झालेली! टॅक्सी मिळण्याची लक्षणे नव्हती. मोटेलचा पत्ता खिशात होता. अर्धा तास होत आला.

"बाबा, ती बघा मघाशी भेटलेली बाई पुन्हा येतेय" खरंच की! बाप रे, काठी किंवा नवऱ्याला घेऊन तर आली नाही ना? मी घाबरलो. ती जसजशी जवळ येऊ लागली तसतसा त्या थंडीत मला घाम फुटू लागला."

"एक्सक्यूज मी, यू वाँट चेंज नो? कम, टेक धिस चेंज।" माझ्या पुढे केलेल्या हातात क्वॉइन्स टाकत ती म्हणाली. मी चटकन् पाच डॉलर्सची नोट तिच्यापुढे केली. "प्लिज डोंट गिव्ह मी युअर डॉलर्स, यू आर अवर गेस्टस्, नाऊ यू कॅन टेक द बस"

इतक्यात आमची बस आली. धावत आम्ही बस पकडली. त्या बाईचा 'बाय, बाय'चा आवाज आला. बस सुटली. ती बाई हात हलवीत उभी होती. पुन्हा कधीही न भेटण्यासाठी. माणुसकी मात्र तिच्यासारख्या अनेक रूपांनी भेटणार होती. ह्या माणुसकीचे दर्शन प्रवासात क्षणाक्षणाला होत होते. आणि त्यामुळेच आमचा प्रवास चालला होता. हसत खिदळत, मजेत!

मोटेलवर पोहोचलो. चिवडा व बिस्किटे खाऊन झोपलो. पण झोप येत नव्हती. कारण आमच्या रूमची मोठी खिडकी रस्त्याला लागून होती. समजा खिडकीतून कोणी घुसले आणि आम्हाला शूट केले तर! असेच डोळे उघडत मिटत रात्र घालविली.

सकाळी चहा सुनीलानेच करून आणला. थोड्या वेळात मालकीणबाई आल्या. "आज तुम्हाला सॅन फ्रान्सिस्कोत फिरविते, माझ्या मिस्टरांना आज ऑफिसमधून लवकर बोलावले आहे."

"पण कशाला?"

"अहो कमाल आहे. तुम्हाला अजून कितीतरी बघायचे आहे. ॲक्वेरियम, झू, आणि झिकझॅक रोड-"

"नाही. सॉरी! आज आम्हाला सिॲटलला जायचे आहे, बस पकडून तेव्हा दहा वाजता टॅक्सी पकडून आम्ही ग्रे-हाऊंडच्या बसस्टँडवर जाऊ. प्लिज टॅक्सीवाल्याला मात्र सांगा दहा वाजता यायला"

"तुम्ही खरेच जाणार?" त्या बाईचा चेहरा पडला, "माझे मिस्टर तर म्हणाले मी लवकर येतो म्हणून मग!"

"तुम्ही केलेल्या पाहुणचाराबद्दल आम्ही खरोखरच आभारी आहोत. पण तिकडे सिॲटलमध्ये आमची वाट बघतील."

"बरे बाबा. ग्रे-हाऊंड बसने सिॲटलला जायला वीस तास तरी लागतील. तेव्हा तुम्हाला काय आवडेल ते करून बरोबर घेऊन जा! बटाटे पोहे तुम्हाला आवडतात?

"हो आवडतात. पण नको. तुम्हाला आम्ही आधीच खूप त्रास दिला आहे. आपले बिल ..."

"ते काही नाही. बाई, तुम्ही या आणि करा बटाटे पोहे!" आणि सुनीलाला ती खेचून घेऊन गेली सुद्धा!

पोह्यांचा घमघमाट नाकात शिरत होता. गरम गरम पोहे डिशेस मधून पुढे आले. शिवाय रस्त्यात खाण्यासाठी म्हणून प्लास्टिकच्या पिशवीतही बांधून देण्यात आले.

"बाई तुमचे बिल?" मी विचारले

"रुमचे तीस डॉलर्स. बस्स"

"अहो पण बाकीचे. चहापाणी, आम्लेट आणि हे पोहे वगैरे?"

"सॉरी! तुमची निघायची वेळ झाली. टॅक्सी येईल इतक्यात, तयार रहा"

मालकीणबाई बाहेर निघून गेलीही. अरेच्या! प्रवासात काय सर्वच माणसे इतकी चांगली भेटतात? ना आपले काही नाते ना काही.

थोड्या वेळाने टॅक्सी आली. सामान भरले. मालकीणबाई आमच्या बरोबर निरोप द्यायला आल्या होत्या, "पुन्हा भेटू या" त्या मराठीत म्हणाल्या. का कोणास ठाऊक, त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले होते.

सॅन फ्रान्सिस्को शहरातील ग्रे-हाऊंड बसस्टँडवर आमची टॅक्सी येऊन उभी राहिली. बसस्टँडवर अनेक ग्रे-हाँऊडचे कामगार हातात फलक घेऊन मूक निदर्शने करताना दिसले. त्यामुळे ग्रे-हाऊंडच्या बस सर्विसमध्ये आज फार अव्यवस्थितपणा आला होता. ह्या बससेवेबद्दल फार फार ऐकले होते. अत्यंत वक्तशीरपणा, सुंदर बसेस, आरामशीर सुखकारक प्रवास! बसचे पासेस् सात-सात दिवसांचे, मुंबईहून निघताना घेतले होते. कारण ते भारतीय चलनामध्ये सवलतीने घेता येत होते. ह्या बसने प्रवास करताना, परत त्याच रूटने परत येता येत नाही रात्री बाराच्या पुढे बस पकडल्यास एक दिवस फुकट जात नाही. सात दिवसात, पाहिजे तिथे पाहिजे तेव्हा. फिरता येते.

बस स्टँडवर नकाशा विकत घेतला. त्यात ग्रे-हाऊंडच्या मार्गाचे जाळे पसरले होते. बसमध्ये बॅगेज ठेवण्यासाठी दिले. की आपल्याला छोटी पावती मिळते. त्यामुळे सामान हरविण्याची भीती कमी! माझ्या नेहमीच्या सवयी प्रमाणे बसस्टँडवर आल्यापासून मी बस कुठे कुठे जाते ते बघत होतो. याशिमोटे नॅशनल पार्कला जरूर जा म्हणून मुंबईत क्षीरसागरांनी सांगितले होते. पण ते पाहायला मिळणार नव्हते. सॅक्रोमॅटो म्हणून ठिकाण सहा तासांवर होते. सॅक्रोमँटोला फार छान तलाव आहेत व तिथे डोंगराच्या कपारीतून नौकाविहार करण्यात मजा येते, व गाडीचा रस्ता झाडाच्या बुंध्यामधून आहे वगैरे वगैरे आठवले. तेव्हा सिअॅटलला जाता जाता सॅक्रोमँटोला वाटेत उतरावे असे मनात आले, पण सॅक्रॉमँटोला गेलो तर ओळखीचे कोणी नाही, म्हणजे पुन्हा मोटेल शोधा. पण रात्रीची ग्रे-हाऊंड पकडून निघालो तर...?

बेत पक्का ठरत नव्हता. शेवटी सॅक्रॉमँटो ड्रॉप केले, व शेवटी दुपारी एक वाजता सुटणारी सिअॅटलची बस पकडावयाचे ठरवून, सामान बसमध्ये ठेवण्यास देऊन टाकले. पाऊण वाजता बस येऊन धक्क्याला लागली. आम्ही चटकन् पुढे होऊन मुलांचा पहिला नंबर रांगेत ठेवला होता. कारण सर्वात पुढची सीट मिळाली तरच मला संपूर्ण प्रवासाचे व्हिडिओ शूटींग करता येणार होते. अमेरिकन रस्ते जवळून पहावयास मिळणार होते.

ड्रायव्हर बसच्या दाराशी उभा राहून तिकीटे पंच करू लागला. आम्ही चटकन् जाऊन पुढच्या चार सीटस् पटकावल्या! "वा! सुंदर!" सीटस् मागेपुढे करीत सुनीला म्हणाली. बसमध्ये समोर टीव्ही आणि मागे काय? सर्वात शेवटी टॉयलेट! बसमध्ये टॉयलेटची कल्पना अगदी उत्तम. अजूनही वाटते, अशी टॉयलेटची सोय आपल्या भारतात का नाही? मुंबई पुणे प्रवास करताना एशियाड बस सर्विस थोड्या जास्त सुविधा देणारी बस आहे. एशियाड बसेस इतरही देश शहरात धावतात. पण मला अजूनही कळत नाही. ट्रेनने प्रवास केला तर फर्स्ट

क्लासला वेगळे टॉयलेट, विमानाने प्रवास केला तर फर्स्ट क्लासला वेगळे. टॉयलेट, पण एस. टी. ने प्रवास केला तर एस. टी. स्टँडवर स्वच्छ टॉयलेट किंवा प्रसाधनगृह का नसावे? एस. टी. स्टँडवरील अस्वच्छ शौचालयांपेक्षा झाडांचा आडोसा बरा असे वाटते. एस. टी. स्टँडवर भरपूर जागा असते. तिथे फर्स्टक्लाससाठी थोडा जादा चार्ज घेऊन ह्या सोयी का मिळू नयेत ह्याचं आश्चर्य वाटते,

ग्रे-हाऊंड बसमधल्या टॉयलेटसारखी टॉयलेटची सोय आपल्याकडच्या आराम गाड्यात करण्यास काय हरकत आहे?

ग्रे-हाऊंड बसला टायर्स मोठे व जास्त लावलेले असतात. बसची उंची जास्त व तळघरात सामान ठेवावयाची व्यवस्था असते. खिडकीला मोठ्या प्रशस्त काचा, त्यामुळे खरे प्रवासाचे सुख अनुभवावयाचे असेल तर ग्रे-हाऊंडनेच अमेरिकेत प्रवास करावा.

बस चालू झाली. फ्रिस्कोला रामराम करून बस शहराच्या बाहेर आली. आमच्या बसचा ड्रायव्हर निग्रो होता. एका हातात स्टिअरिंग व दुसऱ्या हातात नकाशा धरून होता. मायक्रोफोनवरून प्रथम त्याने सर्व प्रवाशांचे स्वागत केले. तो हसतोय हे त्याच्या पांढऱ्या शुभ्र दातांच्या दर्शनामुळे समजले, निग्रो हसतोय की नाही हे त्याच्या शुभ्र दातांवरून ओळखावे. हसताना त्यांच्या शुभ्र दातांचा कॉन्ट्रास्ट फार खुलून दिसतो चेहेऱ्यावर. निग्रोंचे दात स्वच्छ आणि चकचकीत का हे एक न उलगडणारे कोडेच! आपल्यासारखे ते पानतंबाखू खात नाहीत हे एक कारण असावे. अस्वच्छ दात असलेला निग्रो मी अजून तरी पाहिला नाही.

स्वागताबरोबर काही महत्त्वाच्या सूचना आल्या. गाडी चालू असताना धूम्रपान बंदी, मद्यपान नाही, दुसऱ्या प्रवाशास त्रास होईल असे कोणतेही असभ्य वर्तन नको, वगैरे आभार मानून त्याने मायक्रोफोन बंद केला.

शहराच्या बाहेर आल्यावर एका मोठ्या पुलावरून बस धावू लागली. बाप रे! इतका अजस्र पूल प्रथमच पाहत होतो. अमेरिकेत लेफ्ट हँड ड्राईव्ह त्यामुळे रस्त्यावरून गाड्या नेमक्या उलट्या दिशेने धावत होत्या. त्या अजस्र पुलावरून बस बराच वेळ धावत होती. बाजूला पुलाखाली मोठमोठ्या बोटी दिसत होत्या. मी आपला व्हिडिओ कॅमेरा लावून बसलो होतो.

शहरापासून लांब आल्यावर बस ड्रायव्हरने हातपाय मोकळे करीत गाडीचा स्पीड वाढविला. माझी पुढचीच सीट असल्यामुळे समोरच्या व बाजूच्या काचेमधून रमणीय दृष्य दिसत होते. ड्रायव्हर गाडी चालविताना एकटाच बडबडत होता. मधेच त्याने 'आर यु इंडियन' म्हणून विचारले. मी हसून हो म्हणालो. नाही

म्हणून करतो काय. कारण व्हिडिओ कॅमेरा घेऊन बस स्पीडमध्ये असताना शूटिंग करीत होतो. समजा मधेच त्याने जोरात ब्रेक लावला तर समोरच्या काचेतून मी कॅमेऱ्यासकट बाहेर रस्त्यावर.. त्याच्या चेहेऱ्याकडे पाहत मी शक्यतो हसण्याचा प्रयत्न करीत होतो.



ग्रे-हाऊंड बसमधून विडीयो शुटींग!

बस जंगलातून धावू लागली. विरुद्ध दिशेने गाड्या उजवीकडे पाहण्याची सवय, पण अमेरिकेत त्या मार्गावर विरुद्ध दिशेने गाडी येत नाही. त्यांचा रस्ता वेगळा, त्यामुळे हेड ऑन कोलिजन नाही. समोरा समोर येऊन गाड्यांची टक्कर शक्यतो कमी. रस्ता प्रचंड रुंद. त्यावर वेगवेगळ्या वेगाने जाणाऱ्या वाहनांकरिंता वेगवेगळ्या लेनस्. ताशी चाळीस मैल वाल्यांसाठी डावी लेन, पन्नासवाल्यांसाठी मधली तर ६५ मैलवाल्यांसाठी कडेची लेन. शक्य तो लेन बदलावयाची नाही. बदलायची झाली तर सिग्नल देऊन. ज्या लेनमध्ये असू त्या स्पीडने गेलेच पाहिजे. फिरता दिवा असणाऱ्या पोलिसांच्या गाड्या मधेमधे दबा धरून बसलेल्या आढळत होत्या

प्रवास लांबचा होता. साधारण दोन एक तासांनी बस ठराविक गावातील ग्रे-हाऊंडच्या बस स्टेशनवर थांबत होती. मॅकडोनाल्डची स्वच्छ उपहारगृहे दिमतीला असायची.

अंधार होण्यास अजून वेळ होता पण उन्हे तिरपी झाली होती. आजूबाजूस हिरवेगार डोंगर-चहूकडे हिरवळ व पाईन वृक्ष. पाईन वृक्षांची राई सौंदर्यात भर घालीत होती, ह्या वृक्षांचा पालापाचोळा कमी, आणि असला तरी बुंध्यापाशीच, जणू ते वृक्षही सुचवित होते, आपल्या पायापुरतं पाहा. दुसरीकडे पाहू नका. अमेरिकन लोकांच्या वागण्याला शोभतील असेच हे वृक्ष स्वत:चे काय ते पाहा, दुसऱ्याच्या संसारात ढवळाढवळ करू नका!

"सी दॅट वोल्कॅनो!" ड्रायव्हर गाडी चालविताना मला लांबवरचे सफेद डोंगराचे टोक दाखवीत होता. "ओ. आय सी" इतका वेळ मी ते बर्फच समजत होतो! बसमध्ये बहुतेक जण डुलक्या घेत होते.

रस्ता स्वच्छ सिमेंटचा, रुंद, त्यावर गाड्या भरवेगाने पळत होत्या. रस्त्यावर जरी स्वच्छता असली तरी मधेच टायर पडलेले किंवा टायरचे फाटके तुकडे दिसत असत. गाव येण्यापूर्वी हिरव्या बोर्डावर गावाचे नाव दिसू लागे. त्यानंतर गावात जाण्यासाठी फ्लाय ओव्हर व त्यावरून त्या गावात जाण्यासाठी आडवा रस्ता! म्हणजे काखेत कळसा आणि गावाला वळसा घालून जावे लागत होते. एका ठिकाणी एका उतारुला उतरावयाचे होते. त्या गावात जाण्यासाठी ड्रायव्हरने बस हमरस्ता सोडून आत घेतली. पण ड्रायव्हर नवीन, त्यामुळे त्याला ग्रे-हाऊंडचा बस स्टँड सापडेना. ड्रायव्हरने थोडावेळ बस इकडे तिकडे फिरविली, शेवटी त्या प्रवाशाला त्याच्या घरापर्यंत, म्हणजे अगदी दारापर्यंत बसने सोडले! यामध्ये पंधरा- वीस मिनिटांचा खोळंबा झाला. पण तो इतर प्रवाशांनी सहन केला!

ग्रे-हाऊंड बसने जाणारे प्रवासी हल्ली उच्चभ्रू समजले जात नाहीत. ज्यांना विमानाचा प्रवास परवडत नाही, किंवा स्वत:ची गाडी काढायला परवडत नाही ते लोक ग्रे-हाऊंडमधून प्रवास करतात असे अमेरिकेत समजले जाते. त्यामुळे निग्रो लोकांचा, ग्रे-हाऊंडमध्ये भरणा जास्त असतो.

ड्रायव्हरने काही वेळाने एका मॅकडोनाल्डपाशी बस थांबविली, अर्ध्या तासाचा हॉल्ट म्हणून सांगितले. मॅकडोनाल्ड रेस्टॉरंटस् फास्ट-फूडबद्दल अमेरिकेत फार प्रसिद्ध आहेत. मॅकडोनाल्ड म्हटले की स्वच्छता, टापटीप व स्वस्त असे समीकरण - त्याबरोबर उत्तम आदरातिथ्य! सेल्फ सर्विस. त्यामुळे काऊंटरवर जाऊन हसऱ्या मुलाला वा मुलीला ऑर्डर द्यायची व ट्रे-मध्ये खाद्यपदार्थ घेऊन

रिकाम्या खुर्च्यांवर जाऊन बसायचे. पिझ्झा, हॅमबर्गर, फ्रेंच फ्राईज, टोस्ट, नाना तऱ्हेचे फ्रूट ज्यूस, कोल्ड ड्रिंक्स, सेव्हन अप, कोका कोला आणि कॉफी तिथे मिळते. पदार्थांचे दर त्यामानाने स्वस्त.' पण आपल्यासारख्या प्रवाशाला तरीही जास्त वाटणारे. त्यातल्यात्यात स्वस्त व पोट भरणारा प्रकार म्हणजे फ्रेंच फ्राईज! तळलेल्या बटाट्याच्या फोडी व सॉस! ते खाऊन चांगलेच पोट भरता येते. खायचे नसले तरी थोडावेळ आराम करावयास व प्रसाधनगृहात जाऊन तोंड धुवून ताजेतवाने होण्यास मिळते. अशा सोयी भारतात झाल्या तर? भारतातही मॅकडोनाल्डच्या धर्तीवर छोटी हॉटेल्स काढता येतील स्वस्त, स्वच्छ वगैरे पण उत्तम आदरातिथ्य व हसरा चेहरा आपल्या देशात जमणार नाही असे वाटते. सुटे पैसे नाहीत म्हणून वस्कन अंगावर खेकसणारा गल्ल्यावरचा मॅनेजर, आणि ऑर्डर कॅन्सल केली म्हणून गिऱ्हाईकांचा अपमान करणारे वेटर्स यांना आदरातिथ्य शिकविण्यासाठी अमेरिकेत पाठवून धडे द्यावे लागतील, तरच मॅकडोनाल्ड आपल्या देशात उघडली जातील. असो.

आम्ही फ्रेंच फ्राईज खाऊन ड्रायव्हरकडे पाहत बसलो. ड्रायव्हर आरामात अनेक वस्तुंचा समाचार घेत होता. त्याच्यासमोरच भरलेला ट्रे होता. आमच्यासारखा त्याला पैशांचा प्रॉब्लेम नव्हता. आज तिथला ड्रायव्हरही आम्हाला आमच्यापेक्षा श्रीमंत वाटत होता. तिथल्या हिशोबात एक डॉलर म्हणजे आपल्या रुपयासारखा. आपल्याला मात्र डॉलर म्हणजे किती रुपये हे ध्यानात ठेवावे लागते.

ड्रायव्हरने बसमध्ये येऊन सर्व पॅसेंजर मोजले. व नकाशा बाहेर काढून गाडी चालू केली. अंधार पडला होता, थंडीचे प्रमाणही वाढले होते. तरीही खिडकीची काच थोडी उघडी ठेवून मी बोचऱ्या थंडीचा आस्वाद घेत होतो. काही गावांमध्ये बस बाजूच्या मार्गाने, लांबून गावात शिरायची व ग्रे-हाऊंडच्या बसस्टँडवर उभी रहावयाची. ड्रायव्हर उतरून चटकन् त्याची हजेरी लावावयाचा, नवीन पॅसेंजरना आत घ्यायचा. एका गावाजवळ गंमत झाली. एक तरुण मुलगा बस सुटेपर्यंत बसमध्ये बसला नाही. त्याने सिग्नलला बस ड्रायव्हरला हात करून बस थांबविली. आश्चर्य म्हणजे बस ड्रायव्हरने त्याला सॉरी म्हटले, नशीब! नाहीतर तो मुलगा त्या गावातच राहिला असता.

रात्रीचे अकरा वाजत आले होते. सॅन फ्रान्सिस्को ते सिएॅटल मधील अर्धा प्रवास झाला होता. एका बसस्टँडवर ड्रायव्हरने त्याची छोटी बॅग घेतली व तो खाली उतरला. त्याची ड्युटी संपली होती. त्याच्याजागी एक गोरी अमेरिकन बाई बस चालविण्यास आली. मध्यम वयाची जाडी बाई, आल्याबरोबर तिने

बसमधील पाळावयाच्या शिस्तीबद्दलच्या सूचना पुन्हा सांगितल्या. नो स्मोकिंग, नो ड्रिंकिंग वगैरे, बसमध्ये काही वात्रट पोरे चढली होती. मागच्या सीटस्‌वर बसून त्यांचे स्मोकिंग चालू होते. सिगारेटचा वास ड्रायव्हरीणबाईंच्या नाकापर्यंत पोहोचलाच. तिने मायक्रोफोनवर त्या पोरांना चांगलीच तंबी दिली.

प्रत्येक गावातील स्टँडवर गाडी थांबली की ती स्वतः बसखाली उतरून सिगारेट ओढून पुन्हा स्टीअरिंगवर येऊन बसे, कानाला वॉक्‌मन लावून बस चालवताना, गाण्याच्या तालावर तिला डुलताना पाहिले तरी ही बाई बस कुठेतरी खड्ड्यात घालेल असे मुळीच वाटत नव्हते. आधी बसेस उत्तम आणि तिचे ड्रायव्हिंग सफाईदार, पोटातील पाणी काही हलत नव्हते.

रात्री दोन तीन वाजता अशाच एका गावात यूजिन नावाचे गाव होते ते, बसस्टँडवर गाडी पोहोचली तिथे इतक्या रात्री बसस्टँडवर कोणीही नव्हते. ह्या ड्रायव्हर लोकांकडे डुप्लिकेट चाव्या असतात. तिने स्वतः ऑफिस उघडून आपली हजेरी लावली. मी आपला मजा बघत पाय मोकळे करण्यासाठी बाहेर फिरत होतो. मघाची ती वात्रट गोरी अमेरिकन पोरे बाहेर उतरून सिगरेटी फुंकत होती, आणि मग मला आश्चर्याचा धक्का बसला त्या पोरांपैकी एका अमेरिकन मुलाने कोणालाही न लाजता भिंतीवर लघुशंका केली! अरे वा! अमेरिकेतही भारतीय संस्कृती आहे म्हणायची! अमेरिकेत असे काही पाहावयास मिळत नाही म्हणणाऱ्यांवर विश्वास ठेवायचा म्हणून माझ्या मनात शंका आली, आणि ही लघुशंका नव्हती तर मोठ्ठी शंका होती!

रात्रभर ती बाई वॉक्‌मन संगीत ऐकत बस चालवीत होती. मधूनच स्वत:शी बडबडत होती. एका हाताने नकाशावर खुणा करीत होती. असो, नाही नाही म्हणताना माझाही डोळा लागला. थोड्या थोड्या वेळाने जाग येत होती. बाहेर पाहण्याचा प्रयत्न करीत होतो.

पहाट होत होती! फार सुंदर वातावरण! हिरवेगार पाईन वृक्ष! मधूनच गाड्या बाजूने जाताना दिसत होत्या. अमेरिकेतील मालवाहू लॉऱ्या ह्या बंद डब्यासारख्या लांबलचक असतात. ड्रायव्हरची केबीन व लॉरीचा भाग वेगवेगळे असतात. ड्रायव्हर केबीनच्यामागे धूर ओकणारा पाईप सरळ आकाशाच्या दिशेने सोडलेला असतो. त्यामुळे लॉरीचा धूर वरच्यावर निघून जातो. आपल्या देशात लॉऱ्या इतका धूर सोडत असतात! त्यामुळे हवेत प्रदूषण किती होत असेल ह्याची कल्पनाच करवत नाही. आपल्याकडे वाहनांचा धुराचा पाईप बाजूला सोडलेला असतो. त्यामुळे लॉरी थांबली की गिअर चेंज करताना निघालेला धूर बाजूच्या गाडीत जाऊन अक्षरशः गुदमरायला होते. विशेषतः खंडाळा घाटात ट्राफिक जॅम

झाला की लॉऱ्यांचा धूर व कार्बन मोनॉक्साईड आपल्या नाकातोंडात घुसतो. इतक्या, अमेरिकेतल्यासारख्या चांगल्या मालवहातुकीच्या गाड्या आपल्या देशात नसतील बनत पण त्यांच्यासारखा धुराचा पाईप सरळ उभा आकाशाच्या दिशेने काढण्यास कितीसा जादा खर्च येणार आहे? पण ह्या साध्या गोष्टीतही आपण मागे आहोत. आपल्या माल ट्रक्सना सर्विस ही चीज माहीत नसते. हायवेवर नदीच्या काठी ड्रायव्हर आणि त्याच्या लॉरीची आंघोळ आपल्याकडे कधीही पहावयास मिळते. प्रवासातील सर्व सुखसोयी पाहून, अमेरिकेमधील प्रवास सुखाचा का ते मला कळले.

आता सकाळ होऊन बाहेर ऊन पडले होते. थोड्याच वेळात पोर्टलँड हे शहर येणार होते. पोर्टलँडवरून सिएटलला जाणारी दुसरी बस पकडावयाची होती. पोर्टलँडला निर्मला कल्याणपूर नावाची माझी पेशंट राहत होती. पोर्टलँडच्या बसस्टँडवरून तिला फोन लावला. पण दुर्दैव! ती नेमकी बाहेर गेली होती, मेसेज फोनवरून कळले.

चटकन बेत बदलला, सिएटललाच डायरेक्ट जायचे ठरविले. मी आल्याचा व सिएटलला जात असल्याचा निरोप कल्याणपुरांच्या फोनवर मेसेज दिला. सिएटलमधला माझा फोन नंबरही दिला, आणि मग दुसऱ्या बसमध्ये येऊन बसलो. सामान आधीच बसमध्ये पोहोचले होते. बस चालू झाली.

सकाळचे दहा वाजत आले होते, सिएटलचे सुंदर दर्शन दुरून होऊ लागले, आणि थोड्याच वेळात आमची बस सिएटलच्या ग्रे-हाऊंड बस स्टँडवर येऊन पोहोचली.

●●●

निसर्गाने मढलेले सिएटल

सिएटलला उतरून कोदेंच्या घरी फोन करावयाचा होता. पण थोडा वेळ वाट पहावी म्हणून ठरविले. परदेशात 'कलेक्ट कॉल' म्हणून एक अत्यंत उपयोगी टेलिफोनची सुविधा आहे. समजा आपल्या जवळ पैसे नसले किंवा सुटी नाणी जवळ नसली तर आपण ऑपरेटरला आपल्याला हवा असलेला नंबर सांगायचा व कलेक्ट कॉल म्हणायचे. मग ऑपरेटर त्या फोनवरील पार्टीला आपले नाव सांगते व त्याचे बिल त्या कॉल घेणाऱ्या पार्टीला लावते. त्यामुळे कुठेही प्रवाशांचा खोळंबा होत नाही. स्टँडवर थोडावेळ थांबणारच होतो. तेव्हा

ग्रे-हाऊंडच्या काऊंटरवर गेलो. ग्रे-हांऊडचा संप चालू आहे हे जर मुंबईत कळले असते तर आम्ही ग्रे-हाऊंडचे तिकीट काढलेच नसते असे काऊंटरवरच्या बाईला सुनावले. तिने बिचारीने त्रासाबद्दल दिलगीर आहोत वगैरे सांगितले. खरे म्हणजे आम्हाला अजूनपर्यंत तरी ग्रे-हाऊंडचा त्रास झाला नव्हता. पण वेळ काढण्यासाठी मीच विषय उकरून काढला होता. थोड्या गप्पाही मारल्या मग आता कोदेंना फोन करायचा होता.

फोन करण्यासाठी बाहेर बूथवर आलो, तर एका बाजूच्या फोनवर "आई" म्हणून चक्क मराठीत एक बाई बोलताना दिसली. अरेच्च्या! ही तर शैला! डॉ मिसेस. कोदे! तोपर्यंत डॉक्टरीणबाईंनी आम्हास पाहिले होते. आमची बस आली तरी आम्ही दिसत नाही म्हणून त्या घरी फोन करीत होत्या. आम्हास पाहून त्यांना मनापासून आनंद झाला. "चला! एकदा सिएटल गाठले! आता अगदी घरच्यासारखे काही दिवस छान आराम करायचा." "अगदी मनातले बोललात!" असे डॉक्टरीणबाईंनी मनात बोलून त्याच्या गाडीतून सिएटलचे दर्शन घेत नदी पलीकडे पोहोचलो. छोट्याशा टेकडीवरून खाली झाडीतून रस्ता गेला होता. त्या रस्त्यावर छान छान टुमदार बंगले दिसू लागले, आणि पाहतो तो काय, नदीकाठच्या एका टुमदार बंगल्याशी आमची गाडी येऊन उभी राहिली.

अरे बापरे! इतका सुंदर बंगला! मी तर धावतच गाडीतून उतरलो, "सुंदर, अति सुंदर" माझ्या तोंडून नकळत शब्द उमटले. भवानीदास कोदे यांनी मुंबईत आपल्या बंगल्याचे जे वर्णन केले होते ते तंतोतंत खरे होते, प्रथम बंगल्याभोवती फेरी मारली. सुंदर बंगला बाजूला पोर्च! त्यामध्ये क्रायस्लर स्टेशन वॅगन,



कोदेंचा सुंदर बंगला – सिएटल

गॅरेजमध्ये होंडा, आणि फोर्ड गाडी बाहेर उभी! समोर हिरवळ व हिरवळीपलीकडे नदी! नदीच्या बाजूला पोर्चमध्ये लाँच व लाँचपुढे रबराची बोट! सुंदर दृष्य! या सिएटलचा जबाब नही! बाजूला डोंगर व पक्ष्यांचा किलबिलाट, मध्येच सी-गल किंवा बदकासारखे पक्षी नदीच्या पाण्यात डौलात तरंगत होते. माझे मन निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी आसुसले होते. इतके सुंदर दृष्य पाहून मन उल्हासित झाले. चोवीस तासांचा ग्रे-हाऊंडचा प्रवास, पण प्रवासाचा शीण केव्हाच हवेत उडून गेला. नाहीतरी ग्रे-हाऊंडच्या प्रवासाने शीण आलाच नव्हता!

ग्रे-हाऊंडचा चोवीस तासाचा प्रवासाचा शीण जास्त की मुंबई पुणे हा एशियाडच्या प्रवासाचा शीण जास्त असे कोणी विचारले तर मी चटकन् सांगेन, एशियाडचा जास्त. आपल्या एस. टी. च्या खिडकीच्या काचापासून ते दरवाजापर्यंत प्रत्येक सांध्यातून आवाज येत असतो. ग्रे-हाऊंडच्या प्रवासात एखाद्या विमानाच्या इंजिनाचा यावा तसा आवाज फक्त येत असतो. ग्रे-हाऊंडचा प्रवास नक्कीच सुखकारक होतो.

मी एकटाच नदीकाठी उभा राहिलो. शांत परिसर, पक्षांचा किलबिलाट, बाजूला दुसरे बंगले, महाबळेश्वरच्या बंगल्यातील मुक्कामाची आठवण झाली. अमेरिकेतील एका निसर्गरम्य ठिकाणावर मी उभा होतो.

चला आतमध्ये! सामान सध्या गाडीतच राहू द्या. चार-पाच दिवस सुनीलाच्या मामींकडेच मुक्काम! आणि मग नंतरचे चार-पाच दिवस कोदेंच्या ह्या बंगल्यावर! कारण मामी सबंध दिवस घरी, पण कोदे फॅमिली कामावर! भवानीदास कोदेंचा बंगला फारच छान, आतमध्येच स्वीमिंग पूलवर बेडरूम्स, खाली बेडरूम्स, प्रशस्त हॉल आणि छान मोट्टा टीव्ही.

"काय, मग आता आमच्याकडे भरपूर दिवस राहा, आराम करा!" चहा आणि ब्रेकफास्ट करता करता डॉ. शैला सांगत होत्या. अमेरिकेत आल्यावर कळले की येथील लोक सकाळी जेवत नाहीत. ब्रेकफास्ट हेवी करतात. म्हणूनच त्याला ब्रंच म्हणतात. ब्रंच म्हणजे लंच आणि ब्रेकफास्ट मधील खाणे. ना जेवणाएवढे जास्त ना ब्रेकफास्ट एवढे कमी!

हवेत गारठा होता पण सहन करण्याइतका. त्यामुळे ब्रेकफास्ट आटोपल्यावर बाहेर बंगल्याभोवती फिरून आलो.

कोदेंची कहाणी काही वेगळीच. कोदेंचे वडीलभाऊ प्रथम सिएटलला आले. त्यांनी नदीकाठीच बंगला बांधला. त्यांच्यापासून थोड्या अंतरावर ह्या भवानीदासानी बंगला बांधला, आणि मग तिसऱ्या भावानेही बंगला बांधला. आता कोदे परिवार सिएटलमध्ये कायमची मुळे रुतवून बसला आहे. त्यांच्या फॅमिलीज वाढत आहेत. त्यामुळे सिएटलमध्ये कोदेंचे नाव अनेक मराठी कुटुंबियांना परिचित झाले आहे.

काही वेळाने आम्ही सगळेजण गाडीतून सुनिलाच्या मामींकडे गेलो. त्यांचे घर त्यामानाने छोटेसे पण अत्यंत सुंदर. तिथला परिवार म्हणजे सुनिलाची मामी, मामींचा मुलगा डॉ. राज जो डेन्टिस्ट आहे आणि मामींची मुलगी विद्या बोईंग विमान कंपनीत कामाला आहे. डॉ. राजचे लग्न झालेले नव्हते. एम. डी. होऊन रिसर्च करण्यासाठी तो दुसऱ्या गावाला गेला होता.

शैलाने आज आमच्यासाठी रजा काढली होती. दुपारी थोडा वेळ आराम केला. शैला तिच्या घरी गेली. चारच्या सुमाराला विद्या कामावरून आली, पाठोपाठ भवानीदास भेटायला आले. त्यांचा व माझा स्वभाव मिळता जुळता. आयुष्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनच वेगळा "जिओ और मजा करो, कल किसने देखा है" हे त्यांच्या तोंडातील आवडते वाक्य! त्यांच्याबरोबर गप्पा मारून संध्याकाळी विद्याने आसपास फिरवून आणले.

श्री. कोदे, डॉक्टर शैला व विद्या, सर्वच बिझी माणसे, तरीही आम्हाला त्यांचे कौतुक वाटले. आमच्या नशिबाने अमेरिकेत रात्र ह्यावेळी लहान होती. रात्री नऊ दहा वाजेपर्यंत उजेड असायचा त्यामुळे चार-पाच वाजता कामावरून आल्यावर, पुन्हा आम्हाला फिरवून आणण्यास त्यांना सात-आठ तास मिळायचे. अमेरिकेतील सर्वांना अत्यंत मेहनती म्हणून ओळखतात. पण ह्या मागे तेथील हवामान व शरीरास पडणारा कमी त्रास ही कारणे असावीत. कामावरून घरी आलेला माणूसही कधी थकलेला, घामेजलेला वाटत नाही. आपल्यासारखी तिकडेही ड्यूटी आठ किंवा नऊ तासच असते. परंतु जे काही भारतीय तिकडे स्थायिक झालेले आहेत ते बहुतेक उपनगरात बंगले बांधून आहेत. त्यामुळे घरापासून ऑफिसपर्यंत पोहोचावयास दीड ते दोन तास व परत येण्यास तितकाच वेळ. घर एअरकंडिशन्ड, बाहेरची हवा तशीच. गाडीही तशीच व ऑफिसही तसेच! त्यामुळे लोकलच्या गर्दीत वा बसच्या रेटारेटीत आपली जशी अर्धी शक्ती खर्च होते तसे इकडे होत नाही. अमेरिकेत काय किंवा कॅनडात काय, सर्व बुद्धिजीवी वर्ग शहरापासून दूर राहतो. शहराच्या मध्यभागी त्यामानाने गरीब वर्ग विशेषतः निग्रो राहतात कारण त्यांना गाडी ठेवणे परवडत नाही.

इकडच्या हवेमुळे दम लागला किंवा थकायला झाले असे वाटतच नाही. हे आम्ही स्वतः अनुभविले. आजारपणाची शक्यताच कमी! इतकी सुंदर उत्साहवर्धक हवा असल्यास नक्कीच आपण अधिक काम करू शकतो.

कोदेंच्या लॉंचमधून फिरण्यासाठी आम्हा सर्वांचा जीव अगदी उतावीळ झाला होता. दुसऱ्या दिवशी ऑफिसमधून आल्याबरोबर चहापाणी आटोपून त्यांनी लॉंच काढली. लॉंच नदीत सोडणे म्हणजे एक मोठा सोपस्कारच ! प्रथम क्रेनने ती लॉंच एका ट्रॉलीवर उतरावयाची, ट्रॉली पाण्यापर्यंत पोहोचणाऱ्या उतारावर आणावयाची, ट्रॉली एका मोटारने मागे खेचून धरावयाची, मग मोटार हळूहळू मागे आणावयाची, म्हणजे मग ती लॉंच हळूहळू पाण्यात उतरते! ह्या सर्व प्रक्रियेला आम्ही सर्वांनी हातभार लावला.

भवानीदास आज अमेरिकन जॉग ड्रेसमध्ये होते. हाफ पँट व वर स्लीव्हलेस टी-शर्ट, वा! एकदम पिकनिक मूड. लॉंच चालू करण्याआधी माणसांना वजनाप्रमाणे दोन्ही बाजूला बसविण्यात आले. लहान मुलांना लाईफ जॅकेटस घातली, व हळूहळू लॉंच नदीच्या पाण्यात तरंगत जाऊ लागली. लॉंचचे सारथ्य स्वतः कोदे करीत होते. अगदी गाडीसारखेच सर्व काही, स्टिअरिंग फिरवीत कोदेंनी हळूहळू लॉंच पुढे नेली.

"काय हो? एवढाच स्पीड?"

"थांबा हो डॉक्टर" म्हणत कोद्यांनी लाँच नदीच्या पात्रातून एका भल्या मोठ्या तलावात आणली, पाहतो तो काय, क्षितिजापर्यंत पाणीच पाणी. हा एवढा मोठा तलाव की समुद्र काही कळेना.

"हा वॉशिंग्टन लेक" कोदे म्हणाले- "नीट बसा हं पोरांनो हलू नका!" म्हणत कोदेंनी लाँचचा वेग वाढविला, बाप रे! लाँच म्हणजे अक्षरशः हॉवर क्राफ्ट वाटू लागली. लाटांवर उडत, आपटत, पाण्यात फेस काढीत सुसाट वेगाने लाँच पळत होती. अहा ऽऽ हा! काय सुंदर दृष्य! असंख्य छोट्या छोट्या बोटी पाण्यात होत्या. हौशी अमेरिकन अशा बोटींमधून भ्रमण करीत होते. किनाऱ्यावर पांढरा डोंगर दिसू लागला, तो माऊंट रेनिअर. बर्फाळ डोंगर. अरेच्या डोंगरावर बर्फ? डोंगर पहात होतो. त्या डोंगरावर जायला मिळाले तर.. वेळ मिळाला तर घेऊन जाईन तिथे, कोदे म्हणाले, प्रथमच डोळ्यांनी एवढा बर्फाचा डोंगर पाहत होतो. त्या डोंगरावर जाण्याच्या कल्पनेनेच शहारलो. समोर 'फ्लोटिंग ब्रिज'. एक अफाट पूल पाण्यात होता, तो म्हणे तरंगणारा पूल. काहीही आधार अधेमधे नसलेला! त्यावरून गाड्या आरामात जात होत्या. छोटी छोटी पाण्यावर उतरणारी विमाने घिरट्या घालीत पाण्यावर उतरत होती व तरंगत होती.

पुष्कळ वेळ लाँचने फिरून परत फिरलो. अंधार पडत होता. पक्ष्यांचे सुंदर गायन ऐकू येत होते. निसर्ग फुलला होता, रात्र फुलत होती. लाँच पुन्हा पाण्यातून काढून बांधून ठेवण्यात आली. मी सर्व चित्रण व्हिडिओने केले होते, लाँच सफरीचा आनंद मनमुराद लुटला होता आज.

मी एक गझलचा भयंकर नाद असलेला माणूस! गुलाम अली, मेंहदी हसन पासून पाकिस्तानच्या मुन्नीबाईच्या गझलांचा संग्रह आहे माझ्याकडे. पण मला चीत करणारा भवानीदास कोदे! गझल त्या माणसाने कुठे ऐकाव्यात? अगदी बेडरूमपासून टॉयलेटपर्यंत! गाडीत तर सदासर्वकाळ गझल चालूच! मी सांगितलेली नवी गझल ह्या माणसाने माझ्या सिएटलच्या मुक्कामात इतक्या वेळा ऐकली की माझे कान अशा गझलच्या श्रोत्याला पाहून थक्क झाले. कोणतीही गझल ही लोणच्यासारखी असते. पहिल्यांदा ऐकताना ती तितकीशी आवडत नाही, पण पुन्हा पुन्हा ऐकून, त्यातील उर्दू शब्दांचा अर्थ जसा कळू लागतो तसा त्या गझलमधील दर्द आपल्या हृदयामध्ये जाऊन बसतो. रूना लैलाच्या आवाजातील गझल ह्याच प्रकारच्या.

रात्री अचानक काहीतरी छोट्या वस्तूसाठी जावे लागले. रात्रीचे बारा वाजता दुकाने उघडी असतील का? पण भवानीदासने गाडी काढली. रात्री काही मॉल चालू असतात. मॉल म्हणजे मोठे डिपार्टमेंटल स्टोअर. भाजी, मटण पासून

बारीक स्क्रू पर्यंत सर्व वस्तू किफायती भावाने मिळण्याचे ठिकाण म्हणजे मॉल. आम्ही ज्या मॉलमध्ये गेलो होतो तिथे त्यावेळी गिऱ्हाईकि अगदीच तुरळक. स्टाफ आणि इलेक्ट्रिकसिटीचा खर्च सुद्धा सुटणारा नव्हता. फायदा तर दूरच्च, पण नागरिकांना त्रास होऊ नये ही भावना महत्त्वाची.

रात्री झोपतांना पलंगपण काय सुंदर! त्यावरची रजई अहाऽऽ हा, किती तलम आणि मऊ रजया! अशा आपल्याकडे का मिळत नाहीत? बाथरूममध्ये कमोडवरही कार्पेट व खाली पायाखाली सुद्धा कार्पेट, मोठा आरसा, टेबल, पडदा, कुठेही पाणी नाही की घाण नाही. वेगवेगळ्या तऱ्हेचे सुंदर वासाचे फवारे! अमेरिकेत प्रातर्विधीसाठी कमोड वापरतात. भारतीय पद्धतीचे संडास नसतात, त्यामुळे कमोडवर बसण्याची सवय हवीच! परदेशात कमोड वापरताना टिश्यू पेपरचा वापर केला जातो. टिश्यू पेपर टॉयलेटमध्ये किती आणि कसा घ्यायचा त्याचीही ठराविक पद्धत आहे. आम्ही पाहुणेमंडळींनी श्री. कोदेंकडे टिश्यू पेपरचा जादा वापर केल्यामुळे कमोडच्या खालचा पाईप चोक झाला आणि पाण्याचे लोट थेट हॉलपर्यंत पोहोचले! चोक साफ करण्यासाठी प्लंबर वगैरेना न बोलावता स्वतः कोदेंनी अगदी हात आत घालून कमोड साफ केला, तेव्हा आम्हाला त्या माणसाचे खरोखर कौतुक वाटले. अमेरिकेत आधी नोकरमाणूस नाही, त्यात अशा कामासाठी बाहेरून माणूस बोलावणे म्हणजे खिशाला चांगली चाट! अमेरिकेत टिश्यू पेपर फार उपयोगी तोंड पुसायलाही तोच आणि टॉयलेट मध्येही तोच! मात्र त्याचा उपयोग करताना त्याचा गैरवापर करू नये. टिश्यू पेपरवरून एक घडलेली घटना आठवली.

मी अमेरिकेतील एका एअरपोर्टवर असाच टॉयलेट मध्ये गेलो होतो. वॉश बेसिनशी मी आणि दोन अमेरिकन तोंडावर पाणी मारीत होतो! बाजूला असलेल्या टॉयलेटमधील माणसाने (?भारतीयाने) रोलरवर लावलेला टिश्यू पेपर खेचला. दुर्दैवाने त्याने रोलर नको तितक्या जोराने खेचल्यामुळे पूर्ण रोल खाली पडला आणि चटकन वेगाने दरवाज्या खालून बाहेर पडून टॉयलेटचा मुख्य दरवाजा पार करून थेट एअरपोर्टच्या लांऊजमध्ये जाऊन पोहोचला. आकाशात जेट विमान उडाल्यावर असा धुराचा पट्टा दिसतो तसा टिश्यू पेपरचा तो पट्टा निळ्या फरशीवर उडून दिसत होता. बाजूचे अमेरिकन पाहून हसले. बघ, तुम्ही भारतीय किती वेगळे अशा अर्थाने. बिचारा कमोडवरचा माणूस आतमध्ये खजील होऊन बसला होता, दरवाजा खालून मी आत पाहिले, तेव्हा एक पांढऱ्या पायाचा अमेरिकन माणूसच आपली पँट सावरीत बसला होता! दोन चार दिवस मजेत गेले. वीकएंड येण्यास अवकाश होता. संध्याकाळी साधारण चार वाजता घरी आलं की बंगल्यासमोर हिरवळीवर बसून नदीच्या संथ पाण्यात खडे

टाकीत असताना मजा यावयाची. पाण्यावर उठणारे तरंग पाहतांना जुन्या आठवणी उफाळून यावयाच्या, आपण पूर्वी मुंबईत कसे दिवस काढले आणि आता इकडे ऐश्वर्यात कसे दिवस काढीत आहोत त्याचे रसभरित वर्णन ऐकवायचे! शनिवारी माउंट रेनियरला जाण्याचे कोदेंनी नक्की केले, आणि त्या शनिवारची वाट पाहत चार-पाच दिवस भुर्रकन् उडून गेले.

तो पर्यंत शैला आणि विद्याबरोबर सिएटल पाहून घेतले. सिएटल टॉवर, सिएटलचे मार्केट, डिपार्टमेंट स्टोअर आणि वेळ मिळाला तर कॅनडातील व्हॅन्कुवरला जायचे ठरत होते, पण कॅनडाचा व्हिसा घेताना आम्ही केलेली चूक आम्हाला भोंवली. कॅनेडियन मल्टिपल एन्ट्री व्हिसा आम्ही घेण्याऐवजी डबल एन्ट्री व्हिसा घेतला होता. म्हणजे व्हॅन्कुवरला गेलो तर नायगरावर पाणी सोडावे लागले असते! सिएटलमध्ये मल्टिपल एन्ट्री व्हिसा मिळविण्याचा ऐंबसीत प्रयत्न केला. परंतु त्या सोपस्कारात एक दिवस फुकट घालविण्याऐवजी व्हॅन्कुवरला जाण्याचे रहित केले.

सिएटलचे रस्ते फारच छान. फ्लाय ओव्हर आणि फ्री-वे नावाची वेगळी चीज पहावयास मिळाली, जी अमेरिकेत सर्व ठिकाणी आढळते. शहरामध्ये जाताना मोटारीत जर चार पॅसेंजर असले तर फ्री-वेचा वापर करून आपण शहराच्या मध्यभागी म्हणजे डाऊन टाऊनला जाऊ शकतो.

शनिवार आला. सकाळी लवकर ऊठून ब्रेकफास्ट केला. कोदेंनी त्यांची क्रायस्लर स्टेशनवॅगन बाहेर काढली, खाण्यापिण्याच्या वस्तू डिकीमध्ये भरल्या सर्वांनी थंडीसाठी अंगावरचे कोट, कानटोप्या घेतल्या.

गाडी सुरू झाली. अमेरिकन रस्त्यांवरून वळणे वळणे घेत, सुंदर पाईन वृक्षांखालून आमची गाडी मार्ग आक्रमीत होती. साधारण शंभर मैल अंतर होते. अरे हो! अमेरिकेत अंतर अजून मैलामध्ये मोजले जाते. पण कॅनडामध्ये मात्र किलोमीटरमध्ये. मोटारीना पासस्ट मैल म्हणजे साधारण नव्वद ते शंभर किलोमीटर ताशी, एवढा स्पीड ठेवण्यास परवानगी. त्यापुढे नाही. रस्त्यामध्ये पोलीस व्हॅन, दबा धरून बसलेले पोलिस, रहदारीच्या नियमांचे उल्लंघन केल्यासपकडतात.

थोड्या वेळाने गाडी घाट चढू लागली, तो घाट आहे असे वाटेचना. फक्त लेफ्ट हँड ड्राईव्ह असल्यामुळे विरुद्ध दिशेने जाणाऱ्या गाड्या, डाव्या बाजूने भरकन् निघून जात. रस्ते एकदम स्वच्छ. खांचखळगे नाहीत. हळूहळू डोंगरापलीकडे बर्फाने आच्छादिलेले सुळके दिसू लागले. मध्येच एक हरिणांचा थवा जवळून गेला. मी व्हिडीयो कॅमेऱ्याने चित्रण करीत होतो,

इतक्यात रस्त्याच्या बाजूला पांढरे पांढरे ठिपके आणि पांढरे चुन्यासारखे बांध दिसले! अहो हे काय, म्हणून कोदेंना विचारणार तोच कोदे म्हणाले, "डॉक्टर, बर्फ सुरू झाला बघा रस्त्याच्या बाजूने!" खरंच, ब्युटिफूल! निसर्ग इतका सुंदर असतो हे प्रथमच कळले. गाडीमध्ये राणी वर्माची गझल चालू होती. राणी वर्माला गझल गाताना ऐकले नव्हते मी! असा बर्फ आणि असा निसर्गसौंदर्य मी पहिल्यांदाच पाहत होतो. "जरा गाडी हळू चालवा" मी कोदेंना विनंती केली, समोर बर्फाने झाकलेले डोंगराचे सुळके, बाजूने वाहणारी नदी, आणि बाकी ठिकाणी बर्फानी लागडलेले पाईन वृक्ष! आठवले, असे सौंदर्य मी फक्त चित्रांमध्ये किंवा इंग्रजी सिनेमात पाहिले होते. फोटोमध्ये नेहमी कोणतीही गोष्ट चांगली वाटते पण प्रत्यक्ष ती नसते, ह्या माझ्या समजूतीला येथे खीळ बसली, बाजूचे देखावे जणू चित्रात असावेत तसे! माझ्या व्हिडियो कॅमेऱ्याने हे मी चित्रीत करून कायमचे जतन करून ठेवले.

बर्फातील रस्त्यावरून वळणे वळणे घेत आमची गाडी माथ्यावर येऊ लागली, आणि समोरच बर्फाने आच्छादलेला मोठा डोंगराचा भाग दिसू लागला. अरे वा! सुंदर! "हेच ते माऊंट रेनियर. आता आपण पॅरेडाईज म्हणून वर हॉटेल आहे, तिथे जाऊ" कोदे म्हणाले.

पाहता पाहता गाडी त्या हॉटेलच्या दाराशी थांबली, पण हॉटेलला दार होतेच कुठे? सर्व ठिकाणी पांढरा पांढरा बर्फ! अर्धे अधिक हॉटेल बर्फाने गाडले गेले होते. दरवाजाचा भाग तेवढा मोकळा! गाडीतून सामान काढून घेतले व बर्फाच्या कपारीतून हॉटेलमध्ये प्रवेश केला, खाली हॉटेलचे दालन होते व वरती निसर्ग सौंदर्य लुटण्यासाठी गोलाकार गॅलरी! अगदी डोळ्यांचे पारणे फिटले. प्रत्यक्ष पॅरेडाईज म्हणजे स्वर्गातच आल्यासारखे वाटत होते.

"प्रथम खाऊन घ्या" म्हणून कोदेंनी ऑर्डर दिली. पटापट पोरांनी बॉक्सेस उघडून हॅमर्बगर, ज्यूसेस व ब्रेड काढले. मस्तपैकी न्याहरी केली, सर्वांनी कानटोप्या चढविल्या व हॉटेलच्या बाहेर आलो.

माऊंट रेनियरचे शिखर आता आमच्या अगदी मागे होते. सुंदर निळे आकाश, बर्फाच्छादित शिखरे आणि पाईन वृक्ष! एखाद्या कॅलेंडरवरचे चित्रच समोर पाहत होतो. खाली दऱ्या खोऱ्यात बर्फ पसरला होता, वाटले त्या बर्फावर असेच लोळावे. आमच्या मनाची नाडी कोदेंनी बरोबर जाणली. "चला थोडा वेळ बर्फात" त्यांनी फर्मान सोडले. आम्ही सर्वजण बाजूला चालत गेलो. बर्फाळ रस्ता वर शिखराकडे गेला होता, वरून काही माणसे स्कीईंग करून उतारावरून भरवेगात येत होती. कोदेंच्या मुलांनी पटापट गोल प्लास्टिकच्या डिशेस घेतल्या.

त्या रस्त्यावरून ते धावत वर गेले. पाहतो तर काय! त्या डिशमध्ये बसून ते सर्व वरून घसरत खाली येऊ लागले. थोड्या वेळाने मृगया, सलील आणि सुनीलासुद्धा त्यांच्यात सामील झाले. बर्फाचे गोळे अंगावर उडवत, एकमेकांना ढकलत, बर्फात लोळत सर्वजण आनंदात मश्गूल झाले. मग मलाही मोह आवरेना. थोडा वेळ मीही घसरगुंडीच्या खेळात भाग घेतला. मृगया मोजे काढून बर्फात हात घालू लागली, आणि जोरात किंचाळली. तिच्या हाताला बर्फामुळे मुंग्या आल्या होत्या, अशावेळी फ्रॉस्ट बाईट होण्याची शक्यता असते. कारण बर्फामुळे शरीरातील रक्ताभिसरण होत नाही आणि शरीराच्या कोणत्याही भागात गंभीर इजा होण्याची शक्यता असते. चटकन् मृगयाला उचलून हॉटेलमध्ये नेले व टॉयलेटमधील गरम पाण्याच्या नळाखाली हात धरला. मुंग्या गेल्या.

वरच्या गॅलरीतून वेगवेगळ्या कोनातून कॅमेऱ्याने निसर्ग सौंदर्य टिपले. ही दृष्ये खरी की खोटी? काहीच कळत नव्हते. निघायची वेळ झाली तरी पाय बर्फात खिळले होते, आणि डोळे तर निसर्ग सौंदर्यावर फिदा झाले होते.

परतीचा प्रवास सुरू झाला, बर्फाचे निरोपाचे दर्शन घेत घेत मुक्कामी पोहोचलो.

दुपारचा वेळ घरीच घालवीत होतो. पण घरी सुद्धा वेळ मजेत जाई. टी. व्ही. पाहण्यास अमेरिकेत फारच मजा येते. टी. व्ही. हा प्रकार अमेरिकेत सर्वच बाबतीत प्रगत आहे. बत्तीस ते चाळीस चॅनेल्स! रात्रभर कुठले ना कुठले चॅनेल चालूच! अमेरिकेत वर्तमानपत्र घरी येते. म्हणजे प्रत्येक बंगल्यासमोर एक पोस्ट बॉक्स सोयीच्या जागी बसविलेली असते. त्यात पोस्टमन पत्रे टाकतो. त्यातच वर्तमानपत्रे मासिकेही टाकली जातात. इथले वर्तमानपत्र भले जाडजूड असते, आणि त्यात ऐशी टक्के जाहिराती असतात. आज खेळ कुठे आहे हे पाहण्यासाठी त्याचा जास्त उपयोग! बातम्या टी. व्ही. वरून सतत दिल्या जात असतात. त्यामुळे जेवताना कपडे बदलताना टी. व्ही. वरच्या बातम्या ऐकल्या जातात. वर्तमानपत्र वाचणारे रिकामटेकडे थोडेच.

टी. व्ही. वर भारतीय बातम्या क्वचितच. फार मोठी बातमी असेल तरच! बातम्या सतत जरी असल्या तरी बातम्यांच्या मधे-मधे जाहिराती दाखविल्या जातात त्यामुळे बातम्या पाहताना त्रास होतो.

काही चॅनेल्सवर चित्रपटांचा आठवडा असतो. त्यात जुन्या-जुन्या नट नट्यांचे प्रसिद्ध चित्रपट दाखविले जातात. आम्ही सिएटलला असताना क्लिंट ईस्टवुड ह्या नटाचे चित्रपट दाखविले जात होते. बातम्यांमध्ये इतर बातम्याबरोबर अपहरण, दरोडे, बलात्कार ह्यांची रसभरित वर्णन व दृष्ये दाखविली जातात. ही दृष्ये

पाहून आपला भारत त्यामानाने बराच मागासलेला आहे. ते बरे आहे असे वाटते. अमेरिकेत चौदाव्या वर्षापासून मुलगा जगातील सर्व प्रकारचे अनुभव घेण्यास मोकळा होतो. मुलींशी दोस्ती व इतर व्यवहार करून विसाव्या वर्षी तो खऱ्या अर्थाने अनुभवी बनतो. त्यामुळे विसाव्या वर्षी मुलगा किंवा मुलगी व्हर्जिन असणे तेथे कमीपणाचे किंवा मागासलेपणाचे लक्षण समजण्यात येते. वर्गात ऐंशी टक्के मुले जर ह्या बाबतीत पुढे गेलेली असली तरी उरलेली मुले काही दिवसात सेक्सच्या आहारी जाऊन काहीही करू शकतात. टी. व्ही. वरील बातम्यांमध्ये शाळकरी मुलींनी फक्त सेक्स एज्युकेशन पेक्षा संतती निरोधक गोळ्यांची मागणी केल्याचे ऐकले आणि अमेरिकेतील जीवन किती पुढे गेले आहे ते समजले.

एका चॅनेलमध्ये टीन एजर्सच्या कार्यक्रमामध्ये, सत्तावीस वर्षांची एक निग्रोबाई, आपण तेराव्या वर्षी मुलाला जन्म दिला सांगून, तिच्या मुली ज्यांची वये तेरा किंवा चवदा होती, त्यांच्या मुलांना पुढे उभे करून आपण आजी झाल्याचे अभिमानाने सांगते. तेव्हा आपल्याकडील आजीची व्याख्या कितीही जुनी आणि बुरसटलेली असली तरी आपली आजी अधिक बरी असे वाटू लागते. दुसऱ्या एका वीस वर्षांच्या गोऱ्या मुलीने, तिचा एका निग्रोशी संबंध येऊन तिला मूल कसे झाले व आपल्या नवऱ्याचा पत्ताच नाही असे अभिमानाने सांगितले. तिचे सासू व सासरे, तिने बाह्यसंबंध ठेवले तरी आमची हरकत नसल्याचे सांगत होते.

काही वर्षांपूर्वी एका टाईम मासिकात वाचल्याचे आठवत होते. त्यात पोलिसांनी स्त्रियांना बलात्कारासंबंधी गंभीर इशारे दिले होते. बलात्कार करणारा गुन्हेगार शोधण्यास कठीण, शिवाय बलात्कार करू न दिला तर खून करण्याची शक्यता अधिक. म्हणून त्यानी स्त्रियांना पुढील काळजी घेण्यास सांगितले होते स्त्रियांनी रस्त्यावरून जाताना आपल्या पर्समध्ये पैसे ठेवावेत. चोराने अडविल्यास विरोध करता पैसे, दागिने त्याला देऊन टाकावेत. बलात्काराचा प्रसंग आला तर बलात्कार होऊ द्यावा, पण स्वत:चा जीव वाचवावा! बोला, ह्या पुढे आपला देश अधिक बरा असे तुम्हाला नाही वाटत? टी. व्ही.वर दिसणाऱ्या बातम्या जर इतक्या थराच्या तर दृष्टिआड घडणारे पाप ह्या अमेरिकेत काय थराचे असेल कोणास ठाऊक.

अमेरिकेविषयी खूप खूप ऐकले होते, स्वच्छता, टापटीप व अतिशय मेहनत हे अमेरिकन लोकांचे वैशिष्ठ्य! अमेरिकेतला केर कचरा देखील शिस्तप्रिय! गार्बेज म्हणजे केरकचरा, नेण्यासाठी स्पेशल गाड्या आठवड्यातून एक दिवस फिरतात. दिवसभरातील कचरा एका काळ्या प्लास्टिकच्या मोठ्या पिशवीत

भरून बंगल्यासमोर व्यवस्थित बांधून ठेवायच्या, मग गार्बेज डे च्या दिवशी त्या पिशव्या हलविल्या जातात.

टी. व्ही.वर आठवड्यात एकदा ठराविक वेळी, ग्राहकांच्या मुलभूत गरजा न भागवणाऱ्या दुकानांची वा हॉटेलांची नावे दाखविली जातात, आणि ह्या दुकानाना वा हॉटेलांना तंबी दिली जाते. त्याना सुधारणा करण्यासाठी ठराविक मुदत दिली जाते. टी.व्ही वरील अशा जाहिरातीमुळे गिऱ्हाईक कमी होईल ही भीती असते. एवढे करूनही ठराविक मुदतीत सुधारणा न केल्यास अशा दुकानांचे व हॉटेलांचे परवाने रद्द केले जातात. अशा दुकानांच्या यादीमध्ये अनेकदा भारतीय दुकानांची व हॉटेलांची नावे पाहण्यास मिळाली. मला त्याचे आश्चर्य वाटले नाही.

अमेरिकेत कोणालाही फसविले जात नाही आणि चुकून फसविले गेलो तर ताबडतोब खराब माल बदलून मिळतो हा एक माझा गोड गैरसमज! श्री. कोदेंच्याकडे असताना, विद्याच्या गाडीचा पुढचा टायर जास्त झिजलेला मला वाटला. श्री. कोदेंनी विद्याला ताबडतोब नवीन टायर घालण्यास सांगितले. खरं म्हटलं तर तितका झिजलेला टायर मी मुंबईत माझ्या गाडीला आणखी तीन वर्षे आरामात वापरला असता! टायर नवा घालण्यासाठी विद्याने आणि कोदेंनी गाडी गॅरेजमध्ये सोडली आणि नवीन टायर बसवून संध्याकाळी ते घरी आले.

दुसऱ्या दिवशी ऑफिस सुटल्यावर विद्याचा फोन! टायर फुटला म्हणून! काल घातलेला टायर ताबडतोब फुटतो, कमाल आहे! पुन्हा त्याच गॅरेजमध्ये विद्या व कोदे गेले पण त्या गॅरेजवाल्याने चक्क कानांवर हात ठेवले व तुम्हीच गाडी कुठेतरी भलत्या ठिकाणी फिरविली असेल म्हणून सांगितले. शुद्ध चीटिंग! तेव्हा अमेरिकेतही ह्या गोष्टी आहेत. भारताच्या मानाने कमी, पण आहेत! तक्रार करून वेळ घालविणे तेथील लोकांना परवडत नाही, कारण वेळेची किंमत त्याही पेक्षा जास्त असते, असा हा अमूल्य वेळ अमेरिकेमध्ये अनेकांनी केवळ माझ्यासाठी व माझ्या कुटुंबियांसाठी घालविला त्यांना मी कसा विसरू?

नवरा व बायको ही संसाराची दोन चाके आहेत, हे अमेरिकेत प्रत्यक्ष अनुभवास येते. दोघेही नोकरी किंवा कामासाठी बाहेर जातात. कामावरून आल्यावर संध्याकाळी घरातली कामे स्वयंपाक वगैरे दोघे मिळून करतात. स्वयंपाकातील अनेक प्रकार बायकोप्रमाणे नवऱ्यालाही येत असतात. प्रत्येक कामाला नवरा मदत करतो. फरशी पुसण्यापासून ते डिशेस वॉशरमध्ये घालण्यापर्यंत तो ही सर्व कामे करीत असतो. माझा असाच दुसराही एक भ्रम होता की अमेरिकेत घरकामे त्यामानाने कमी! पण नाही. वॉशिंग मशीन, डिश वॉशर, व्हक्युम क्लिनर ही सर्व साधने असली तरी कामे भरपूर! त्यामानाने

त्यांचे कपडे आपल्यासारखे मळत नाहीत. आपल्या शर्टाची कॉलर, हाताच्या बाह्या, पँटचे बॉटम दोन-चार वेळा वापरले की काळेकुट्ट होतात, परंतु तिकडे घामच नाही. त्यामुळे ती माणसे घामाचा पैसा मिळवितो असे म्हणू शकत नाहीत! वॉशिंग मशीनचा उपयोग करण्याचे फॅड आपल्याकडेही आले आहे. मशीन कितीही अद्यावत असले तरी त्यातील मुख्य तत्त्व म्हणजे घुसळणे! त्यामुळे आपले घामेजलेले कपडे नुसते घुसळून साफ होतील का? म्हणून वॉशिंग मशीन वापरले तरी शर्टची कॉलर व कफ तसेच पँटचे बॉटम वगैरे हातांनी चोळून मगच ते कपडे वाशिंग मशीनमध्ये टाकावे लागतात. डिश वॉशरचे तसेच! परदेशात खाद्यपदार्थ आपल्यासारखे तेलकट नसतात. बहुतेक पदार्थ उकडलेले त्यामुळे डिशेसवर तेलाचे तवंग नसतात. भारतीय पद्धतीच्या पदार्थांमुळे डिशेस चिकट होतात व त्या हातानेच चोळून मग इतर भांड्यांबरोबर डिश वॉशरमध्ये टाकाव्या लागतात. मला सर्वात आवडलेली अमेरिकन स्वयंपाकघरातील वस्तू म्हणजे मायक्रो ओव्हन! फारच छान! ही वस्तू आता भारतातही मिळू लागली आहे. किंमतीत जरी महाग वाटली तरी त्याचे फायदे फार आहेत. मायक्रो ओव्हन मध्ये पाच मिनिटात जेवण शिजविले जाते. किंवा गरम केले जाते. त्यामुळे अमेरिकेत एक महिन्याच्या पोळ्या सुद्धा शिळ्या होत नाहीत.

मुंबईतली गोष्ट, एक बाई भारतात एक महिन्यासाठी आली होती. मी तिला विचारले, तिकडे नवऱ्याच्या जेवणाचे काय? काही काळजी नाही म्हणाली, पोळ्या करून ठेवल्या आहेत. महिनाभर सहज पुरतील! मायक्रो ओव्हनचे हे फायदे! अन्न शिळे आहे असे वाटतच नाही. पटापट स्वयंपाक दोन ते पाच मिनिटात गरम होऊन बाहेर येतो. तिकडच्या थंडीत तर हे गरमागरम पदार्थ अगदी चविष्ट लागतात. घरात कितीही पाहुणे असले तरी मायक्रो ओव्हन सोबतीण घरमालकिणीला फारच मदत करते.

समजा, अमेरिकेतील एखाद्या गृहिणीला बाहेर जावयाचे असेल तर ती काय करेल. वॉशिंग मशीन ऑटोमॅटिक चालू करेल. मायक्रो ओव्हनवर टायमिंग लावून ठेवेल, आणि फ्रीजमध्ये कोणत्या वस्तू कुठे ठेवल्या आहेत त्याच्या लिस्ट बरोबर नवऱ्याला एक मेसेज डायनिंग टेबलावर स्टिक करून ठेवेल. मी अमक्याकडे गेले आहे पार्टीला, इतक्या वाजता घरी येईन, मुलाला शाळेतून पिक-अप करावे, वगैरे. नवरा घरी बसेल की मायक्रो ओव्हनमधून गरम जेवण काढून घेईल. टी. व्ही लावून जेवत वॉशिंग मशीन मधले कपडे वाळवील, मध्येच डिश वाशरने भांडी धुऊन ठेवील, व्हॅक्यूम क्लिनरने घर साफ करील! वेळ जात नसेल तर लॉनवरचे गवत कापेल, लेव्हल करेल, बागकाम करील.

म्हणजे हा एकटा माणूस घरी आला की कामात व्यग्र राहील. कुठेतरी गादीवर लोळत बसलाय किंवा घरामध्ये आरडा ओरडा चाललाय असा प्रकार नाही.

अमेरिकेत सुंदर प्रकार आहेत! फ्रीजला बाहेर एक तोटी असते, बटन दाबले की त्यातून थंड ज्यूस बाहेर येतो. तेवढ्यासाठी वारंवार फ्रीज उघडण्याची गरज नाही.

अमेरिकेत आणखी एक मजा पाहिली. आपण भारतीय त्या मानाने रेडिओ कमी लावतो. पण अमेरिकेत रेडिओलाही तेवढाच मान आहे, रेडिओवर अनेक लोकल रेडिओ स्टेशने असतात. त्यावर हिंदी, उर्दू कार्यक्रम, जुन्या चित्रपटातील हिंदी गाणी, शास्त्रीय संगीत किंवा गझलही सादर केल्या जातात. ह्या सर्व सुखसोयींमुळे गृहिणीला वेळ चांगल्या प्रकारे घालविता येतो. हे झाले अमेरिकन स्वयंपाकघर!

अमेरिकेत सगळीकडे भांड्यांचा सुळसुळाट. शो-केस मध्ये भांडी, आंघोळीला भांडे (टब) आणि टॉयलेट साठीही भांडेच (कमोड), आरोग्य दृष्ट्या कमोड किती हितावह ह्या बाबत मी साशंकच आहे.

नवरा बायकोचे भांड्याला भांडे लागत नाही, म्हणजेच जास्त भांडत नाहीत. भांडण झालेच तर ताबडतोब घटस्फोट! पाहुणा परत गेला की आपल्यासारखा त्या लोकांचा जीव भांड्यात पडत नाही अजून!

अमेरिकेत बहुतेक घरे लाकडाची असतात. आपल्याकडे लाकडाचा उपयोग आपण खिडक्या, दारे, किंवा कपाटे करण्यासाठी करतो, पण तसे तेथे नाही. पूर्ण घरच लाकडाचे. खिडक्या, दारे, जमीन, भिंती व छप्पर सर्व लाकडाचेच! लाकडाच्या घराचे फायदे आहेत तसे तोटेही! पाईन वृक्ष अमेरिकेत मुबलक, त्यामुळे लाकूड सिमेंटपेक्षा स्वस्त. ही घरे चटकन् बांधता येतात. अगदी दोन-चार महिन्यातच! त्यामुळे वेळ वाया जात नाही. घरांचे रेडीमेड पार्टस् एकमेकाला जोडून, घरे उभी केली जातात, लाकडामुळे बाहेरून एकसारखी रंगरंगोटी करावी लागत नाही. पण ह्या लाकडी घरांना आग लागली तर? आणि हे अमेरिकेत होतेही! कोदे म्हणाले, आग लागली तर बेडरूममधल्या कपाटातील इन्शुअरन्सचे पेपर्स घेऊन बाहेर उडी मारायची. कितीही नुकसान झाले तरी इन्शुअरन्स कंपनी नुकसान भरपाई देते. मौल्यवान वस्तू बँकेत लॉकरमध्ये असतात. घरातील प्रत्येक वस्तूचा विमा उतरवलेला असतो.

लाकडी घराचा दुसरा तोटा म्हणजे, वरच्या मजल्यावर कोणी जोरात चालले किंवा आदळआपट केली तर त्याचा प्रतिध्वनी उमटतो. बहुतेक घरांना तळघर बेसमेंट असते. बेसमेंटचा उपयोग बहुतेकवेळी गोडाऊन म्हणून होतो, किंवा

इमर्जन्सीमध्ये पाहुणे अचानक वाढल्यास झोपण्यासाठी केला जातो. घरात मुख्य दरवाजापासून टॉयलेटपर्यंत कार्पेट असल्यामुळे चालण्याचा आवाज बिलकूल येत नाही. सर्व घराची सफाई व्हॅक्यूम क्लिनरने केली जाते

मोटारगाड्यांची गॅरेजीस बंगल्याच्या बाजूला असतात. गॅरेजचे दरवाजे मोटारमध्ये बसविलेल्या रिमोट कंट्रोलचे बटन दाबून उघडता येतात. ड्रायव्हर लांबूनच असे बटन दाबून गॅरेजचा दरवाजा उघडतो, गाडी आत ठेवतो व पुन्हा रिमोट कंट्रोलने गॅरेज बंद करतो.

बंगल्याच्या आसपास झोपाळे व इतर मुलांना खेळण्याची साधने सुंदर झाडामधे असतात. अमेरिकेत सर्वत्र अशाच प्रकारचे बंगले पाहिले. ज्यांची आर्थिक सुस्थिती नसते ते किंवा नवीनच आलेले लोक, अपार्टमेंटमध्ये राहतात. अपार्टमेंट म्हणजे आपल्याकडचा सोसायटीमधला फ्लॅट म्हणाना! पण ते ही सुंदर असतात.

अमेरिकेत इन्शुरन्स हा एक जबरदस्त प्रकार आहे. केव्हा कुठे अपघात किंवा चोरी होईल हे सांगता येत नाही. म्हणून घरातील सर्व वस्तूंचा विमा उतरविलेला असतो. त्यामुळे घराच्या मोठ्या पारदर्शक खिडक्या तशाच बंद ठेवून अमेरिकेतील रहिवासी कुठेही बाहेर बिनधास्त जातात. कारण जर चोरी झालीच तर विम्यातर्फे सर्व पैसे मिळण्याची तेथे व्यवस्था असते, आणि हे सर्व डोक्याला जास्त ताप न देता होते. नुकसान भरपाई मिळतेही भारताच्या मानाने फार चांगली व कमी तापदायक!

दुसरे म्हणजे अमेरिकेत लोन प्रकरण फार आहे. अमेरिकेमध्ये नव्याने आलेला बाहेरील देशाचा नागरिक एक तर विद्यार्थी म्हणून येतो, नाहीतर धंदेवाईक म्हणून येतो. प्रथम असे लोक कॉमन रूम घेऊन राहतात, नंतर अपार्टमेंटमध्ये राहतात. लोनवर गाडी घेतात. नंतर आणखी कर्ज घेऊन घर बांधतात. कर्ज काढून घरातील सर्व सुखसोयीने बंगला अद्यावत करतात. कर्जाचा बोजा असल्यामुळे इन्कमटॅक्स मध्येही त्यांना सवलत मिळते. काही भारतीयांची भारतात येण्याची इच्छा असली तरी कर्ज फिटेपर्यंत परत येण्याचा ते विचार करू शकत नाहीत. कर्ज फिटेपर्यंत त्यांचा अमेरिकेत राहण्याचा विचार पक्का झालेला असतो.

सिएटलला असताना कोदेंच्या भावाकडे सत्यनारायणाच्या पूजेसाठी गेलो होतो. अनेक भारतीय आले होते. भटजी, बोईंग कंपनीत मोठ्या पोस्टवरील मराठी व्यक्ती! पूजेचे सर्व श्लोक व कथा व्यवस्थित, तोंडपाठ! फक्त पूजेला लावलेले केळीचे खुंट मात्र प्लॅस्टिकचे होते, खरे नव्हते. पूजेनंतर

तीर्थ-प्रसादाबरोबर जेवण होते. शुद्ध शाकाहारी, फ्लॉवरची भाजी आणि श्रीखंड, अगदी होम मेड!

मराठी संस्कृती टिकविण्याचा प्रयत्न सध्याची पिढी तरी करीत आहे. कोदेंच्याकडेच काय बहुतेक अमेरिकेतील मराठी लोकांकडे निर्णयसागर कॅलेंडर दिसले. कोदेंच्याकडे असताना, सुनिलाच्या मामींनी संकष्टीचा उपवास केला होता! त्यानी उपवास निर्णयसागरवरून केला होता. अमेरिकेत आणि भारतात वेळेमध्ये खूपच फरक, त्यामुळे त्यांनी चंद्रोदय संकष्टीचा पाहिला की पंचमीचा पाहिला ते श्री गजाननच जाणे.

मराठी संस्कृती टिकविण्यासाठी सध्या अमेरिकेतील अनेक मराठी घरात मुलांबरोबर मराठीतच बोला, म्हणून आम्हाला आग्रहाने सांगण्यात येत असे. आमचे इंग्रजी उच्चार मुलांच्या डोक्यावरून जाण्याऐवजी आम्ही आपले मराठी तरी नीट बोलू असेही कदाचित वाटले असावे!

एके दिवशी विद्याचे शेजारी, पॅकिंग करून घर सोडून निघाल्याचे कळले, लांबलचक ट्रान्स्पोर्टची गाडी आली होती. शेजारी सिएटल सोडून पार दक्षिणेस सॅन डिआगोला चालले होते, अरे हो! मी पण लॉस एन्जलीस करून सॅन डिआगोला जाण्याचे ठरविले होते. त्यांचे सामान गाडीत भरताना मी उभा राहून गंमत पाहत होतो. दोन ट्रान्सपोर्ट गाड्यांपैकी एकी मध्ये त्यांची होंडा मोटार चढविण्यात आली. ट्रान्सपोर्टची गाडी एवढी मोठी होती. शिवाय सर्व सामानही आरामात ठेवले गेले. ड्रायव्हरची केबिन व मागचा भाग वेगळा. ट्रेलरसारखा. आपल्याकडे अशा बंद मालवहातुकीच्या गाड्या यायला हव्यात.

असो. सिएटलच्या मुक्कामात वाशिंग्टन लेकवरून अनेकदा फेऱ्या झाल्या. सिएटलचा मुक्काम संपत आला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वांचा निरोप घेतला.

डॉ. शैला एअरपोर्टवर सोडण्यास आली. श्री. कोदे निरोप घेऊन ऑफिसला गेले, विद्याही गेली. सुंदर सिएटलचा निरोप घेतला. असे निसर्ग सौंदर्य आणखी कुठे पहावयास मिळण्याची शक्यता नव्हती. सुंदर गर्द झाडीतून, सिएटलच्या एअरपोर्टवर आलो. सगळे सोपस्कार आटोपण्याअगोदर डॉ. शैलाचा निरोप घेतला.

विमानात खिडकीच्या जागा घेतल्या. विमानात फारशी गर्दी नव्हती. विमानाला आकाशात झेप घेण्यासाठी अक्षरश: विमानतळावर इतर विमानांच्या मागे लाईन लावावी लागली होती, विमानाच्या खिडकीतून एक-एक विमान आकाशात झेप घेताना दिसत होते. सात-आठ विमानांनी उड्डाण केल्यावर आमचा

नंबर लागला. पाहता पाहता आम्हीही आकाशात उंच उंच आलो. आमच्या पायलटने माईकवरून आमचे स्वागत केले. प्रवासाला लागणारा वेळ सांगितला, लॉस एन्जलीसचे तापमान हवामान सांगितले आणि पटकन् खाली पाहण्यास सांगितले.

आम्ही माऊंट रेनिअरच्या बरोबर वर आकाशात होतो. खाली माऊंट रेनिअरचा बर्फाच्छादित डोंगर होता. सीट बेल्ट सोडण्याचा आदेश आल्याबरोबर आम्ही प्रत्येकाने खिडकीजवळ जाऊन माऊंट रेनिअरचे पुन्हा दर्शन घेतले. कमाल! खरोखरंच कमाल! ज्या पर्वतावर आम्ही दोन-चार दिवसांपूर्वी गेलो होतो, बरोबर त्याच पर्वतावरून आमचे विमान आता चालले होते. मी व्हिडिओ कॅमेरा लावून आकाशातून माऊंट रेनिअरचे चित्रण केले. पुन्हा दर्शन घेताना माऊंट रेनिअर वरचे बर्फ वितळले नव्हते पण माझे हृदय मात्र बर्फासारखे विरघळले होते.

माऊंट रेनिअरला वळसा घालून विमान आणखी उंच जाऊ लागले. बर्फाने आच्छादित डोंगर दिसत होते. मृगया एअर होस्टेसला कोकाकोला देण्यासाठी फर्मान सोडीत होती. मध्येच छोटे छोटे डोंगर, त्यावर सापाच्या बिळासारखे डोंगराचे माथे, मधेच पाण्याचा मोठा तलाव तर मधेच रस्त्याची एखादी वाकडी रेषा! मधेच एका डोंगराचा भला मोठा सुळका दिसला. पायलटला आज आमच्याबरोबर बोलायची हुक्की आली होती. तो भला मोठा सुळका पाहून तो म्हणाला, "ही दोन राज्यांमधील बॉर्डर. टेक्सास राज्याच्या वर सुरुवातीला हा सुळका येतो. ह्या सुळक्यामुळे आम्ही विमान बरोबर मार्गाने नेतो आहोत की नाही आम्हाला कळते." अगदी आपल्या बोरघाटातल्या नागफणी सारखा सुळका.

विमानातून वेगवेगळी दृष्ये दिसत होती. ही खरी अमेरिकेची भूमी! कधी उघडे बोडके डोंगर, तर कधी हिरवीगार शेते, कुठे नद्या तर कुठे सरोवरे. विमानातून ही सर्व मजा पाहत होतो, कॅमेऱ्याने टिपत होतो.

इतक्यात लॉस एन्जलीस जवळ आल्याचे पायलटने घोषणा केली. पट्टे बांधले, खुर्च्या सरळ केल्या, लॉस एन्जलीस विमानतळावर विमान उतरले.

●●●

सर्वांगसुंदर लॉस एन्जलिस

लॉस एन्जलीस विमानतळावर माझी चुलत भाची स्मिता आर्यमाने येणार होती. आमचे विमान लॉस एन्जलीसच्या इंटरनॅशनल एअरपोर्टवर उतरले होते. खरं म्हणजे अमेरिकेत लोकल एअरपोर्ट अनेक आहेत. स्मिताने त्यावेळेस आम्हाला तिच्या घरा जवळच्या ऑरेंज काऊंटी भागातील जॉनवॅन एअरपोर्टवरचे विमान घेण्यास सांगावयास पाहिजे होते. असो.

लॉस एन्जलीसचा एअरपोर्ट मोठा! विमान किती वाजता सुटते ते स्मिताला कळविले होते, व मेन एक्झिट डोअरजवळ आम्ही उभे राहतो म्हणून तिला कळविले होते! ट्रॉल्या घेऊन आम्ही बाहेर आलो, स्मिता काही दिसेना! अर्धा तास झाला, एक तास झाला. तिच्या घरी पुन्हा फोन करावा असा विचार आला.

इतक्यात एका छान गाडीतून एक अमेरिकन तरुणी बाहेर पडली. "मामा, कम ऑन" ती तरुणी दरवाजा उघडून आमच्या बॅगस् घेत म्हणाली. खरंच, स्मिताकडे पाहून मी चाट झालो! स्मिता एकदम अमेरिकनच वाटत होती. गोरी अमेरिकन, मूळतःच तिचे निळे डोळे आणि गोरा रंग, त्यामुळे स्मिता इंडियन की अमेरिकन तेच कळत नव्हते. जीन पँटवर तिचा अमेरिकन पेहराव खुलून दिसत होता.

मी स्मिताचा नात्याने जरी चुलत मामा असलो तरी लहानपणी आम्ही एकत्र खेळल्यामुळे तिच्याशी भिडस्तपणे वागण्याची काही जरूर नव्हती. उलट सिएटलहून निघताना दहा दिवसाच्या मुक्कामात लॉस वेगास, डिस्नेलँड, हॉलीवुड आणि सॅन डिआगो दाखव असे मी तिला हक्काने सांगितले होते. खरं तर माझे प्लानिंग चुकले होते. ग्रे-हाऊंड पासचा उपयोग प्रथम लॉस-एन्जलीसच्या आसपास करून शेवटी सिएटलसाठी करावयास हवा होता. पण सिएटलला पोहोचल्यावर पासचा उपयोग सात दिवस करता आला नाही आणि तो पास फुकट गेला होता.

स्मिताने गाडी एअरपोर्टच्या बाहेर काढली, आणि मोठ्या रस्त्यावरून गाडी तिच्या घराकडे धावू लागली. स्मिताचे गाडी चालविण्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे! तिचे मिस्टर कामावर गेले होते. मोठा रस्ता सोडून वळणावरच्या एका बंगल्याजवळ गाडी थांबली.

"हा आमचा बंगला" स्मिता म्हणाली! बाजूलाही टुमदार बंगले होते. गॅरेज रिमोट कंट्रोलने उघडून गाडी आत ठेऊन, आतल्या दरवाजाने सामान आत घेण्यात आले. सुंदर बंगला! मागे स्वीमिंग पूल, भिंतीमागे झाडे आणि झाडांवर

ऑरेंजेस! "अरे बापरे! किती संत्री लागली आहेत!" मी झाडाकडे पाहत म्हटले. "मग, म्हणून तर ह्या एरियाला ऑरेंज काऊंटी म्हणतात"

"वा, बहोत खूब!" एकदम खूष! मी कोचावर बसत म्हणालो.

"बरं, प्रथम चहापाणी घ्या व मग बाथ घ्या. तुमच्यासाठी वरती रूम आहे"

ठीक! म्हणत. चहा बरोबर मस्त ब्रेकफास्ट करीत आम्ही पोटातील भूक शमविली.

"हे बघ मामा, निवांतपणे राहा! काय पाहिजे ते सांग! सर्व काही माझ्याकडे मिळेल."

"मला खाण्यास काही नाही दिलेस तरी चालेल, पण सांगितलेली चार ठिकाणे..."

"अरे दाखविते ना! आता अविनाश आला की प्रोग्राम फिक्स करू"

"ठीक आहे, तो पर्यंत बंगल्याभोवती फेरफटका मारतो. "ए नको, तू बंगला दाखवितेस ना, मग बंगल्याचे शूटिंग करतो. तू दाखविता दाखविता बघंच आज माझे डायरेक्शन 'ॲक्शन' म्हटले की ताबडतोब डायलॉग बोलत, बंगल्याचा सर्व भाग दाखव! काय?"

"ओ के" स्मिताने चटकन् आरशात पाहून केस सारखे केले.

"चल मग. बाहेरून मी कॅमेरा घेऊन आत येतो. तू दरवाजा उघडावयाचा या या म्हणून स्वागत करायचे आणि प्रत्येक रूम दाखवायची! म्हणजे मुंबईला तुझ्या आई वडिलांना तुझ्या डायलॉगसकट तुझे घर दाखवितो."

माझ्या डायरेक्शनखाली मी व्हिडिओ चित्रण सुरू केले, आणि ते इतके सुंदर झाले की मुंबईत आल्यावर ते पाहून सर्वजण अगदी खूष झाले.

स्मिता आणि सुनीला मग स्वयंपाकाला लागल्या. अगदी घरच्यासारखे मोकळे वातावरण! मस्त स्वयंपाक तयार झाला. पण अमेरिकन स्टाईलप्रमाणे जेवण रात्री घ्यावयाचे होते, नाहीतरी हेवी ब्रेकफास्टमुळे भूक नव्हतीच. चार वाजत आले, ओमर व नील शाळेतून घरी आले. थोड्या वेळाने स्मिताचे पतिराज अविनाश आले, सुंदर व्यक्तिमत्व आणि अरेतुरे ची भाषा! कपडे बदलत त्यांनी चटकन, ऑपलेसे करून टाकले. चेहऱ्यावर घाम नाही, तेलकटपणा नाही. एकदम फ्रेश! कामावरून आलेली माणसे थकलेली वाटतच नाहीत. गप्पा मारता मारता रात्र झाली. रात्रीचे साडेनऊ वाजत होते. जेवायला बसलो. मस्त चिकन आणि राईस! आडवा हात मारून बेडरूममध्ये झोपी गेलो.

सकाळी आम्ही उठेपर्यंत अविनाश कामावर निघूनही गेला होता! ओमर व नील शाळेत गेले होते.

"आज विश्रांती घ्या. जवळचे मॉल बघू आणि संध्याकाळी ओमर व नीलला घेऊन लॅगून बीचवर जाऊ या!" स्मिता म्हणाली.

"ओके ओके. तू सांगशील तसे" मी म्हणालो

टी व्ही पाहण्यात सकाळचा वेळ काढला. ब्रेकफास्ट झाल्यावर आंघोळी आटोपल्या व मग बाजूचा मॉल बघावयास गेलो. मॉल पाहताना खरंच मजा वाटते! खिशात पैसे नसताना, उगाचंच किंमती वस्तूना हात लावीत, जणू काही आम्हाला पसंत नाही, असा आविर्भाव करीत स्वच्छंदपणे फिरावयाचे. लहान मुलांसाठीच्या खेळणी विभागात कोणतेही खेळणे मुलांना तात्पुरते खेळण्यास दिले जात होते. ट्रॉली घेऊन उगाचच इकडे तिकडे फिरत होतो. सर्व मॉलमध्ये माझ्या आवडीची जागा म्हणजे अत्तरे सेंटस्, आणि सुंदर वासांचा पावडरींचा विभाग! तिथे सॅम्पलसाठी अत्यंत महागड्या सेंटस्च्या बाटल्या ठेवलेल्या असतात. कोणतीही बाटली उघडा आणि कितीही चोपडा कोणी अडवत नाही. सेंट जेवढा महाग तेवढा तो फुकट वापरण्याचा आनंद अधिक! ह्या मॉलमध्ये वेगवेगळ्या विभागात सर्व काही मिळते. अगदी मुलांच्या कपड्यापासून ते रजईपर्यंत - नानाविध वस्तू. मनसोक्त विडो शॉपिंग करून घरी आलो.

लॉस एन्जलीसबद्दल खूप ऐकले होते. लॉस एन्जलीसचे दोन प्रमुख विभाग आहेत लॉस एन्जलीस काऊंटी आणि ऑरेंज काऊंटी! ऑरेंज काऊंटी हे उपनगर! ह्या शहरात अनेक परदेशी लोक येऊन स्थायिक झाले. विशेषत: १९८२ मध्ये नऊ हजार परदेशीय येथे स्थायिक होण्यासाठी आले. त्यात मेक्सिकन, फ्रेंच, ब्रिटिश आणि साऊथ व्हिएतनामी यांचा भरणा होता. येथे असलेल्यात आशिया खंडातील लोकांचे प्रमाण १९८७ मध्ये दहा मध्ये एक होते, लॉस एन्जलीसमध्येच एवढे परदेशी लोक का आले? कारण लॉस एन्जलीस हे सेऊल, सिंगापूर या शहरांना इतर अमेरिकन शहरांपेक्षा, जवळचे आणि तिथले हवामान साधारण त्या देशांसारखे. लॉस एन्जलीसमध्ये नोकरी किंवा धंदा करणे त्यामानाने सोपे! सिनेमा आणि टी. व्ही त्यांचे माहेरघर, शहराला लाँग बीच आणि लॅगून बीच हे दोन सुंदर समुद्रकिनारे लाभले आहेत, बिव्हर्ली हिलसारखा सुंदर डोंगर आहे. अनेक जपानी येथे धंदा संभाळून आहेत.

'हिस्पॅनिक हे प्रामुख्याने मेक्सिकोतून आलेले, मागासलेले! मेक्सिकोच्या सीमेवर ह्या सर्वांनी प्रवेश न करावा म्हणून कडेकोट बंदोबस्त आहे. तरीही

अनेक घुसखोर अमेरिकेत घुसण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येकाला अमेरिकेचे आकर्षण आहे.

संध्याकाळी लॅगून बीच पाहण्यास गेलो. नील व ओमर बरोबर होते. स्मिताच्या घरापासून साधारण वीस मैलांवर असलेला हा सुंदर समुद्र किनारा! गाडी पार्क करून खडकावर गप्पा मारीत बसलो. समुद्राच्या लाटा फेसाळत खडकावर आपटत होत्या. मुले खेळण्यात रंगली होती, आपल्या वांद्रयाच्या बॅन्ड स्टँडची आठवण झाली! तिथेही खडकाआड अमेरिकन युगुलांचे प्रणयाराधन चालू होते! शेवटी मानवजात! कुठेही गेले तरी गुणधर्म एकच! असो!

समोरच्या अथांग निळ्या सागराकडे पाहून वाटले, ह्या सातासमुद्रापलीकडे माझा देश आहे भारत! थोडा वेळ माझ्या मुंबईच्या घराची, माझ्या दवाखान्याची, माझ्या पेशंटांची आठवण झाली, वीर सावरकरांची हृदय पिळून काढणारी कविताही आठवली, 'ने मजसी ने परत मायभूमिला सागरा प्राण तळमळला.' फरक इतकाच की सावरकरांच्या आणि माझ्या परिस्थितीमध्ये जमीन अस्मानचे अंतर होते.

प्रवासाचा कंटाळा आला नव्हता. मजा वाटत होती. हळूहळू खडकांवरून उठून समुद्र काठाने चालत चालत फेरी मारली. दादरच्या चौपाटीवर मारली तशी. केव्हाही 'कुल्फी मलाय' अशी घाटी हाक ऐकू येईल असे वाटत होते, पण हा बीच आपल्या चौपाटीपेक्षा किती स्वच्छ! नाहीतर आपल्या चौपाटीवर! शौचविधी व कचऱ्याची घाण पाहण्यापेक्षा येथे मन रमले.

"ती बघ लांब दिसते, ती क्वीन-मेरी पॅसेंजर बोट!"

"हो का! फेमस क्वीन-मेरी बोट?"

"हो ना. आता ती वापरात नाही. पण येथे ह्या बीचवर ती आता नांगरून ठेवली आहे. आणि तिचा उपयोग हॉटेल सारखा करतात" स्मिताने माहिती पुरविली.

बोलत बोलत आम्ही पुन्हा गाडीजवळ आलो. गाडीतून आणलेले सेवन अप, कोकाकोलाचे कॅन व बिस्किटांचा मुले समाचार घेत होती. गाडीतही छोटी गार्बेज बॅग! त्यामध्येच केरकचरा टाकायचा. रस्त्यावर टाकावयाचा नाही. असो.

येता येता अंधार पडत होता. डोंगरावर गाई बैलांचा एक कळप चरत असताना दिसला. अगदी आपल्या खेड्यासारखेच दृष्य! काही गाई तर आपल्या गायींसारख्या हडकुळ्या होत्या! म्हणजेच अमेरिका कितीही सुंदर वाटली तरी

तिथे आपल्यासारखेही काही तरी आहे की! अमेरिकन चित्रपट आणि अमेरिकन मासिकांमधले फोटो पाहून अमेरिकेत सर्व ठिकाणी हिरवेगार व निळे आकाश असेल असा समज होता.

अमेरिकेत माती कशी असेल? तिथे ओसाड प्रदेश असेल की नाही? पाली उंदीर असतील का? भिकारी असतील का? असे अनेक प्रश्न. आणि आम्ही तिकडे हे सर्व पाहिले. पालीही पाहिल्या भिकाऱ्यांची पद्धत मात्र वेगळी, एखादे वाद्य घेऊन वाजवत उभे रहावयाचे, मग येणारा जाणारा त्याच्या समोर ठेवलेल्या हॅटमध्ये पैसे टाकतो.

अमेरिकेत आकाश दिवसा गर्द निळे दिसायचे पण रात्री, धूसर तांबूस. चहुंकडे दिव्यांचा झगमगाट असल्यामुळे आकाशात चमकणाऱ्या चांदण्या व गर्द काळे आकाश कमी पहावयास मिळायचे. कदाचित आकाशाचा गर्द निळा रंग तेथील गोऱ्या लोकांच्या डोळ्यात उतरला असावा आणि धूसर तांबूस जमिनीचा रंग आकाशात जाऊन बसला असावा!

रात्री जेवण आटपले. मुलाना दुसऱ्या दिवशी सुट्टी होती. त्यामुळे आमची मुले ओमर व नील बरोबरच इंटेंडो बघत बसली. इंटेंडो हा टी व्ही वर खेळण्याचा गेम! इंटेंडोमध्ये कॅसेट घालून दोन रिमोट कंट्रोलनी ऑपरेट करून दोघांनी खेळायचे. इंटेंडो फार महाग व त्याच्या कॅसेटही महाग! पण अमेरिकन मुलांना त्याचे ॲडिक्शन होत चालले आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी हॉलीवुडला प्रयाण! हॉलीवूड हे लॉस एन्जलीसचे उपनगर! हॉलीवूडसारखे ठिकाण न पाहता परत येणे म्हणजे माझाच मी अपमान करण्यासारखे होते.

हायवेच्या एका बाजूच्या रस्त्याने आम्ही एका टेकडीवर चढलो आणि हिरव्या रंगाचे बोर्ड वाचता वाचता हॉलीवूडमध्ये कधी प्रवेश केला ते कळलेच नाही. दोन-चार टेकड्यांमध्ये हॉलीवूडचा परिसर पसरलेला होता. नजर पोहोचत नव्हती. तिकीटे काढून आतमध्ये गेलो. अमेरिकेत काय किंवा कॅनडात काय, सगळीकडे तिकीटे आपल्या मानाने महाग! कॅनडात तर बारा वर्षाखालील मुलांना तिकीट कमी वगैरे काही नाही. मात्र जरी तिकीट महाग वाटले तरी एकदा आतमध्ये गेल्यावर पैसे वसूल झाल्याचे समाधान वाटते.

तिकीट काढून आत गेल्यावर वेगवेगळे मुखवटे चढविलेली माणसे स्वागत करीत होती. आम्ही आत शिरतो तोच 'ड्रॅकुला' जवळ आला व बघता बघता मृगया-सलीलला त्याने मिठीत घेतले. सुनीला तर घाबरून किंचाळलीच! मग

त्या ड्रॅकुलाने मृगया सलीलला सोडले आणि तो सुनीलाच्या मागे मागे येऊ लागला, नंतर त्याने फ्लाईंग किस् घेतला व निघून गेला.

स्वागतद्वारावर अशी गंमत पाहण्यास मजा येते. आता स्टंट शो पाहू, म्हणून डाव्या बाजूला गेलो. तिथे छोटा स्टेडियम होता प्रेक्षकांसाठी आणि समोर स्टंट चित्रपटाचा देखावा होता. स्टंटमेननी त्यांचा खेळ सुरू केला. काऊ बॉय टाईप कमरेच्या पट्ट्याला पिस्तूले लाऊन पिस्तूल गरागरा फिरवीत, वरून खालून उड्या मारून त्यानी स्टंट चित्रपटातील देखाव्याचे हुबेहूब प्रात्यक्षिक दाखविले.

हॉलीवूड,चालत चालत फिरून होणे अशक्य, हॉलीवूडला आल्यावर काही ठिकाणी उभेच रहावेसे वाटते. बस मधून फिरण्याची सोय होती शिवाय सोबत लेडी गाईडस् पण होत्या. दोन बसेस ट्रामसारख्या जोडलेल्या, खिडकीत बसून एक एक मजा पाहू लागलो.

एका लाकडी ब्रीजवर बस येऊन उभी राहिली. खालून पाणी वाहत होते. अचानक कड् कड् आवाज झाला, ब्रीज कोसळला! मोठ्या मुश्किलीने बस वळवून दुसऱ्या ठिकाणी आणल्याचे सोंग ड्रायव्हरने केले. पाहतो तो क्षणापूर्वी मोडलेल्या पुलाचे खांब पुन्हा उभे राहिले, तुटलेला भाग वर आला. ब्रीज सांधला गेला! सिनेमात ब्रीज कसा कोसळतो त्याचे हे प्रात्यक्षिक!

हळूहळू छोट्या पुलावरून बस गेली. दोन रंगाचे पाणी वेगळे झाले. नंतर एका इमारतीत बस शिरली. इमारतीत अंधार आणि बस उभी राहिली. क्षणार्धात बाजूच्या अंधारात इमारती दिसू लागल्या. एका मोठ्या गोरिलाने आमच्या बसवर झेप घेतली, अगदी खिडकीपर्यंत आला. तो तोंडातून ज्वाला काढीत, इमारतींवर पाय देत तो बाजूला गेला. तेवढ्या वेळात आमचे धाबे दणाणले मात्र! मग आठवले हा तर किंगकाँग चित्रपटातील 'गोरीला'. इंग्रजी चित्रपट पूर्वी पाहिले असल्यामुळे प्रत्येक दृष्याचा मनमुराद आनंद लुटत होतो.

एका झाडाजवळ कृत्रिम पाऊस पाडून, क्षणार्धात पूराचे दृष्य दाखविण्यात आले. नंतर जुन्या पद्धतीच्या बंगल्यातून आणि रस्त्यावरून आमची बस फिरली. चित्रपटांची नावे गाईड सांगत होती. जुन्या वेस्टर्न टाईप पिक्चर्स व्हेरा माईल्स आणि अशाच अनेक चित्रपटात ज्या ज्या जुन्या बंगल्यांचा उपयोग केला गेला होता ते बंगले जसेच्या तसे जतन करून ठेवले गेले आहेत.

पुन्हा एकदा बस इमारतीत शिरली. दोन्ही बाजूला रेल्वे प्लॅटफॉर्मचे दृष्य! थोड्या वेळाने बस थरथरू लागली. वीजा कडकडू लागल्या. आणि धाडधाड आवाज होऊन प्लॅटफॉर्मला तडे गेले! ट्रेन आली, पण डब्यावर डबे आदळून ती

प्लॅटफॉर्मवरच उलटून पडली! दगडाचे ढीग झाले, व थोड्या वेळाने प्लॅटफॉर्मवर पाण्याचे लोटच्या लोट आदळू लागले! हे 'अर्थक्वेक' नावाच्या चित्रपटाचे दृष्य! वा वा करीत आणि धडधडणाऱ्या हृदयाला सावरीत बसने बाहेर आलो.

आता एक तलाव आला. तलावातून चटकन् एक मोठा शार्क मासा बाहेर आला व त्याने पोहणाऱ्या एका खोट्या माणसाला खेचून पाण्याखाली नेले, नंतर तो मासा पुन्हा पाण्याखालून वर आला व आमच्या बसच्या खिडकीजवळ येताच मोठा आ-वासून आमच्या अंगावर त्याने पाणी उडविले. 'जॉज' ह्या चित्रपटातील इलेक्ट्रॉनिक यंत्रणेने ऑपरेट होणारा हाच तो मासा! चित्रपट पाहताना काय अंगावर शहारे आणतो!

बसने वळसा घेतला व बस एका बैठ्या अपार्टमेंटच्या समोर उभी राहिली. त्याच्या मागे एक जुनाट बंगला व खिडक्या, हा तर 'सायको' चा सेट! "धिस इज दी फेमस बंगलो फ्रॉम सायको, अँड दॅट ओल्ड लेडी इज सिटिंग इन दॅट विंडो" गाईडने सांगितल्याबरोबर 'सायको' मधील दृष्ये तरळली, अँथनी पर्किन्स नावाचा नट ज्या खालच्या खोलीत राहत असतो त्या खोल्या समोर होत्या. चित्रपटात होणारा थरथराट प्रत्यक्ष पाहत होतो.

इंग्रजी चित्रपट पाहण्याची मला भयंकर आवड! कॉलेजमध्ये असताना बहुधा युद्धाचे आणि वेस्टर्न पिक्चर्स पाहून झाले होते. प्रॅक्टिस सुरू केल्यानंतर शिवाजीपार्कहून डायरेक्ट चर्चगेट अथवा बोरीबंदरला दुपारचा इंग्रजी चित्रपट पाहण्यास जात असे. ह्या चित्रपटांची तिकीटे माझा मोठा भाऊ जयंत काढून आणावयाचा! हे इंग्रजी आणि विशेषतः अमेरिकन चित्रपट पाहिल्यामुळे अमेरिकन उच्चार समजण्यास कधीच कठीण गेले नाहीत.

आमची बस फिरत फिरत एका बोगद्यात येऊन उभी राहिली. दोन्ही बाजूला बर्फाचा भास निर्माण करणाऱ्या ओबड धोबड भिंती होत्या. हळूहळू बाजूच्या भिंती गोल गोल फिरू लागल्या. आणि बस अधांतरी तरंगते आहे आणि आपण खोलखोल खड्यात चाललो आहोत असा भास झाला! अनेकांनी तर घाबरून किंकाळ्या मारल्या!

बाजूला एक शो होता तिथे टी.व्ही वर चालू असलेल्या प्रसिद्ध सीरीयलचे प्रात्यक्षिक दाखविले गेले. बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज पाण्याची टाकी फुटून आलेला पाण्याचा लोंढा, चटकन् घराला आग लागणे वगैरे प्रकार पाहून डोळे थक्क झाले. कोणताही खेळ आवडला तर तो पुन्हा पाहता येतो. हा खेळ पाहण्यास आम्ही पुन्हा आलो व डोळे भरून पाहिला. स्टंट आर्टिस्ट किती धोके

पत्करतात ते पाहून आश्चर्य वाटते. अशा अनेक गमतीदार आठवणी! हॉलीवूडच्या.

हॉलीवूड म्हणजे सिनेमाची मक्का. अमेरिकेतील बहुतेक प्रसिद्ध नट- नट्या येथे शिक्षण घेऊन बाहेर पडतात. हॉलीवूड त्यांचे माहेरघर. म्हणूनच तिथे एकाबाजूला प्रसिद्ध नटनट्यांचे बंगले आहेत. हॉलीवूड पाहून डोळ्याचे पारणे फिटले.

हॉलीवूडमध्ये काही गमतीदार घटना घडल्या. रस्त्यावरून सुंदर सुंदर मॉडेल्स फिरत होत्या. इतक्यात आम्ही पाहिले की एक सुंदर अमेरिकन मॉडेल भेटेल **त्याच्याशी** डान्स करीत होती. स्मिताने मला विचारले, तिला विचारू का **तुझ्याबरोबर** डान्स करतेस का? मी म्हटले 'जरूर', तिने हो म्हटल्यावर मी कॅमेरा सुनीलाच्या हातात दिला, आणि त्या मॉडेलने मला जवळ घेऊन पाच मिनिटे सुंदर डान्स केला. सुनीलाने ह्या डान्सचे छान चित्रण केले.

सगळीकडे 'खाओ पिओ और मजा करो' असे वातावरण! त्यामुळे मजा येत होती. इतक्यात तिकीटावरचे लकी नंबर चार वाजता जाहीर करणार, म्हणून घोषणा झाली. स्मिताने कुपन्सचे नंबर नेऊन बॉक्समध्ये टाकले. आणि काय नशीब! आठशे डॉलर्स किमतीचे अमेरिकेत फिरण्याचे पहिले बक्षीस स्मिताला लागले. कमाल! सर्वच ठिकाणी आमचा पायगुण चांगला ठरत होता. स्मिताही खूष झाली!

घराघरात टी. व्ही आल्यामुळे लोक चित्रपट कमी पाहतात. त्यामुळे हॉलीवूडमध्ये आता सामसूम असेल असे आम्हाला वाटत होते. पण आता हॉलीवूडने टी. व्ही. सीरियल्स बनवण्यात बाजी मारली आहे. अमेरिकेतील टी. व्ही वरील प्रसिद्ध सीरियलचे चित्रीकरण हॉलीवूडमध्ये होते. पुन्हा एकदा गजबजलेल्या हॉलीवुडचे शेवटचे दर्शन घेऊन घरी आलो. उद्या डिस्ने लँड!

रात्री लवकर झोपून सकाळी लवकर उठलो. कारण अविनाश त्यांच्या ऑफिसात जाताना आम्हाला डिस्ने लँडच्या दरवाजावर सोडणार होते व पुन्हा संध्याकाळी सहा वाजता घेऊन जाण्यास येणार होते.

सकाळी निघताना भरपूर ब्रेकफास्ट करून ऑम्लेट, ब्रेड, ज्यूस, कोकाकोला, सेवन अप वगैरे बरोबर घेतले, कुपन्स असल्यामुळे तिकीटे थोडी स्वस्तातच मिळाली. डिस्ने वर्ल्ड अफाट जागेवर वसले आहे. सुंदर प्रवेशद्वार, प्रवेशद्वाराच्या बाहेर फुलांचा सुंदर बगीचा! प्रवेश द्वारातून रांगेतून आत गेलो. भयंकर गर्दी त्यामुळे आतमध्ये जाण्यास उत्सुक होतो. आत गेल्यावर मिकी

माऊस व इतर प्राण्यांचे ड्रेस घातलेली मॉडेल्स, जवळ येऊन शेक हॅन्ड करू लागली.

या! या! तुमचीच वाट पहात होतो! डिस्नेलँड

गेटवर आम्हाला डिस्ने वर्ल्डचा नकाशा दिला होता. कोणत्या राईडस् प्रथम घ्याव्या ते कळत नव्हते. मध्यभागी चांदीच्या रंगाची मोठी, बोगदा असलेली टेकडी व इतर बाजूस निरनिराळ्या राईडस्! नकाशा पाहून एका बाजूने राईडस् पाहत गेलो, बाप रे! जीवघेण्या राईडस्! मला तर पाहूनच चक्कर येऊ लागली. गोल गोल, उलट सुलट शरीराचे वेगवेगळ्या तऱ्हेने हाल करून गंमत करावयाची!

अशाच एका• राईडमध्ये. पैसे अगदीच फुकट जाणार म्हणून थोडा वेळ बसलो. बाप रे! काही सुचेना! जोरजोरात चक्कर घेऊ लागली. सुनीला मात्र काटक. गोल गोल उलटे फिरतांना मुलांच्या बरोबर आनंदात! मी आपला विडिओ शुटिंग करीत पिशव्या सांभाळीत होतो.

हत्ती, वाघ, व इतर प्राणी ह्यांचा एक वेगळा बोटीतील राईड. त्यात हत्ती सोंडेने आपल्या अंगावर पाणी उडवितो, तर दुसऱ्या ठिकाणी स्पलॅश माऊंटनवरून चटकन् छोट्या बोटीतून पाण्यामध्ये पडावयाचे. चहुकडे पाणी जोरात उडते व बोटीतील सर्वजण भिजतात. रेड इंडियन माणसापासून आजच्या मॉडर्न माणसापर्यंत स्थित्यंतरे कशी झाली तेही येथे पहावयास मिळते. छोट्या आगगाडीतील सफर, कपबशीत बसून गरगर फिरणे, छोट्या गाड्यांची सफर,

त्यांची एकमेकांशी टक्कर, छोट्या बोटी स्वतः चालविणे! एक ना अनेक प्रकार. ह्या सर्व खेळांना बेस स्टेशनवरून नियंत्रित केले जाते.

एका ठिकाणी पाणबुडीत बसून पाण्याखाली जाता येते, कोरल्स बघावयास, ह्या सर्वात एक उणीव आढळली. पाण्याखालचे कोरल्स, व मासे खोटे चक्क रबराचे स्पष्ट दिसत होते, तसेच बोटीतून फिरताना दिसणारे प्राणी रिमोट कंट्रोलने हालचाली करतात. तेही खोटे दिसल्यामुळे मजा जाते. तरीही डिस्ने लँडला मजा येते.



मिकी माऊसबरोबर आम्ही चौघे – डिस्नेलँड

राईडस् घेऊन कंटाळा येत नाही, एखादी राईड आवडली तर पुन्हा तिच्यात बसता येते. डिस्ने लँडला संध्याकाळी डिस्ने शो होता. आगगाडीत बसून राईड घेताना. लाऊडस्पिकरवरून शो असल्याचे समजल्यावर आम्ही तो शो पहावयास गेलो. शो मध्ये अजस्र मिकी माऊस, व इतर प्राणी ह्यांची मिरवणूक व त्यांच्यापुढे गाणे गात नाचत जाणारे अमेरिकन नर्तक नर्तिका मजा आली. शनिवार व रविवार हा शो रात्री असतो, कारण त्या दिवशी डिस्ने लँड उशीरापर्यंत चालू असते.

बॅन्ड स्टँडवर एक सुंदर युवती सुंदर गाणे गात होती. आगगाडीने फेरफटका मारून पुन्हा काही राहिले का पहावयाचे ते पाहिले. वरती बुलेट ट्रेनचा आकार असलेली गाडी होती. ती वर्तुळाकार फिरत होती. एक गाडी तशीच जाऊ दिली.

सहा वाजत आले होते तेव्हा पुढच्या गाडीने बाहेर जाण्याच्या मुख्य दरवाजाशी पुन्हा परत आलो.

अविनाश बाकावर बसून वाट पाहत होते. "कसे वाटले?"

अविनाशने विचारले, "पाय बीय दुखले की नाही?"

"पण फिरण्याच्या उत्साहापुढे पाय दुखायचेच विसरलो. अमेरिकेतील सुंदर हवेचा परिणाम थकायला होतच नाही," मी म्हटले.

दुसऱ्या दिवशी शनिवार होता. विक एंडला लास वेगासला जाण्याचे अविनाशने ठरविले होते. गाडी घेऊन जाणार होतो. लास वेगासला रात्री पोहोचावे लागते, त्यामुळे शनिवारी दुपारी निघण्याचे ठरले. लास वेगासमध्ये मुलांना प्रवेश नाही! तेव्हा प्रश्न आला मुलांना कुठे ठेवायचे? जर काहीच सोय नाही झाली तर तिथे पैसे देऊन ठेवावे लागले असते. पण अविनाशने एक शक्कल काढली. माझे मुंबईत ओळख झालेले व अविनाशचे मित्र डॉ. गोपाळ मराठे हे लॉस एन्जलीसच्या वॉर्डरवर रहात होते, म्हणजे अविनाशच्या घरापासून लास वेगासच्या रस्त्यावर तीस मैलांवर! तेथे मुलाना ठेवून आम्ही चौघेजण लास वेगासला जाणार होतो. अविनाशने त्यांना तसे कळविले.

शनिवारी दुपारी आम्ही निघालो. मुलाना डॉ. मराठेंच्या घरी ठेवले.

डॉ. मराठेंच्या मिसेस ह्या बाळ कोल्हटकरांच्या जवळच्या नातेवाईक! बाळ कोल्हटकरांच्या भूमिका जरी मी पाहिल्या नव्हत्या, तरी त्यांची आठवण गोपाळ मराठेंकडे आली. त्यांच्याकडेही आग्रह झाला. चहापाणी आटोपून आम्ही लास वेगासच्या रस्त्याला लागलो, सुंदर लिंकन गाडी, आतमध्ये गझल लावलेल्या व अविनाश गाडी चालवताना एकदम खुशीत! डॉ. मराठेंच्या घरापासून जवळ एक मोठा डोंगर लागला. तिथे हवा म्हणे इतकी दूषित, की दम्याच्या रोग्यांना, दम्याचा त्रास हमखास होतो. हवा ढगाळ होती, पण वातावरण सुंदर होते. लास वेगासच्या वाटेवर आता उघडे बोडके डोंगर दिसू लागले. बाजूला डोंगरात एक मालगाडी जाताना दिसली. थोड्या वेळाने ओसाड माळरानाचा प्रदेश लागला. वैराण प्रदेश, फड्या निवडुंग! आणि त्या बरोबर मन भूतकाळात जाऊ लागले.

पूर्वी पाहिलेले वेस्टर्न चित्रपट, जॉन वॅन, कर्क डग्लस, क्लिंट इस्टवूड. ही मंडळी चित्रपटातल्याप्रमाणे घोड्यावरून! पिस्तुलातून गोळीबार होईल... पश्चिमेकडे सूर्य मावळत होता. फ्रँको नीरो डोंगरावरून काऊबॉय टोपी घालून चालला होता. राक्कॉल वेल्स फड्या निवडुंगाच्या आड आपल्या देहाचे प्रदर्शन करीत घोड्यावरून सुसाट पळत होती... सर्व इंग्रजी चित्रपटातील विशेषतः

वेस्टर्न, दाखविलेली दृष्ये ह्याच निर्जन प्रदेशात चित्रीत करण्यात आली असावीत...

खिडकीतून बाहेर पाहण्यात मी गप्प झालेला पाहून, अविनाशने गाडीत गझलची नवी कॅसेट सुरू केली, आणि मी भानावर आलो. अंधार गुडुप्प झाला होता. गाडी पळत होती. उत्तरेकडे आकाश एकदम तांबूस दिसू लागले. थोड्या वेळाने उतरणीवर आल्यावर लाईटस् दिसू लागले.

"आले वाटतं लास वेगास?"

"अजून थोडा वेळ थांब! मग बघ!" अविनाश माझी उत्सुकता वाढवीत म्हणाला, एक छोटेसे गाव लास वेगासची झलक दाखवून मागे गेले, आणि पाहता पाहता लांबवर भव्य रोषणाई दिसू लागली. रस्त्याच्या डाव्या बाजूपासून उजव्या बाजूपर्यंत!

"ह्यांना मिराज दाखवू या, सर्कस दाखवू या की हॉर्स शू मध्ये...?

"नको, आज कोणता शो आहे ते पाहू या" स्मिता म्हणाली, "आणि मग काय ते ठरवू"

माझी अवस्था खाटीकखान्याकडे चालविलेल्या जनावरासारखी झाली होती. "मी काही दारू घेत नाही, आणि जुगार तर मुळीच खेळणार नाही" मी ठामपणे अविनाशला म्हणालो.

"ए नखरे बस! एवढा सोवळा ब्राह्मण होतास तर लास वेगासला कशाला आलास? इथे येऊन जुगार नाही खेळलास आणि शो नाही पाहिला तर ... अरे बघ तर. जन्मभर आठवत राहशील. पुढच्या वेळी आलास की तूच म्हणशील जाऊया म्हणून" अविनाश मला तयार करीत होते.

"हो ना! मागच्या वेळेला तुमचे मंबईचे डॉक्टरांचा ग्रुप फक्त लास वेगास बघायला आला होते, आणि बायको बरोबर असताना तू कशाला घाबरतोस? डरो मत मामा साहेब!" स्मिता

"सुनीला तू बघणार आहेस की नाही शो? आणि खेळणार ना?"

सुनीलाने चटकन् होकार देऊन टाकला.

"दॅटस् लाईक ए गुड गर्ल" अविनाश म्हणाले. सुनीला ही मुलगी म्हटल्यामुळे आनंदली होती. मी डोळे वटारून सुनीलाकडे पाहिले. काही झाले तरी जुगार खेळणार नाही आणि दारूला तर आयुष्यात स्पर्श केला नव्हता.

"हे बघ, तुमची एवढी बळजबरी असेल तर मी तुमची गाडी संभाळतो"

जुगारात पैसे जातातच हे मला नक्की ठाऊक होते. आधीच खिशात पैसे कमी त्यात माझे आयुष्यातील काही नियम होते.

"चल, आम्ही काढतो तुमची तिकीटे" अविनाश, म्हणाला.

"नको नको" मी म्हटले अविनाशला अरे तुरेच्या भाषेत बोलणे त्या वातावरणात जास्त योग्य वाटले.

अशी वादावादी चालू असताना गाडीने वळसा घेतला, समोर जत्राच उभी होती. नेत्रदिपक रोषणाई रस्त्यावरून नुसती ओसंडत होती. बाप रे! इतके दिवस ज्याची वाट पाहिली ते हे लास वेगास!

अविनाशने मूडमध्ये येऊन एक फर्स्ट क्लास इंग्लिश ट्यूनची कॅसेट गाडीमध्ये लावली व गाडीचा वेग कमी केला. अविनाश गाडीच्या स्टेअरिंगवर हात आपटीत ताल देऊ लागला, व शरीराची बसल्याबसल्या हालचाल करू लागला. रोषणाईने डोळे दिपले होते. गाडी हळूहळू पुढे जाऊ लागली.

कॅसिनोचे आगार म्हणून लास वेगास प्रसिद्ध. डाव्या बाजूला मिराज, सर्कस. उजव्या बाजूला हॉर्स शू, लास वेगास कॅसिनो. चित्रविचित्र पोस्टर्स. त्यावर कॅसिनोंचे दर. वेगवेगळ्या युवती पोस्टर्समधून डोळे मिचकावीत होत्या.

अविनाशने हिंदी गझलची टेप लावली, "इधर देखो उधर देखो" वा! काय सिच्युएशन! गाडी आणखी हळू चालू लागली. कॅमेरा घेऊन मी खिडकीतून चित्रण करू लागलो. मज्जाच मज्जा! प्रथम आम्हाला सर्व मोठ्या रस्त्यांवरून अविनाशने फिरविले व नंतर स्मिताने आम्हाला एका कॅसिनोत नेले. अविनाश गाडी पार्क करावयास गेला. प्रथमच रस्त्यावर दारू पिऊन तर्र झालेली अमेरिकन मुले पाहिली. काहींच्या डाव्या कानात एक रिंग होती. "हे रिंग का घालतात?" मी स्मिताला विचारले "पुष्कळ ठिकाणी मी पाहिली"

"त्यांना 'गे' म्हणतात"स्मिताने माहिती पुरविली.

"गे म्हणजे काय गं?" मी मराठीत विचारले. स्मिता हसली. व म्हणाली "ती होमो सेक्स असल्याची खूण आहे मामा" बापरे! हे वेगळेच प्रकरण पाहून मी विषय बदलला. तेवढ्यात अविनाश गाडी पार्क करून आला.

"तुम्ही दोघे 'शो' बघून या, तो पर्यंत स्मिता व मी खेळतो"

"कसला शो?" मी बावळटपणे विचारले. कारण सुनीला समोर माझा नसता शो होण्या अगोदर स्पष्टीकरण झालेले बरे.

"तसे काही विशेष नाही, फक्त टॉपलेस, नॉट कम्पलीट न्यूड"

"ओके ओके" म्हणत मी सुनीलाकडे पाहिले. तिनेही जास्त विरोध दाखविला नाही.

कॅसिनोच्या इमारतीत शिरलो. पाहतो तर जुगार खेळण्याची अनेक यंत्रे. नजर पोहोचणार नाही एवढी पसरली होती. चालत चालत पुढे गेलो. बिलिअर्ड बोर्ड सारख्या मोठ्या बोर्डावर काहीजण कॅरमच्या सोंगट्या सारख्या बेटस् लावीत होते व काठीने नोटा गोळा करीत होते. थांबून मुद्दाम मजा बघत बसलो. वेस्टर्न पिक्चरमध्ये हिरो काऊबॉय कॅप घालून तोंडात सिगार, कंबरेला पिस्तूल लटकावून, बाहेर घोडा उभा करून खेळ खेळताना पाहिला होता. तसाच सर्व प्रकार. सगळीकडे सर्वकाही मजेत चालले होते. मध्येच सुंदर तरुणी सुटी नाणी घेऊन चेंज देण्यासाठी फिरत होत्या. तर काही, मद्याचे ग्लासेस घेऊन! सुंदर सिगारेटचा वास! कुतूहलाचे वातावरण! कोण कधी जिंकेल, सांगता येत नव्हते. धुंद वातावरण होते!

आमचे शोचे तिकीट काढून स्मिताने आम्हाला दरवाजात सोडले, पण कॅमेरा आत नेण्याची परवानगी नव्हती. स्मिता कॅमेरा गाडीमध्ये ठेवून आली आणि आम्ही आत शिरल्यावर ती अविनाश बरोबर खेळण्यास निघून गेली.

आतमध्ये सर्व ठिकाणी मंद प्रकाश. गोलाकार मांडलेली टेबले व खुर्च्या. त्या पलीकडे पुन्हा टेबले. हॉल तुडुंब भरला होता. प्रत्येक टेबलापाशी अमेरिकन जोडपी. आश्चर्य म्हणजे बायका जास्त होत्या. तिकीटाच्या किंमतील ड्रिंकचा एक पेग फ्री होता. पण आम्हा दोघांना कोका कोलावर समाधान मानावे लागले.

थोड्यावेळाने दिवे मंद झाले. एक एक करता करता अनेक अर्धनग्न तरुणी स्टेजवर येऊन नृत्य करू लागल्या. गोलाकार नाचत त्यांनी त्यांचे नृत्य कौशल्य व इतर बरेच काही दाखविण्याचा प्रयत्न केला. पण मनाला रुचले नाही. केवळ ह्या शो साठी एवढे महाग तिकीट काढून मनीलेस होण्यात मजा वाटली नाही कदाचित आम्हाला चांगला शो बघावयास मिळाला नसावा. शो केव्हा संपतो असे झाले.

'शो' पाहून आलो तो सुनिलाचे थोडावेळ जुगार खेळूया म्हणून तुणतुणे सुरू झाले. माझ्या मनाला जुगार खेळणे पटत नव्हते. काही झाले तरी मी खेळणार नाही, तू पाहिजे तर खेळ, म्हणून सुनिलाकडे पाच डॉलर्स दिले. तेवढ्यात अविनाश व स्मिता आले. त्यांचे खिसे साफ रिकामे झाले होते! सुनीलाला हौस आहे तर खेळूदे तिला. तू बस तुझे प्रेस्टिज धरून. म्हणत अविनाश व स्मिता

आम्हाला दुसऱ्या विभागात घेऊन गेले. काऊंटरवर जाऊन स्मिताने एक एक डॉलरची कागदात बांधलेली नाणी आणून दिली. पाच सेंटची नाणी. नवख्या माणसाने सेंटनी खेळावे, पाव डॉलर्स किंवा एक डॉलर पर्यंत जाऊ नये.

मी खेळणार नाही म्हणून हेका धरून बसलो. तेव्हा सुनीला बरोबर स्मिता खेळण्यास बसली. मी आपला मजा बघत होतो. सुनीलाने खाचेतून नाणे आत



अय्या ! अहो काय करू ह्या पैशांचे? सुनिला व मी स्लॉट मशिनजवळ लासवेगास

घातले. दांडा फिरविला. आणि अहो आश्चर्यम्! धडाधडा आवाज करीत खाली भांड्यात पडू लागली नाणी, काही केल्या थांबेचनात! एका नाण्यावर दोनशे नाणी! मी आणि सुनीला आनंदलो. "सुनीला चल, बस झाले, निघूया" मी म्हणालो. पण माणूस जुगारात फसतो तो इथेच. मोह आवरता येत नाही.

आणि शेवटी सकाळी पाच वाजेपर्यंत आणि पाच डॉलर्स घालवेपर्यंत आम्ही खेळत राहिलो, जुगार न खेळण्याचा निश्चय करून मी हळूहळू निश्चयापासून कोसळलो, व शेवटपर्यंत खेळत राहिलो.

अनेक म्हाताऱ्या बायका स्लॉट मशीनवर खेळत होत्या. त्यांची खेळण्याची तंद्री लागलेली होती. आम्हा नवशिक्यांसारख्या, पैसे लागले की त्या ओरडत नव्हत्या. त्यांच्या दृष्टीने लास वेगास हे वेळ घालविण्याचे व नवऱ्याने ठेवलेला

पैसा घालविण्यांचे एक उत्तम साधन होते. खेळणाऱ्या म्हाताऱ्यांमधील अनेक विधवा पाहून असे वाटले खरे! पैसे घालवून शेवटी बाहेर आलो, आम्ही.

स्टॉल मशीन व रौलट चक्र ह्यावर अनेकजण जुगार खेळतात. जुगारात जिंकणाऱ्या किंवा एखादा आकडा बरोबर काढणाऱ्यास, काही हॉटेलतर्फे होंडा व क्रायस्लर गाडी बक्षीस म्हणून ठेवली होती! अशाच क्लबमध्ये नाचून किंवा गाणी म्हणून अनेक कलावंत पुढे आले. असो.

लास वेगास पाहून झाले होते. अविनाश जांभया देत होता. रात्रीचे जाग्रण जाणवू लागले होते, पण मी मात्र ताजातवाना होतो. एक वेगळाच अनुभव घेतल्यामुळे.

लास वेगासचे आणखी एक वैशिष्ठ्य आहे. इथे क्रामांट रोड नावाचा रस्ता आहे, त्या रोडवर अनेक पाट्या आढळतात. "झटकन लग्न व पटकन डायव्होर्स येथे करून दिले जातात म्हणून!" अनेक मंडळी खास ह्या कामासाठी लास वेगासला येतात. लग्न म्हणजे जन्माचे बंधन वगैरे सब कुछ झूट आहे असे मानणाऱ्या अमेरिकन माणसांचे कौतुक करावे की...

गाडी हळूहळू लास वेगासच्या बाहेर पडत होती. स्मिता गाडी चालवायला बसली होती. सकाळ होत होती. सूर्य उगवत होता. स्मिता आणि मी गप्पा मारीत होतो. अविनाश गाढ झोपी गेला होता.

सकाळी डॉ. गोपाळ मराठेंच्या घरी पोहोचलो. बाहेर लॉनवर सगळीकडे काचा पडल्या होत्या. गोपाळ मराठे नुकतेच उठले होते. ते बाहेर आले, पण ह्या काचा? आणि बाहेर उभी असलेली त्यांची गाडी? बापरे! सर्व काचांचा चक्काचूर! आज नेहमीचे आनंदी गोपाळ दिसत नव्हते. असं का? डॉ. मराठेंनी सांगितले, हा अमेरिकन गुंडगिरीचा प्रकार!

दीड महिन्यापूर्वी एका रात्री डॉ. मराठे त्यांचा कार्यक्रम आटोपून रात्री उशिरा घरी आले. तेव्हा त्यांना शेजारच्या घरात काही अमेरिकन गोरी मुले चोरी करताना दिसली, पोलिसांनी त्या मुलांना पकडले, तेव्हा गोपाळ मराठेनीच पोलिसांना कळविले असावे ह्या संशयाने, सूड घेण्यासाठी म्हणून मुलांनी मराठेंची गाडी मोडली. ती रिपेअर करून आल्यावर काल रात्री पुन्हा फोडली. गाडीतून गुंड येताना, गाडी फोडताना मराठे स्वतः रात्री पाहत होते. पण त्या गुंडांपुढे कोणाचेच चालले नसते. ही अमेरिकन मुले वंशभेद मानणारी होती. त्यामुळे जाता जाता डॉ. मराठेंना 'काळ्या कातडीचे' म्हणून हिणवूनही गेली. खरं

म्हणजे मराठे वंशाने जरी काळे असले तरी रंगाने अत्यंत गोरे आहेत. ह्या सर्व त्रासाला कंटाळून डॉ. मराठेनी ती वस्ती सोडावयाचे ठरविले होते.

आज मराठेंकडे आमच्यासाठी खास स्वयंपाक बनविला जात होता. रविवार दुपार होती. डॉ. मराठेंच्या आडदांड कुत्र्याबरोबर अविनाश खेळत होता. कुत्रा जरी आडदांड असला तरी अत्यंत भित्रा होता. अविनाशला घाबरून शेवटी बिचाऱ्याने सर्वांसमोर लघुशंका करून आपण घाबरट असल्याचे कबूल केले. कदाचित कुत्र्याच्या ह्या घाबरट वृत्तीमुळेच डॉ मराठेंकडे दोनवेळा चोरी झाली असावी.

स्वयंपाक होईपर्यंत डॉ. मराठेंनी हार्मोनियम काढला. मुंबईला त्यांची व माझी श्री. सुधीर फडकेंच्या तर्फे ओळख झाली. त्यानंतर रेडिओवर त्यांची भावगीते मी ऐकली होती. तुम्ही अमेरिकेत या, ही भावगीते मी तुम्हाला म्हणून दाखवीन असे तेव्हा ते मला म्हणाले होते. त्या दुपारी माझी आवडती भावगीते आणि मेहंदी हसनची 'रंजिश सही' ही गझल गाऊन त्यांनी आमचे समाधान केले. माझ्या गाडीला जरासा चरा पडला तर माझा मूड जातो. ह्यांच्या गाडीचा तर चक्काचूर झाला होता. तरीही एवढी मन:शांती व आमचे आदरातिथ्य करताना पाहून आश्चर्य वाटले.

गाण्यानंतर त्यांनी त्यांची स्वत:ची गाण्याची एक ग्रामोफोन रेकॉर्ड मला दिली. जेवण झाल्यावर मुलांना घेऊन, लॉस एन्जलीसला स्मिताच्या घरी परत आलो. एवढा प्रवास आणि रात्रीचे जागरण करूनही स्मिता थकली नव्हती. रात्रभर गाडी चालवून एवढे ताजेतवाने राहणे, अगदी तेथल्या हवेत सुद्धा, कसं काय जमते तिला, याचे आश्चर्य वाटत होते.

बहुतेक लॉस एन्जलीस पाहून झाले होते. आता फक्त सॅन डियागो राहिले होते! पण प्रत्येक वेळी स्मिताला व अविनाशला त्रास देणे योग्य वाटत नव्हते. अविनाश कामावर जाणार होता. तेव्हा आम्ही बसने जाऊ म्हणून स्मिताला सांगितले, पण बसने जाण्यासाठी डॉलर खर्च करणे जीवावर आले होते. परदेशात जाताना परकीय चलन कमी मिळत असल्यामुळे, पैसे फारच काटकसरीने वापरावे लागतात. उदाहरणार्थ कोणत्याही दुकानात वस्तू आवडली म्हणून खरेदी करता येत नाही. काचेला तोंड लावून अधाशासारखे त्या वस्तूकडे पाहत राहावे लागते. पैसे वाचविण्यासाठी अनेक युक्त्या कराव्या लागतात. असो.

खरे म्हणजे ग्रे-हाऊंडचा फुकट गेलेला पास येथे वापरता आला असता. सबंध प्रवासात ग्रे-हाऊंडचा पास व्यवश्रस्थत वापरता आला नव्हता.

दहा वाजता आंघोळ करून आम्ही तयार झालो. बससाठी जायला निघणार एवढ्यात स्मिताने आमच्यासाठी गाडी काढली. आनंद झाला. सॅन डियागो लॉस एन्जलीसच्या दक्षिणेला व मेक्सिकन बॉर्डर जवळ! सॅन डियागोला लष्कराचा मोठा तळ आहे.

रस्ता फारच सुंदर! स्मिताचा वेग फारच होता, खरं म्हणजे स्मिता सारखे ड्रायव्हिंग मी अमेरिकेत कोठेही पाहिले नाही. एकदा तर पासष्ट मैलाचा वेग तिने क्रॉस केला होता तेव्हा गाडीत लागलेला लाल लाईट तिच्या लक्षात आला नाही. नशीब, तिकीट मिळाले नाही! अमेरिकेत अनेक ठिकाणी वाहतूक नियंत्रण करणारे पोलिस मोक्याच्या ठिकाणी दबा धरून बसलेले असतात. वेग मर्यादा ओलांडल्यास ते ताबडतोब पकडून तिकीट म्हणजे दंडाची रिसीट फाडतात. ह्या पोलिस अधिकाऱ्यांबरोबर वाद घालण्यात अर्थ नसतो! मला मुंबईचे वाहतूक अधिकारी आठवले, कोपऱ्यात नेऊन ड्रायव्हरकडून पैसे उकळणारे, व उगाचंच गाडीच्या ड्रायव्हरना सतावणारे. आम्ही अविनाशकडे येण्यापूर्वी थोडेच दिवस आधी, अविनाशला पोलिस अधिकाऱ्याने अडविले होते व शंभर डॉलर दंड केला होता. संध्याकाळी सात वाजता अविनाशने बीअर घेतली होती, तर रात्री एक वाजता त्याला अडवून त्याची पेन्सिल टेस्ट करण्यात आली, तोपर्यंत ओमरने सीटचा बेल्ट सोडला म्हणून आणि अधिकाऱ्याशी वाद घातला अशा तीन गुन्ह्यांसाठी दंड! तेव्हा जबरदस्त दंड होण्यापेक्षा काळजी घेतलेली बरी! हायवेवर तर ट्रॅफिक हेलिकॉप्टर किंवा विमानाने सुद्धा कंट्रोल केला जातो.

सॅन डियागोचा रस्ता समुद्र काठाला लागून, सुंदर इमारती आणि टेकड्यांच्या रम्य परिसरातून गेला होता.

लॉस एन्जलीसला गेल्यावर सॅन डियागोला अवश्य भेट द्यावी. डॉल्फीन, व्हेल व इतर माशांचे शो पाहण्यासारखे आहेत. एका भल्या मोठ्या, निळ्या पारदर्शक भिंतीच्या तलावात हे मासे खेळ करून दाखवितात. त्या माशांची 'रामू' आणि 'शामू' ही भारतीय नावे ऐकून आश्चर्य वाटले. ही नावे देताना बाकी काही नाही, तरी भारतीयांची बुद्धी अफाट आहे हे अमेरिकन लोकांनी मान्य केल्याचे मला जाणवले.

कसरतीचे अनेक प्रकार! मासा उलटा होऊन, त्याच्या पंखांचा वल्हयांसारखा उपयोग करतो. त्याचे शिक्षक माशाच्या तोंडामध्ये उभे राहून वेगवेगळ्या कसरती करवितात. ह्या माशाचे नैपुण्य पाहून हा मासा सर्व माशात हुशार का समजला जातो, ते प्रत्यक्षात पहावयास मिळाले.

डॉल्फिनच्या कसरती पाहताना आमचे कुटुंब

सॅन डियागो पाहून घरी आलो, तेव्हा अविनाश घरी आलेला होता. अविनाश चिडलेला दिसत होता. खरे म्हणजे आज आमच्यासाठी स्मिताने अविनाशला न कळविता गाडी नेली होती. घरी त्याच्यासाठी मेसेजही ठेवला नव्हता, मुलांनाही आई कुठे गेली आहे ह्याची माहिती नव्हती. त्यामुळे संध्याकाळी चार पासून रात्री आठ वाजेपर्यंत वाट पाहून तो काळजीत पडला होता. मेसेज न ठेवल्यामुळे त्याचे भडकणे साहजिक होते, पण स्मिताने आल्या आल्या त्याची माफी मागितली.

खरे म्हणजे त्या रात्री सावंत नावाच्या गृहस्थांनी आम्हाला जेवावयास बोलाविले होते. अविनाशचा मूड गेलेला पाहून, भूक नसल्याचे कारण सांगून पार्टी कॅन्सल करावी असे मी स्मिताला सुचवीत होतो, पण अविनाशनी कमाल केली! पाहतो तो अविनाश परत नार्मल मूडमध्ये! भराभरा कपडे करून आम्ही सावंताकडे जेवावयास गेलो.

सावंत दादरचेच! त्यांनी एका हॉटेलमध्ये पार्टी अॅरेंज केली होती. पार्टीला तिथे राहणारी, पण मूळची दादरची तीन जोडपी आणि आम्ही असे बोलावलेले

होते. सावंतांचा पत्ता मिळाला होता पण भेट झाली नव्हती. सावंतांनी आम्हाला त्यांचा फोन नंबर दिला व त्या फोनचा आम्हाला पुढे फार उपयोग झाला. अमेरिकेत कुठेही असलात तर माझ्या नावावर कलेक्ट कॉल करा, मी तुम्हाला पाहिजे तो फोन नंबर लावून देईन असे त्यानी सांगितले. धंदेवाईक लोकांसाठी इथे वेगळा फोन नंबर असतो. ह्या फोन नंबरमुळे, आधी भेटलेल्या सर्वांना आम्ही पुन्हा फोनवर भेटू शकलो होतो. इमर्जन्सीमध्येही हा नंबर फार उपयोगी होता.

ह्या फोन नंबरमुळे पुढील प्रवासात सिएटल, लॉस एन्जलीस व इतर ठिकाणी आम्ही बोलू शकलो.

दुसरे एक उपाध्याय म्हणून गृहस्थ भेटले, पैशाची कमतरता अमेरिकेत कुठेही पडली तर त्यांना फोन करा म्हणाले. अर्ध्या तासात त्या शहरात पैसे मिळण्याची सोय होईल म्हणून सांगितले! कोण कुठले सावंत आणि कोण उपाध्याय! पण ह्या सर्वांचे केवढे प्रेम! इतक्या आपुलकीने कसे आदरातिथ्य करतात? त्यांच्याबद्दल काय लिहू तेच कळत नाही. त्यांच्याबद्दल लिहिताना हृदयच काय पण हात सुद्धा भारावून गेला आहे माझा, असो.

रात्री घरी आलो नील ओमरचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही लॉस एन्जलीस सोडणार होतो. रात्री बॅगा भरण्यास स्मिता मदत करीत होती. उशीरापर्यंत गप्पा मारीत बसलो.

सकाळी लवकर उठलो. अविनाश आम्हाला जवळच्या ऑरेंज काऊंटी एअरपोर्टवर सोडणार होता. त्या एअरपोर्टचे नाव 'जॉन वेन एअरपोर्ट' प्रख्यात अभिनेत्याचे नाव! गाडीत बसल्यावर निरोप देताना स्मिताचे निळे डोळे पाण्याने भरले. निळ्या आकाशातून काळ्या ढगांनी वर्षाव करण्याआधीच अविनाशने गाडी बाहेर काढली. स्मिताचा हात हलत होता.

जॉन वेन एअरपोर्ट छोटा एअरपोर्ट! अविनाश आम्हाला सोडण्यासाठी आतपर्यंत आला, आम्ही लॉस एन्जलीसहून प्रथम सॅन फ्रान्सिस्कोला जाणार होतो, व नंतर ह्यूस्टनला, विमानामध्ये अनेक जपानी प्रवासी होते. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक जपान्यांचे वास्तव्य आहे. उद्योग धंद्यामध्ये जपानी लोक अग्रेसर का ते विमानात समजले! विमानात बसल्याबरोबर त्याची ऑफिसची कामे सुरू!

सॅन फ्रान्सिस्कोला विमान उतरलल्यावर दुसऱ्या गेटने ह्यूस्टनचे विमान पकडावयाचे होते. विमानाला अजून वेळ होता. बॅगेज आत पाठवून

विमानतळावर फिरत राहिलो. मुलांचा वेळ जाण्यासाठी वेगवेगळे खेळ होते. अगदी बूट पॉलीश पासून सगळ्याची सोय एअरपोर्टवर होती.

ह्यूस्टनच्या विमानात बसलो. विमान टाहो लेक, टेक्सास बॉर्डर ह्यावरून जात होते. हवामान तप्त होते. टेक्सासवरून जाताना 'फोर फॉर टेक्सास'हा चित्रपट आठवत होता. आमचा पायलट विनोदी होता. सर्व माहिती सांगणारा, त्यामुळे मजा आली! जसजसे ह्यूस्टन जवळ येऊ लागले तसे पृथ्वीतलावर सगळीकडे हिरवेगार दिसू लागले. गर्द हिरवी पाईनची झाडे. हळूहळू विमानतळ दिसू लागला. गर्द हिरव्या झाडीने वेढलेला.

• • •

वैज्ञानिकांचे आगर ह्यूस्टन

विमानतळावर विमान उतरले, भडकमकरांना आधीच फोन केलेला असल्यामुळे विमानतळावर कोणीतरी उतरवून घेण्यास येईल असे वाटत होते. आम्ही आमच्या बॅगा क्लेम करण्यासाठी गेलो. बाजूलाच साधारण सहा फूट उंचीचा एक देखणा माणूस उभा होता. "मी भडकमकर, आपण डॉक्टर कवळी का?" त्यांनी विचारले मी "वा! हो हो" म्हणे पर्यंत दोन्ही हातात बॅगा उचलून "फॉलो मी" म्हणत ते गेटकडे निघाले. त्यांच्या मागोमाग आम्ही त्यांच्या गाडीत **येऊन बसलो**. घरी पोहोचलो. खरे म्हणजे एअरपोर्ट त्यांच्या घरापासून साठ सत्तर मैल लांब! पण इतक्या दूर आम्हाला उतरवून घेण्यासाठी ते स्वतः आले होते. आम्ही घरी पाहोचतो तो विजू भडकमकर आमच्या स्वागताला हजर होती. माझा दादरचा शाळेतील मित्र विनय पित्रे ह्याची विजू बहीण!

गेल्याबरोबर छानपैकी चहा व स्नॅक्स्, मजा आली. विजूचे बाबा हल्ली मुंबईहून इथे रहावयास आले होते. संध्याकाळी थोडावेळ विजूबरोबर ह्यूस्टन शहरात फिरलो. विजूने फोन करून दाबके नावाच्या ह्यूस्टनमधील एका विद्यार्थ्याला आम्हाला त्याच्या सवडीने दुसऱ्या दिवशी ह्यूस्टन दाखविण्यास सांगितले.

डल्लास आणि ह्यूस्टन ही टेक्सास राज्यातील दोन मोठी शहरे. टेक्सास राज्याचे क्षेत्रफळ हे फ्रान्सपेक्षाही मोठे आहे. एकूण क्षेत्रफळ २६७३३९ चौ. मैल! अंदाजे चार हजार वर्षांपूर्वी टेक्सास राज्यात भारतीय संस्कृती होती असे भूगर्भ शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे. ह्या राज्यात पैसा मुबलक. तसेच बंदुकाही परवान्याशिवाय, मिळू शकतात. ह्यूस्टन शहर टेक्सासमध्ये आग्नेयेस आहे. ह्यूस्टनमध्ये वास्तुशास्त्राला भरपूर वाव, त्यामुळे इमारतींच्या बांधणीत कल्पकता आढळते. ह्योस्टेनिअन म्हणजे येथला राहणारा रहिवासी! अनेक फ्लाय ओव्हर्सचे जाळे आणि चमचमणाऱ्या काचेच्या इमारती! एल पासो टॉवर ही फार ऊंच इमारत ह्यूस्टनमध्ये आहे. शहरात अनेक थिएटर्स आहेत त्यामधून वेगवेगळे शो सुरूअसतात.

विजू बरोबर गाडीतून फिरताना नेमकी तिची गाडी बंद पडली. गाडी धक्कामारून बाजूला नेली. बाजूने जाणाऱ्या प्रत्येक गाडीला विजू 'जम्प' 'जम्प' म्हणून विचारीत होती. शेवटी बाजूच्या इमारतीतून एक जोडपे बाहेर पडले.

त्यांनी बॅटरी चार्ज केली. 'जम्प' म्हणजे बॅटरी तात्पुरती दुसऱ्या गाडीवर चार्ज करणे. हे नंतर समजले! त्या अमेरिकन माणसाची बायको पूर्वी एअरहोस्टेस होती. ती पूर्वी बॉम्बेला येऊन गेली होती. त्यामुळे तिला आमच्याबद्दल सहानुभूती वाटली असावी.

ह्यूस्टन दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध, ओपन हार्ट सर्जरी आणि नासा.

ओपन हार्ट सर्जरी करणारे डॉक्टर कुली ह्यूस्टनचे! सेंट ल्युकस हॉस्पिटलमध्ये ते ही ऑपरेशनस् करतात. आपल्या देशातील अनेक प्रसिद्ध व्यक्ती येथे ऑपरेशनसाठी येऊन गेल्या आहेत, हॉस्पिटलच्या बाहेर दगडाचे एक मोठे लालचुटूक हृदय प्रतीक म्हणून लावलेले आहे.

म्युझियम व इतर ठिकाणे दाखवून, दाबके आम्हाला त्यांच्या अपार्टमेंटवर घेऊन गेले. एका मित्राबरोबर ते त्या छोट्याशा जागेत राहत होते.

दुसऱ्या दिवशी भडकमकर आम्हाला 'नासा' ह्या सुप्रसिद्ध ठिकाणी घेऊन गेले. चंद्रावर जाणारी अंतराळयाने खरे म्हणजे केप केनडी मायामीच्या तळावरून सोडली जातात. म्हणजेच अमेरिकेच्या पूर्वेकडून सोडली जातात. परंतु ह्या अवकाशयानांचे नियंत्रण नासा येथून केले जाते. ह्यूस्टनपासून काही मैलांवर 'नासा' एका फार मोठ्या जागेवर पसरलेले आहे. प्रतीक म्हणून नासाच्या बाहेर एक मोठे रॉकेट आडवे ठेवलेले आहे. त्याच्या बाजूला रॉकेटसचे भाग, कॅपसूल आणि खालचा भाग मांडून ठेवलेले आहेत.

आतमध्ये एक फार सुंदर म्युझियम आहे. अवकाशयानामध्ये बसण्याची आसने! अवकाशयानात वापरण्यात येणारे पोशाख, ग्रहांवर उतरल्यावर तिथे वापरण्याच्या वेगवेगळ्या गाड्या, आणि आतापर्यंत सोडण्यात आलेल्या रॉकेटस्ची हुबेहूब मॉडेल्स रांगेने मांडून ठेवली आहेत. चंद्रावरून आणलेले दगड, चंद्राच्या पृष्ठभागावरून घेतलेले अमेरिकेचे छायाचित्र पाहताना फारच मजा येते. ज्या ठिकाणाहून रॉकेट नियंत्रित केले जाते ती रूम व ते कसे नियंत्रित केले जाते याचे प्रात्यक्षिकही बघावयास मिळाले. अवकाशयानातून जाणाऱ्या शास्त्रज्ञांना शिक्षण देण्यासाठी मोठमोठ्या प्रयोगशाळा तिथे आहेत. हे सारे पाहून फार आनंद झाला!

ह्यूस्टनचा मुक्काम दोन दिवसांचाच होता, व नंतर ओरलँडोला जाणार होतो आम्ही. परंतु इतक्या मोठ्या प्रवासात प्रथमच पंचाईत झाली. वीकएंड असल्यामुळे ओरलँडोचे तिकीट मिळाले नाही. ओरलँडोला निरोप पोहोचायला हवा होता. म्हणून फोनवर सुनीलाच्या चुलत बहिणीशी बोलण्याचा प्रयत्न केला.

पण नंबर लागत नव्हता. लॉस एन्जलिसवरूनही प्रयत्न केला. कदाचित नंबर बदलला की काय त्याची चौकशी करण्यास विजूला सांगितले. नंबर बरोबर आहे पण फोन कोणी उचलत नाही, असे ऑपरेटरने सांगितले.

ओरलँडोला एकच दिवस मुक्काम होता. तेव्हा मॉटेलमध्ये रहावयाचे ठरविले होते. पण तिकीटच न मिळाल्यामुळे आता ह्यूस्टनचा मुक्काम दोन दिवसानी वाढवावा लागला. शनिवार असल्यामुळे विजूने दिवसभर ह्यूस्टनमध्ये फिरवून आणले.

ह्यूस्टनमध्ये आणखी एक वैशिष्ठ्य जाणवले. काचेच्या इमारती वेगवेगळ्या आकाराच्या. अगदी आकाशाला भिडणाऱ्या तिथे पहावयास मिळाल्या. चॉकलेटी रंगाच्या स्वच्छ काचा! त्यातून स्वच्छ निळ्या आकाशाचे पडलेले प्रतिबिंब! आपल्याकडे अशा इमारती बांधल्या तर? दंगलीमध्ये सगळ्यांचा चक्काचूर होईल!

शिल्पकार व स्थापत्यकार यांचे कौतुक वाटले. सुंदर सुंदर इमारती त्यातील काहीतर खानोलकर नावाच्या मराठी आर्किटेक्टने बांधलेल्या! ह्यूस्टनमध्ये अनेक मराठी माणसे आहेत. त्यामुळे 'महाराष्ट्र मंडळ जोरात चालते. दिवाळी गणपतीला सर्वजण एकत्र येतात. ही मराठी कुटुंबे एकमेकाला सांभाळून आहेत. कोणाला काही अडचण आली तर मदत करायला सगळी तयार! कोणाला वीकएंडला बाहेर जायचे असेल तर मुलांना दुसऱ्या कुटुंबात सोडून खुशाल जातात.

नाहीतरी मुलांना आई-वडिलांबरोबर राहण्याची संधी फार कमीच. मूल सहा महिन्यांचे झाले की त्याची खोली निराळी. एकट्यानेच सर्वकाही करावयाचे. स्वावलंबी जीवन! आईच्या मागे भोकाड पसरणारी भारतातील काही मुले तिकडे पाठविण्यास काय हरकत आहे असे क्षणभर मला वाटले. मुलांना त्यामानाने आईबापाचे वात्सल्य कमीच मिळते. वीकएन्ड आला की आई-बाप पार्टीसाठी बाहेर पडतात. मुलांना पार्टीला नेले तर मुले आपली वेगळी खेळतात. त्यामुळे मुलांना आईबापाचा फारसा लळा नसतो.

रात्री विजूने मला श्री गाड ह्यांच्याकडे डॉ. परुळेकरांबरोबर गप्पा मारण्यास नेले. मुंबईमधील के. इ. एम् हॉस्पिटलचे डीन डॉ. परुळेकरांचे हे सख्खे बंधू! ठाकूरद्वारमध्ये प्रॅक्टीस! माणूस विनोदी! दर चार-पाच वर्षांनी ते मुंबईहून अमेरिकेत येतात. त्यांच्याशी चांगल्या दिलखुलास गप्पा झाल्या. मुंबईत पुन्हा भेटण्याचे ठरवून आम्ही परत आलो.

शेवटच्या दिवशी विजूने आम्हा सर्वांना किडीझ् कॉर्नरमध्ये नेलं. मुलांसाठी वेगवेगळे छान गेम्स होते. मोठ्यांनाही मज़ा येते. तसेच मॉलमध्ये जाऊन थोडीफार खरेदी केली.

शनिवारी रात्री विजूच्या घरी बार्बेक्यू चिकन! श्री अनिल भडकमकर ब्राह्मण. स्वतः चिकन खात नाहीत पण आम्हाला जेवतांना गरम गरम पीसेस आणून देत होते. मजा आली.!

दुसऱ्या दिवशी ओरलँडोला जायला निघालो. भडकमकर पुन्हा आम्हाला सोडण्यासाठी एअरपोर्टवर इतक्या लांब आले. माणूस मितभाषी पण दिलदार! इतक्या लांब एअरपोर्टवर न कुरकुरता येणारा माणूस मी प्रथमच पाहिला. सहार एअरपोर्टवर जर आम्हाला कोणी यायला सांगितले तर आम्ही कंटाळा करू. भडकमकर आतपर्यंत आले.

●●●

पुन्हा पुन्हा पहावे असे ओरलँडो

विमानाने आकाशात झेप घेतली. ओरलँडोला डायरेक्ट फ्लाईट नव्हती मायामीत उतरून दुसरी फ्लाईट पकडावयाची होती. मायामीतही एक दिवस थांबण्याचे मनात होते. तिथेही माझ्या पेशंटना फोन केला होता. पण ह्यूस्टनचा मुक्काम दोन दिवस वाढल्यामुळे मायामीत थांबण्याचा प्रश्न निकालात निघाला होता.

मायामी एअरपोर्टवर आम्ही ट्रान्झिटमध्ये होतो. पॅन ॲम कंपनीचे मायामी हे माहेरघर. सर्व ठिकाणी एअरपोर्टवर त्यांची विमाने होती. हल्ली मात्र मायामी हे गुन्हेगारीबद्दल जास्त प्रसिद्ध आहे. पूर्वी शिकागोचा नंबर होता, आता मायामी! दरोडे, बलात्कार हे नेहमीचेच! खून सर्रास! त्यामुळे मायामीस उतरण्यास मन नाखूष होते. मायामी हे अमेरिकेचे दाक्षिणपूर्वेकडचे टोक. काहीशी मागास लोकांची वस्ती, तरीपण निसर्ग सौंदर्यामुळे उतरावेसे वाटत होते. पण ओरलँडोला भेट द्यायची ठरल्यावर मायामी आयत्यावेळेस रद्द!

ओरलँडोचे विमान पकडून ओरलँडो एअरपोर्टवर उतरलो. विमानतळ त्या मानाने छोटा! पण वर्दळ जास्त! पर्यटन स्थान म्हणून अनेक प्रवासी येथे वीकएंडला येतात. विमानतळावर उतरल्यावर सामान लॉकरमध्ये ठेवण्यासाठी गेलो. लॉकर पहिल्या मजल्यावर होते. पण ते लॉकर ओपन! आपल्या बॅगा क्लोकरूममध्ये आपणच ठेवावयाच्या, काऊंटरवरून नंबर घेऊन पैसे भरावयाचे. आपल्या पुण्यामुंबई सारखे!

क्लॉकरूमचा मॅनेजर भारतीय वाटला. त्याला विचारले "आर यू फ्रॉम इंडिया?" तो हसत म्हणाला "यस सर, आय ॲम फ्रॉम केरला, साऊथ इंडिया" सामान बाजूला ठेऊन, दोन मिनिटात गाववाल्याशी गट्टी केली! त्यामुळे बराच फायदा झाला.

मॅनेजरकडे टेलीफोन डिरेक्टरी मागितली, व सुनीलाच्या चुलत बहिणीचा पत्ता शोधण्याचा प्रयत्न केला. अनंता जोशी, शेवटी डिरेक्टरीत नंबर सापडला. पण 'ए-जोशी' म्हणून दोन नंबर होते. एका नंबरवर बेल वाजली पण कोणी फोन उचलत नव्हते. दुसरा नंबर फिरवला. फोन लागला पण तो जोशी, ए फॉर अनंता नव्हता. तर गुजराथी जोशी होता. प्रवासात प्रसंगावधान व समयसूचकता लागते. त्याचा उपयोग करून त्या जोशी भाईंना विचारले "डू यू नो एनी महाराष्ट्रीयन जोशी."

"जोशी! सर. आय डोन्ट नो"

"ओके. यु गॉट एनी महाराष्ट्रीयन फ्रेन्डस?"

"यस. आय हॅव फ्यू."

"प्लीज कॉन्टॅक्ट देम ॲन्ड आस्क देम इफ दे नो एनी बडी नेमड. अनंता जोशी. यू सी, वुई आर वेटिंग ॲट एअरपोर्ट फॉर अनंता जोशी" वुई हॅव कम फ्रॉम बॉम्बे." ही मात्रा लागू पडली.

"प्लीज रिंग मी आफ्टर टेन मिनिटस्. आय विल गिव्ह यु प्रॉपर इन्फॉर्मेशन. "ओ के" हायसे वाटले! पुढील दहा मिनिटे महत्त्वाची होती. कारण एकतर एअरपोर्टवर हवा खायची नाहीतर मॉटेलसाठी पैसे खर्च करावयाचे आणि ते सुद्धा फक्त रात्रीचे सहा तासांसाठी.

दहा मिनिटांनी फोन केला. त्या जोशीभाईंनी सांगितले की तुमचा अनंता जोशी डेन्टीस्टकडे आहे, आणि त्याचा फोन नंबर हा आहे. रिअली वंडरफूल! चटकन् त्या नंबरवर फोन केला. अनंता जोशी स्वतः होता. आम्ही दोघेही अनंता जोशीना डायरेक्ट ओळखत नव्हतो, पण सुनीलाने ओळख पटवून दिली, आणि अर्ध्या तासाने अनंता जोशी आम्हाला नेण्यासाठी एअरपोर्टवर आला. एअरपोर्टच्या खुर्च्यांवर अवघडून बसण्याऐवजी गादीवर निवांतपणे झोपावयास मिळणार होते रात्री!

म्हणतात ते खोटे नाही. कोठेही गेलो तरी कोणीतरी ओळखीचे अथवा प्रेमाचे भेटते हे खरे! लॉकरमध्ये सामान ठेऊन आम्ही खाली आलो.

थोड्या वेळात एका अत्यंत सुंदर गाडीतून एक निळ्या डोळ्यांचा राजबिंडा माणूस उतरला. त्याने हसत स्वतःची ओळख करून दिली व मग त्याच्या सुंदर गाडीत विराजमान होऊन आम्ही त्याच्या घरी जाण्यास निघालो. खरंच अनंता यू आर रिअली ग्रेट! अनंताने आमच्यावर खरंच अनंत उपकार केले होते.

प्रवासामध्ये पैसा वाचविणे हे परदेशात अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी तर आम्ही धडपडत होतो! तुम्ही म्हणाल काय चिक्कू आहेत डॉक्टर, पण तसे नाही. भारतातून परदेशात जाताना आपल्याला पाहिजे तेवढा पैसा नेता येत नाही. बंधने असतात. तेव्हा प्रवासाची आवड आणि पैसा याचा मेळ घालावाच लागतो.

अनंता जोशीबरोबर गाडीतून त्याच्या घरी जाताना त्याचे प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि अ अ करीत बोलण्याची स्टाईल आम्हावर एकदम छाप पाडून गेली. घरी जाताना त्याने राजमार्गावरून नेले. ओरलँडोला अमेरिकेत फारच महत्त्व येत चालले आहे. तेथे हॉलीवूडसारखे दुसरे चिटपटांचे चित्रण करणारे केंद्र एक-दोन महिन्यात चालू होणार आहे.

ओरलँडोचे दर्शन फार सुखकारक वाटले. टुमदार बंगल्यांना वळसा घालून अनंताच्या बंगल्याकडे आलो. फारच सुंदर बंगला! असा बंगला अमेरिकेत दुसऱ्या कुठेही पहावयास मिळाला नव्हता. आजूबाजूला नट नट्यांचे बंगले! मागे सुंदर बॅकयार्ड, शांत वातावरण, सुंदर व स्वच्छ रस्ते! अमेरिका म्हणजे काय चीज आहे आणि भारतीय अमेरिकेत का धावतात ते अनंताच्या बंगल्यावरून कळले. बंगल्यापुढे हिरवळ व चार-पाच पायऱ्या चढून गेले की बेडरूमस् आणि बाजूला अद्यावत किचन! मागच्या बाजूला पुन्हा हिरवळ आणि रांगेने बंगले! पक्ष्यांचा किलबिलाट आणि पौर्णिमेच्या चंद्राचे सुंदर दर्शन!

अनंताची बायको सौ.अलका तिथे नव्हती. बाळंतपणासाठी नणंदेच्या घरी, मिसीसिपीला होती. रात्री किचनमध्ये आम्लेट, ब्रेड व फळे खाऊन झोपलो.

सकाळी एपकॉर्ट सेंटर पहावयास जाण्याचे ठरले होते. आमचा फक्त एकच दिवसाचा मुक्काम होता. शिवाय आम्ही येणार हे आधी कळविले नव्हते, त्या दिवशी सकाळी अनंताची एक अर्जंट मीटिंग होती - तरी त्याने मीटिंगला जाता जाता आम्हाला गाडीतून एपकॉर्ट सेंटरला सोडण्याचे कबूल केले.

सकाळी उठून आंघोळी आटोपून अनंताच्या गाडीतून एपकॉर्ट सेंटरकडे निघालो. लांबून एक पृथ्वीसारखा गोळा आकाशात दिसू लागला. 'आले एपकॉर्ट सेंटर' म्हणत अनंताने गेटवर गाडी थांबविली, तिकीटे काढण्यासाठी मी खिशात हात घातला, 'थांबा', म्हणत अनंता शेजारच्या ऑफिसमध्ये गेला व आम्हा चौघांसाठी चार तिकीटे घेऊन आला. मी तिकीटांचे पैसे विचारले आणि खरोखरंच मला आश्चर्याचा धक्का बसला. अनंता जोशी म्हणाला "डोन्ट वरी डॉक! आय ॲम वर्कींग फॉर धिस काऊंटी ओनली! आय गॉट फ्री पासेस फॉर यू!" "ओ रियली?" तोंडाचा आ करीत आश्चर्याने मी म्हणालो. चक्क दीड-दोनशे डॉलर्स वाचले होते! आधी माहीत असते तर अनंताच्या घरीच दोन दिवस मुक्काम वाढविला असता. मस्त! डिस्नेलॅन्ड पुन्हा पहावयास मिळाले असते, पण मुक्काम वाढविणे अशक्य- कारण संध्याकाळच्या फ्लाईटची तिकीटे बुक झाली होती व ओके केली होती.

अनंताचा निरोप घेताना 'थोर तुझे उपकार, अनंता थोर तुझे उपकार! असे मनात म्हणत अनंताचा हात काही क्षण मी हातातच दाबून ठेवला.

"अहो" सुनीला काहीतरी म्हणत होती "निघण्याच्या गडबडीत सलील मृगयाची जॅकेटस आणायला विसरलो बहुतेक" इतकी सुंदर जॅकेटस आणि पुढे प्रवासात भयानक थंडी असणार! अनंताच्या ते लक्षात आले. त्याने चटकन् घड्याळाकडे पाहत वेळेचा अंदाज घेतला. तो म्हणाला, "हे बघा, आता नऊ

वाजले आहेत. साधारण अकरा वाजता तुम्ही इटालियन विंग जवळ असाल. तिथे मी येतो तुमची जॅकेटस् घेऊन, ओके?''

''पण तुमचे घर इतक्या लांब, तुम्हाला फुकट त्रास. त्यापेक्षा राहू देत ती जॅकेटस.''

''यू डोन्ट वरी, कम ऑन, डोन्ट वेस्ट टाईम. एपकॉर्ट सेंटर नीट पहा जा लवकर'' बरं, म्हणून आम्ही आत गेलो.

अनंता जोशी हा एपकॉर्ट काऊंटीतच मोठ्या पदावर कामाला होता. पॅरिसलाही लवकरच असे सेंटर चालू होणार आहे. त्यासाठी दर दोन महिन्यानी त्याला पॅरिसला जावे लागे. असो.

एपकॉर्ट सेंटरवर आमचा नंबर लवकर लागला. मॅजिक किंग्डम, एपकॉर्ट सेंटर आणि एम. जी. एम स्टुडिओ अशा तीन भागात येथील डिस्नेलँडची विभागणी केलेली आहे. हे सर्व नीट पहावयाचे म्हटलं तर एक आठवडा तरी हवा. म्हणूनच तिकीट काढतांना एक दिवसाचे, दोन दिवसांचे किंवा चार-पाच दिवसांचे एकदम काढता येते. आम्हाला फक्त एपकॉर्ट सेंटर पहावयाचे होते. आणि ते ही केवळ आठ तासात!

एपकॉर्ट म्हणजे एक्सपिरमेंटल प्रोटोटाईप आफ दि सिटी ऑफ टुमॉरो'' बाकी डिस्नेवर्ल्ड आम्ही लॉस एन्जलीसला पाहिले होते. खास म्हणजे जंगल क्रुझ, टुमॉरो लँड, फँटसी लँड, ॲडव्हेंचर लँड. पण ह्यातही काही गोष्टी येथे पुन्हा पहावयास मिळाल्या. सरकत्या पट्यावरून चालणाऱ्या गाड्या व बोटीतून अंधाऱ्या बोगद्यात प्रवेश केल्यावर आजूबाजूला ओरडणारे व अंगावर चालून येणारी रेड इंडियन माणसे. तसेच अगदी जुन्या काळापासून आजच्या कॉम्प्युटर युगापर्यंतचा इतिहास आणि त्यानंतर उद्याच्या जगात होणाऱ्या सुधारणा पाहून डोळ्यांचे पारणे फिटते. फँटसी-लँडमध्ये देशोदेशीच्या बाहुल्या इटस्-ए-स्मॉल वर्ल्ड ह्या विभागात पहावयास मिळतात. हे जग किती लहान आहे ह्याचे महत्त्व येथे पटते.

एपकॉर्ट सेंटरमध्ये 'स्पेस स्टेशन अर्थ' म्हणून भलामोठा जांभळा चमचमणारा गोळा दिसला. मी घाबरून बाहेरच चित्रीकरण करीत उभा होतो. पण आतमध्ये थिएटर होते. शो सुरू झाला की थिएटर हलू लागते, आतल्या खुर्च्या हलू लागतात. रक्तातील तांबड्या पांढऱ्या पेशी हृदयाच्या झडपांमधून प्रवास करताना आपणही जणू काही फार वेगाने फेकले जात आहोत असे शो पाहून आल्यावर आमच्या सुनीलाने सांगितले. 'क्रेनियम कमांड' हा दुसरा शो ह्याच धर्तीचा, स्पेस शिप अर्थ, दि लिव्हींग सीज, द लँड, जर्नी टू इम्यॅजिनेशन,

वर्ल्ड ऑफ लाईफ, वर्ल्ड ऑफ मोशन, होरायझन्स, युनिव्हर्स ऑफ एनर्जी वगैरे कार्यक्रमातून मानवाची वैज्ञानिक प्रगती व भविष्यकाळातील जीवनाचे दर्शन घडते.

वर्ल्ड शोकेस पहावयास सुरुवात केली. मेक्सिको, नॉर्वे, चीन, जर्मनी पहात इटालीच्या दालनात अकरा वाजता आलो. तिथे अनंता आमची जॅकेटस् घेऊन आला होता, बिचारा आमच्या जॅकेटस्साठी मीटिंग सोडून आला होता! सलील-मृगयाला जॅकेटस् मिळाली होती. अनंताचे थँक्स मानले. पुढे अमेरिका, जपान, मोरोक्को, फ्रान्स, इंग्लंड ह्या देशांची दालनेही पाहिली. प्रत्येक देशाच्या दालनात त्या देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडविले होते. आपल्या भारताला मात्र तेथे स्थान नव्हते म्हणून वाईट वाटले.

आत्तापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी सिनेमागृहे पाहिली होती. सर्कारामामध्ये वर्तुळाकार पडद्यावर चित्रपट दाखविला जातो. आपण फक्त सेंटरला उभे रहावयाचे. दुसऱ्या एका ठिकाणी, खुर्च्यांवर बसल्यावर चित्रपट सुरू झाला की खुर्च्याही पट्टयावरून वेगवेगळ्या दिशेने हलू लागतात, त्यामुळे चित्रपट अतिशय वास्तव वाटतो. ह्यूस्टनला तर मजा झाली. एका चित्रपट गृहात आम्ही खुर्च्यांवर जाऊन बसलो. चित्रपट चालू झाला आणि आश्चर्य म्हणजे खुर्च्या पूर्णपणे मागच्यामागे आडव्या होत होत्या. चित्रपटाचा पडदा संपूर्ण अर्धवर्तुळाकार होता. त्यामुळे चित्रपट पुढे, वर आणि मागे अशा भव्य पडद्यावर पाहण्यास मिळत होता. अशाच एका पडद्यावर आम्ही ग्रँड कॅनियॉनचा चित्रपट पाहिला, फारच सुंदर! अमेरिकेतील हा भाग आम्हाला पाहता आला नाही, पण अशा प्रकारच्या चित्रपटग्रहात हा चित्रपट पाहतांना आपण विमानात बसून डोंगर कपारीतून भराऱ्या मारीत आहोत असे वाटते, धबधब्याचे पाणी अगदी अंगावर येत आहे असे भासते. काही ठिकाणी थ्री डायमेन्शनल परिणाम साधण्यासाठी आम्हाला रंगीत चष्मे वापरायला दिले होते. त्यामुळे आपण त्या दृष्याचाच भाग आहोत असे हुबेहूब भासते.

होरायझन्स. (क्षितिज) युनिव्हर्स ऑफ एनर्जी. ह्या कार्यक्रमामध्ये आम्हाला डायनोसार्स प्राण्यांच्या लढाईपासून ते ऊर्जेच्या परिणामांचे विसावे शतक, एकविसाव्या शतकातील स्थित्यंतरे, मायक्रो व मॅक्रो फोटोग्राफीच्या सहाय्याने पहावयास मिळाली.

संध्याकाळचे सहा वाजत आले होते. एपकॉर्ट सेंटर बंद होत होते. रात्री आठ वाजताचे विमान पकडून शिकागोला जावयाचे होते. टॅक्सी पकडून थेट एअरपोर्टवर आलो. लॉकरमधून सामान घेतले व शिकागोच्या विमानात बसलो.

●●●

दि ग्रेट शिकागो

अमेरिकेतील दक्षिण बाजू सोडून आम्ही आता उत्तरेकडे चाललो होतो. शिकागो कडे! शिकागो हे अमेरिकेतील अत्यंत गजबजलेले शहर. तसेच गुन्हेगारीबद्दल प्रसिद्ध! काही वेळाने विमान शिकागोच्या जवळ आले. इंजिनांचा आवाज बदलला. आणि विमान अलगद विमानतळावर उतरले. झगझगत्या प्रकाशात शिकागो न्हाऊन निघाले होते. ह्या शहराच्या एअरपोर्टवर एका दिवसात जास्तीत जास्त विमाने उतरतात व उडतात. तुम्ही म्हणाल चूक, लंडनच्या हीथ्रो एअरपोर्टच प्रथम क्रमांकाचा! खरं आहे तुमचे म्हणणे. इंटरनॅशनल फ्लाईटस्मध्ये हीथ्रोचा क्रमांक पहिला, पण डोमेस्टिक व इंटरनॅशनल फ्लाईटस्मध्ये शिकागो अग्रेसर आहे.

विमानतळावर उतरल्यावर बॅगेज क्लेम करण्यासाठी साधारण पंधरा ते वीस मिनिटे चालावे लागले. आपला फ्लाईट नंबर लक्षात ठेवीत व मार्गातील बाणांनी दाखविल्याप्रमाणे बॅगेज क्लेमकडे चाललो होतो. एअरपोर्ट जुना असला तरी सजावट अद्यावत होती. त्यामुळे वेगळीच शोभा आली होती. इतका वेळ चालल्यावर बॅगा मिळण्यास आणखी वेळ लागेल असे वाटत होते. पण अहो आश्चर्यम! आमच्या अगोदरच बॅगा पोहोचून पट्ट्यावर गरागरा फिरत होत्या. आम्ही बॅगा उचलत होतो तेवढ्यात एक सहा फूट उंचीचे देखणे गृहस्थ जवळ आले व "आपण डॉक्टर कवळी का? मी घारपुरे!" मी 'हो' म्हणे पर्यंत आमच्या दोन जड बॅगा त्यांनी उचलल्या सुद्धा.

बिचारे घारपुरे! ऑफिस चार वाजता सुटल्यावर, आमच्यासाठी एअरपोर्टवर रात्री साडेनऊपर्यंत वाट पहात बसले होते. अमेरिकेत वेळेला फार महत्त्व. पण आमचे मागल्या जन्मीचे पुण्य म्हणून अशी माणसे भेटत होती आम्हाला.

शिकागोमधील दोघाचौघांचे पत्ते जवळ होते. तरी माझे पेशंट व प्रसिद्ध टीकाकार प्रा. माधव मनोहर यांची मुलगी लीना हिची पूर्वीची ओळख असल्यामुळे तिच्याकडे जाण्याचे ठरविले होते. विमानतळावर आलेले घारपुरे हे लीनाचे पती! लीनाने आधीच फोनवर, 'माझा नवरा मितभाषी आहे तेव्हा गैरसमज करून घेऊ नका' अशी सूचना देऊन ठेवली होती.

प्रवासामध्ये एक गोष्ट मी अनुभवातून शिकलो होतो. कोणत्याही माणसाला आपलासा करण्यासाठी पहिल्या भेटीत त्याच्या आवडी विषयी माहिती करून घ्यावयाची. त्यातील ज्या आवडीबाबत त्याचे व माझे जमत असेल त्यावरच

बोलावयाचे, किंवा त्याबाबत इंटरेस्ट दाखवावयाचा, ह्यामुळे माणसे फार लौकर जोडली जातात. माणसांना एकमेकांबद्दल प्रेम निर्माण होते, आणि ह्या प्रेमाची शिदोरी बरोबर असली की कोणताही प्रवास मग तो कितीही अवघड राहो, सुखकर होतो. ह्यासाठी आपला स्वभाव बोलका हवाच! एखाद्या बाबतीत आपले पटत नसले तरी तेवढ्या पुरत्या आपल्या आवडी निवडी बाजूला ठेवण्याची तयारी हवी.

शिकागो हे अमेरिकेतील एक अवाढव्य शहर. अमेरिकेतील सर्वात मोठे रेल्वे टर्मिनसही येथें आहे, असो.

तर श्रीकांत घारपुरे हा एक मितभाषी माणूस! सुन्दर व्यक्तीमत्व! आणि घरी गेल्यावर चाटच पडलो. अमेरिकेत आजपर्यंत मी कोणाहीकडे पाहिला नव्हता एवढा मोठा जम्बो टी. व्ही आणि छानपैकी म्युझिक सिस्टीम! वा! बहोत खूब! एकंदर ह्या माणसाला संगीताची आणि सिनेमाची आवड दिसते आहे तर! श्रीकांतबरोबर इंग्रजी चित्रपटांबद्दल गप्पा मारता मारता हिंदी चित्रपटांवर आलो, गप्पा चांगल्याच रंगत होत्या.

"अहो गप्पा मारा मागून, आधी जेवून तर घ्या" लीनाने सांगितले.

"डॉक्टर, तुम्ही 'उमराव जान' पाहिला आहे का हो?"

" वा! पाहिला आहे काय विचारता? अहो गजानन जहागिरदारानी तो मुंबईत लागण्याआधी मला त्याची व्हिडिओ टेप दिली होती. आणि मी माझ्या व्हिडिओ कॅसेटवर तो टेप करून घेतला आहे. वेळ मिळाला की बघतो मी मधून मधून" मी म्हणालो.

"अस्सं! मी उमराव जान किती वेळा पाहिला असेल, तुम्हाला वाटतं?

"असेल दहा पंधरा वेळा"

"पन्नासवेळा - आणि आज पण आपण पाहुया, जेवता जेवता. तुम्हाला नाही वाटत रेखाने लग्न कशाला केले म्हणून? अरे, आमच्या सारख्या चहात्यांना नाराज केले तिने"घारपुरे रंगात आले होते, वा! घारपुरेंचा व माझा स्वभाव आवडी निवडी जमल्या होत्या, मग काय, गप्पाच गप्पा! आणि एकंदरीत आम्हा दोघांना गप्पात रंगलेले पाहून लीनाही खूश! नवऱ्याला कोणीतरी तात्पुरता दोस्त मिळाला म्हणून. प्रवास संपवून मुंबईला आलो तेव्हा समजले की रेखाच्या नवऱ्याने आत्महत्त्या केली! वाईट वाटले पुन्हा एकदा रेखा एकटी राहिल्याचे दुःख झाले. पण मग घारपुरेंची आठवण झाली! घारपुरेंसारखे चहाते असल्यावर रेखा संसार तरी कसा करणार?

घारपुरेंकडची म्युझिक सिस्टीम कॉम्पॅक्ट डिस्क. व्हिडिओची लेसर डिस्क, एकापेक्षा एक आत्याधुनिक संगीत व टीव्हीचे साहित्य. लेसर डिस्कवर 'उमरावजान' चित्रपट आणि तोही जम्बो टीव्हीवर. एकंदरीत काहीतरी वेगळाच अनुभव! रात्री उशीरा झोपी गेलो.

सकाळी घारपुरेनी आम्हाला सायन्स म्युझियमजवळ सोडले. म्युझियम बघितल्यानंतर सिअर्स टॉवर पाहण्यास जाणार होतो. म्युझियमला जाताना डाव्या बाजूला अथांग असा जलसागर दिसला. हा तलाव की समुद्र, काही कळेना.

"हा बाजूला दिसतोय तो लेक मिशिगन. त्याच्या पलीकडे डेट्रॉइट शहर" घारपुरेंनी सांगितले.

हा तलाव? एवढा मोठा! बापरे! आणि त्याच्या पलीकडे काय हा प्रश्न मनात आलाच होता माझ्या. 'पलीकडे काय?' हा माझ्यापुढे अनेकदा उभा रालिलेला प्रश्न. कुठेही गेलो की त्या पलीकडे काय हे जाणून घेण्याची भयानक उत्सुकता! रेल्वे स्टेशनच्या पलीकडे काय? डोंगराच्या पलीकडे काय? क्षितिजाच्या पलीकडे काय? ह्या पलीकडे. पलीकडे पाहण्याच्या आवडीमुळे जर मी पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास निघालो होतो, आणि सर्व काही गोल आहे म्हणून शेवटी पहिल्याच ठिकाणी येणार होतो.

गाडी एका भव्य इमारती समोर थांबली. "हा म्युझियम" घारपुरे म्हणाले. "म्युझियम बघून झाला की बस पकडून सिअर्स टॉवरला या. संध्याकाळी ठीक सहा वाजता मी तिथे तुम्हाला नेण्यास येतो" घारपुरेंनी आमचा प्रोग्राम ठरवून दिला व ते ऑफिसला गेले.

म्युझियम पाहण्यास पुष्कळ ठिकाणी तिकीट नसते.

म्युझियममध्ये निरनिराळे विभाग होते. त्यामध्ये वेगवेगळी मॉडेल्स मांडून ठेवली होती. खऱ्या छोट्या विमानापासून ते आगगाडीच्या छोट्या मॉडेल पर्यंत सर्व काही त्या दालनांत होते. बाजूच्या दालनांत प्रवेश केला, तिथे शरीराला लागणारे वेगवेगळे खाद्यपदार्थ व्यवस्थित मांडले होते. बाजूला एका शो-केस मध्ये अंडी ठेवली होती व कवच फोडून कोंबडीची पिले बाहेर येताना दिसत होती. विमानाचे व पाणबुड्या बोटींचे दालन फार बघण्यासारखे होते.

डायनोसॉर ह्या प्राण्याबद्दल अमेरिकेत फार आपुलकी. अति प्राचीन काळातील हे जिराफ ची लांब मान, हत्तीसारखे मोठे पोट, व शेपटी. पुढील पाय मोठे व मागील पाय छोटे. ह्या प्राण्यांचे सांगाडे सर्व म्युझियममध्ये व्यवस्थित

मांडून ठेवलेले आढळतात. एका ठिकाणी मनुष्याच्या हृदयाचे मोठे मॉडेल ठेवलेले होते, त्या मॉडेलमधून आत-बाहेर करण्यात मुलांना मजा वाटत होती.

अमेरिकेतील म्युझियमस्मध्ये 'इथे हात लावू नये' असे बोर्ड लावलेले नसतात. मुलांना सर्वठिकाणी उपकरणे हाताळण्याची मुभा असते. बटन दाबून आपल्याला पाहिजे ती माहिती ऐकता येते. एका दालनामध्ये कोळशाच्या खाणीचा भाग दाखविलेला आहे. खाणीच्या ट्रॉलीमधून मुले आरडा-ओरडा करीत बाहेर पडत होती. एका दालनात एका प्रसिद्ध नटीने दिलेल्या बाहुल्या ठेवलेल्या आहेत. तर दुसऱ्या दालनात पूर्वीच्या व आताच्या मोटारगाड्या ठेवलेल्या आहेत.

म्युझियम पाहून बाहेर आलो. आता 'सिअर्स टॉवर' पहावयास जावयाचे होते. म्युझियम बाहेर बस पकडली. ह्यावेळी बसमध्ये वेगळाच अनुभव! बसमध्ये बहुतेक निग्रो लोकांचा भरणा! बस शिकागोच्या बकाळ वस्तीतून जात होती. एवढी घाण वस्ती अमेरिकेत काय परदेशात प्रथमच पाहत होतो. बस थांबली की निग्रो चढत उतरत होते. दोहो बाजूंना जुनाट इमारती. खिडकीतून व पायऱ्यांवर काळे गोरिलासारखे चेहेरे. "ए गाय! कम ऑन" हे शब्द सारखे ऐकू येत होते. का कोणास ठाऊक पण प्रथमच अमेरिकेत भीती वाटली. पाऊण तासाच्या ह्या घुसमटवणाऱ्या प्रवासानंतर पुन्हा प्रसन्न शिकागो दृष्टीस पडले. मोठा मिशीगन तलाव आणि त्याच्या बाजूस इमारती दिसू लागल्या. लांबून दिसणाऱ्या इमारतींमध्ये एक काळा उंच चबुतरा एका काळ्या बिल्डींगवर दिसू लागला.

"हाच तो सिअर्स टॉवर असावा" मी सुनीलाला म्हटले! ड्रायव्हर जवळ जाऊन "वुई वाँट टु गेट डाऊन निअर सिअर्स टॉवर" म्हणून त्याला सांगितले. ड्रायव्हर निग्रो! त्याने दोन-चार इमारतींना वळसा घातला आणि आम्हाला उतरण्यास सांगितले.

आजूबाजूला मोठमोठ्या बिल्डींगस् होत्या. जवळच सिअर्स टॉवर! खाली मोठे दालन! सिअर्स टॉवर हा मानवाने बांधलेला सर्वात उंच टॉवर! ह्याच्या बांधकामामध्ये काळे ॲल्युमिनियम व ब्रॉन्झ ह्याचा प्रामुख्याने उपयोग करण्यात आला. ह्या टॉवरमध्ये, मूळ इमारत व त्यावरती टॉवर असे दोन भाग. इमारतीची उंची १४४५ फूट (४४३ मीटर्स) १०३ मजले .

अँटेना व टॉवरसकट उंची १७०७ फूट ११० मजले. लिफ्टने १०३ मजल्यावर जाता येते, तेथून पाहण्यासाठी गॅलरी! बांधकामास तीन वर्षे लागली. सांगाडा बांधण्यास ७६ हजार टन पोलाद लागले. ७५ X ७५ फुटाचे ९ चौक आणि त्याचा पाया जमिनीत एक एकर क्षेत्रात. कास्याचा (ब्राँझचा) मुलामा व १६००० खिडक्या! वीजप्रवाह बंद पडल्यास जनरेटर्सची सोय. वर्षातून आठ

वेळा, इमारत सहा यंत्रानी बाहेरून स्वच्छ धुतली जाते. रोज १२००० लोक ह्या इमारतीत कामासाठी येतात. १५०० लोकांचे उपहारगृह आहे. इमारतीतली लिफ्ट एका मिनिटात गॅलरीत येते. म्हणजे १०३मजले चढून जाते. कमाल! खरोखरच सर्व व्यवस्था पाहून आश्चर्य वाटते.

सिअर्स टॉवर्स म्हणजे जगप्रसिद्ध सिअर्स डिपार्टमेंट स्टोअर्सचे मुख्य ऑफिस! अमेरिकेतील जवळ जवळ प्रत्येक गावात ह्यांचे डिपार्टमेंट स्टोअर आहे, जेथे सुईपासून गरजेची प्रत्येक वस्तू मिळू शकते.

१०३व्या मजल्यावरील गॅलरीमधून मिशीगन लेक, शिकागो फूटबॉल स्टेडियम आणि अनेक फ्लायओव्हर्स दृष्टीस पडले. फ्लायओव्हर्सच्या वेगवेगळ्या वळणदार रचना, त्यावरून वेगाने जाणाऱ्या मोटारी तसेच लोहमार्गांचे विणलेले जाळे पहावयास मिळाले. बोटीचा कालवा, त्यावरील उचलला जाणारा मोटारींसाठीचा पूल. सर्व काही डोळे भरून पाहिले. बाजूच्या काही इमारतीवर हेलीपॅड होते, जिथे हेलिकॉप्टर गच्चीवर उतरण्याची सोय होती.

सिअर्स टॉवर पाहून झाला. उद्या शिकागो सोडणार म्हणून सिअर्स टॉवर वरून शिकागोचे पुन्हा दर्शन घेतले व खाली आलो. पाच वाजत आले होते. इतक्यात घारपुरे बाहेरच भेटले. त्यांच्याबरोबर घरी आलो. 'सलाम बॉम्बे' आणि 'रशिया विथ लव्ह' चित्रपटांच्या लेसर डिस्कस् पोस्टाने आल्या म्हणून घारपुरे खुशीत होते. सलाम बॉम्बेची डिस्क त्यांनी लावली आणि काय आश्चर्य! एक बाजू चक्क कोरी! काहीच नाही. शुद्ध फसवाफसवी, ह्या डिस्कस् सिएटलहून आल्या होत्या. अमेरिकेतही फसवाफसवी चालते ह्या बद्दल खात्री पटली. कदाचित बदलून मिळतील, पण पोस्टाचा भुर्दंड पडणारच. त्याचे काय? असो!

रात्री जेवण छान करून घेतले. ह्या मुक्कामात विवेकानंदांचा आश्रम पाहण्याचा योग आला नाही म्हणून वाईट वाटले. पण पुढच्या प्रवासाची आता ओढ लागली होती.

●●●

मोटार गाड्यांचे आगर डेट्रॉईट

पुढचे ठिकाण - डेट्रॉईट!

शिकागोहून ग्रे-हाऊंड बसचा दुसरा पास सुरू करणार होतो आगगाडीने ग्रे-हाऊंडच्या स्टँडवर आलो. लीना आम्हाला स्टेशनवरं सोडायला आली होती. अमेरिकेत ट्रेनचा प्रवास प्रथमच! प्रत्येक डब्यात अटेंडन्ट! तिकीटे चेक करून सीटच्या मागील बाजूस लावून ठेवतात, मजा वाटली. ग्रे-हाऊंडच्या बस स्टँडवर डेट्रॉईट बससाठी थांबलो, बसला अजून वेळ होता. एक भारतीय वाटणारा मनुष्य जवळ आला पण तो पाकिस्तानी होता. शिकागोहून न्यूयॉर्कला चालला होता. एका हॉटेलमध्ये तो वेटर होता, तरीही अमेरिकेत रहातो म्हणून मी त्याच्याकडे कौतुकाने पाहिले. माझ्यापेक्षा तो वेटर मला मोठा वाटला, कारण त्याला डॉलरचा हिशोब रूपयात करावयाचा नव्हता!

काऊंटरजवळ उभा होतो. एक निग्रो तेवढ्यात दारू ढोसून बडबडत झोकांड्या देत तिथे आला. मुंबईत दारूडे नेहमीच पाहातो पण अमेरिकेत प्रथमच पाहात होतो. मी टॉयलेटमध्ये गेलो. तो निग्रोही पाठोपाठ आला. कांहीतरी अर्वाच्य बडबडू लागला. अमेरिकेत मगिंग हा प्रकार फार चालतो. चक्क पिस्तूल किंवा चाकू टेकवून पैसे लुबाडले जातात. माझ्या एका भाच्याला न्यूयॉर्कमध्ये टॉयलेटमध्ये अशाच एका निग्रोने पिस्तूल टेकविले होते. पण तेवढ्यात दुसरा एक पॅसेंजर आल्यामुळे तो निग्रो पळाला.

माझ्या फार जुन्या पेशंट मिसेस पाटेकर यांचा मानलेला मुलगा अनिल क्षीरसागर हा डेट्राईटला होता. मिसेस पाटेकरांच्या सांगण्यावरूनच तर मला ह्या प्रवासाला निघण्याची बुद्धी झाली होती. दुर्दैवाने मी प्रवासाला निघायच्या थोडेच दिवस आधी मिसेस पाटेकरांचे अपघाताने निधन झाले होते. त्यावेळी अनिल मुंबईत आला होता व तेव्हा, त्या मनःस्थितीतही अमेरिकेला येण्याचा त्याने आग्रह केला होता.

ग्रे-हाऊंडने डेट्रॉईटला येत आहोत म्हणून फोनवर बोलणे झाले होते. आमच्या डेट्रॉईट बसचा बोर्ड लागला आणि नेहमीप्रमाणे आम्ही पहिल्या सीटस्‌वर विराजमान झालो.

बस शिकागोहून निघाली आणि अमेरिकेतील हायवेचे दर्शन झाले. सुंदर, खूपच सुंदर! रस्ता पाहून मला गाडी चालविण्याची हुक्की येत होती. गाडी स्पीडने

● आठवणी दाटतात

चालविणे हा माझा एक आवडता छंद! आणि जर असे रस्ते असतील तर! वा! एकदा वाटले, ड्रायव्हरला सांगावे, 'दे रे जरा! विश्रांती घे तू थोडावेळ!' तू वळत वळत जाणारा, सरळ सोट पाईन वृक्षांच्या राईतून जाणारा रस्ता, रस्त्यावर घाण अजिबात नाही. पाईन वृक्षांची पाने पडली तरी त्यांच्या मुळाशीच पडतात. जणू त्या वृक्षांनाही कचरा इतस्ततः करण्याची परवानगी नसावी! त्या वृक्षांना देखील आपणामुळे शक्यतो दुसऱ्याला त्रास देवू नये ही अमेरिकन शिकवण दिलेली असावी.

ड्रायव्हरने मध्यंतरी मॅकडोनाल्ड हॉटेलजवळ गाडी थांबविली. हॉटेल स्वच्छ, सुंदर व स्वस्त! फ्रेंच फ्राईज व ज्यूस घेऊन पुन्हा गाडीत येऊन बसलो. रात्री आठ साडे-आठ वाजता डेट्रॉईटला पोहोचलो.

बसस्टँडवर अनिल क्षीरसागर, त्याची मोठी गाडी घेऊन आम्हाला उतरवून घेण्यास आला होता. अमेरिकेत हमाल नाहीत. त्यामुळे स्वतःच सर्व सामान उचलावे लागते. बहुतेक प्रत्येक ठिकाणी माझ्या ओळखीचे सर्वजण मला सामान उचलू देत नसत. स्वतः त्यांच्या गाडीत नेऊन ठेवीत असत, व घरी घेऊन जात असत. तसेच अनिलच्या घरी पोहोचलो. भला मोठा कुत्रा दाराजवळ उभा! भीती वाटली! पण डेट्रॉईटमध्ये आम्ही फार लौकर माणसाळलो कारण अनिलची व आमची चांगलीच जुनी ओळख होती. मिसेस पाटेकरांच्या निधनाचे वेळी तो नुकताच मुंबईत येऊन गेला होता.

त्या रात्री अनिलच्या घरी मस्तपैकी जेवण उरकले. नंतर रात्री प्रोजेक्टरवर स्लाईडस् दाखवून-अनिलने अमेरिकेचे फार सुंदर दर्शन आम्हाला घडविले.

सकाळी उठून नास्ता आटोपून डेट्रॉईट पाहण्यास निघालो. डेट्रॉईट शहर सुंदर नदीच्या काठावर वसलेले! मोटारींचे माहेरघर! डेट्रॉईटलाच फोर्ड गाड्यांचा कारखाना आहे. 'दी ग्रेट हेन्री फोर्ड' किनाऱ्याने आम्ही गाडीतून सुंदर सुंदर बंगले पहात चाललो होतो. एक एक विलक्षण बंगले! नदीच्या पलीकडे इमारती होत्या. "ते काय?" मी विचारले. "तो कॅनडा" अनिल म्हणाला. मी आश्चर्यचकित झालो. कॅनडा एवढे जवळ? फक्त नदी ओलांडली की? बापरे! मला वाटत होते दोन्ही देशांच्या मध्ये काटेरी कुंपण वगैरे! नदीची वाटणी कशी केली असेल? ही नदी अमेरिकेची की कॅनडात? नदी पोहून पलीकडे-अलीकडे सहज जाता येता येईल. चेकींग कसे करीत असतील? कॅनडा देशाचा व्हिसा मिळविताना जास्त खोलवर चौकशी का करतात ते आता मला समजले. कारण कॅनडात प्रवेश मिळवून मग काहीजण बॉर्डर क्रॉस करून चक्क अमेरिकेत घुसतात!

तो पहा हेन्री फोर्डचा बंगला! त्या विख्यात उद्योगपतीचा सुंदर बंगला पाहून तेथील धूळ मस्तकी लावावी असे वाटले! मला गाड्यांचे भयानक प्रेम! अमेरिकेत बहुतेक गाड्या जनरल मोटर्स ह्या कंपनीच्या क्रायस्लर, फोर्ड, थंडरबोल्ट फारच सुंदर गाड्या. आता मात्र अमेरिकन मोटारींच्या मार्केटमध्ये जपानने जोरदार शिरकाव केला आहे. होंडा गाड्या अनेक दिसतात, पण सच्चा अमेरिकन शक्यतो अमेरिकनच गाडी वापरतो. अमेरिकन गाडी ही जाड पोलादी पत्र्याची, त्यामुळे जास्त मजबूत व वजनदार. काचेचा उपयोग त्या मानाने कमी! तर जपानी गाडी त्याच्या उलट! त्यामुळेच कदाचित असेल, पण अमेरिकन रस्त्यांवर अमेरिकन गाड्या अपघातातून वाचतात. प्रत्येक गावात विकावयाच्या गाड्या एका कुंपणात आवारात ठेवलेल्या असतात. 'फॉर सेल', हा भलामोठा कागद चिकटवून! चांगली गाडी दोन ते तीन हजार डॉलर्सला मिळू शकते.

आपल्या सरकारने परदेशातून फक्त एकच वस्तू आणावयाची मुभा दिली असती तर मी फक्त एक मोटारगाडी घेऊन आलो असतो. ऑटोमॅटिक गीअर्स, डोअर्स, सर्व प्रकारची गॅजेटस्, मजा आली असती. पण काही स्वप्ने अपुरी राहण्यातही मजा असते, 'स्वप्नातल्या कळ्यांनो उमळू नकाच केव्हा'. आपल्या मनातील सगळ्याच इच्छा जर चटकन् पुऱ्या झाल्या तर जीवन आळणी होऊन जाईल. असो.

फोर्ड गाड्यांचा कारखाना बाहेरूनच पाहिला. ह्या शहरातही फार सुंदर इमारती! भरपूर शूटिंग केले. हो! डेट्रॉईटमध्ये एक मैदान पाहिले तिथे काही मंडळी चक्क क्रिकेट खेळत होते. "अरे! क्रिकेट आणि इथे?" मी म्हणालो, "हो ना! इथे काही वेस्ट इंडियन आणि भारतीय राहतात. त्यानी थोडाफार इंटरेस्ट घेतला आहे क्रिकेटमध्ये. मागे वेस्ट इंडिजहून परत जाताना गावस्कर, विश्वनाथला घेऊन ह्या मैदानावर खेळून गेला आहे!" अनिलने खुलासा केला

नदीच्या किनाऱ्यावर मुलांना खेळण्यासाठी वेगळी घसरगुंडी पाहिली, साधी कल्पना! एक भलामोठा ॲक्रिलीकने मढवलेला पत्रा उंचीवरून खाली सोडला होता. बाजूच्या जिन्याने वर जावयाचे, पोत्यावर बसून घसरत खाली यायचे. लहानमोठी सर्वच भाग घेत होती. सुनीलाही अनिलबरोबर घसरगुंडीवरून घसरून आली! ह्या अशा साध्या कल्पनाही आपल्या देशात का वापरल्या जात नाहीत कळत नाही. डिस्नेलॅन्ड म्हणा किंवा इतर मनोरंजनाच्या ठिकाणी अशा सुंदर कमी खर्चिक कल्पना पाहून, आपला देश मनोरंजनाला किती कमी महत्त्व देतो ते पटले. मनोरंजन म्हणजे श्रीमंती चोचले! श्रीमंत होणे हे आपल्या देशात पाप! पैसा असला तरी वापरण्याची चोरी! अमेरिकेत तसे नाही, घरे विकत घेऊन ती भाड्याने देणे हा एक चांगला कमाईचा धंदा आहे. एक माणूस अनेक

घरे घेऊ शकतो. त्याची चौकशीसुद्धा होत नाही. गाड्यांच्या बाबतीतही तसेच! प्रामाणिकपणे इन्कमटॅक्स भरा व पाहिजे तशी मौज मजा करा! त्यामुळे अमेरिकन लोक सुखी आहेत.

रात्री टीव्ही वर बास्केटबॉलची फायनल मॅच होती. डेट्रॉईटचा पिस्टन ग्रुप विरुद्ध शिकागो ग्रुप! खरं तर क्रिकेट व हॉकी सोडून बाकी खेळ मला आवडत नाहीत. पण मिसेस क्षीरसागर आज फायनल मॅच, म्हणून स्वयंपाक आटोपून व आम्हाला जेवायला घालून मॅच पाहण्यास बसल्या, मीही बसलो. बास्केटबॉलमध्ये शेवटचे एक मिनिटही अर्धा-अर्धा तास टाईम-आऊट मागून खेळविले जाते. हल्लीच्या नव्या नियमाप्रमाणे बास्केटला हात लावला तरी फॉऊल धरला जात नाही. त्यामुळे उंचीचा उपयोग करून खेळाडू चपळाईने चेंडू कसा बास्केटमध्ये टाकतात ते बघून थक्क होतो आपण.

अमेरिकेचा आवडता खेळ म्हणजे बेसबॉल! आपल्याकडच्या कपडे धुण्याच्या चोपण्यासारख्या बॅटीचा उपयोग करून, चौफेर धावाधाव करीत स्कोअर करायचा. पण हा खेळ काही मला आवडत नाही. त्यापेक्षा आपला क्रिकेट कितीतरी चांगला.

अनिलने रहा-रहा म्हणून खूप आग्रह केला. पण सकाळी सकाळी आम्हाला ग्रे-हाऊंडच्या स्टँडवर सोडण्यास आम्ही त्याला सांगितले. सकाळी सातची वेळ. ग्रे-हाऊंडचा बसस्टँड काही सापडत नव्हता. रस्त्यावर चिटपाखरू नव्हते. शेवटी अनिलने एका निग्रोला विचारले व पत्ता सांगताच त्या निग्रोला एक डॉलर चटकन दिला. फक्त पत्ता विचारल्याबद्दल पैसे का द्यायचे? मगिंगची भीती! म्हणून घाबरून आधीच पैसे देऊन टाकायचे, उगाच भानगडी नकोत! स्टँडवर पोहोचलो तर बस सुटत होती. धावत जाऊन बस पकडली.

●●●

'अतिसुंदर शहर टोरोंटो'!

चलो टोरोंटो!

पुढील मुक्काम टोरोंटो! काही दिवसांसाठी अमेरिका सोडायची होती. ग्रे-हाऊंडची बस कालच्याच रस्त्याने आली व नदीजवळ उजवीकडे वळली. रस्ता नदीखालून-भुयारातून होता. बस भुयारात शिरली. साधारण दोन अडीच मैल की किलोमीटर भुयारातून प्रवास केल्यावर बस दुसऱ्या किनाऱ्यावर बाहेर आली. 'वेलकम टु कॅनडा' बोर्ड दिसला! "अरेच्चा! आपण कॅनडात आलो बघ!" मी सुनीलाला म्हटले. नदीपलीकडची अमेरिका आम्हाला 'टा टा' करीत होती.

साधारण एक वाजता टोरोंटोला पाहोचू असे वाटत होते. सुंदर रस्त्यावरून बस धावू लागली. बसमध्ये हातात नकाशा धरून बसलो होतो. डोक्यावर टीव्ही होता. विंडसर गाव मागे गेले. नंतर लंडन गाव लागले. हे लंडन कॅनडातील! नंतर न्यू दिल्ली म्हणजे दिल्ली नावाचे गावही लागले. टोरोंटो केव्हा येईल ते कळण्यास काही मार्ग नव्हता. इतक्यात लांबून एक डोम दिसू लागला. मग इमारती दिसू लागल्या. एका बाजूला तलाव लागला. उत्तुंग इमारती. काही इमारतींसमोर पुतळे! हे कोणते शहर असावे? विचार करीत होतो तोच बस भुयारात शिरली व दुसऱ्या बाजूने थेट शहरात आली व बसस्टँडवर उभी राहिली. हेच बहुतेक टोरोंटो. कारण सर्व बस इकडे रिकामी झाली!

घड्याळात फक्त अकराच वाजले होते. प्रवास फार जलद झाला किंवा वेळ मोजण्यात आमची काहीतरी चूक झाली असावी. टोरोंटो येथील श्री. कांदळगावकरांना मी एक वाजता पोहोचतो म्हणून कळविले होते. त्यांच्या घरी फोन केला.

"एवढ्या लवकर आलात?" फोनवर भागवतांनी विचारले. भागवत कांदळगावकरांचे जावई व माझे मुंबईचे पेशंट. भागवतांची चारही मुले अमेरिकेत. दोन मुली टोरोंटोत, एक अटलांटाला, आणि मुलगा प्रदीप बाल्टीमोरला. श्री व सौ. भागवत काही दिवस अमेरिका किंवा कॅनडामध्ये आणि काही दिवस मुंबईत असतात. "आम्ही येतो, तुम्ही बसस्टँडवरच थांबा" भागवतांनी सांगितले.

आमच्या बॅगा उतरवून आम्ही बसस्टँडवर थांबलो. ग्रे-हाऊंडसारख्या पण कॅनडातील व्हिबॉर कंपनीच्या बसेस तिथे येत जात होत्या. प्रवास करून आणि

पाहुण्यांचा चार खाऊन आमच्या बॅगांची पोटं तट्ट फुगली होती. बॅगमधल्या काही वस्तू कमी होत होत्या, तर काही वांढत होत्या. घासून घासून त्याचे सांधे ढिले झाले होते. कोणाचे हँडल तर कोणाचे चाक कुठेकुठे गळून गेले होते. सिंगापूरला विकत घेतलेली ट्रॉली रस्त्यावरून आणि अनेक एअरपोर्टवर चालून थकली होती.

थोड्याच वेळात श्री. कांदळगावकर, त्यांच्या मिसेस व श्री भागवत बसस्टँडवर आले. आमचे सामान पाहून त्यांनी दुसरी टॅक्सी केली. भागवतांना फार आनंद झाला. श्री. भागवत आणि मिसेस शशिकला भागवत. ह्या मला आई वडीलांसारख्या! त्यांचा इतका वर्षांचा आग्रह फळाला आला होता.

मानलेला भाऊ, मानलेली बहीण ही नाती खोटी, भंपक असतात असा माझा ग्रह. मग भागवतांना मानलेले आईवडील कसे म्हणू? पण त्यांना मी आईवडिलांसारखा मान देत होतो हे खरे.

आमची गाडी मुख्य रस्त्यावर आली. पाहतो तो रस्त्याच्या मध्यभागावरून ट्राम जोरात पळत होती. ट्रामवे रस्त्याला लागूनच. त्यामुळे गाडी आणि ट्राम यांची टक्कर होण्याची शक्यता! जगामध्ये अनेक मोठ्या शहरात अजूनही ट्राम अस्तित्वात आहेत. मुंबईमध्ये मात्र ट्रामचे उच्चाटण करण्यात आले. पेट्रोलचे भाव वाढल्यामुळे आता मुंबईत ट्रामचा प्रवास स्वस्त वाटला असता! काही नाही तर ट्रामचे उच्चाटण करण्यात तरी मुंबईने इतर मोठ्या मॉडर्न शहराना मागे टाकले आहे, हेही नसे थोडके!

शशिकला भागवत आणि सुनंदा कांदळगांवकर घरी वाटच पाहत होत्या. छानपैकी ब्रंच घेतले.

संध्याकाळी टोरोंटोत फिरण्यासाठी कांदळगावकरांनी गाडी काढली. अर्ध्या रस्त्यात गाडीतील रेडीओवर 'पावसाची व वादळाची शक्यता आहे तेव्हा गाडीवाल्यांनी शक्यतो घरी जावे. पंधरा मिनिटात टोरोंटोच्या काही भागात जोरदार वादळ होण्याची शक्यता आहे' अशी सूचना देण्यात आली. उगाच अडकून पडायला नको, म्हणून आम्ही घरी परत आलो.

रात्रीचे साडेनऊ वाजले आणि वादळाऐवजी चक्क लखलखीत ऊन पडले होते! आपण आपल्या हवामान खात्याला हसतो पण कॅनडातील हवामानखातेही आपल्यासारखेच आहे ह्याची खात्री पटली. कॅनडा अमेरिकेत कार रेडिओचा उपयोग फार! शहरात जाताना कुठचा रस्ता टाळा, कुठे ट्रॅफिक जॅम आहे, पाऊस वादळ यांच्या, गाड्या विमाने यांच्या वेळापत्रकांबद्दल सूचना सतत दिल्या जात असतात, त्यामुळे गाडी चालविणाऱ्याना फार सोयीस्कर होते.

दुसऱ्या दिवशी नायगरा पाहण्यास जाणार होतो. टोरोंटोपासून नायगरा शंभर किलोमीटर आहे. अमेरिकेत मैल आणि कॅनडात किलोमीटर्स! इतक्यात माझ्या एका नातेवाईकाची आठवण झाली. त्याचेही नांव प्रकाश. त्याच्या घरी फोन केला.

"अरे, आलास? आणि माझ्याकडे का नाही आलास रहायला?"

तुला कशाला उगाच त्रास? शिवाय तुला रजा घेणे जमले नसते"

"घ्या! अरे सोमवारपासून मी रजा घेऊ शकतो, ते जाऊ दे. नायगऱ्याला कधी येतोस?"

"उद्या सकाळी"

"मग एक काम कर, उद्या संध्याकाळी सहा वाजता ग्रे-हाऊंडच्या बसस्टँडवर तेथे थांब. मी तुला न्यायला तिथे येतो. सकाळी टोरोंटोला जा."

"ठीक आहे" म्हणून मी फोन ठेवला. एक रात्र ह्या प्रकाशकडे काढून दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता टोरोंटोला परत येतो असे कांदळगावकरांना सांगितलो. "ठीक, पण उद्या सकाळी लवकर बस पकडा. जास्तवेळ नायगरा पाहण्यासाठी मिळेल." कांदळगांवकर म्हणाले.

सकाळी बस पकडून आम्ही ग्रे-हाऊंडच्या बस स्टँडवर आलो. नायगरा फॉल्सला जाण्यासाठी बस पकडावयाची होती. व्हिप्ब्रॉर किंवा ग्रे-कोचलाही आमचा पास चालणार होता. तलावाच्या काठा-काठाने बस जात होती. नंतर थोड्या वेळाने हॅमिल्टन येथे बस थांबली. हॅमिल्टन कॅनडातील प्रसिद्ध शहर. बस पुन्हा चालू झाली. नायगारा कसा असणार म्हणून उत्सुकता होती. इतक्यात एका छोट्या गावात बस थांबली. सेंट कॅथरीन! अरेच्च्या, आम्हाला संध्याकाळी ह्याच गावात प्रकाशकडे रहायला यायचे होते.

आता नायगारा काही किलोमीटरच! कान टवकारून आणि कॅमेरा सरसावून मी खिडकीतून बाहेर पाहत होतो. मधूनच झाडाआडून चुटपुटते धबधब्याचे दर्शन व्हावयाचे. आणखी थोडे पुढे जाऊन बस थांबली, बसचे शेवटचे स्टेशन. नायगारा बस स्टॉप! हत् तेरी, आता मजा नाही येणार! बसमधून उतरताना वाटले. पण मग कळले की आता मिनीबस पकडावयाची तिकीट काढून. तिकीट काढले व बसमध्ये चढलो. थंडी भयानक. सर्वांनी स्वेटर्स चढविले. मी लांब ओव्हरकोट घातला.

बस जुन्या घरांना वळसे घालून झाडांमधून थोडी पुढे गेली व थांबली. तिथे पाण्याचा आवाज ऐकू येत होता. धावत जाऊन कठड्यावरून पाहिले. एका

कड्यावरून पाणी फेसाळत खाली पडत होते, वरून रोपऱ्वे होती. हाच का नायगरा? मग तो मेरिलीन मन्रोचा नायगारा? तो हाच! मन निराश झाले.

"ह्यापेक्षा आमचा बेळगावचा 'जोग फॉल्स' बरा की हो " सुनीला म्हणाली. "चूप गं," एवढ्या लांब आल्यावर नायगाराचे हे दर्शन? बरं चला आता बसने फिरून येऊ या म्हणत परत बसमध्ये येऊन बसलो. उजव्या बाजूला झाडी व डाव्या बाजूला हॉटेल्स सुरू झाली. उजव्या बाजूच्या झाडीतून येणारा पाण्याचा आवाज वाढू लागला. पाहता पाहता उजव्या बाजूची झाडी विरळ विरळ होत गेली आणि. ओ! ओ! सिम्पली वंडरफुल! बाप रे! नायगारा इज वंडरफुल! कॅमेरा सरसाऊन मी नायगाराचे प्रथम दर्शन टिपले.

'ओ! माय गॉड!' बसमधील प्रत्येकजण म्हणत होता. बस आता हळू चालत होती. मी बसमध्ये उभा राहून वेगवेगळ्या अँगलने शूटिंग करीत होतो. "अहो थांबा. आधी नुसते पाहून तरी घ्या." सुनीला माझ्या हातातून कॅमेरा काढण्याचा प्रयत्न करीत होती. पण खरं सांगू? ते आनंदाचे क्षण कायमचे टिपून घेण्यासाठी मी आसुसलो होतो. कॅमेऱ्यातून चित्रण केले की ते तुम्हा सर्वांना दाखविता येईल. ज्यांना नायगारा प्रत्यक्ष पाहण्याची शक्यता कमी त्यांच्यासाठी ही सुवर्ण संधी! मी कॅमेरा डोळ्याला चिकटवून ठेवला होता. हळूहळू एक भला मोठा पूल, दोन कड्यामध्ये, दिसू लागला. आमच्या बसमध्ये स्पीकरवरून नायगराची माहिती दिली जात होती. पलीकडे अमेरिका आणि अलीकडे असलेल्या कॅनडाच्या बाजूने आपण नायगारा पाहतोय! वा! दोन्ही देशांना जोडणारा हा पूल! वा, छान, सुंदर करीत आम्ही बसमधून सावकाश पुढे चाललो होतो. शेवटी साधारण मध्यावर बसमधून आम्ही उतरलो. समोर अमेरिकन बाजूने नायगारा धबधब्याचे पाणी पडत होते. पण खरे आश्चर्य पुढेच होते.

सुंदर बगिच्याच्या कठड्याजवळ गेलो आणि उजव्याबाजूला खऱ्या खुऱ्या नायगाराचे दर्शन झाले. डोळे विस्फारले! इतके सुंदर सृष्टीसौंदर्य आयुष्यात प्रथमच अनुभवीत होतो. समोर दिसणारा धबधबा हा त्यामानाने फारच छोटा, पण उजव्या बाजूचा घोड्याच्या नालासारखा धबधबा फार उंचावरून खाली कोसळत होता. तिथे निळ्या आकाशाचे आणि धरतीचे मिलन घडत होते, आणि उंचच उंच उडणारे फेसाळते तुषार, त्या आनंदाची उधळण करीत होते. धबधब्यासमोरून सी-गल पक्षी उडत होते. क्षणभर डोळे मिटून घेतले. सुंदर प्रपाताच्या मंजूळ आवाजात मेरिलीन मेन्रो कानाशी गुणगुणत होती. त्या नायगारामध्ये नहात होती...!

"अहो शूटिंग करा ना आमचे इथे!" घरच्या सेन्सॉरनी सीन 'कट्' केला!



अविस्मरणीय निसर्गसौंदर्य दि ग्रेट नायगारा!

"घ्या बरे पोझ!" कठड्याजवळ आमच्या कुटुंबियांना उभे करून मी कॅमेऱ्याने वाईड अँगल व क्लोझअपस् मारले. वा! कुठे मेरिलीन मेन्रो आणि कुठे..." माझा कॅमेरा आपोआप गोल फिरू लागला. उजवीकडून डावीकडे! "सुनीला, इथे मला मनसोक्त शूटिंग करू दे. तोपर्यंत तू सलील-मृगयाला ब्रेड-जाम दे." मला डिस्टर्बन्स नको होता. मावेल तितका नायगरा मला कॅसेटमध्ये उतरावयाचा होता.

शूटिंग केल्यावर नायगारा फॉल्सचे माहितीपत्रक वाचण्यास सुरुवात केली. नायगरा हा शब्द प्रथम फादर लुईस हेनेपिन याने वापरला, १६९७ साली! काही इंडियन्स पूर्वी कॅनेडीयन नदीच्या बाजूस राहत होते, त्यानी त्यांच्या वसाहतीला 'ओंगीआऱ्हा' हे नाव दिले होते. त्याचा अर्थ-'पाण्याचा अद्भूत चमत्कार! हळूहळू ह्या नावाचा अपभ्रंश होत होत 'नायगारा' हे नाम रूढ झाले. अमेरिका, कॅनडा यांच्यामधील नायगारा ह्या नदीचा उगम 'लेक एरी' ह्या सरोवरातून होतो. तिचा बराचसा भाग कॅनडाच्या भूमीवरून धबधब्याच्या रूपाने कोसळतो. हा धबधबा कॅनडाच्या बाजूने 'हॉर्स शू फॉल' म्हणून ओळखला जातो. अक्षरशः घोड्याच्या

नालेसारख्या आकारात, खोलवर हा धबधबा कोसळतो. अमेरिकन बाजूने पडणाऱ्या धबधब्याला 'अमेरिकन फॉल्स्' म्हणतात. पण अमेरिकन फॉल्सची रुंदी त्यामानाने कमी. आणि नाले सारखा आकार नसल्यामुळे त्याचे तुषार आकाशात उडत नाहीत.

अमेरिका व कॅनडा यांचे संबंध मित्रत्वाचे असल्यामुळे त्यानी नायगाराची समाईक विभागणी केली आहे. उद्या अमेरिका व कॅनडामध्ये युद्ध झाले तर त्यानी बाकी काहीही करावे, पण नायगारा विद्रुप करू नये.

ज्या 'एरी' नावाच्या सरोवरातून नायगारा नदी उगम पावते ते सरोवर बारा हजार वर्षांपूर्वी बर्फाचे सरोवर होते. बर्फ वितळून हे सरोवर निर्माण झाले. त्यातून ही नदी उगम पावली व हा धबधबा निर्माण झाला. पूर्वी ह्या धबधब्याचा आवाज कानठळ्या बसविणारा होता. परंतु खालच्या दगडाची झीज झाल्यामुळे आता आवाज काहीसा सुसह्य व सुंदर वाटतो. अठराव्या शतकात पर्यटक नायगाराकडे वळू लागले. दोन्ही बाजूस इमारती उभ्या राहिल्या व हॉटेलस्ना तेजी येऊ लागली. परिसर बिघडण्याचा धोका ओळखून, दोन्ही सरकारांनी ताबडतोब पावले उचलली व धबधब्याच्या जवळ इमारती बांधण्यास बंदी केली. १८८५ साली न्यूयॉर्क म्हणजे अमेरिकन सरकारने ४३० एकर जमिनीवर नायगारा फॉल्स पार्क उभारला तर कॅनेडीयन सरकारने १८६ एकर जागेवर क्वीन्स् व्हिक्टोरिया पार्क निर्माण केला.

नायगारा नदी जेथे कोसळते तेथली दरी सात मैल रुंद आहे. अमेरिकन बाजूने कोसळणाऱ्या धबधब्याची उंची १८२ फूट व रुंदी १००० फूट आहे. तर कॅनेडियन बाजूच्या धबधब्याची उंची १७३ फूट व रुंदी २६०० फूट आहे. ह्या हॉर्स शू फॉल्स मधून ८५ टक्के पाणी खाली कोसळते.

नायगाराचे जवळून अगदी खालून दर्शन घेण्यासाठी, भुयाराने जावे लागते. लिफ्टने खाली जाण्यापूर्वी रेनकोट, कानटोपी व तागाचे बूट घालावे लागतात. तेथे धबधब्याचे ते रौद्र रूप पाहून मृत्यूच्या दारी उभे आहोत असेच वाटते. ह्याच ठिकाणी 'नायगारा' चित्रपटातील उत्कंठा वाढविणारी मारामारी चित्रीत केली आहे.

थोडा वेळ नायगाराचे जवळून दर्शन घेतल्यावर आम्ही 'मेड ऑफ मिस्ट' (धुक्यातीलकुमारी) ह्या बोटीने फेरफटका करण्यासाठी ट्रॉलीने खाली, नदीच्या पात्रामध्ये उतरलो. निळ्याजांभळ्या रंगाचे रेनकोट, घालून व डोके पूर्णपणे झाकून बोटीत चढलो. १८४६ साली निकोलास नावाच्या तरुणाने धबधब्याचे पाणी जेथे कोसळते तेथे जाण्याचा विक्रम केला होता. त्यासाठी त्याने कोळशावर

चालणारी बोट वापरली होती. आता इकडे डिझेलवर चालणाऱ्या बोटी वापरात आहेत.

माझा कॅमेरा हातात धरून मी चित्रण करीत होतो. बोट पाण्याच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जात होती. पाणी निळे, आकाश निळे, पोशाख निळे आणि शेजारी उभे असणाऱ्या माणसांचे डोळेही निळे! बोट डुलत डुलत पुढे जाऊ लागली, प्रत्येक हेलकाव्याबरोबर तोल जाऊन माणसे एकमेकांच्या अंगावर पडू लागली. हळूहळू धबधब्याचा आवाज वाढू लागला. सी-गल पक्षांचा आवाज जवळून येऊ लागला. पाण्याचे तुषार अंगावर पडू लागले. सर्व ठिकाणी निळे निळे, आणि पाण्याचे नाजूक तुषार, काही क्षण श्रावण महिना आठवला. व 'श्रावणात घननिळा' हे गाणे मी नकळत गुणगुणू लागलो.

तोल सांभाळणे व कॅमेरा पेलून चित्रण करणे कठीण होऊ लागले. पण आयुष्यात ह्यापेक्षाही कठीण परिस्थितीत तोल संभाळला असल्यामुळे, मी कॅमेरा हातात धरून चित्रण करीतच होतो. शेवटी शेवटी पाण्याचे शिंतोडे अंगावर फटकारू लागले आणि पांढऱ्या स्वच्छ धुक्यात आम्ही पूर्णपणे गुरफटून गेलो! आता मात्र कॅमेऱ्याच्या लेन्सवर पाणी येऊन कॅमेरा खराब होऊ नये म्हणून कॅमेरा बंद केला आणि नायगऱ्याचे मनमुराद दर्शन घेतले. वरती पाहिले, बाप रे! सरळ रेषेत, काही फुटांवरच पाणी कोसळत होते. मेरिलीन मन्रोची बोट कड्यावरून धबधब्यामधून कोसळली असती तर? तेवढ्यात आठवण झाली, नायगरामध्ये वरून खाली उडी मारण्याचा वेडा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला पण त्यातील एकही वाचू शकला नाही. हाडांचा चुराडा होऊ नये यासाठी खास पोशाख घालून, पिंपात बसून वगैरे उपाय वापरून आजपर्यंत तीस जणांनी आपले प्रयत्न व प्राण वाया घालवले आहेत. पेटीट नावाच्या तरुणाने मात्र दोरीच्या सहाय्याने नायगरात उतरण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

मला आठवते, काही वर्षांपूर्वी मुंबईत कुलकर्णी नावाचा एक तरुण मुलगा अदभूत पराक्रम करीत असे. काचेचे बल्ब, सुया व ट्यूब लाईटसारख्या वस्तू खाणे वगैरे. अशा त्याच्या एका प्रयोगासाठी मी प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित होतो. भर वेगाने जाणाऱ्या डेक्कन क्वीन मधून प्लॅटफॉर्मवर उडी मारण्याचा प्रयत्न त्याने केला होता. तसेच अमिताभ बच्चनचे जुहू येथील घर ते सिद्धिविनायक मंदिर (प्रभादेवी) हे अंतर त्याने उलटे धाऊन पूर्ण केले होते. हाच कुलकर्णी गिनीजबुक मध्ये रेकॉर्ड नोंदले जावे म्हणून नायगारावरून उडी मारणार होता. पुढे त्याचे काय झाले काही समजले नाही. कदाचित तो एकतीसावा प्रयत्न ठरला असता!

नायगाराचे सुरेख चित्रण, नायगारा ह्या मेरिलीन मन्रोच्या प्रसिद्ध चित्रपटानंतर, हल्लीच्या "सुपरमॅन २" ह्या चित्रपटात केलेले आढळते.

आमची 'मेड ऑफ मिस्ट' थोडा वेळ तळाशी थांबून परत फिरली, आम्ही ट्रॉलीने पुन्हा वर आलो. चालत चालत नायगाराचे दर्शन घेत पुढे चाललो होतो. बाजूला एक उंच मनोरा होता. त्यावरूनही नायगाराचे सुंदर दर्शन घेता येते. एक ठिकाणी सहज कठड्यावरून डोकावून पाहिले, आणि सुंदर-अतिसुंदर इंद्रधनुष्य नायगाराच्या पात्रात दृष्टीस पडले. बाजूलाच पाटी होती, रेनबो पॉईंट! कॅमेऱ्याने तो देखावा टिपला, त्या दृष्याचे चित्रण फारच सुंदर झाले. डाव्या बाजूला पाणी पडत आहे, मध्यभागी अर्धवर्तुळाकार इंद्रधनुष्य, आणि डाव्या बाजूने मेड ऑफ मिस्ट बोट हळूहळू पात्रातून जात जात इंद्रधनुष्याच्या मध्यभागी जात आहे! एखाद्या सिनेमाचे डायरेक्शन करावे तसा मी स्वत:लाच डायरेक्शन देत होतो.

आणखी पुढे चालत गेलो. जेथून नायगारा नदीचे पाणी खाली पडते तिथे आलो. ह्याच ठिकाणाहून पाणी खोल खाली कोसळत होते. कॅमेरा घेऊन चटकन् कठड्यावर चढलो व वेगवेगळ्या अँगलने शूटिंग केले. आमची मृगया घाबरून ओरडू लागली, कारण माझा तोल गेला असता तर नायगाराहून उडी मारून प्राण गमावणाऱ्यात ३१वा नंबर माझा लागला असता! झूम लेन्सने केलेले शूटिंग फारच सुंदर झाले, आणखी पुढे चालत गेल्यावर नदीचे पात्र व त्यात उभी असलेली झाडे दिसू लागली. का कोणास ठाऊक पण प्रत्येक ठिकाणी 'नायगारा' चित्रपटाची आठवण येत होती. चित्रपटात शेवटी मेरिलीन मेन्रोची बोट झाडांना अडकत अडकत पुढे जात असते, ह्या पैकी कोणत्या झाडाला ती बोट अडली असेल त्याचा मी विचार करीत होतो. कदाचित ते झाडही मूळासकट धबधब्यावरून खाली गेले असावे. नायगाराचे दर्शन हेलिकॉप्टरने घेण्याची पण सोय आहे. पण खिशाला निदान आमच्यासारख्यांच्या खिशाला न परवडणारी! पण हेलिकॉप्टरने सुंदर विहंगम दृष्य आणि 'ब्राईडस् व्हेल' हा धबधबाही पहावयास मिळतो.

सध्या नायगारा जेथून कोसळतो ते काही त्याचे मूळ ठिकाण नाही. खरं तर हा धबधबा सात मैल पुढे होता. पण खडकाची झीज होत होत हा धबधबा इतका मागे सरकला. ह्यातला हॉर्स-शू फॉल दर वर्षाला तीन इंचानी मागे सरकतो. तर अमेरिकन फॉल एक इंचाने! दोन्ही धबधब्यांच्या पाण्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी केला जातो. नायगारातही हल्ली जल-प्रदूषण होऊ लागले आहे. अनेक रसायने मिसळल्यामुळे नायगाराचे निळे पाणी काहीसे काळे होऊ लागले आहे.

नायगाराच्या कॅनडाच्या बाजूला, व्हिक्टोरिया पार्कमध्ये अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. ह्या पार्कच्या मागे अर्ध-वर्तुळाकार नदीचे पात्र आहे. स्कायलोन टॉवर, मिनोल्टा टॉवर असे वेगवेगळे टॉवर्स व हेलिपॅडही इथे आहेत.

नायगारा पाहून, फराळ करण्यासाठी हिरवळीवर बसलो. पोटभर खाऊन कागद व पेपर डिशेस उचलून बॅगमध्ये ठेवल्या! स्वच्छता आपोआपच राखली जाते, शिकवावी लागत नाही हे परदेशात गेल्यावर कळते. बस पकडून परतीच्या प्रवासाला निघालो. नायगाराचे शेवटचे दर्शन घेत होतो, काही वेळाने नायगारा दृष्टीआड झाला. वाईट वाटले. न जाणो, नायगारा पाहण्याचे भाग्य पुन्हा लाभेल न लाभेल. डोळ्यात आसवे दाटली त्यामुळे व्हिडिओ कॅमेऱ्यातून धुके दिसू लागले. माझ्या आयुष्यातील एक फार मोठी इच्छा पूर्ण झाली होती.

नायगाराच्या बसस्टँडवर आलो. साडे सहा वाजत आले होते. प्रकाश चुरी आम्हाला नेण्यासाठी येणार होता साडेसहाला. सात वाजले, आठ वाजले तरी त्याचा पत्ता नाही. अरे बापरे! विसरला तर नसेल ना! स्टँडवरचे प्रवासी निरनिराळ्या बसेस् पकडून जात होते. साडे आठ झाले तरी प्रकाश येण्याचे चिन्ह दिसेना. बसस्टँडवर आता शुकशुकाट झाला होता. अंधार ९॥ वाजता होत असल्यामुळे तशी भीती नव्हती. शेवटी प्रकाशच्या घरी फोन केला. तेव्हा तो ऑफिसमधून आम्हाला घेण्यासाठी निघाला आहे, असे त्याच्या बायकोने सांगितले. आणि आमचा जीव भांड्यात पडला.

थोड्या वेळाने प्रकाश आला. चटकन् 'सॉरी हं' म्हणाला. आम्ही त्याच्या गाडीत बसत होतो तोच तिथे एक तरुण भारतीय जोडपे आले. त्यांना तेथे हॉटेलमध्ये रूम हवी होती. नुकतेच लग्न आटोपून हनीमूनसाठी ते नायगाराला आले असावेत. प्रकाशने त्यांनाही गाडीमध्ये घेतले व थोड्या अंतरावर उतरवून तिथे हॉटेलमध्ये चौकशी करण्यास सांगितले.

सेंट कॅथरीन गाव हे नायगारापासून जवळच. अंधार पडताना त्याच्या घरी पोंहोचलो. आमच्यासाठी त्याने बार्बेक्यू चिकन केले होते. जेवण आटोपल्यावर प्रकाश म्हणाला, 'चला, तुम्हाला नायगारा- बाय-नाईट दाखवितो! मी आश्चर्याने ओरडलो "काय?" होय होय, नायगारा बाय नाईट!" प्रकाश म्हणाला.

आम्ही चटकन गाडीत बसलो. आकाशात चंद्र होता. त्याची मंद मंद किरणे फार मोहक वाटत होती. थोड्याच वेळात आम्ही पुन्हा नायगाराला आलो. आता धबधब्यावर चहूबाजूने फ्लड लाईटस् सोडले होते. थोड्या थोड्या वेळाने लाइटस्चा रंग बदलत असे आणि पडणाऱ्या पाण्याचाही! आजूबाजूला सर्वत्र

अंधार! नायगाराचा आवाज आसमंतात घुमत होता. हे मात्र नायगराचे शेवटचे दर्शन.

गाडीतून पुन्हा प्रकाशच्या घरी आलो. सकाळी प्रकाशला लवकर कामावर जावयाचे होते. त्यामुळे रात्रीच त्याचा निरोप घेतला. त्यांची मुलगी सकाळी आम्हाला ग्रे-हाऊंड बस स्टँडवर सोडण्यास गाडी घेऊन आली. स्मार्ट, सतरा अठरा वर्षाची पोरगी, फार प्रेमळ!

ग्रे-हाऊंडने पुन्हा टोरांटोला अकरा वाजता पोहोचलो. थोडा वेळ विश्रांती घेऊन मिसेस कांदळगावकरांबरोबर टोरोंटो पहावयास गेलो. टोरोंटोचा इन डोअर स्टेडियम स्कायडोम पाहण्यास गेलो. जगातील सर्वात मोठा बंदिस्त स्टेडियम म्हणून हा ओळखला जातो. बेसबॉलची मॅच सुरू होती त्यामुळे आत जाता आले नाही. स्टेडियमच्या बाजूलाच टोरोंटोचा उंच टॉवर उभा होता. हा जगातील सर्वात उंच टॉवर समुद्र पातळीपासून, शिकागोचा सिअर्स टॉवर हा मानवाने बांधलेला सर्वात उंच मनोरा. मग बाजूच्या मॅकडोनाल्डमध्ये बसून पिझ्झा फस्त केला.

दुसऱ्या दिवशी आता टोरोंटोत बघण्यासारखे काय राहिले ह्याचा विचार करीत होतो. श्री. भागवंतानी पाठ काढली म्हणून वंडरलॅन्ड पाहण्यास गेलो. वंडरलॅन्ड व डिस्नेलँड यात विशेष फरक तो काय असे म्हणत मी जाण्यास नाखूशच होतो. दुसरे म्हणजे पुन्हा शंभर सव्वाशे डॉलर्स खर्च करणे जीवावर आले होते. हो ना करता करता बस व ट्रेनने वंडरलॅन्डला पोचलो. पण ह्या वेळेला पंचाईत होण्याची वेळ आली. इतर ठिकाणांसारखे कॅनडात बारा वर्षाखालील मुलांना अर्धे तिकीट नव्हते, फक्त सहा वर्षाखालील मुलांना त्याचा फायदा घेता येत होता, बापरे! कॅनेडियन डॉलर्स आता कमी राहिले होते. कारण दुसऱ्या दिवशी कॅनडा सोडणार म्हणून करन्सी बदलून घेतली नव्हती. कसेबसे तिकीटांपुरते पैसे निघाले फक्त चार दोन नाणी शिल्लक राहिली होती.

चरफडत वंडरलॅन्डमध्ये प्रवेश केला. आधीच बारा वाजत आले होते.

त्यामुळे पाच किंवा सहा तासात सर्व वंडरलॅन्ड पाहणे शक्य नव्हते. तरी सुद्धा सुनीला व मुलांची पाठ काढत, वेगवेगळ्या राईडस् घेण्यास लावल्या. मी आपला हॅन्डबॅग्ज संभाळत व व्हिडिओ कॅमेऱ्याने चित्रण करीत धावत होतो.

सहा वाजत आले, आणि शेवटची राईड घेण्यासाठी सुनीला मुलांना घेऊन गेली. मी आजूबाजूला पाहिले. तिथे काही गेमस् होते. माझ्या खिशात चार-दोन नाणी शिल्लक होती. एक नाणे घेऊन, बक्षीसाच्या मोठ्या वस्तू होत्या तिकडे

गेलो. ठोकळ्यात रिंग टाकायची होती. पाच चान्सेस! रिंग्ज टाकल्या! एक वेळा ठोकळ्यातून आत गेली पण खाली सपाट राहिली नाही. थोडक्यात बक्षीस गेले. म्हणून मृगयाला राईडवरून आल्यावर सांगितले. मृगयाने आग्रह केला, "बाबा पुन्हा खेळा".

खिशात कॅनेडियन पैसे नव्हते, दैवयोगाने एकच कॅनेडियन नाणे सापडले. दुकानवाला दुकान बंद करीत होता, पण आमची दया येऊन त्याने आम्हाला खेळण्यास दिले.

मी पुन्हा रिंग्ज हातात घेतल्या. पहिली-बाहेर, दुसरी-बाहेर. तिसरी आत गेली पण खाली गेली नाही, चौथी-बाहेर, आणि पाचवी आत व खाली जाऊन बसली! दुकानदार आवासून पहातच बसला. "ओ! यू हॅव वन!" 'मी जिंकलो!

टेडीबेअर जिंकल्याचा आनंद – वंडरलँड कॅनडा

मी आनंदाने नाचू लागलो. मृगया सलीलला उचलून गरागरा फिरवले! दुकानदाराने मला आणखी एक चान्स दिला. ह्यावेळी माझ्यापेक्षा त्यालाच टेन्शन होते! ही रिंग आत गेली पण खाली बसली नाही. सुनीला कॅमेरा घेऊन शूटिंग करीत होती. माझ्या आनंदाचे क्षण, माझ्या मुलांबरोबर, सुनीलाने बरोबर टिपले होते.

बक्षीस म्हणून मला मोठे टेडी बेअर मिळाले. जवळ जवळ दीडशे डॉलर्स किमतीचे! आनंदाने नाचत बाहेर आलो. पण खरी पंचाईत पुढेच होती! माणसाच्या उंचीचे हे टेडी बेअर नेणार कसे मुंबईला? बापरे! टेडी बेअर घरात असणे हे अमेरिकेत शुभशकुनाचे मानले जाते. टेडी बेअर प्रत्येक घरात असतेच!

वंडरलॅन्डवरून बस स्टँडवर आलो. तेथून फोन केल्यावर श्री. कांदळगांवकर आम्हाला नेण्यास येणार होते. फोनवर त्याना खोटेच सांगितले, आणखी एक पाहुणा तुमच्याकडे एक दिवस राहण्यासाठी येणार आहे म्हणून! वंडरलॅन्डलाच त्याची ओळख झाली!

मिसेस कांदळगांवकर गाडी घेऊन बसस्टँडवर आल्या, आणि आमच्या अगंतूक पाहुण्याला पाहून चाट पडल्या. असे टेडी बेअर क्वचितच बक्षीस लागते असे तो दुकानदारही म्हणाला होता. मग मी सांगितले, कॉलेजमध्ये असताना रायफल शूटिंगमध्ये मी पहिला आलो होतो, त्यामुळे नेमबाजी हा माझा आवडता छंद! त्या छंदाचे आज फार मोठे बक्षीस मिळाले.

रात्रीच सर्व बांधाबांध करून ठेवली. टेडी बेअरसाठी गार्बेज बॅग्ज काढल्या व टेडीबेअरला त्यात गुंडाळून ठेवला.

सकाळी उठून बाल्टीमोरला प्रदीपला फोन केला. प्रदीप हा श्री. भागवतांचा मुलगा! म्हणजेच भागवतांच्या टोरोंटोतल्या मुलीकडून आता आम्ही भागवतांच्या बाल्टीमोरमधल्या मुलाकडे जाणार होतो! वा संध्याकाळी पाच वाजता बस पकडणार होतो. ग्रे-हाऊंडच्या पासचा उपयोग करायचा होता. बारा तासांचा प्रवास! बफेलोला बस बदलावी लागणार होती. टोरोंटोला बसस्टँडवर भागवत व कांदळगावकरांचा निरोप घेतला. अमेरिकेत व कॅनडामध्ये आपल्या बॅगा काही ठिकाणी ड्रायव्हर बसमध्ये चढवितात तर काही ठिकाणी आपल्याला स्वत:ला चढवाव्या लागतात. त्याप्रमाणे बॅगा गाडीच्या तळाशी सरकविल्या. टेडी बेअरसाठी ड्रायव्हरला विनंती केली व सर्वात शेवटी टेडीबेअरला सामानाच्या वरती ठेवले. चला! टेडी बेअरची बफेलोपर्यंत तरी काळजी नाही. बस सुरू झाली. ●●●

बस नायगाराच्याच रस्त्याने धावू लागली, परत नायगरा दिसणार म्हणून मनात आशा उत्पन्न झाली. नायगारा बसस्टँड आला. आता बस कशी जाणार? पण आज नायगारा पाहण्याचे नशीबात नव्हते. बस नायगारा धबधब्याच्या बाजूने पुढे धावू लागली, पण झाडांतूनही नायगारा दिसला नाही. म्हणून वाईट वाटले. बफेलोला पोहोचावयाच्या आधी बसने नदी ओलांडली. नायगारा नदी. नदीच्या पलीकडे बस कस्टम चेकिंगसाठी थांबली.

प्रत्येक उतारूला बॅगा काढून रांगेत उभे करण्यात आले. प्रत्येकाचा पासपोर्ट वगैरेची कसून तपासणी चालू झाली. प्रत्येकाची हँडबॅगही तपासली जात होती. आमचा नंबर आला. मृगयाच्या हातात तिच्याच उंचीचे टेडी बेअर होते. कस्टम ऑफिसरने पासपोर्ट पाहिले. बॅगा न उघडता फक्त टेडी बेअरकडे पाहिले व त्याला हात लावून तो म्हणाला, "सॉरी जंटलमन – वुई शॅल हॅव टू ओपन धिस टेडी बेअर, इफ यू डोन्ट माईंड" त्याचे म्हणणे बरोबर होते. अशा भल्या मोठ्या टेडी बेअर मधून ड्रग्ज स्मगलिंगचे चांगलेच चान्सेस होते. मी चटकन् मनात म्हटले, आता डोके चालविले पाहिजे! मी चटकन् उत्तर ठोकून दिले, "आय डोन्ट माईंड. बट सी हर फेस! शी हॅज वन इट ॲट द वंडरलँड! इफ यू हॅव टू ओपन इट, देन यू कॅन. बट देन यू विल हॅव टू रिप्लेस इट बाय सिमिलर वन. अदरवाईज शी विल क्राय!" मात्रा लागू पडली. "ओ नो कम ऑन बेबी! यू कॅन प्रोसीड!" मृगयाचा गालगुच्चा घेत तो म्हणाला. आमची कसलीही तपासणी न होता आम्ही पुन्हा बसमध्ये येऊन बसलो. गोल फिरणारी कुलपे उघडावी लागली नाहीत त्याचेही समाधान वाटत होते. अमेरिकेत पुन्हा प्रवेश केला होता. थोड्याच वेळात बफेलो आले.

बसमधून उतरलो. बसस्टँडवर बाल्टीमोरसाठी बसच्या रांगेत उभे राहिलो व बॅगस् तेथील काऊंटरवर दिल्या. सबंध प्रवासात पहिल्यांदाच वाईट अनुभव आला. ग्रे-हाऊंडच्या संपामुळे असावे कदाचित, पण बफेलोला शिष्टाचार आणि सहानुभूतीचा अभाव होता. तो काऊंटरवरचा माणूस टेडी बेअर बसमधून नेण्यास मुळीच तयार होईना. शेवटी बॅगस् दिल्या. व टेडी बेअर हातात धरून बसजवळ उभे राहिलो. ड्रायव्हर आल्याबरोबर तिकीटे चेक करून प्रथम आत चढलो. सीटवरच खिडकीजवळ टेडी बेअर ठेवले व त्याच्या बाजूला मृगयाला बसविले. ड्रायव्हर आला आणि बस सुरू झाली. मी समाधानाचा सुस्कारा सोडीत टेडी बेअरकडे पाहिले – ते टेडी बेअर एक हात खिडकी बाहेर ठेवून आरामात माझ्याकडे डोळे मिचकावित पाहत होते! मृगया थोड्या वेळाने तिच्या आईजवळ जाऊन बसली, नशिबाने बस पूर्ण भरली नव्हती. त्यामुळे बारा तासांच्या प्रवासात पहाट होईपर्यंत टेडी बेअरला कोणी उठविले नाही! प्रत्येक स्टँडवर बस

थांबली की प्रवासी टेडी बेअरला पाहून 'हाऊ क्यूट' म्हणून दुसरी सीट पकडत असत. मी झोपेचे सोंग घेऊन टेडी बेअरवर लक्ष ठेवून होतो.

पहाट झाली. हायवेला फार फाटे फुटू लागले. पिटसबर्ग, न्यूयॉर्क वगैरे पाट्या रस्त्यावर दिसू लागल्या. आता बाल्टीमोरला फार वेळ लागणार नाही असे वाटू लागले. आणि साधारण सकाळी नऊ वाजता आम्ही बाल्टीमोरला पोहोचलो.

●●●

आवडते बाल्टीमोर आणि वाशिंग्टन

बाल्टीमोरच्या बस स्टँडवर असंख्य काळे लोक दिसत होंते. काळे लोक म्हणजे लुटारू अशी एक भावना आमच्या मनात निर्माण झालेली होती. पण ती भावना चुकीचीच होती. कारण सिएटलला बसस्टँड आम्हाला मिळत नव्हता तेव्हा एका काळ्या जोडप्याला आम्ही पत्ता विचारला होता. तेव्हा बायकोला पुढे जायला सांगून, तो स्वतः आम्हाला बसस्टँड दाखवावयास आला होता. बस स्टँडवर तो थोडा वेळ थांबला सुद्धा. बहुधा आम्हाला लुटायचा त्याचा बेत असेल अशी आमची कल्पना! पण बस आल्यावर त्याने आत चढून बस ड्रायव्हरला आम्हाला आमचे ठिकाण दाखविण्यास सांगितले! तसे पाहिले तर लॉस एन्जलीसच्या डॉ. मराठेंच्या गाडीचा चक्काचूर गोऱ्या तरुणांनी केला होता. पण निग्रो बघीतला की भीती वाटे. बाल्टीमोर बस स्टँडवर प्रदीप भागवत आम्हाला नेण्यास येणार होता. त्याची वाट पाहत आम्ही बस स्टँडवर सामान संभाळत उभे होतो. इतक्यात प्रदीप आला. सुटाबुटात! आल्यावर त्याने 'हॅलो' म्हटले व आमचे सामान घेऊन तो त्याच्या गाडीकडे आम्हाला घेऊन गेला. अमेरिकेत पाहिलेली सर्वात बेकार गाडी ती असावी! एकदम जुनी! पण डिकी मोठी त्यामुळे सामान भरपूर मावण्याची सोय. भारतीय लोक भरपूर सामान घेऊन प्रवास करतात ह्याची खात्री असल्यांमुळे प्रदीप ती गाडी घेऊन आला होता. कोट व टाय काढून टाकून त्याने पटापट आमचे सामान डिकीत टाकले. खरंच प्रदीप ग्रेट! आपले ऑफिस सोडून तो आज आमच्यासाठी आला होता. त्याने आम्हाला घरी आणून सोडले. त्याची बायको पाली, घरी नव्हती. तेव्हा आमच्यावर उघडं घर सोडून तो परत ऑफिसला गेला. जाण्यापूर्वी दुपारी दोन वाजता वॉशिंग्टनला जायचे आहे, तयार रहा. असे सांगून तो गेला.

खरं म्हणजे आमचा ग्रे-हाऊंडचा पास संपला होता. त्यामुळे आम्हाला वॉशिंग्टनला जाण्यासाठी तिकिटे काढून जावे लागले असते. आंघोळ करावी असा विचार करीत होतो, तितक्यात मागील दरवाज्याचा आवाज आला. प्रदीपची बायको, पाली –सुहास्य वदनाने आत आली. प्रदीप ब्राम्हण! पाली पंजाबी –शाकाहारी आल्याबरोबर तिने प्रथम चहा दिला. आमच्या आंघोळी होईपर्यंत ब्रेकफास्ट तयार केला.

● आठवणी दाटतात

प्रदीप भागवतचे घर, एक वेगळेच घर! घरात किचनमध्ये पक्षी मोकळे उडत होते. पालीने – म्हणजे प्रदीपच्या बायकोने पाळलेले! छानपैकी कुठेही बसत वॉश बेसिनमध्ये पडणाऱ्या पाण्यात वॉश घेत! दुसऱ्या खोलीत मोठा पिआनो टाईप कॅसिओ सर्व गॅजेटससह वा! मजा आली. बंगल्याची रचना नेहमीसारखीच, पण खाली मोठे तळघर, तळघरात उपयोगी न पडणारे सामान!

पालीची आणि माझी एकदाच मुंबईत भेट झाली होती. तेव्हा ती इंडियात आली आणि आजारी पडली. पाली मूळची दिल्लीची. पालीचा स्वभाव प्रथम कळला नव्हता. पण पालीने दोन दिवसात आम्हाला जीव लावला. भारतीय पद्धतीच्या सर्व डिशेस् करण्यात ती एक्सपर्ट! स्वतः व्हेजिटेरिअन पण चिकन सुद्धा फर्स्ट क्लास बनवायची! तिच्या इतकी सुगरण बाई मी आख्या अमेरिकेत पाहिली नाही!

दुपारी बरोबर दोन वाजता प्रदीप आला. कपडे बदलून पटकन् तयार झाला. बाल्टीमोरपासून वॉशिंग्टन अवघे चाळीस मैल! पण मध्ये खाडी. पाण्याखालून काढलेला बोगदा. आणि त्यावेळेस तरी जगातील सर्वात लांब बोगदा. बोगदा पार करून वॉशिंग्टनला आलो. वाटेत आम्हाला हाय-वे लागला. हा उत्तर-दक्षिण सर्वात मोठा अमेरिकन हायवे, थेट फ्लोरिडा पर्यंत जाणारा.

अमेरिकेत एकाच नावाची अनेक गावे आहेत. पोर्टलँड, वॉशिंग्टन वगैरे, त्यामुळे गावाच्या नावापुढे राज्याचा उल्लेख करतात. हे वॉशिंग्टन डी. सी. (डिस्ट्रिक्ट कोलंबिया). पॅटोमॅक नदीच्या किनाऱ्यावर वसलेले हे सुंदर शहर-अमेरिकेची राजधानी आहे! जॉर्ज वॉशिंग्टन यांचे घर, पंधरा मैलांवर 'माऊंट व्हरनॉन' येथे आहे.

प्रथम नॅचरल हिस्टरी म्युझियम पहाण्यास गेलो. म्युझियम भलताच मोठा होता. प्रमुख दालनात मोठ-मोठे व्हेल मासे व इतर प्राणी टांगून ठेवले होते, काचेच्या शोकेसेसमध्ये माकड, हरिण, ससा, वाघ आणि चिमण्यांचे वेगवेगळे प्रकार भुसा भरून, नावे लावून ठेवले होते. नैसर्गिक वाटावे म्हणून फार सुंदर झाडांची वगैरे पार्श्वभूमी करण्यात आली होती. जगातील सर्व खंडातील वेगवेगळे प्राणी व पक्षी तिथे पहावयास मिळाले. डायनोसॉर हा प्राणी अमेरिकेतील फार आवडता. त्याचा सांगाडा प्रत्येक म्युझियममध्ये पहावयास मिळाला. स्मिथसोनियम ह्या माणसाच्या नावाने ही सर्व संग्रहालये आहेत.

स्फटिकांचा संग्रह तर पाहण्यासारखा. त्या चमचमणाऱ्या दगडात अगदी आपल्या पुण्या नाशिककडचे चमकणारे दगडही ठेवलेले आढळले. आपल्या

महाराष्ट्रात इतके सुंदर दगड मिळतात हे आम्हाला माहीत नव्हते. माहीत आहेत ते फक्त नर्मदेतील गोटे! हे दगड कापल्यावर त्याच्या पोटातील रंगीबेरंगी खजिना पाहून मन थक्क होते.

म्युझियम पाहून बाहेर पडलो. आणि मग एक विस्तीर्ण परिसर सुरू झाला. जागोजागी उभारलेले सुंदर सुंदर पुतळे, सुंदर हिरवळ. हळूहळू आम्ही एका टेकडीच्या पायथ्याशी आलो. ही 'अर्लिंग्टन सिमेट्री! टेकडीवर अनेक पांढरे शुभ्र क्रॉस. जमिनीत पुरलेले. दृष्टी पुरणार नाही एवढे क्रॉस. येथे व्ही. आय. पी. लोकांना पुरण्यात येते. अमेरिकेत माणूस आपल्या मृत्यूनंतर आपल्याला पुरण्याची व्यवस्था प्रथम करून ठेवतो. आपल्याला मृत्यूनंतर मोठ्या जागी पुरले जावे ही अमेरिकन माणसाची इच्छा असते, मुख्य गेटच्या बाहेर, टुरिस्ट गाड्यांचे तिकीट होते. तिकीट काढल्यावर गाडीने स्मशानभूमी दाखवितात. परवडत नसेल त्याने चालत जायचें. अमेरिकन लोक एवढे श्रीमंत, पण स्मशानातही पैसा कमवितात हे पाहून वाईट वाटले.

ह्या स्मशानभूमीत अनेक थडगी! बहुतेक व्हिएतनाम युद्धात धारातीर्थी पडलेल्या मोठमोठ्या सेनापतींची! व्हिएतनाम युद्धात अमेरिकेला केवढे नुकसान सोसावे लागले त्याचे हे द्योतक. काही ठिकाणी थडग्याजवळ ताजी फुले ठेवलेली होती. तर काही ठिकाणी ढाळलेले अश्रू! टेकडीच्या माथ्यावर पोहोचलो. चबुतऱ्यावर एक ज्योत तेवत होती. हिंदू संस्कृतीप्रमाणे तेवणारी ही ज्योत पाहून आश्चर्य वाटले! ती प्रेसिडेंट केनेडींची समाधी होती. आजूबाजूला प्रेसिडेंट केनेडींची सुंदर वाक्ये दगडावर कोरलेली होती. खरं म्हटलं तर ज्योतीचा जवळचा संबंध हिंदुंचा आणि पारशांचा. पण अमेरिकन्स? कदाचित रोमन संस्कृतीचा परिणाम असावा.

टेकडीवरून सभोवताली नजर फिरविली. सर्वत्र पांढरे क्रॉस पसरले होते. एका रांगेत बहुतेक सैनिकांची थडगी. जणू काही मृत्यूनंतरही सैनिकी शिस्तीने ती जॉन केनडींना मानवंदना देत होती. वातावरण खूपच गंभीर वाटत होते. तसे पाहिले तर प्रेसिडेंट केनेडींचा खून आणि सैनिकांचे मरण, दोन्हीही अनैसर्गिकच. म्हणजे हे सगळे एकाच माळेचे मणी, पण ह्या मण्यांमध्येही जॉन एफ. केनडी हा मेरुमणी!

त्यानंतर अब्राहम लिंकनचा पुतळा पहावयास गेलो. वॉशिंग्टन मेमोरियलमध्ये – लिंकन मेमोरियल, स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूट आणि कॅपिटॉल ह्या इमारती आहेत. वॉशिंग्टन मेमोरियल हा मनोरा मध्यभागी उंचच उंच! त्याच्या एका बाजूला अब्राहम लिंकन यांचा पुतळा व दुसऱ्या बाजूला कॅपिटॉल

बिल्डींग. सर्व एकाच रेषेत, मध्ये लांबचलांब सुंदर हिरवळ आणि पाणी. पाहून मजा वाटते.

अब्राहम लिंकन हे कृष्णवंशीय. पण त्यांचा सुंदर पुतळा येथे उभारलेला आहे.

एका उंच चबुतऱ्यावर लिंकनचा १९ फूट उंचीचा पुतळा, खुर्चीवर बसलेल्या स्थितीत आहे. आतील भिंतीवर लिंकनची प्रसिद्ध वाक्ये कोरलेली आहेत.

गाडी पार्क करण्यास जागा नसल्यामुळे, प्रदीप राऊंड मारून आला, नंतर आम्ही व्हाईट हाऊस पाहण्यास गेलो. वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी आणि व्हाईट हाऊस म्हणजे अध्यक्षांचे निवासस्थान व महत्त्वाची भाषणे करण्याचे ठिकाण. पण तिथे रंगकाम चालू असल्यामुळे आम्हाला व्हाईट हाऊस अर्धवटच पहावयास मिळाले. अर्धे अधिक व्हाईट हाऊस बुरख्याखाली झाकलेले!

कुंपणाला टेकून व्हाईट हाऊसचे दर्शन घेतले. व्हाईट हाऊसची इमारत बाहेरून फार छोटी आणि साधी वाटली. हिरवळ मात्र छान होती. शुक्रवारी रात्री आपल्याकडे 'वर्ल्ड धिस वीक' कार्यक्रमात अनेकदा पाहिलेले व्हाईट हाऊस निदान बाहेरून तरी पाहिल्याचे समाधान आम्हाला मिळाले.

व्हाईट हाऊसच्या मानाने कॅपिटॉलची इमारत फारच सुंदर व भव्य. कॅपिटॉलचा एक भाग वॉशिंग्टनने १७९३ मध्ये बांधला. व सर्व इमारत १८११ मध्ये बांधून पूर्ण झाली. सिनेटच्या बैठकी येथे होतात.

त्यानंतर केनेडी परफॉरमिंग आर्टस् नावाची इमारत पहाण्यास गेलो. पोटोमॅक नदीच्या किनाऱ्यावर ही सुंदर वास्तू उभी आहे. आतमध्ये केनेडींचा सुंदर बस्ट पुतळा आहे. इथे नाटके, नृत्य वगैरे अनेक करमणुकीचे कार्यक्रम होतात.

येताना बाजूला एक गोलाकृती इमारत पाहिली. "ही वॉटर गेट बिल्डींग!" प्रदीप म्हणाला, "म्हणजे वॉटर गेट स्कॅन्डल?" मी विचारले. हो हो, ती भानगड ह्याच प्रसिद्ध इमारतीतील! एके काळी गाजलेले वॉटर गेट अशा तऱ्हेने पहावयास मिळाले. भ्रष्टाचाराचे प्रसिद्ध प्रकरणात ही इमारत गाजली होती.

वॉशिंग्टन पाहून झाले होते. रात्री पुन्हा बाल्टीमोरला प्रदीपच्या घरी आलो.

पालीने फर्स्ट क्लास जेवण तयार केले होते. मुलाना पाहिजे तेवढे कोकाकोला-सेवनअप व इतर पदार्थ मिळत होते. पाली स्वतः शाकाहारी, तरीही

मांसाहारीच काय पण इतरही पदार्थ करण्यातील तिचे कौशल्य पाहून मी तिला 'तिथे कुकिंगचे क्लासेस काढ' म्हणून अनाहूत सल्ला दिला.

दुसऱ्या दिवशी बाल्टीमोरला आराम करून फिलाडेल्फियाला जाणार होतो.

"आज काय करणार?" पालीने मला विचारले.

"नथिंग, फक्त आराम!"

"प्रदीप, आज सर्वांना बाल्टीमोअरच्या धक्यावर घेऊन जाऊ या. डॉक्टर, तुम्हाला क्रॅब्स खायचे आहेत ना? मग नक्की जाऊ या प्रदीप आल्यावर"

अरे वा! क्रॅब्स! कोणीतरी मला सांगितले होते – अमेरिकेतील मेन येथील लॉबस्टर आणि बाल्टीमोअरचे क्रॅब्स जरूर चाखावेत. "ठीक आहे." मी जणू काही कोणीतरी बळजबरीने मला क्रॅब्स खाऊ घालणार आहे अशा सुरात उत्तर दिले. खरे म्हणजे मला मनातून फार आनंद होत होता.

संध्याकाळी प्रदीप घरी आला. आणि धो धो पाऊस पडू लागला. "नाऊ इट इज इम्पॉसिबल टु गो ऑन पोर्ट" प्रदीप म्हणाला, पण पाली-दी-ग्रेट प्रदीपला म्हणू लागली, "नथिंग डुईंग. दीज आर पासिंग शॉवर्स! वुई मस्ट गो." दोघांची थोडावेळ वादावादी झाली. माझ्या मनातील आशा टेबलटेनीसच्या बॉलप्रमाणे इकडून तिकडे व तिकडून इकडे हेलपाटत होत्या, सरते शेवटी पाली जिंकली!

थोड्याच वेळात आम्ही पोर्टवर पोहोचलो. मगाशी पडलेल्या पावसाने पोर्ट न्हाऊन निघाले होते. सुंदर इमारती, चमचमणारे दिवे व मधूनच छोट्या छोट्या लाँचेस! "चला प्रथम राईड घेऊन येऊ" प्रदीप मुलांना घेऊन वेगळ्या बोटीत गेला- त्यात स्वतः वल्हे मारण्याची सोय होती. मी सुनीला व पाली लाँचमध्ये बसलो. पाण्यात आम्ही खूप आतमध्ये गेलो. पाण्यामध्येही एका बेटावर सुंदर हॉटेल होते. त्याला वळसा घालून आम्ही परत फिरलो. तो पर्यंत प्रदीपही मुलांना घेऊन आला होता.

एका बाजूला पाण्यात ॲक्वेरियमची इमारत होती. तेथील माशांचे संग्रहालय फार मोठे होते. किनाऱ्यावर पोहोचलो तोपर्यंत बहुतेक हॉटेल्स बंद झाली होती. तोपर्यंत पालीने पिझ्झा घेतले. पण क्रॅब्स मिळण्याची शक्यता नव्हती. प्रदीप म्हणाला, "सॉरी डॉक्टर," पण पाली भलतीच ग्रेट- "नो प्रदीप, वुई विल गेट क्रॅब्स ऑन द वे, यु नो. वन शॉप इज ओपन टिल लेट नाईट," आणि पालीने प्रदीपला तिथे गाडी घेण्यास लावलीच.

क्रॅबस्च्या दुकानात मी गंमत पाहण्यास गेलो. वेगवेगळ्या साईझचे खेकडे उकडून काचेच्या शो-केसमध्ये ठेवलेले होते. प्रदीपने साधारण मध्यम आकाराचे

खेकडे घेतले त्याबरोबर सुकी चटणी मिळाली रात्री घरी आल्यावर, एका खास बनविलेल्या मॅलेटने, क्रॅब फोडून, डायनिंग टेबलावर बसून आम्ही – पाली सोडून – सर्वांनी ते खाल्ले. प्रदीपने आमच्याबरोबर प्रथमच क्रॅब्स् चाखले. मॅलेटने क्रॅब्स् फोडताना मोठी मजा आली. क्रॅबचे राहिलेले सांगाडे पालीने एका स्पेशल गार्बेज बॅगमध्ये भरले व टेबल साफसूफ केले. पालीचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

रात्री झोपून सकाळी लवकर उठलो. फिलाडेल्फियाला डॉ. पाठकांना फोन लागेना. ग्रे-हाऊंडचा पास संपल्यामुळे आता बसचे तिकीट काढून जावे लागणार होते. सर्व बांधाबांध करून आम्ही तयार होतोय तोच डॉ. पाठकांचा फोन लागला. ग्रे-हाऊंडने तिकीट काढून जायचे म्हणजे खर्च वाढणार! पण फोनवर प्रदीपने त्यांना त्यांचा पत्ता विचारला व सांगितले की तो आम्हाला त्याच्या स्टेटच्या बॉर्डरवर सोडेल व तेथून डॉ. पाठकांनी आम्हाला पिकअप करावे. कोणत्या मॉलवर भेटायचे ते त्यांनी ठरविले. सर्व सामान गाडीत ठेवले. पण प्रदीपचा कॅसिओचा पिआनो पुन्हा एकदा नजरेस पडला. मी त्याला म्हणालो, "ए प्रदीप, दहा मिनिटे लेट निघूया. पण तुझा हा सुंदर पिआनो जरा वाजवून दाखव ना." प्रदीपने ताबडतोब होकार देऊन अनेक हिंदी गाण्याची झलक वाजवून दाखविली. मन प्रसन्न झाले!

पालीचा निरोप घेताना, पालीच्या स्वयंपाकाची चव जीभेवर रेंगाळत असल्यामुळे शब्दच बाहेर पडेनात. पाली यू आर सिंपली ग्रेट! मनात म्हटले, गाडी सुरू झाली.

●●●

'ऐतिहासिक फिलाडेल्फिया'!

हाय-वेने फिलाडेल्फियाकडे निघालो. वाटेत एक मोठा मॉल लागला. तेथे प्रदीपने गाडी थांबविली, डॉ. पाठक तिथेच भेटणार होते. आतमध्ये चक्कर मारली. अरेच्या! डॉ. पाठक वाट पाहत होते! त्यांच्याबरोबर त्यांची अठरा वर्षांची कन्या होती. एक्सचेंज ऑप प्रिझनर्स तसे एक्सचेंज ऑफ टूरिस्टस्! सामान काढून प्रदीपने डॉ. पाठकांच्या गाडीत भरले. त्यामानाने डॉ. पाठकांची गाडी लहान, पण प्रदीपने दोरीने बांधून वगैरे कसेबसे बसवले. प्रदीपचा निरोप घेतला. डॉ. पाठकांची मुलगी गाडी चालवित होती.

डॉक्टर पाठकांची ओळखही श्री. सुधीर फडके ह्यांच्यामुळेच! डॉ. पाठक मुंबईत वारंवार कंपनीच्या कामाच्या निमित्ताने येत असतात. ते एक हुशार शास्त्रज्ञ! ह्यामुळे हैद्राबादच्या डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीने त्यांच्याशी करार केला होता. दोन वर्षांसाठी सहा किंवा आठ आठवडे भारतात राहून ते अमेरिकेला परत जात असत. थोड्या वेळात फिलाडेल्फिया आले.

डॉ. पाठकांची दोन्ही मुले हॉस्टेलमध्ये राहत होती. मुलगा मेडिकलला आणि मुलगी दाताची डॉक्टर. संध्याकाळी डॉक्टर व त्यांच्या मिसेस बरोबर फिलाडेल्फिया पहावयास गेलो. रेव्हरंड टिळकांनी आपल्या बायकोला डॉक्टर होण्यासाठी ज्या हॉस्पिटलला पाठविले होते ते हॉस्पिटल बघीतले. एका इमारतीवर एक काळा कुट्ट उंच पुतळा होता. स्वातंत्र्याची घंटा तेथे आहे. त्या घंटेवर एक मोठा तडा गेलेला आहे. त्याबद्दलची माहिती ऐकली.

परत येताना इंडियन ग्रोसरी शॉपमध्ये गेलो. तेथे भाज्यांबरोबर नासके आंबेही पाहण्यास मिळाले. भारतीय दुकानात नासके आंबे मिळावेत हे पाहून वाईट वाटले.

रात्री डॉक्टर पाठकांनी गाणी म्हणून दाखविली. त्यांनी सुनीलालाही गायला लावले! डॉक्टर पाठक एक हुशार आणि गमत्या माणूस! म्हणाले, डॉक्टर चला, मी तुम्हाला उद्या ॲटलांटा सिटीत घेऊन जातो.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही ॲटलांटाला गेलो. ॲटलांटा सिटी समुद्रकिनारी! लास वेगाससारखी सिटी! अनेकजण स्लॉट मशीनवर खेळत होते.

● आठवणी दाटतात

आम्हीही खेळलो. पंधरा डॉलर्सने, प्रथम जिंकलो. नंतर एक डॉलर शिल्लक राहिला. पुन्हा खेळलो – अठरा डॉलर्स जिंकलो. व शेवटी तीन-चार डॉलर्स हरल्यावर पुरे म्हटले! पण मजा आली.

नंतर डॉक्टर पाठकांनी कुपन्सवर खाण्यासाठी एका हॉटेलमध्ये बसविले. कंटाळा आला की डॉ. पाठक ॲटलांटाला बसने येतात, स्लॉट मशीनवर खेळतात आणि परत जातात. परत येताना फिलाडेल्फियातल्या माझ्या एका पेशंटला भेटावयास गेलो. त्याचा पत्ता शोधण्यासाठी खूप फिरावे लागले. पण डॉक्टर पाठकांनी त्याचा पत्ता शोधून काढलाच शेवटी. त्यात एक तास गेला! आपण टुरिस्ट, लोकांना कसा त्रास देतो त्याचे उत्तम उदाहरण!

दुसऱ्या दिवशी फिलोडेल्फियातच, किरण जोगळेकरकडे एक दिवस रहावयास गेलो. सुप्रसिद्ध गायिका श्रीमती अलका जोगळेकर, यांचा किरण मुलगा. फिलाडेल्फिया, एक सुंदर शहर! इथे सेल्सटॅक्स नाही, त्यामुळे कपडे अमेरिकेतील कोणत्याही शहरापेक्षा स्वस्त. फॅक्टरीच्या भावात. संध्याकाळी किरणने आम्हाला खरेदीला नेले. कपड्यांच्या राशीच्या राशी पडल्या होत्या. आणि कपडे खरोखरच स्वस्त होते. थोडीफार खरेदी केली. कपड्यांची खरेदी होईपर्यंत कॉर्निंग वेव्हचे भांड्यांचे दुकान बंद झाले होते, दुकानाच्या शो-केसमध्ये भांडी दिसत होती, त्याच रात्री न्यू जर्सीला जाणार होतो. त्यामुळे कॉर्निंग वेव्हच्या भांडी खरेदीला रामराम ठोकावा लागला असता. पण किरणने एक आयडिया सुचविली. तीन दिवसानी तो आम्हाला सोडण्यासाठी न्यूयॉर्क एअरपोर्टवर येणार होता. त्यावेळी तो भांडी घेऊन येतो म्हणाला.

रात्री किरणकडे जेवून न्यू जर्सीला जाण्यासाठी रात्री ९ वाजता आम्ही निघालो. न्यू जर्सीला डॉ. आडिवरेकरांकडे फोन केला होता, बिचारा किरण, आमच्यासाठी तीन तास ड्राइव्ह करून न्यू जर्सीला आला. डॉ. आडिवरेकरांचा पत्ता किरणने विचारला होता, पण पत्ता मिळेपर्यंत रात्रीचा एक वाजला. मिसेस आडिवरेकर जाग्या होत्या. किरणने आमचे अर्धे सामान बरोबर आणले होते व उरलेले सामान तो तेरा तारखेला न्यूयॉर्कला जेव्हा येणार होता, तेव्हा घेऊन येणार होता.

डॉ. आडीवरेकर जवळच्याच हॉस्पिटलमध्ये डॉक्टर होते. बाजूलाच त्यांचे जुन्या पद्धतीचे घर! पी. एच्डी करून ते भारतातून आले. व नंतर येथे खरेखुरे डॉक्टर झाले होते – लहान मुलांचे डॉक्टर!

दुसऱ्या दिवशी न्यूयॉर्क बघण्यास जायचे होते. झोपी गेलो.

सकाळी लवकर उठून न्यूयॉर्कला कसे जावयाचे ते विचारले डॉक्टरांना, न्यूयॉर्कमध्ये संध्याकाळी सहा नंतर फिरू नका अशी सक्त ताकीद मिळाली. मगींग हा प्रकार फार चालतो तिथे.

●●●

भव्य शहर न्यूयॉर्क

ट्रेन पकडून न्यूयॉर्कच्या मॅनहटन भागात उतरलो. मॅनहटन स्टेशन अतिभव्य! साधारण बोरीबंदर सारखेच पण कितीतरी पटीने भव्य! न्यूयॉर्कसारखे भव्य शहर पहावयास मिळणार म्हणून आनंद व कुतूहल दोन्ही होते. न्यूयॉर्कबद्दल खूप ऐकले, वाचले होते. चित्रपटातून तसे थोडे पाहिलेही होते. न्यूयॉर्कचे एक वैशिष्ठ्य म्हणजे समांतर रस्ते – उभे आणि आडवे. उभे रस्ते स्ट्रीट व आडवे रस्ते ॲव्हेन्यू! त्यामुळे कुठेही चुकावयास होत नाही. न्यूयॉर्कमध्ये महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे एम्पायर स्टेट बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, स्टॅच्यु ऑफ लिबर्टी, ब्रॉडवे आणि फॉर्टी सेकंड स्ट्रीट. ब्रॉडवे हा नाटकांसाठी तर फॉर्टी सेकंड स्ट्रीट हा जुगार आणि वेश्या व्यवसायासाठी प्रसिद्ध!

मॅनहटन स्टेशनच्या बाहेर आलो आणि बाजूच्या उत्तुंग इमारती पाहून थोडावेळ स्तब्ध झालो. रस्त्यावरच उभे राहून मजा पाहत होतो. नंतर रस्त्याने चालत बाजूच्या गल्लीत शिरलो आणि एम्पायर स्टेट बिल्डींगचे दर्शन झाले. व्हिडिओ कॅमेरा सरसावला आणि चित्रण सुरू! रस्त्यावर असंख्य लोकांची वर्दळ होती, तरीही कॅमेरा कोणी खेचेल अशी भीती वाटत होती!

एम्पायर स्टेट बिल्डींग तशी जुनी इमारत एकशे दोन मजल्यांची, वरती जाऊन न्यूयॉर्क शहराचे दर्शन करावे असे मनात आले. पण मग बेत रद्द केला. कारण आतापर्यंत बरेच टॉवर्स पाहिले असल्यामुळे आता पूर्वी इतके स्वारस्य उरले नव्हते. शिवाय वेळ व पैसाही आता घालविण्यासाठी नव्हता. एम्पायर स्टेट बिल्डींगच्या पायथ्याशी अनेक झेंडे फडकत होते. जवळून दर्शन घेऊन पुन्हा मॅनहटन स्टेशनवर आलो.

स्टॅच्यु ऑफ लिबर्टीसाठी ट्रेन पकडून साऊथ फेरी स्टेशनवर उतरावयाचे होते. प्रवास सब-वे ने होता. तिकीट काढून गाडीत बसलो. डबे लांबलचक व जुने. भुयारी रेल्वे, जुनी स्टेशन्स, ओंगळवाणी! एक एक स्टेशन मागे पडू लागले. फॉर्टी सेकंट स्ट्रीट, वर्ल्ड ट्रेड सेंटर, अरे वा! सर्व नावे ओळखीची वाटत होती. वर्ल्ड ट्रेड सेंटर ही जगातील सर्वात उंच इमारत! पण उतरून बघण्यास वेळ नव्हता. शेवटी गाडी साऊथ फेरी स्टेशनला पोहोचली. हे शेवटचे स्टेशन. उतरलो आणि पलीकडे गेलो. छोटी इमारत, त्यापलीकडे सुंदर समुद्र आणि

समुद्रात लांबवर स्वातंत्र्य देवीचा पुतळा! पाण्याच्या मध्यभागी, हात वर करून उभा असलेला तो सुंदर पुतळा लांबूनही स्पष्ट दिसत होता.

तिकीट काढले, समोर पॅसेंजर बोटी होत्या. त्यात बसून स्वातंत्र्य देवीच्या पायथ्याशी जावयाचे होते. बोटी फारच छान! दुपार झाली होती. निळ्या समुद्रावरून आमची बोट पुतळ्याच्या दिशेने सरकू लागली. मधूनच परत येणाऱ्या बोटी भेटत होत्या. हातवारे करून प्रवासी आपला आनंद प्रकट करीत होते. अमेरिकेत कोणीही भेटला तर 'हाय' आणि दुसऱ्याबद्दल बोलताना 'गाय' हे शब्द नेहमी वापरले जातात. त्यामुळे भाषेची मजा वाटत होती.

सहज मागे वळून पाहिले. बापरे! किनाऱ्यावर उंचच उंच इमारती! किती उंच आणि वेगवेगळ्या. त्या दोन जुळ्या उंच इमारती, अरे त्या तर वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या. हां म्हणजे जगातील सर्वात उंच इमारती! आणि पलीकडची ती इमारत? - अरेच्चा ती तर एम्पायर स्टेट बिल्डींग! सर्व न्यूयॉर्क किनाऱ्यावर दिसत होते.

समोर पाहिले. पुतळा जसजसा जवळ येत होता तसतसे त्याच्या भव्यतेचे दर्शन होत होते. उंच, हिरवागार पुतळा! हळूहळू बोट त्याच्या पायथ्याशी

स्वातंत्र्यदेवीचा पुतळा न्युयॉर्क बोटीतून फ्हाताना

थांबली. क्षणभर उभे राहून पुतळ्याचे दर्शन घेतले. मग बोटीतून उतरून पुतळा चारी बाजूने फिरून पाहिला. एवढा उंच पुतळा कसा आणि कशासाठी उभारला? मैत्रीचे प्रतीक म्हणून फ्रेंच जनतेने अमेरिकेला हा पुतळा भेट दिलेला आहे.

हा पुतळा १९व्या शतकातील एक आश्चर्य गणला जातो. तो १८८६ मध्ये उभारला गेला.

ह्या पुतळ्यासाठी सर्वात जास्ती सिमेंट आणि लोखंड लागले. पुतळा पूर्ण झाल्यावर आतून लाईट व लिफ्ट बसविण्यात आले, हा पुतळा हिरवा का हा प्रश्न पडतो. पण त्याचे उत्तर सोपे आहे. ह्या पुतळ्याला तांब्याचा उपयोग करून मुलामा चढविण्यात आला आहे. त्यावर जमा होणाऱ्या कॉपर सल्फेटचा रंग आपोआप पुतळ्याला आला आहे. हा पुतळा समुद्रात दूरवर असल्यामुळे वारा पाणी ह्यापासून त्याचे संरक्षण करणे फार जिकीरीचे असते. तसेच देवतेच्या हातातील ज्योत कशी तेवत ठेवावयाची हा प्रश्नही असतोच सध्या मशालीत असलेली ज्योत युनिव्हर्सिटी ऑफ डेनबरच्या संशोधन विभागाने ती तेवत ठेवली आहे. पार्क सर्विस नावाच्या एका कंपनीने एका नवीन उपकरणाद्वारे ह्या पुतळ्याला कुठे तडा गेल्यास तो शोधण्याचे तंत्रही उपयोगात आणले आहे. पाण्यात गंजणार नाही असा लोखंडाचा प्रकार शोधण्यात आला, आणि १९८६ साली दुरुस्ती करून हा पुतळा पुन्हा जनतेसाठी खुला करण्यात आला.

ह्या पुतळ्याचा परिसर १६ एकरांचा आहे. पुतळ्यात जाण्यासाठी पुतळ्याच्या पायामधून रस्ता होता. माणसे रांगेने पण मुंगीच्या पावलाने पुढे सरकत होती. प्रथम रुंद जिना. नंतर चिंचोळा मार्ग. गर्दीमुळे पुतळा चढून जाण्यास दोन अडीच तास लागले. म्हणूनच पुतळा पहाण्यासाठी लौकर जाणे चांगले. मध्यभागी लिफ्ट होती पण ती अगदी वर मुकुटा पर्यंत जात नव्हती. मध्ये मध्ये रक्षक उभे होते. हास्यविनोद करून लोक वेळ घालवीत होते. पुतळ्याच्या मुकुटात प्रवेश केल्यावर त्याच्या छोट्या छोट्या खिडक्यातून खाली पाहिले. बाप रे! भयानक उंचीवर आम्ही उभे होतो आणि समोर न्यूयॉर्कचा सुंदर किनारा! वा! येवढ्या लांब आल्याचे सार्थक झाले, मशालीचा थोडा भाग खिडकीतून दिसत होता. पुतळ्याची मोठी सांवली जमिनीवर पसरली होती. समाधानाने खाली उतरलो. न्यूयॉर्कची स्काय लाईन फारच सुंदर वाटली. रात्री तर ह्या झगमगत्या इमारती पाहणे म्हणजे पर्वणीच असेल.

पुन्हा सब-वे ने मॅनहटनला निघालो. मध्ये पुन्हा "फॉर्टी सेकंड स्ट्रीट" स्टेशन लागले. येथे कॅबरे आणि अनेक डान्सिंग क्लब आहेत. तिथे डोकावून येण्याचे

मनात होते, पण पुन्हा उतरून गाडी पकडणे तापदायक झाले असते, शिवाय मुले बरोबर होती. तेव्हा स्टेशनचे नांव वाचण्यावरच समाधान मानावे लागले!

साडे-पांच वाजता मॅनहटनला आलो. न्यूयॉर्कच्या रस्त्यावर मनसोक्त फिरून घेतले, व गाडी पकडून न्यू जर्सीला आलो. गाडी सुखसोयीनी युक्त-सुंदर सीटस्-मोठ्या खिडक्या. नाहीतर आपल्या लोकलसमधील गर्दी! चांगल्या रेल्वे व्यवस्थेमुळे लांबलांबून न्यूयॉर्कला लोक अप- डाऊन करू शकतात.

रात्री डॉ. आडिवरेकरांशी भरपेट गप्पा झाल्या. थोड्याच दिवसांनी ते न्यू जर्सी सोडून दुसरीकडे स्वतःची प्रॅक्टिस चालू करणार होते. त्यांच्याबरोबर आमच्या वैद्यकीय विषयांवर चर्चा झाली. रात्री उशीरा, आवराआवर करून झोपी गेलो.

१३ जूनची सकाळ उजाडली. १३ आकडा अशुभ मानतात इकडे, पण माझा असल्या गोष्टींवर विश्वास नव्हता. किरण जोगळेकरचा फिलाडिल्फियाहून फोन आला - ११ वाजता येतो म्हणून. त्याच्याबरोबर न्यूयॉर्कला जावयाचे होते, पण तो लौकर येणार असल्यामुळे न्यूयॉर्कला जाताना जॅकसन हाईटवर खरेदी करण्यास वेळ नव्हता. म्हणून मग सुनीला न्यू-जर्सी मध्येच खरेदी करून आली. ११ वाजता किरण मोठी गाडी, आणि आमचे डॉक्टर पाठकांकडे राहिलेले सामान घेऊन आला. गाडीत सामान बांधेपर्यंत एक वाजला. किरणची आई-श्रीमती अलका जोगळेकर-दुपारी अडीच च्या विमानाने मुंबईहून येणार होत्या. अलका जोगळेकर स्वतः गायिका, त्यांची व माझी फार दिवसांची ओळख! किरणने येताना मोठे काम केले होते. पिस्ता, बदाम व कॉर्निंग वेव्हची भांडी त्याने आणली होती. न्यूयॉर्कच्या खरेदीला आम्ही स्व-खुषीने चाट दिली होती. नाहीतरी खरेदीसाठी आता डॉलर्स कोठे उरले होते म्हणा?

डॉ. अडिवरेकरांचा निरोप घेतला आणि न्यूयॉर्कच्या वाटेला लागलो. अमेरिकेतील प्रवासाचा शेवटचा टप्पा. कारण न्यूयॉर्कवरून डायरेक्ट मुंबई युरोपला जाता आले असते, पण तेवढे दिवस शिल्लक नव्हते मुलांच्या शाळा सुरू होणार होत्या.

न्यूयॉर्क शहराला वळसा घालून गाडी विमानतळाच्या दिशेने धावू लागली. सुंदर डबल डेकर पूल व समुद्र पाहात एअरपोर्ट जवळ आलो. विमान कंपन्यांचे मोठमोठे बोर्ड रस्त्यावर दिसू लागले. जगातील बहुतेक सर्वच कंपन्यांचे बोर्ड रस्त्यावर दिसले. प्रत्येक मोठ्या कंपनीचा वेगवेगळा एअरपोर्ट! ज्या कंपनीचे

तिकीट असेल त्या कंपनीच्या एअरपोर्टवर जावयाचे. ह्यावरून न्यूयॉर्क हा केवढा प्रचंड एअरपोर्ट आहे हे लक्षांत आले.

आम्ही पॅन-ॲम विभागात आलो. तिथेही दोन-तीन इमारती, नंतर आमच्या विमानतळाचा नंबर शोधून शोधून काढला. तोपर्यंत मी आणि किरण, किरणच्या आईला घेण्यासाठी एअर इंडियाच्या विभागात गेलो. किरणच्या आई विमानाने एकट्याच येणार होत्या. त्या येऊन थांबल्या होत्या वाट बघत. थोडा वेळ त्यांच्याशी बोललो. आणि किरण आम्हाला पुन्हा आमच्या एअरपोर्टवर सोडून गेला.

पाच वाजत आले होते संध्याकाळचे. आमच्या न्यूयॉर्क बॉम्बे फ्लाईटला वेळ होता. तो पर्यंत एअरपोर्ट पहात बसलो. एअरपोर्टच्या खिडकीतून जम्बो विमानांची रांगच दिसत होती.

आमच्या विमानाची अनाऊंसमेंट झाली. सिक्यूरिटी चेक अप मधून जाण्याची सूचना मिळाली. त्या अगोदर काऊंटरवर तिकीट ओ. के. असल्याची खात्री करण्यासाठी रांग लागली. आम्ही रांगेत उभे असताना एका बाई व पुरुषाने प्रत्येक प्रवाशाला प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

"क्षमा करा! आम्ही तुमचा वेळ घेतोय."

"काही हरकत नाही. बोला."

"आम्हाला सांगा, ह्या सर्व बॅगा तुम्ही स्वतः भरल्या आहेत का? आणि निघताना कोणी तुम्हाला भेटी वगैरे बांधून दिल्या आहेत का?

"आहेत थोड्या"

"मग तुम्ही त्या उघडून पाहिल्या आहेत का?"

ह्यालाही उत्तर "हो", कारण नाहीतर ती बाई बॅग उघडून प्रत्येक पॅकिंग तपासावयाची!

"बरे, मग तुम्ही इतर कोणासाठी कोणाच्या तरी नातेवाईकाने दिलेले सामान घेऊन जात आहात का?"

"छट्ट, मुळीच नाही, अहो आमचेच सामान आम्हाला भारी झालं आहे! बघाना, एवढे मुलांचे कपडे, खेळणी...

"बरं बरं, आभारी आहोत. तुमचा प्रवास सुखाचा होऊ द्या."

"थ्यँक यू" म्हणून संभाषण संपले. ही सर्व काळजी घेणाऱ्या एअरपोर्ट रक्षकांचे कौतुक वाटले. कधी कधी एखादा प्रवासी स्मगलिंगचा माल अथवा स्फोटक पदार्थासह पकडला गेल्यावर, ती बॅग माझी नव्हती किंवा मी बॅग भरली नाही किंवा कुणीतरी भेट दिली, ती मी उघडून पाहिली नाही, अशा सबबी सांगतात. त्या साठी ही सौजन्यपूर्ण चौकशी!

इतक्यात काऊंटरवर माझा नंबर लागला. बॅगा काऊंटरवर दिल्या. पुन्हा तिथे जोरदार चौकशी. सर्व बॅगांना टॅग्ज लावून त्या बाईला खूष करीत म्हटले,

"का हो, हे" ह्या मुलीच्या हातात टेडी बेअर आहे, ते हातातून घेऊन गेले तर चालेल ना?"

"छे छे. भलतंच काय? अहो हातातून ठरलेल्या आकारापेक्षा मोठे सामान नेण्याची परवानगी नाही, आणि हे टेडी बेअर तर एवढे मोठे"

"अहो, पण हे इतके नरम व लुसलुशीत आहे, ते तुमच्या बॅगज कंपार्टमेन्टमध्ये खराब नाही कां होणार?

"ते पण खरंच, पण तुम्ही त्याला व्यवस्थित पॅक करून का नाही आणले?" मनात म्हटले, पॅकिंगचा खर्च २५ ते ३० डॉलर्स, तो कोण देणार?" ती म्हणाली, "पण एक काम करा, तुम्ही सिक्युरिटी चेक अप मध्ये विनंती करून पहा."

"ठीक आहे" मी म्हणालो. अर्थात हे सर्व संभाषण इंग्रजीतून चालले होते. सिक्युरिटी चेक अप मधूनही टेडी-बेअरला पास करून घेतले. आता शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा - विमानात शिरकाव करून घेण्याचा!

थोडा वेळ एअरपोर्टवर फिरलो. न्यूयॉर्क एअरपोर्टवरच्या ह्या कक्षात अनेक दालने होती. ड्युटी फ्री शॉपमध्ये जाऊन दोन मद्याच्या बाटल्या घेतल्या. खरं म्हणजे न्यूयॉर्क ड्यूटी फ्री शॉप मध्येही महागाई! सिंगापूरच्या मानाने कितीतरी महाग! थोडा वेळ फिरून मग प्रतीक्षा दालनात शिरलो व एका कोपऱ्यात टेडी बेअरला घेऊन बसलो. आम्ही विमानाच्या वेळे आधी आलो होतो, तेव्हा थोडावेळ व्हिडीओ शूटिंग करीत काढला.

प्रतीक्षागृह बघता बघता भरून गेले, बहुतकरून भारतीय प्रवासी त्यामुळे भारतातच असल्यासारखे वाटत होते. सगळीकडे आपल्याच वर्णाची माणसे.

इतक्यात काऊंटरवरून घोषणा झाली, 'प्रवाशांची हातातील पिशवी ह्याच मापाची असावी. एका पेसेंजरला फक्त एवढेच वजन त्या पिशवीतून नेता येईल.

मोठे सामान बॅगेमधून पाठवावे!' बापरे, आता मात्र आमच्या टेडी बेअरचे काय होणार, म्हणून छातीत धडधडले, टेडी बेअर बिचारे खुर्चीवर बसून, किलकिल्या डोळ्यांनी केविलवाणे होऊन पहात होते. जणू मला म्हणत होते, 'नको रे मला सोडून जावूस! त्या बॅगेबरोबर माझा खुर्दा होईल.' काय करावे सुचेना, मृगयाला टेडी बेअर उचलायला सांगितले, व तिला घेऊन काऊंटरवर गेलो. एक तरुणी तिथे होती, आमचे संवाद... "Madam, we re carrying this Teddy Bear with us!"

"Sorry Sir, you are not supposed to carry it. I am afraid you will have to urrender it to us. We will send it in the baggage comprtment."

"Oh no!" तो पर्यंत मी मृगयाला मराठीत चेहरा गंभीर आणि रडवेला करण्यास सांगितले.

"Madam, my daughter has won it, she does not want to leave it. She says 'Put e in the baggage, but dont put the bear there.' Now what to do? Show me the ay please."

ती ही थोडा वेळ विचारात पडली. शेवटी म्हणाली, "See I cannot ive you assurance, but I will see that you get through."

"Thank you, Thank you madeam" मृगयाही चटकन् थ्यँक यू म्हणाली!

विमानात बसण्याची घोषणा झाली. चटकन् विमानात शिरावयाच्या बोगद्याजवळ धाव घेतले. आम्ही मद्याशी मस्का लावलेल्या ह्या तरुणीने आम्हाला चटकन् आत सोडले. नाहीतरी परदेशामध्ये बहुतेक एअरपोर्टवर १२ वर्षाखालील मुले सोबत असलेल्या पालकांना विमानात बसण्याची संधी प्रथम दिली जाते. मद्याच्या बाटल्या, रिसीट दाखविल्यावर, अगदी गेटजवळ मिळाल्या, विमानात शिरल्यावर आधी आमच्या सीटस् शोधून काढल्या. बाप रे! मधल्या भागातील चार सीटस् मिळाल्या होत्या. समोर, चार रांगा सोडून सिनेमाचा पडदा! चटकन वर पाहिले. आमच्यासाठी असलेली सामान ठेवावयाची जागा फारच लहान - त्यामानाने खिडकीजवळ मोठी! चटकन तिथल्या सामान ठेवण्याच्या जागेत टेडी बेअरला ढकलले, थोड्या वेळात विमान भरून गेले. खिडकी जवळचे पॅसेंजर आले. त्यांनी त्यांच्या वरचे कम्पार्टमेंट सामान ठेवण्यासाठी उघडले. टेडी बेअरला पाहिल्यावर त्याचा मालक कोण म्हणून विचारू लागले. मी त्याना विनंती केली, की ते टेडी बेअर आहे. फार नाजूक

आहे. तुम्ही तुमचे सामान आमच्या कम्पार्टमेंटमध्ये ठेवाल का?'' विनंती मान्य झाली. टेडी बेअरची सोय झाली!

आता एक नवीनच प्रश्न उभा राहिला. विमानाचे पर्सर निग्रो. एक जवळ आला, व पायाखाली एवढी मोठी पिशवी ठेवता येणार नाही म्हणून हुज्जत घालू लागला. तिथेही डोके चालवून, एका पिशवीतल्या सामानाचे चार भाग करून प्रत्येकाच्या पायाजवळ ठेवले. प्रश्न सुटला.

फार लांबचा प्रवास होता आता, मध्ये फ्रँकफ्रुटला उतरून दुसरे विमान पकडून मुंबईस उतरणार होतो.

विमानाने घरघर आवाज करण्यास सुरुवात केली. विमानाचे दरवाजे बंद झाले, आणि आमचे जम्बो विमान न्यूयॉर्क विमानतळावरून आकाशात उडाले. समोरच्या पडद्यावर इंग्रजी चित्रपट दाखविण्यात येऊ लागला. जेवण झाले. ज्यूस, कोकाकोला ह्याचे सेवन करीत रात्र घालविली. सकाळी विमान फ्रँकफ्रुटला उतरले.

फ्रॅंकफ्रुटहून पुढे दुसरे विमान घ्यावयाचे होते. त्या विमानाला दोन तास अवकाश होता. पुन्हा टेडी बेअरची चिंता होतीच!

फ्रॅंकफ्रुट हे पश्चिम जर्मनीतील मोठे शहर. युरोपला मध्यवर्ती ठिकाण. येथून पॅरीस, लंडन सर्व काही जवळ. खरे म्हणजे आम्हाला लंडनला उतरून युरोपची सहलही करता आली असती पण वेळेचे बंधन होते, फ्रॅंकफ्रुटचे विमानतळावरूनच दर्शन करून पुढच्या विमानात बसलो.

ह्या विमानातही पुन्हा मधल्या चार सीटस् मिळाल्या. समोरच्या पडद्यावर वर सिनेमा सुरू झाल्यावर पलीकडचा सतरा-अठरा वर्षांचा एक गोरा मुलगा चुळबुळ करू लागला. एअर होस्टेसचे लक्ष नसले की तो तिच्या रूममधून कोकाकोलाचे कॅन आणून सराईतपणे स्वत:च्या हँडबॅगमध्ये भरत होता. मी त्याला ते करताना पाहिले, आणि विचारले, ''काय रे बाबा, तू कुठला?'' तो आपल्या भारतातलाच निघाला. पाँडेचरीजवळ अरूविलेमध्ये रहातो म्हणाला. त्याचे आई-वडील जर्मन पण त्याचा जन्म भारतात झाल्यामुळे त्याने कोकाकोलाचे कॅन बॅगमध्ये भरून आपल्या संस्कृतीची चुणूक दाखविली होती. मी त्याला माझी सीट दिली व मी त्याच्या सीटवर बसलो.

भारतीय संस्कृतीचे दर्शन सर्वत्र होऊ लागले होते. एवढ्या प्रवासा नंतर प्रथमच एवढी अस्वच्छता आढळली. टॉयलेट टिश्यू पेपरने भरले होते.

टॉयलेटच्या आसपास बाहेरपर्यंत पाणी उडाले होते, विमानात अतोनात बडबड चालू होती. त्यामुळे आम्ही भारताच्या जवळ येत आहोत हे ध्यानांत येत होते.

माझ्या बाजूला ५५-६० वर्षाचा एक देखणा भारतीय बसला होता. मी त्याच्याशी बोलणे सुरू केले. तो अमेरिकेत सेटल झालेला भारतीय होता. मला वाटत होते बहुतेक इंजिनीअर, डॉक्टर किंवा मोठ्या पदावरील अधिकारी असावा. पण त्याची कथा वेगळीच!

हा स्मार्ट मनुष्य त्याच्या ऐन उमेदीत, दिल्लीत एका हॉटेलात कपबश्या विसळायला होता! १९६८ मध्ये म्युनिच येथे ऑलिम्पिक गेमस् व्हावयाचे होते, ते पहावयास जाण्याची ह्याची दांडगी हौस होती. मित्राकडून व जवळच्या वस्तू विकून पैसे गोळाकरून हा म्युनिचला पोहोचला. तेथे गवंडी कामावर जास्त पैसे मिळत होते. तेव्हा गवंडीकाम करून पैसे मिळविले. तिथेच एका अमेरिकन निग्रो मुलीशी त्याचे प्रेम जुळले. ती त्याला अमेरिकेला घेऊन गेली. तेथे त्यांनी लग्न केले. रस्त्यावर कपडे विकण्याचा धंदा पहिल्यांदा न्यूयॉर्क मध्ये सुरू केला. मग लॉस एन्जिल्सला आला, धंदा वाढला. न्यूयॉर्कला घर घेतले. आतां हाँगकाँग, जपान वरून तो अमेरिकेत घड्याळे वगैरे आयात करतो. तरीही दर दोन वर्षांनी भारतात येऊन आपल्या नातेवाईकाना भेटून जातो. माणसांचे नशीब आणि जिद्द बघून कमाल वाटली.

"अमेरिकेतील गोऱ्या लोकांनी तुम्हाला बाहेर काढले तर?" मी विचारले.

"ह्या अमेरिकेत गोरे काय आणि काळे काय - सर्वच बाहेरच्या देशातून येऊन इथे स्थायिक झालेले आहेत. अमेरिकेचे खरे रहिवासी म्हणजे रेड इंडियन! बाकीचे सर्वच उपरे, कोण कोणाला काढणार?"

विमान आखाती प्रदेशावरून चालले होते. खिडकीजवळ जागा नसल्यामुळे बाहेरचे काही दिसत नव्हते. पण रात्रीच्या वेळेस तर, तेलाच्या विहिरींचा पेटणारा गॅस अंधारात लुकलुकताना दिसतो म्हणतात. हळूहळू डोळे मिटू लागले. आता दोन-तीन तासात मुंबई येणार. माझी मायभूमी - माझी मुंबई! मुंबईवर पाय ठेवण्यास उत्सुक झालो होतो. माझे नातेवाईक, माझे मित्र, माझे पेशंटस् सर्वच माझी उत्सुकतेने वाट पहात असतील.

पण ही सर्व माणसे माझी कोण? मला प्रेम देणारी की मला पैसा व प्रेम दोन्ही देणारी! ह्या सर्व प्रवासात शेवटी काय उपयोगास आले? उपयोगास आले ते फक्त हृदयातील प्रेम! ह्या प्रेमाची शिदोरी मला फार फार उपयोगी पडली

मराठी ग्रंथसंग्रहालय दादर

होती. आयुष्यात ह्या शिदोरीवरच तर मी जगतो आहे. कधी कधी मला अगदी मनापासून वाटते की आयुष्यात पैशाची गरज नसती तर मला मनसोक्त प्रेम मिळविता आले असते! प्रेमाचे पारडे पैशा पेक्षा केव्हाही जड! तसे नसते तर मी इतक्या ठिकाणी, कसा फिरू शकलो असतो? काही ठिकाणी नातेवाईकांनी, काही ठिकाणी पेशंटस्‌नी तर काही ठिकाणी पेशंटस्‌च्या नातेवाईकांनी - स्वतः अडचणी सोसल्या, पण मला काहीही कमी पडू दिले नाही. ह्या हृदयाचे धागे असे काही अद्‌भुत गुंतवले आहेत की ह्या धाग्यांच्या आधाराने मी इतका फिरून आलो. ह्या धाग्यांच्या हिंदोळ्यांवर मी झुललो, मी फुललो!

माझ्या आयुष्यात माझे जे एक स्वप्न होते ते मी पूर्ण केले होते. ऐश्वर्य पाहिले, निसर्ग सौंदर्य पाहिले, माझ्या आवडत्या मोटारी पाहिल्या, अफाट रस्ते पाहिले, खरे तर मुंबईहून निघताना, माझा मित्र - विजय देशपांडेने सांगितले होते की लोकांनी कितीही आश्वासने दिली असली तरी लोकांवर विसंबून राहू नकोस! आयत्या वेळेस कोणीही मदत करीत नाहीत. पण माझे भाग्य, की मला आयुष्यात सर्वजण असे काही भेटले की त्यांच्यामुळे माझा हा प्रवास - मुलाबाळांना घेऊन - सुखाने झाला. टोकिओ सारख्या महागड्या शहरात जर देशमुखांनी माझे आदरातिथ्य केले नसते किंवा होनोलुलूला डॉक्टर रेळे भेटले नसते तर... अमेरिकेतल्या किती मंडळींची नांवे घ्यावीत? त्या सर्वांच्या प्रेमाचे वर्णन करण्यास खरोखरच माझ्याजवळ शब्द कमी आहेत. हे सर्व प्रेम मला माझ्या व्यवसायामुळे मिळते म्हणून तर आयुष्याचा आनंद मी लुटू शकतो आहे.

परदेशात, विशेषतः अमेरिकेत मी एक वेगळेच कौटुंबिक जीवन जवळून पाहिले. मुलाबाळांना त्यांच्या पालकांचे प्रेम पाहिजे तसे मिळत नाही. मूल सहा महिन्यांचे झाले की त्याला वेगळ्या खोलीत झोपविण्यात येते. आईच्या कुशीत अथवा आईच्या मांडीवर झोपण्याच्या सुखापुढे जगातील बाकी सर्व सुखे तुच्छ आहेत, पण इकडची मुले ह्या सुखापासून वंचित रहातात. भोकांड पसरले असता आईकडून मिळणारा धपाटा आणि आईने त्राग्याने काढलेले उदगार हे तिच्या मायेपोटीच काढलेले असतात. पण हे सर्व इकडच्या हाय- सोसायटीत पहावयास मिळत नाही. मुलांना धीट व स्वावलंबी बनविण्यासाठी अमेरिकन उपाय वेगळे, आणि आपल्याला जरी ते पटले नाहीत तरी त्या उपायांचीही गरज आहेच की.

पण ह्या सर्वामुळे अमेरिकन मुले फार पुढे गेलेली आहेत. सोमवार ते शुक्रवार शाळा कॉलेजात, आणि वीक एन्डला मित्रांबरोबर पिकनिक व पार्टी,

तेव्हा आईबापांबरोबर सहवास मिळणे कमी - मग प्रेमाची काय कथा! आई वडील आणि मुले जरी एकाच पार्टीला गेली असली तरी मुलांचा वेगळा ग्रुप असतो. सकाळी उठून सर्व आपआपल्या कामावर निघून जातात! मुले स्वतःचे डबे स्वतः भरून घेऊन शाळेला जातात, वीक एंडला घरातील कामे वाटून घेतलेली असतात मुलांनी. फरशी साफ करणे, हिरवळी वरील गवत कापणे, स्वतःची गाडी धुणे आणि स्वतःचा पोहण्याचा तलाव असेल तर त्याचा पी. एच. पाहून पाणी बदलण्यापर्यंत अनेक कामे करावी लागतात. मुले अगदी लहान असली तर एकतर पाळणाघरात ठेवली जातात नाहीतर भारतातून मुलांच्या आजी-आजोबांना बोलावून बाळंतपणापासून सर्व जबाबदारी त्यांच्यावर सोपविली जाते. अमेरिकेत किंवा इतर कोणत्याही देशात मोलकरीण किंवा इतर कोणीही, कोणत्याच कामांसाठी मिळत नाही.

अमेरिकेत किंवा कॅनडात रहाणारी मराठी माणसे ही बहुतांशी हुशार आणि बुद्धिजीवी आहेत. अमेरिका व कॅनडात जाण्यासाठी पुरुषाना जे कर्तृत्व दाखवून द्यावे लागते ते स्त्रियांना मात्र दाखवावे लागत नाही! कारण एखादी मुलगी सुंदर असेल किंवा तिने इतर गुणांनी जर विवाहोत्सुक परदेशातील मुलावर छाप पाडली तर केवळ पंधरा दिवसात अथवा महिन्याभरात ती तिचे भविष्य बदलू शकते.

गुजराथी व मराठी माणसात एक फरक आहे. एक गुजराथी अमेरिकेस गेला की त्याच्या सर्व कुटुंबियांना तो तेथे घेऊन जातो, मग ग्रोसरी शॉप पासून कोणताही उद्योग करण्यास तो तयार!

अनेक मराठी लोक हे शहरापासून लांब रहातात. मुंबईत किंवा भारतात आपण शहराच्या मध्यभागी रहाणारे - म्हणजे मलबार हिल भागात रहाणारा - जास्त श्रीमंत समजतो. पण अमेरिकेत ज्यांना जाण्यायेण्याचा गाडीसाठी पेट्रोलचा खर्च परवडत नाही, ते शहराच्या मध्यभागी रहातात. म्हणून न्यूयॉर्क, शिकागो वा इतर मोठ्या शहरात निग्रोंची वस्ती शहराच्या मध्यभागी आढळते. शहरापासून थोडे लांब राहिले तर सुंदर बंगला घेता येतो. त्यामुळे बहुतेक लोक शहराच्या बाहेरच वास्तव्य करून आहेत.

सगळ्यांचे बंगले सुंदर. पुढे मागे हिरवळ - मुलांसाठी खेळण्याची जागा वगैरेनी सुसज्ज. मोलकरीण हा प्रकार नसल्यामुळे घरात ऑटोमॅटिक मशीन आवश्यक - वॉशिंग मशीन, डिश वॉशर, मायक्रो ओव्हन प्रत्येक घरात असतोच. कचऱ्यासाठी 'गार्बेज बॅग्ज' विशिष्ठ काळ्या रंगाच्या, गार्बेज डे च्या

दिवशी बंगल्या समोर बांधून ठेवावयाच्या. कचरा नेणारी गाडी त्या बॅग्ज घेऊन जाते. अमेरिकेत किंवा कॅनडात वॉशिंग डे, गार्बेज डे, मॉमस् डे वगैरे अनेक प्रकारचे दिवस पाळले जातात. गार्बेजमध्ये सुद्धा विरघळणारे डबे व प्लास्टिक एका पिशवीत व बाकी कचरा दुसऱ्या पिशवीत ठेवावे लागतात. वर्तमानपत्रे जाडजूड, पण थोडेबहुत चाळून गार्बेज मध्ये जातात. आपल्यासारखे तिकडे रद्दी विकावयास कोणी जात नाही.

घरे सर्वत्र लाकडाची. चालताना आवाज येऊ नये म्हणून सर्व ठिकाणी कार्पेट वापरलेले असते. घराला सेंट्रल एअर कंडिशनिंगची सोय, त्यामुळे हिटींग अथवा कूलींग दोन्ही करतां येते. नवीन बंगला बांधून हवा असेल तर त्याचे एक मॉडेल प्रथम फर्निचरसकट उभारले जाते, शेवटी ते मॉडेल विकले जाते! बांधकामासाठी लाकडाचा वापर करीत असल्यामुळे घरे भरभर उभारली जातात.

टिश्यू पेपरचा उपयोग जास्ती. तोंड पुसण्यापासून ते शौचविधीसाठीही.

अमेरिकन आणि कॅनेडियन लोकांना भांडी फार प्रिय! शोकेसमध्ये भांडी, घरात शोपीस म्हणून भांडी, आंघोळीला भांडी (टब) आणि संडासासाठीही भांडी (कमोड), काही अपवाद सोडले तर पाहुणे गेल्यावर यजमानांचा जीवसुद्धा भांड्यात पडतो. नवरा बायकोत खटके उडाले तरी भांड्याला भांडे लागत नाहीत. तसेच वाटले तर चटकन् घटस्फोट! आपल्याकडे त्याउलटे. कितीही भांडणे झाली तरी घटस्फोट नाही!

मोटारगाड्या बहुतेक सर्वांकडे असतातच, आणि त्याही सुंदर! मुलांना सोळाव्या वर्षी ड्रायव्हिंगचा परवाना मिळू शकतो.

आहाराच्या बाबतीत अतोनात काळजी. चीझचा अतिशय वापर! लो-कॅलरी, कोलेस्टोरॉल फ्री वगैरे जेवणात अनेक चरबीयुक्त प्रकार वापरले जातात. लहान मुलांना देखील अंड्यात कोलेस्टोरॉल असते म्हणून जास्त अंडी खाऊ दिली जात नाहीत. त्यामुळे लहान मुले आवश्यक त्या जीवनसत्वांना व प्रोटीन्सना मुकतात. जेवताना आपला नवरा किती आणि काय खातो याकडे बायकोचे बारकाईने लक्ष! स्वत:चे वजन करणे हा छंद! जॉगिंग करून प्रकृती तंदुरुस्त ठेवण्यासाठी रस्तोरस्ती हाफपँट घालून लोक पळताना दिसतात. जॉगिंग केव्हाही करतात, दिवसा, रात्री केव्हाही. सर्वसाधारण अमेरिकन स्थूल वाटतात.

मराठी माणसांच्या घरात बहुतेक कालनिर्णय कॅलेंडर असते. घरातली खरेदी बहुतेक इंडियन ग्रोसरी शॉप मधून केली जाते. तिथे तूर डाळीपासून बेडेकर मसाल्यापर्यंत सबकुछ मिळते. भारतीय संगीताबद्दल नव्या पिढीला आवड आहे. गझलची अत्यंत आवड!

पुरुषांचा पोशाख, कामाच्या वेळी टाय व सूट. एरवी नाईट ड्रेस. घरगुती कामे करताना वा जॉगिंगसाठी हाफपँट-टी शर्टमध्ये! स्त्रिया ऑफिसला जाताना जीन्स् घालून, पण घरामध्ये सुटसुटीत पंजाबी ड्रेसमध्ये. इंडियन क़ार्यक्रम असेल तर साड्या नेसून हजेरी!

अमेरिका - कॅनडाला भेट देण्यासाठी सोयीचे दिवस म्हणजे मे ते ऑगस्ट हे दिवस. सप्टेंबर ते फेब्रुवारी कडक थंडी आणि बर्फ. मे ते ऑगस्ट वसंतऋतू त्यामुळे सृष्टीसौंदर्याची लयलूट! त्याचप्रमाणे दिवसही मोठा असतो. पहाटे ५ पासून रात्री ९।। पर्यंत सूर्यप्रकाश असतो. हवामान उत्कृष्ट! आजारी पडण्याचे चान्सेस फार कमी. कितीही आईसक्रीम अथवा थंडपदार्थ खाल्ले तरी सर्दी होत नाही. हवामानाचे अंदाज रेडिओवरून सतत प्रसारीत होत असतात. त्यामुळे प्रवास करताना फायदा होतो. येणारे वादळ वा पाऊस याची सूचना मिळू शकते.

परदेशात विशेषत: अमेरिका-कॅनडा टी. व्ही. जवळ जवळ २४ तास! ४० ते ५० चॅनेल्स असतात. जुन्या इंग्रजी चित्रपटांपासून ते अत्याधुनिक शास्त्रावर आधारित कार्यक्रम वेगवेगळ्या चॅनेल्सवर सुरू असतात. मुलांसाठी वेगळे कार्यक्रम. स्त्रियांसाठी वेगळे कार्यक्रम, कार्यक्रम पाहून नवी अमेरिकन पिढी कुठे चालली आहे ह्याची कल्पना येते. बातम्या सतत. बातम्यांमध्ये सुद्धा खून, दरोडे, बलात्कार, जाळपोळ ह्या बातम्यावर जास्त भर. बातम्यांमध्ये दर पाच मिनीटांनी जाहिराती! त्यामुळे बातम्या पहाताना कंटाळा येतो. रेडिओचा उपयोग इकडे जास्त, विशेषकरून मोटारीमध्ये रेडिओ असतोच. शिवाय टेपरेकॉर्डरही असतोच. रेडिओवर हिंदी-ऊर्दु भाषिकांसाठी वेगवेगळे कार्यक्रम असतात.

अमेरिकेत बेसबॉल आणि बास्केटबॉल हे लोकप्रिय खेळ! ह्या खेळांचे प्रक्षेपण टी. व्ही. वर सतत. शिवाय जोडीला वॉटर पोलो, स्कीईंग वगैरे असतातच.

शिष्टाचारांच्या बाबतीत जगात वेगवेगळे अनुभव आले. पण अमेरिकन लोक मंदस्मित करून ओळख नसली तरी ओळख देतील! हाय आणि गाय हे आवडते शब्द सारखे कानावर पडत असतात.

अमेरिकेन व कॅनडात राहणाऱ्या मराठी माणसांचा देवावर विश्वास आहे. संकष्टी, चतुर्थी वगैरे अजून तरी पाळल्या जातात. सत्यनारायण पूजा होतात. हा भक्तिभाव पुढील पिढीत टिकून राहील किंवा नाही ह्याबद्दल शंका वाटते.

अमेरिकेत मुलांवर फार वेगळेच संस्कार घडविले जातात. त्यामुळे शाळेतील मुलांना १२ व्या किंवा १३ व्या वर्षी सेक्स एज्युकेशन दिले जाते. टी. व्ही. वर बलात्कार, खून, व इतर टीन एजर्स मॉम सारखे कार्यक्रम असतात. सेक्स एज्युकेशन लवकर घेतल्यामुळे त्याचे प्रयोग मुलंमुली करतातच. म्हणून १६ व्या वर्षी व्हर्जिन रहाणे हा कमीपणा समजला जातो. २० व्या वर्षाला येईपर्यंत मुलांनी आयुष्यांतील सर्वकाही उपभोगलेले असते. त्यामुळे हनिमूनचे नाविन्य व मजा त्यांच्या आयुष्यात उरलेली नसते. ऐन उमेदीत, विसाव्यावर्षी आयुष्यातील सर्व अनुभव घेऊन झाल्यामुळे अमेरिकन तरुण मनाने म्हातारा झालेला असतो. त्यामुळे मग नेहमीच्या चाकोरीबद्ध आयुष्याला कंटाळून त्यातून बाहेर पडण्यासाठी अनेक धाडसे करतो, मग ती धाडसे वाईट असोत की चांगली! मगिंग, पुशिंग हे प्रकार सर्रास चालतात.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांच्या आजच्या पिढीला भारताबद्दल अतोनात प्रेम. त्यामुळे कोणी भारतीय पाहुणा आला की त्याच्याबद्दल आपुलकी असते. आपल्या देशात काय चालू आहे त्याची येथे महिना महिना खबर नसते. जी माहिती मिळते ती पत्रव्यवहारामुळे किंवा आमच्या सारख्या पाहुण्यांमुळेच! यापुढच्या पिढीला मात्र भारताबद्दल प्रेम रहाणे शक्य वाटत नाही. कारण त्यांचा जन्म अमेरिकेतला तेव्हा तीच त्यांची मातृभूमी!

अनेक भारतीयांना आपल्या देशात परत येऊन स्थायिक होणे शक्य होणार नाही, कारण कितीही मेहनत केली तरी त्याचा मोबदला आपल्या देशात मिळेलच असे नाही. परदेशात अधिक मेहनत-अधिक मोबदला, शिवाय त्याबरोबर तिकडचे ऐश-आरामाचे आयुष्य जगावयास मिळते. आपल्याकडील हवामान, संप, ऑफिसची गैरसोय, किंवा उद्योग धंद्यात आणल्या जाणाऱ्या अडचणी ह्यामुळे भारतीय माणूस पुन्हा इकडे येण्यास फारसा उत्सुक नसतो. त्यांची मुले तर ह्या वातावरणात रहाणे अशक्य आहे. आपल्या मुलांना शक्यतो भारतीय वर अथवा वधू मिळावी अशी काहींची इच्छा असते. तरीही अमेरिकेत जन्मलेली मुलगी भारतात येऊन रूळणे कठीणच वाटते.

मायभूमीबद्दल प्रेम वाटून येथील भारतीयांनी भारतात परत यावयाचे ठरविले तरी त्यांना अनेक कर्जे असतात. अनेक संसारोपयोगी वस्तू, मोटार,

बंगला हे कर्जाने घेतलेले असतात, ही कर्जे एकदम फेडून भारतात परत येणे हे त्यांना अशक्य आहे.

विमानाची घरघर चालू होती. टॉयलेटस् जवळ गर्दी वाढत होती. मुंबई येणार म्हणून मी आनंदलो होतो. मृगया-सलील आता कोणकोण मित्र मैत्रिणी भेटणार व त्यांना काय काय सांगायचे ते ठरवीत होते.

"काय गं, आपणही कुठे परदेशात स्थायिक झालो असतो तर?" मी सुनीलाला विचारले.

"दुसरीकडे कशाला स्थायिक व्हायचे? आपण आहोत ते बरे आहोतच की" खरंच, माझ्या मनातलं बोलली माझी बायको! शेवटी काय- माझा देश माझी माणसे, सर्व काही माझेच! अगदी मुंबईच्या गर्दीपासून ते वाहत्या गटारापर्यंत! रस्त्यावरची घाण, गोंगाट, लोकलमधली धक्काबुकी, बससाठी धांवणे, इतकेच काय चाळीतला शेजारी सुद्धा-माझाच! ही माणसे काही झाले की चटकन् धावून येतात. भांडतात, शिव्या देतात पण शेवटी अडचणीला उपयोगीही पडतात. तसे परदेशात वाटले नाही. अमाप ऐश्वर्य, आराम जीवन, सर्व काही तिथे आहे, पण एकमेकांबद्दल प्रेम-आदर त्यामानाने कमी. आणि असणार कसा? त्यांच्याकडे काही आपल्या सारखी माणसे चाळीचाळीत कोंबून रहात नाहीत. शेजाऱ्याचा खून झाला तरी कोणी धावून जाणार नाही. आजारी पडला, तर मदत करणार नाही. आमचा भारत देश जरूर गरीब आहे पण माणुसकी आणि आपुलकी अजूनही आपल्या देशात तग धरून आहे. कदाचित दिवस बदलतील! आपणही पाश्चात्य जीवन पद्धती अवलंबून, एकमेकांस विसरायला लागू. आपल्या देशात जोपर्यंत माणुसकी व प्रेम आहे तो पर्यंत माझ्या सारख्या अनेकांना आपल्या देशाबद्दल प्रेम वाटत राहील.

●●●

'आमची आवडती लाडकी मुंबई'

"अहो, हे बघा! लाईट दिसू लागले, मुंबई आली." सुनीला म्हणाली. इतक्यात अनाऊंसमेंट झाली. मुंबई जवळ आली. बेल्ट बांधून तयार झालो. आमच्या मुंबईत उतरण्यासाठी विमानाने हळूहळू सहारच्या धावपट्टीवर चाके टेकविली, आणि उतरताच आमच्या मुंबईच्या जीवनाचे दर्शन होऊ लागले. इतके दिवस परदेशातील सुंदर एअरपोर्ट पाहण्यास आमच्या नजरा सरावल्या होत्या. चुन्याने रंगवलेल्या भिंती असलेला आपला एअरपोर्ट, त्यावरचा मळकट खाकी ड्रेसमधील पोलिस आणि अनाऊन्सवर ओरडणारा काऊंटरवरचा अधिकारी ह्या सर्वांची पुन्हा भेट झाली. पासपोर्ट तपासताना साधे स्मित हास्य ही चेहेऱ्यावर नाही!

अहो आम्ही परत सुखरूप आलोय पृथ्वीप्रदक्षिणा करून!

मृगया, सुनिला मी व सलील

● आठवणी दाटतात

बॅगेज क्लेम जवळ गेलो! माय गॉड! एअरपोर्टवरील एअरकंडिशनिंग बंद! चक्क घामाच्या धारा! बॅगेज साठी एका पट्ट्याजवळ आमच्या विमानाचा नंबर लागला. अर्धा पाऊण तास झाल्यावर मग दुसऱ्या ठिकाणी लागला! परत धावपळ! साधारण दीडतास बॅगेज ताब्यात घेण्यासाठी लागला. होनोलुलूच्या विमानतळावरची हसून स्वागत करणारी महिला अधिकारी आठवली. बॅगेज क्लेमजवळ पोहोचण्याआधी आमच्या बॅगा पोहोचलेल्या. शिकागो एअरपोर्टची आठवण झाली. सर्व काही डोळ्यासमोर चटकन तरळून गेले. इकडे विमानतळावरील अधिकारी तर तक्रार ऐकूनही, न ऐकल्या सारखे करीत होते.

कस्टम चेकिंगसाठी उभे राहिलो, वरून आमचे नातेवाईक हात हालवून आमचे स्वागत करीत होते. उभ्या उभ्या टोकिओच्या देशमुखांची, सान फ्रान्सिस्कोच्या हॉटेल मालकिणीची व प्रवासात भेटलेल्या अनेकांची आठवण आली. शेवटी कस्टम अधिकाऱ्यांची. तपासणीचा कार्यक्रम आटोपायला दोन तास लागले.

आता मला कोणी विमानातील पट्टे बांधायला सांगणार नव्हते. मागे वळून एअरपोर्टकडे पाहिले. का कुणास ठाऊक, दरवाजावर पाय थबकले आणि पाहिले तर काय? प्रेमाचा हात पुढे करून अनेक बेल्टस् माझ्या हृदयाला शोधीत होते. हा बेल्ट कधी न सोडता येणारा होता. माझ्या नातेवाईकांच्या आणि माझ्या पेशंटस्च्या प्रेमांचा!

गाडीत बसलो घरी येण्यासाठी, आणि अचानक पुन्हा सुमती टिकेकर नजरेसमोर आल्या. आठवणींच्या दाराआडून गाणे गुणगुणत, "आठवणी दाटतात धुके जसे पसरावे...

REFBK-C027378

REFBK-0027378

●●●